# अर्थसंवाद

खंड 19, अंक 4

जानेवारी-मार्च 1996

भारतीय सौर पौष-फाल्गुन 1917

- ऊस किंमत धोरण
- वित्तीय क्षेत्रातील सुधारणा
- शेतीतील उच्च तंत्रवैज्ञानिक अभिवृद्धी क्षेत्रे
- आंतर-राज्य आर्थिक विषमता
- आर्थिक विकास आणि पर्यावरण
- आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 19, अंक 4 जानेवारी–मार्च 1996

[illegible]

रवीन्द्र दोशी

[illegible]

सु. गो. भानुशाली

[illegible]

पुरुषोत्तम पाळंदे
भालचंद्र मुणगेकर
अंजली कुलकर्णी
श्रीराम पेडगांवकर

[illegible]

रवीन्द्र दोशी,
प्राध्यापक व विभाग प्रमुख,
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर–416 004
दूरध्वनी (निवास)
[ 0231 – 656963 ]

## अनुक्रमणिका

[illegible]
शि. ना. माने
[illegible]
विनायक श्रीधर देशपांडे
320 मराठी अर्थशास्त्र परिषदेची वार्षिक अधिवेशने
325 आर्थिक वार्ता
रवीन्द्र दोशी
[illegible]
सु. गो. भानुशाली
[illegible]
शं. के. मोडक / मुक्ता वि. जहागिरदार /
व्यं. सु. पाटणकर / रवीन्द्र दोशी / गुलाबराव ताथडे
[illegible]
कुमुद पोरे / दि. व्यं. जहागिरदार / सु. गो. भानुशाली

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ

**( 1995–96 )**

**अध्यक्ष**

शि. ना. माने

**कार्याध्यक्ष**

नलिनी पंडित

**कार्यवाह–खजिनदार**

गुलाबराव तायडे

**प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**

रवीन्द्र दोशी

**सदस्य**

उत्तम वाकोडकर
अर्जुन पाटील
विजय साठे
सुधाकर कुलकर्णी
बन्सीभाई चौधरी
अनिल सूर्यवंशी
शिवाजी पाटील
रमेशचंद्र बेराड
दिलीप पाटील
बाळकृष्ण कुलकर्णी
ज्योत्स्ना राजपूत
मुक्ता जहागिरदार

■ **कार्यालयीन पत्रव्यवहार :**

(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे इत्यादी)

**डॉ. आ. गो. पुजारी,**
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
किल्ला भाग, **मंगळवेढा** 413 305
(जिल्हा मंगळवेढा)

■ **परिषदेचे प्रमुख कार्यालय :**

मराठी अर्थशास्त्र परिषद,
द्वारा / सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई 400 014.

■ **वर्गणी :**

**(अ) परिषदेचे सदस्य**

( 1 ) आजीव सदस्य : रु. 600 ( एकरकमी )
( 2 ) साधारण सदस्य : रु. 100 ( वार्षिक )
( 3 ) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 100 ( वार्षिक )
व्यावसायिक संस्था : रु. 150 ( वार्षिक )

[ * परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो. ]

**(आ) 'अर्थसंवाद' वर्गणीदार**

ग्रंथालये : रु. 100 (वार्षिक)

(इ) **वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च.

** वर्गणी डिमांड ड्राफ्ट / मनी ऑर्डरने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे मंगळवेढयाला पाठवावी.

■ **'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार :**

( 1 ) पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई.

( 2 ) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

**(टीप :** म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकामधील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यालयीन व्यवस्थेतील बदल

दिनांक **1 एप्रिल, 1996** पासून मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह–खजिनदार म्हणून मंगळवेढा (जि. सोलापूर) येथील **डॉ. आ. गो. पुजारी** हे काम पाहणार आहेत. त्यामुळे या तारखेपासून परिषदेच्या कामासंबंधी तसेच 'अर्थसंवाद'ची 1996–97 ची वर्गणी पाठविण्यासाठी नव्या कार्यवाह-खजिनदारांच्या पुढील पत्त्यावर संपर्क साधावा :

डॉ. आ. गो. पुजारी,
किल्ला भाग, **मंगळवेढा** (जिल्हा सोलापूर) 413 305
( दूरध्वनी : 02188 – 20556 )

सर्व संबंधितांनी या बदलाची नोंद घेऊन 1 एप्रिल, 1996 पासूनचे सर्व पत्रव्यवहार **मंगळवेढयाच्या** पत्त्यावरच करावा.

**गुलाबराव तायडे**
कार्यवाह – खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## वार्षिक वर्गणी संपली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि 'अर्थसंवाद'चे वार्षिक वर्गणीदार याना आम्ही आठवण करून देऊ इच्छितो की, 'अर्थसंवाद'च्या जानेवारी–मार्च, 1996 या अंकाबरोबर त्यांची वार्षिक वर्गणीची मुदत संपली आहे. त्यानी 1 एप्रिल, 1996 ते 31 मार्च, 1997 या वर्षासाठी आपल्या सदस्यत्वाचे आणि 'अर्थसंवाद'च्या वर्गणीदाराचे नूतनीकरण करून घ्यावे ही विनंती. **ही वर्गणी आता नूतन कार्यवाह-खजिनदार डॉ. आ. गो. पुजारी, मंगळवेढा यांच्या पत्त्यावर पाठवावी; नाशिक येथील पत्त्यावर पाठवू नये.**

**गुलाबराव तायडे**
कार्यवाह – खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## विसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विसावे वार्षिक अधिवेशन ऑक्टोबर / नोव्हेंबर, 1996 मध्ये प्रताप कॉलेज, अमळनेर येथे आयोजित होणार आहे. पुणे येथील निवृत्त प्राध्यापक भ. ग. बापट अध्यक्ष-स्थानी राहतील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आलेले आहेत.

(1) एकोणिसाव्या शतकातील आर्थिक उदारमतवाद आणि तत्कालिन भारतीय अर्थशास्त्र

(2) भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचे स्थान

(3) महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्याचे अर्थशास्त्र

चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. वरील विषयांची रूपरेषा 'अर्थसंवाद'च्या जानेवारी–मार्च 1996 अंकात देण्यात आली आहे.

निबंधलेखकांनी जास्तीत जास्त 2,000 शब्दांत विषय मांडावयाचा असून **निबंधासोबत 300 शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा पाठविल्याखेरीज त्याविषयीचा निर्णय अध्यक्षांकडून पाठविला जाणार नाही.**

निबंध मराठीतच असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे / शैक्षणिक वा अन्य संस्थेचे नाव आणि पत्ता हा तपशील **मराठीतच** देणे आवश्यक आहे.

31 **ऑगस्ट**, 1996 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत :

**प्राध्यापक भ. ग. बापट, ब्लॉक क्र. सी–5, 'पुष्पनगरी', रामबाग कॉलनी, पौड रस्ता, पुणे** 411 038.

**गुलाबराव तायडे**
कार्यवाह – खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

**वार्षिक सदस्य / 'अर्थसंवाद' वर्गणीदार / संस्था सदस्य**

## वर्गणीचे नूतनीकरण

प्रति दिनांक

डॉ. आ. गो. पुजारी,
कार्यवाह– खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
किल्ला भाग, **मंगळवेढा** (जिल्हा सोलापूर) 413 305

महोदय,

मी माझ्या वार्षिक सदस्यत्वाचे / 'अर्थसंवाद' वर्गणीचे / संस्था सदस्यत्वाचे 1996–97 या वर्षासाठी नूतनीकरण करू इच्छितो. त्यासाठीची रक्कम रुपये 100/150 मंगळवेढा येथील बँकेवरील डिमांड ड्राफ्टने सोबत पाठविली आहे. डिमांड ड्राफ्ट **'मराठी अर्थशास्त्र परिषद'** याच नावाने काढला आहे. सदस्यत्वाचा तपशील खाली दिला आहे. तरी कृपया वर्गणी स्वीकारून त्याची रीतसर पावती खालील पत्त्यावर पाठवावी ही विनंती.

आपला विश्वासू,

---

## ( सदस्याचा / वर्गणीदाराचा तपशील )

(१) **नाव व पूर्ण पत्ता :** ____________________
(पिन कोडसहित) ____________________
____________________

(२) **वर्गणीचा प्रकार :** वार्षिक सदस्य / 'अर्थसंवाद' वर्गणी / संस्था सदस्य

(३) **वर्गणीची रक्कम :** रुपये १०० / १५०

(४) **डिमांड 'ड्राफ्ट'चा तपशील :** ____________________
(बँक, क्रमांक, दिनांक) ____________________
____________________

येथे कापा

येथे कापा

पान

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेले कोश व भाषाप्रवेश

| अनु. | कोश | संपादक | किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| (1) | इंग्रजी–मराठी स्थापत्य शिल्पकोश | श्री. रा. वि. मराठे | 15 |
| (2) | उर्दू–मराठी शब्दकोश | श्री. श्रीपाद जोशी<br>श्री. एन. एस. गोरेकर | 50 |
| (3) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2<br>( संस्कृत-संस्कृत ) | पं. वेणी माधवशास्त्री<br>जोशी व पं. ना. ह. जोशी | 50 |
| (4) | आयुर्वेदीय शब्दकोश भाग 1 व 2<br>( संस्कृत–संस्कृत–मराठी ) | ,, ,, | 75 |
| (5) | वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा<br>( वनस्पतीशास्त्र व्याख्यासंग्रह ) | डॉ. गो. रा. परांजपे | 10 |
| (6) | मराठी वाङ्मयकोश खंड 1 | श्री. गं. दे. खानोलकर | 50 |
| (7) | तामिळ–मराठी शब्दकोश | सौ. रमाबाई जोशी<br>श्री. पु. दि. जोशी | 74 |
| (8) | मराठी–कन्नड शब्दकोश | श्री. गुरुनाथ दिवेकर | 74 |
| (9) | गुजराती–मराठी शब्दकोश | श्री. स. ज. धर्माधिकारी | 15 |
| (10) | कन्नड भाषा प्रवेश | श्री. गु. व्यं. दिवेकर | 13 |
| (11) | बंगाली भाषा प्रवेश खंड 1 | श्री. स. ग. सुखटणकर | 16 |
| (12) | बंगाली भाषा प्रवेश खंड 2 | ,, ,, | 16 |
| (13) | मल्याळम भाषा प्रवेश | श्री. रा. बं. जोशी | 28 |

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केंद्रांवर मिळतील.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नी रोड, मुंबई 400 004.

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद 431 001.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार,
बडवे बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना,
पुणे 411 004.

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर 440 001.

# भारतातील ऊस किंमत धोरण (उसाच्या किमतीचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र)*

शि. ना. माने **

## प्रास्ताविक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या एकोणिसाव्या वार्षिक अधिवेशनाचा अध्यक्ष म्हणून आपण माझी अविरोध निवड केली त्याबद्दल मी आपला ऋणी आहे.

'भारतातील ऊस किमतीचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र' हा माझ्या अध्यक्षीय भाषणाचा विषय आहे. प्रस्तुत अध्यक्षीय भाषणाच्या मर्यादित संदर्भात धोरणाभिमुख अर्थशास्त्राची पुढीलप्रमाणे व्याख्या करण्यात आली आहे. लोकानुनयवादी धोरणांची / वचननाम्यांची नावानिशी नसली तरी प्रत्यक्षात मते विकत घेण्यासाठी सर्रास विक्री केली जाते अशी अर्थव्यवस्था. या विषयाच्या निवडीमागील कार्यप्रेरणा थोडक्यात अशी आहे. सॅम्युअल्सन यांनी त्यांच्या 'Economics' (1973) या प्रसिद्ध पुस्तकाच्या पृ. 14 वर 'अर्थशास्त्राचे अध्ययन का करावयाचे'' या प्रश्नाचे उत्तर देताना लॉर्ड केन्स यांच्या 'General Theory' मध्ये अखेरच्या प्रकरणात अखेरच्या परिच्छेदातील 'आकाशवाणीकडे' कान लाऊन बसलेल्या 'अधिकारपदावरील वेड्या माणसांकडे' (madmen in authority) लक्ष वेधले आहे. अशा माणसांकडून शासित आर्थिक जगतात आर्थिक विरूपणे (distortions) आणि उत्पात घडवून आणणारे निर्णय वारंवार घेतले जातात. अशा आर्थिक धोरणांचा परिचय करवून देणे, त्यांचा तार्किक परामर्श घेणे आणि गरजेनुसार अवघ्या समाजाला सावध करणे यासाठी अर्थशास्त्राचे अध्ययन उपयुक्त व मार्गदर्शक ठरते.

गेल्या जवळजवळ सहा दशकात भारतातील ऊस किंमत धोरणाविषयी विविध स्तरांवर अनेक अभ्यास झाले. त्यांना अनुसरून किंवा सोयीस्करपणे बाजूला सारून शासकीय धोरणे कार्यान्वित झाली. त्या धोरणांविषयी अनेक अभ्यासकांनी व समित्यांनी उलटसुलट चर्चा केल्या. त्यांनी प्रेरित (किंवा प्रभावित) होऊन

* मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या पुणे येथील एकोणिसाव्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण.

** अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, सातारा.

याची अर्थशास्त्रीय चिकित्सा करण्यासाठी मी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

## शेतीमाल किमती : कार्ये व मर्यादा

ऊस किंमत धोरणाची चिकित्सा करण्यापूर्वी आणखी एका बाबीविषयी खुलासा करणे जरूर आहे. किंमत सिद्धान्ताची किंवा शेतीमाल किंमत सिद्धान्ताची पुढील तीन प्रमुख कार्ये आहेत·

(अ) साधनसंपत्तीची विल्हेवार ( resource allocation )

(आ) उत्पन्नाचे वाटप

(इ) भांडवलनिर्मितीला उत्प्रेरण[2]

1960–80 या कालखंडात भारतात उत्पादनाच्या किंमत लवचिकतेविषयी काही अभ्यास करण्यात आले. त्या अभ्यासांनुसार निरनिराळी पिके, विशिष्ट प्रदेश यांच्या बाबतीत उत्पादन किंमत लवचिकता भिन्न असल्याचे आढळले. परंतु एका बाबतीत अभ्यासात एकमत दिसून आले. ती बाब म्हणजे कोणत्याच पिकाच्या बाबतीत ती किंमत लवचिकता एककाबरोबर किंवा एककापेक्षा जास्त नव्हती. डी. एस. त्यागी यांच्या एका अभ्यासात (1974) उसाची उत्पादन किंमत लवचिकता तुलनेने बरीच अल्प, म्हणजे 0·34 ते 0·39 या टप्प्यात, असल्याचे स्पष्ट झाले आहे. 1980 नंतरच्या एका अभ्यासात अँलेन डी. जान्वरी व के. सुब्बाराव यांनी असे स्पष्ट केले आहे की, किंमत प्रोत्साहनांपेक्षा ( price incentives ) जलसिंचन व तंत्रवैज्ञानिक बदल उत्पादन / उत्पन्न वाढीच्या बाबतीत जास्त सरस व विश्वसनीय ठरतात. 'आपल्या परिगणनयोग्य सार्वत्रिक समतोल प्रतिमानाच्या' आधारे ते म्हणतात, "आम्ही असे दाखवितो की, अल्पकालात किंमत साहाय्यकारी कार्यकारी कार्यक्रम ग्रामीण व नागरी गरिबांच्या क्रयशक्तीत तीव्र नुकसान निर्माण करून वास्तविक उत्पन्न वितरणाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात परागतिक ( regressive ) असतात. जास्त दीर्घकालातही, किंमत प्रोत्साहनांना उत्पादनाचा प्रतिसाद मिळून, भूमीहीन व नागरी वर्गांची वास्तव उत्पन्ने घटतात. पुरवठा प्रतिसादाची एकत्रिक लवचिकता 0·60 इतक्या वरील पातळीवर असूनही या वर्गाचे नुकसान होत असताना मोठ्या शेतकऱ्यांना पैसारूप ( nominal ) आणि वास्तविक लाभ भरघोस प्रमाणात मिळतात. आम्हाला असा निष्कर्ष काढणे भाग आहे की, प्रोत्साहनांच्या साहाय्याने कृषी उत्पादनाला माफक प्रमाणात उत्तेजन मिळत असले तरी या दृष्टिकोनाचा उत्पादन वृद्धीवरील सामाजिक परिव्यय अतिरिक्त प्रमाणात मोठा असतो."[3]

अशा प्रकारे शेतीमालाच्या एकरी उत्पादन वाढीच्या संबंधात दोन भिन्न दृष्टिकोन मांडण्यात आले आहेत :

(अ) पहिला, किंमत प्रोत्साहनांना अग्रक्रम देणारा पैसावादी दृष्टिकोन

(आ) दुसरा, जलसिंचन सुविधा व तंत्रविज्ञान यांच्या माध्यमातून शेतीत संरचनात्मक बदल घडवून आणणारा संरचनात्मक दृष्टिकोन.

दीर्घकालात, आणि सर्व वर्गांच्या आर्थिक लाभांचा विचार करता, दुसरा दृष्टिकोन पहिल्यापेक्षा सरस आणि जास्त स्वीकारणीय आहे. दुसऱ्या शब्दांत, उत्पादनात माफक प्रमाणात वाढ करणाऱ्या किंमत प्रोत्साहनांवरील ही एक महत्त्वाची मर्यादा आहे. ही मर्यादा विचारात घेऊन आता ऊस किंमत धोरणाचा विचार करू.

## सांविधिक किमान किंमत : धावता मागोवा

1932 चा साखर उद्योग (संरक्षण) कायदा हे भारतातील साखर उद्योग आणि पर्यायाने ऊस उद्योग यांच्या पुढील सहा दशकातील वाटचालीतील एक महत्त्वाचे तलचिन्ह ( benchmark ) म्हणून ओळखले जाते. त्या वर्षात भारतातील साखर उद्योगाला प्रशुल्की ( tariff ) संरक्षण मिळाले. त्या संरक्षणाच्या पोटात, त्या सरक्षणाचा अनुषंगिक किंवा अविभाज्य भाग म्हणून, ऊस उद्योगाचा विचार करण्यात आला होता. त्या कायद्यानुसार ऊस उत्पादकांपेक्षा साखर उत्पादकांनी जास्त लाभ पटकावले. म्हणून प्रांतिक सरकारांना उसाची किंमत निश्चित करण्याचे अधिकार देणारा ऊस कायदा (1934) मंजूर करण्यात आला. कमीअधिक

प्रमाणात ही स्थिती 1950–51 पर्यंत टिकून होती. प्रशुल्क मंडळाने (1950) केलेल्या शिफारसीनुसार 1955 मधील ऊस (नियंत्रण) आदेशाखाली आणि त्यात फेरबदल करून अस्तित्वात आलेल्या 1966 मधील ऊस (नियंत्रण) आदेशाखाली केन्द्र सरकारला किमान किंमत निश्चित करण्याचा अधिकार देण्यात आला.

दरम्यानच्या काळात 1929 मध्ये शाही कृषी संशोधन मंडळाची ( Imperial Council of Agricultural Research ) स्थापना झाली. त्या मंडळांतर्गत एका साखर उपसमितीचीही निर्मिती करण्यात आली. त्या उपसमितीने तिच्या पहिल्याच सभेत साखर उद्योगाला संरक्षण देण्यासाठी प्रशुल्कविषयक चौकशी करण्याची हिंदुस्थान सरकारला शिफारस केली (1931). त्याचवर्षी हिंदुस्थान सरकारने प्रशुल्क मंडळाला संरक्षणाच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याचा आदेश दिला आणि 1932 पासून साखर उद्योग, पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे, प्रशुल्की संरक्षणाखाली आला.

भारतातील उसाची एकरी अल्प उत्पादकता ही गोष्ट जगजाहीर होती. (जागतिक तुलनेत आजही तिच्यात अपेक्षित वाढ झाली नाही.) शिवाय, जागतिक मंदीचा साखर उद्योगावर आघात होईल अशी सरकारच्या मनात भीती होती. उसाची एकरी उत्पादकता वाढविल्याशिवाय साखर उद्योगापुढील संकटावर कायमची मात करता येणार नाही ही गोष्ट निर्विवाद होती. या पार्श्वभूमीवर साखर उद्योगाच्या संरक्षणाचा हेतू स्पष्ट करताना प्रशुल्क मंडळाने आपले मत पुढीलप्रमाणे नोंदले आहे : "संरक्षण नीतीचे सर्वाधिक समर्थ स्वरूप असे आहे की जे ऊस उत्पादकांचा विकास करण्याच्या राष्ट्रीय महत्त्वावर (महत्त्वाच्या कार्यावर) आधारित आहे."[4]

1932 मधील साखर संरक्षण धोरण आणि त्यापूर्वी 1929 मध्ये स्थापन झालेले शाही कृषी संशोधन मंडळ यांचा एकत्रित परिणाम म्हणून 1931-32 ते 1941–42 या कालात उसाखालील क्षेत्रात वाढ झाली. विशेषत: उसाखालील क्षेत्राच्या एकूण वाढीशी सुधारित जातींखालील क्षेत्राच्या प्रमाणात 38 टक्क्यांवरून 77 टक्क्यांपर्यंत वाढ झाली. नक्त परिणाम? ऊस उत्पादनात वाढ झाली आणि उसाच्या किमतीत मोठी घसरण अटळ ठरली. अशा प्रकारे उसाला रास्त (fair) किंमत देण्याचा नवीन प्रश्न निर्माण झाला. तथाकथित रास्त किंमत देण्याविषयी तावडतोब सहमती दिसून आली तरी ती निश्चित करणे आणि तिची प्रत्यक्षात कार्यवाही करणे याविषयी नेहमीप्रमाणे समाधानकारक प्रगती झाली नाही. प्रशुल्क मंडळाच्या अंदाजानुसार 1931-32 मध्ये संयुक्त प्रांतात (आजचा उत्तर प्रदेश) आणि बिहारमध्ये ऊस उत्पादन परिव्यय प्रतिमण अनुक्रमे 4 आणे ते 5 आणे आणि 5 आणे 6 पै असा होता. या परिव्ययाच्या आधारे साखर कारखान्याच्या प्रवेशद्वारावरील उसाची रास्त किंमत प्रतिमण 8 आणे ठरवून दिली. परंतु प्रत्यक्षात कारखान्यांनी ऊस उत्पादकांना दिलेली किंमत अल्प होती (संयुक्त प्रांतात 3 आणे 7 पै आणि बिहारमध्ये 5 आणे). ऊस उत्पादकांचे हे उघडउघड शोषण होते. त्याविरुद्ध काही ऊस उत्पादकांनी विरोध व संताप व्यक्त केला. सिमला येथे साखर परिषद भरली. सिमला परिषदेचा विशेष म्हणजे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा उसाच्या सांविधिक किमान किमतीविषयीचा ( statutory minimum price ) ठराव. या ठरावाचा एक विशेष असा की, येथून पुढील कालात द्यावयाच्या किमान किमतींना सांविधिक आधार मिळाला. आज अस्तित्वात असलेल्या सांविधिक किमान किमतीचे मूळ या ठरावात सापडते.

## प्रमाणित सूत्र

या ठरावाच्या अनुरोधाने व ऊस उत्पादकांचा वाढत जाणारा दबाव ध्यानात घेऊन 1933 मध्ये संयुक्त प्रांत सरकारने उसाची किमान किंमत निश्चित करणाऱ्या एका प्रमाणित सूत्राची ( standard formula ) मांडणी केली. उसाला प्रत्यक्षात दिलेल्या किमतीबरोबर प्रमाणित सूत्रानुसार उसाला देय ( payable ) किंमत देण्याची अपेक्षा करण्यात आली. ते सूत्र पुढीलप्रमाणे होते :

$$C_t = \frac{S_{t-1} + P_t}{200}$$

याठिकाणी –

$C_t$ = कारखान्याच्या प्रवेशद्वारावरील t वर्षातील प्रतिमण उसाची आण्यात किंमत

$S_t$ = t वर्षातील उसाच्या निष्कर्षणाची (extraction) सरासरी टक्केवारी (उसाचा शर्करांश)

$P_t$ = t वर्षात अस्तित्वात असलेली साखरेची प्रतिमण आण्यात किमत.[5]

हे सूत्र म्हणजे उसाची किमान किंमत निश्चित करण्याच्या अधिक वस्तुनिष्ठ मार्गावर टाकलेले पहिले पाऊल होय. परंतु ऊस उत्पादकांच्या दृष्टिकोनातून त्या सूत्रात पुढील दोन ठळक दोष दिसून आले.

(अ) उसाची किंमत साखर उत्पादन परिव्ययावर आधारित ठेवली. विशेष म्हणजे ती साखर उत्पादन परिव्ययाच्या 50 टक्के असते, असे मोघम गृहीत मानण्यात आले. वस्तुतः 1931 मध्ये प्रशुल्क मंडळाच्या अंदाजानुसार ते प्रमाण 66 टक्क्यांच्या आसपास होते. दुसऱ्या एका अभ्यासानुसार ते 75 ते 80 टक्के या टप्प्यात असल्याचा अंदाज करण्यात आला होता. अगदी अलीकडील कालात (1987–88 ते 1992–93) ते 50 टक्क्यांच्या आसपास असल्याचा अहमदनगर जिल्ह्यातील काही कारखान्यांच्या वार्षिक

**तक्ता 1**

**साखर उतारा आणि ऊस दर ***

( उतारा टक्के )
( दर रुपये प्रतिटन )

| कारखाना | | 1987-88 | 1988-89 | 1989-90 | 1990-91 | 1991-92 | 1992-93 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अशोक सहकारी साखर कारखाना | उतारा | 10·57 | 10·21 | 10·21 | 10·34 | 10·68 | 10·63 |
| मर्यादित, अशोकनगर | दर | 270 | 252 | 390 | 425 | 394 | 507 |
| कोपरगाव सहकारी साखर कारखाना | उतारा | 11·30 | 11·03 | 10·90 | 11·09 | 11·33 | 11·91 |
| मर्यादित, कोळपेवाडी | दर | 355 | 340 | 395 | 415 | 405 | 570 |
| पारनेर तालुका सहकारी साखर | उतारा | बंद | 10·09 | 10·27 | 10·42 | 10·80 | 10·79 |
| कारखाना मर्यादित, देवी भोयरे | दर | बंद | 268 | 306 | 375 | 405 | 454 |
| पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील | उतारा | 10·88 | 10·34 | 10·57 | 10·50 | 11·34 | 11·14 |
| सहकारी साखर कारखाना मर्यादित, प्रवरानगर | दर | 295 | 285 | 310 | 360 | 375 | 538 |
| राहुरी सहकारी साखर कारखाना | उतारा | 10·76 | 10·94 | 10·73 | 10·38 | 11·23 | 11·05 |
| मर्यादित, श्री शिवाजीनगर | दर | 283·50 | 300 | 390 | 375 | 375 | 600 |
| संजीवनी (टाकळी) सहकारी साखर | उतारा | 11·60 | 11·31 | 10·93 | 11·43 | 11·86 | 11·23 |
| कारखाना मर्यादित, सहजानंद नगर | दर | 306 | 350 | 405 | 425 | 415 | 580 |
| संगमनेर भाग सहकारी साखर | उतारा | 11·76 | 11·43 | 11·17 | 10 68 | 11·20 | 11·28 |
| कारखाना मर्यादित, अमृतनगर | दर | 376 | 385 | 440 | 415 | 435 | 700 |
| श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना | उतारा | 10·11 | 10·91 | 10·48 | 10·37 | 10.70 | 10·86 |
| मर्यादित, श्रीगोंदा | दर | 306 | 316 | 353 | 395 | 390 | 525 |
| श्रीजगदंबा सहकारी साखर कारखाना | उतारा | 10·36 | 10·53 | 10 56 | 9·96 | 10·21 | 10·62 |
| मर्यादित, राशीन | दर | 240 | 273 | 330 | 307 | 326 | 425 |
| श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना | उतारा | 10·98 | 10·53 | 10·42 | 10·16 | 11·40 | 11·16 |
| मर्यादित, ज्ञानेश्वर नगर | दर | 335 | 335 | 381 | 381 | 425 | 645 |

* सर्व दर कपातीविरहित अंतिम / एकूण दर आहेत.

**स्रोत** : 1987–88 ते 1992–93 या वर्षांचे संबंधित साखर कारखान्यांचे वार्षिक अहवाल.

अहवालांच्या[6] आधारे अंदाज बांधता येतो. याविषयीच्या अगदी अलीकडील आणखी एका अंदाजाचा येथे उल्लेख करणे जरूर आहे. उसाचा 'घोषित वस्तू'त ( declared goods ) समावेश करावा अशी भारतीय साखर गिरणी संघाने (Indian Sugar Mills Association) मागणी केली आहे. हेतू हा की, केन्द्रीय विक्री कराच्या विभाग 14 व 15 खाली राज्यांनी वसूल करावयाच्या उसाच्या खरेदीविक्रीवरील विक्री कर 4 टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही. या मर्यादेत उसाच्या खरेदीविक्रीवरील विक्री कराचा लाभ मिळविण्याच्या संदर्भात भारतीय साखर गिरणी संघाने अशी अप्रत्यक्ष कबुली दिली आहे की, साखर उत्पादन परिव्ययात उसाचा हिस्सा 70 टक्क्यांच्या आसपास आहे.[7] अशा प्रकारच्या ऊस उत्पादन परिव्ययाच्या परस्परविरोधी अंदाजांच्या गदींगोंधळात ( hurly-burly ) प्रत्यक्षातील बिनचूक परिव्यय लुप्त झाला आहे आणि करारातील सवलतींचा लाभ घेताना ऊस उत्पादन परिव्ययाचा मोठा आकडा आणि उसाची किमत देताना त्याचा कमीत कमी आकडा सोयीस्करपणे स्वीकारून कारखाने आपल्या दुटप्पी वर्तनाचे दर्शन घडवीत आहेत. परिव्ययाविषयीच्या संशयाचा लाभ आरोपीला असा हा प्रकार आहे.

(आ) विशिष्ट ऊस गळित हंगामात उसाची किमान किमत एकदा निश्चित केल्यानंतर पुढील हंगाम सुरू होईपर्यंत ती किमत स्थिर असते. दरम्यानच्या काळात साखरेच्या किमतीत वाढ होऊनही तिचा साखर उत्पादकांना जसा लाभ मिळतो तसा तो ऊस उत्पादकांना मिळू शकत नाही. अशी परिस्थिती 1974-75 पर्यंत टिकून होती. 1975 मध्ये साखर उद्योग चौकशी समितीने (भार्गव समितीने) ऊस उत्पादकांच्या संभाव्य नुकसानीची अंशतः भरपाई करण्यासाठी एका तडजोड सूत्राची तरतूद केली. 'भार्गव सूत्र' म्हणून ते ओळखले जाते. त्यानुसार कारखान्यांना मिळालेल्या खुल्या साखरेच्या विक्री प्राप्तीत ( sales proceeds ) ऊस उत्पादकांसाठी समान हिश्श्याची तरतूद करण्यात आली. खुल्या बाजारातील साखरेच्या वाढत जाणाऱ्या किमतींचा विचार करता ही एक रास्त तरतूद होती. परंतु ती तडजोडीची तरतूद तात्पुरती ठरली, कारण राज्य सरकारांनी अनौपचारिकपणे सुरू केलेल्या आणि आजपर्यंत केन्द्राने चालवून घेतलेल्या 'राज्यांनी सुचविलेल्या किमतींनी' (state advised prices) भार्गव सूत्राला नाट्यपूर्ण रीतीने केव्हाच खो दिला. अशा प्रकारे, उसाची किमान किमत निश्चित करण्याच्या मुख्य आख्यानाचे उपाख्यान म्हणून अस्तित्वात आलेल्या राज्यांनी सुचविलेल्या किमतींचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक ठरते. पुढे योग्य ठिकाणी तो केला आहे.

येथे (आ) मधील दोषाचा अधिक सविस्तर विचार करणे अपरिहार्य ठरते. ऊस उत्पादकांच्या दृष्टिकोनातून भार्गव सूत्रातील तरतूद रास्त होती, परंतु बाजाराच्या मूलभूत यंत्रणेच्या दृष्टिकोनातून ती तरतूद तर्कशुद्ध ( rational ) होती असे म्हणता येत नाही. (1) खुला बाजार व नियंत्रित बाजार यांच्यात मूलतः फरक आहे. खुली साखर खुल्या बाजाराशी निगडित आहे. उलट, ऊस किमत नियंत्रित बाजाराचा एक अविभाज्य घटक आहे. (2) खुल्या बाजारातील साखरेच्या वाढलेल्या किमत लाभात ज्याप्रमाणे ऊस उत्पादकांचा हिस्सा मान्य करण्यात आला त्याप्रमाणे साखरेच्या किमत घसरणीच्या काळातही त्यांच्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या तरतुदीची दखल घ्यावयाला नको काय? आणि समजा, ती दखल घेतली तरी ती स्वयंनिर्वाही ( self-sustaining ) ठरेल काय?

पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे 1954 च्या कायद्यानुसार प्रांतिक सरकारांना उसाची किमान किमत निश्चित करण्याचे अधिकार मिळाले, आणि 1955 च्या ऊस (नियंत्रण) आदेशात फेरबदल केलेल्या 1966 मधील ऊस (नियंत्रण) आदेशानुसार ते अधिकार परत केन्द्राला देण्यात आले. केन्द्राने किमत निश्चित करताना अर्थातच ऊस उत्पादन परिव्यय, साखर ग्राहकांसाठी रास्त किमत आणि साखर उतारा यांचा समावेश व्हावा अशी रास्त अपेक्षा होती. तत्त्व म्हणून ही गोष्ट स्वीकारण्यातही आली. परंतु प्रत्यक्षात 1955 ते 1962 च्या दरम्यान उसाच्या शर्करांशाचा तसेच त्याच्या उत्पादन परिव्ययाचा विचार न करता उसाच्या वजनावर आधारित किमान किमत निश्चित करण्याचे पूर्वीचेच धोरण पुढे चालू राहिले. ही ढोबळ त्रुटी विचारात घेऊन प्रशुल्क मंडळाने (1961) पाठीमागील वर्षातील साखर उतारा आणि किमान किमत यांच्यातील हस्वलेला दुवा जोडून किमत ठरविण्याची शिफारस केली. 1962–63 पासून भारत सरकारने ती

शिफारस स्वीकारली. आणि 1966 च्या ऊस (नियंत्रण) आदेशानुसार कृषी किंमत आयोगाच्या (Agricultural Prices Commission) आणि राज्य सरकारांच्या दृष्टिकोनांचा विचार करून निश्चित करण्यात यावयाच्या सांविधिक किमान किमतीचा अखेरीस अमल सुरू झाला.

## सांविधिक किमान किंमत

या किमतीचे चार घटकावयव आहेत :

(अ) उसाची किमान किंमत

(आ) साखर उताऱ्याची मूलाधार (basic) पातळी

(इ) मूलाधार पातळीवरील साखर उताऱ्यातील प्रत्येक 0·1 टक्का वाढीला चढा भाव किंवा अधिमूल्य (premium).

(ई) ठराविक कालातील कारखान्याचा सरासरी साखर उतारा.[8]

उदाहरणार्थ, 1962-63 च्या हंगामापासून किमान किंमत 9 टक्के सरासरी साखर उताऱ्यावर आधारित ठेवण्यात आली. साखर उताऱ्यातील प्रत्येक 0·1 टक्का वाढीला प्रतिक्विंटल उसाला 4 पैसे चढा भाव देण्याचे कारखान्यावर बंधनकारक ठरविण्यात आले. अशा प्रकारे 9 टक्के उताऱ्यावर ठरविण्यात आलेली प्रतिक्विंटल रुपये 4·0 अशी उसाची किंमत 9·8 टक्के उताऱ्यावर रुपये 4·32 (0·8×4 पैसे) होते.

1972–73 च्या हंगामापासून मूलाधार साखर उताऱ्याची पातळी 9 टक्क्यांवरून 8·5 टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आली. आजपर्यंत (1994–95 हंगाम) तो उतारा त्या पातळीवर स्थिर ठेवण्यात आला आहे. त्या हंगामासाठी निश्चित करण्यात आलेली सांविधिक किमान किंमत प्रतिक्विंटल रुपये 39·10 असून 1993-94 हंगामासाठी ती रुपये 34·50 होती.

1955 च्या ऊस (नियंत्रण) आदेशानुसार उसाची प्रत व ऊस उत्पादन परिव्यय यांच्या आधारे उसाची किमान किंमत निश्चित करण्याचे तत्त्व स्वीकारण्यात आले. परंतु प्रत्यक्षात कृषी किंमत आयोगाची स्थापना होईपर्यंत (1965) प्रत व उत्पादन परिव्यय यांच्याऐवजी उसाच्या वजनाचाच आधार घेण्यात आला. आणि या प्रमुख त्रुटीकडे लक्ष वेधताना कृषी किंमत आयोगाने पुढीलप्रमाणे आपले ठाम मत मांडले आहे. आयोग म्हणतो, ' किमान आधार किंमत पातळीचे निर्धारण करताना (ऊस) उत्पादन परिव्ययाचा विचार करावयालाच हवा."[9]

## उद्दिष्टपूर्ती

उसाची उपज व साखर उतारा यांच्यात सुधारणा करणे ही सांविधिक किमान किंमत धोरणाची प्रमुख उद्दिष्टे होती. तसेच शेतीमाल किंमत धोरणाच्या मूलभूत कार्यांचा आपण सुरुवातीला उल्लेख केला आहे. त्यांचा एकत्रित विचार करून सांविधिक किमान किंमत धोरणाच्या यशापयशाची मीमांसा करावी लागेल. कोणत्याही आर्थिक धोरणाचे यश त्याच्या उद्दिष्टपूर्तीवर निर्भर असते. या दृष्टिकोनातून सांविधिक किमान किंमत धोरणाची उद्दिष्टपूर्ती किती प्रमाणात झाली आणि ती उद्दिष्टपूर्ती समाधानकारक नसेल तर त्याची कोणती कारणे संभवतात या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आता सांविधिक किमान किंमत धोरणाची थोड्या विस्ताराने चिकित्सा करू.

### (अ) सरासरी विरुद्ध 'व्यक्तिगत' किंमत

उसातील शर्करांशाला विशिष्ट प्रमाणात उष्णता देऊन उसाचे शर्करांशाचे प्रमाण काढले जाते. त्यालाच उसातील साखर उताऱ्याचे प्रमाण म्हणतात. ते प्रमाण काढताना पुढील पद्धतीचा वापर करतो :

$$\frac{\text{विशिष्ट वेळी कारखान्याचे उत्पादन केलेली साखर (टन)}}{\text{त्यावेळी कारखान्याच्या प्रवेशद्वारावर खरेदी केलेला ऊस (टन)}}$$

सर्वसाधारण संकेत असा की, कारखान्यापासून दूर अंतरावर खरेदी केलेल्या उसाच्या बाबतीत जास्तीत जास्त 1 टक्का कपात केली जाते.

या पद्धतीचा प्रमुख दोष असा की, उपलब्ध होणारा उतारा सरासरी दर्शवितो. व्यक्तिगत ऊस

उत्पादकाच्या उसाचा शर्करांश किंवा त्यातील साखर उताऱ्याचे प्रमाण समजू शकत नाही. परिणाम ? 'सब घोडे बारा टक्के' या न्यायाने अल्प शर्करांश असलेल्या ऊस उत्पादकांना लाभ मिळत असला तरी जास्त शर्करांश असलेले ऊस उत्पादक त्यापासून वंचित राहतात. त्यांच्यावर 'हॉब्सनची निवड' (Hobson's choice) लादली जाते. उसाची हेक्टरी उपज व प्रत वाढविण्याची प्रेरणा राहात नाही. असमतोलाची स्थिती निर्माण होते. निर्णायक स्पर्धात्मक समतोलाचा हा ठळक गुणधर्म आहे की, प्रत्येक उत्पादित वस्तूच्या उत्पादन परिव्ययात तिचा सीमान्तिक परिव्यय परावर्तित होतो. अर्थशास्त्रीय परिभाषेत असे म्हणता येईल की, गुणभेदाकडे दुर्लक्ष करून सर्वच वस्तूंना एकच माप लागू केल्यामुळे "ज्या उत्पादकांनी सफरचंदाचे उत्पादन केले त्यांना नारिंगे मिळाली."[10] ही स्थिती अपूर्ण बाजाराची आहेच. त्यापेक्षा ती अपूर्णांच्या बाजाराची (market of the imperfects) जास्त आहे सेन अशा अपूर्णांना 'सूज्ञ मूर्ख'[11] (rational fools) या नावाने संबोधतात. येथे असा प्रश्न निर्माण होतो की, अशा प्रकारचा विषमतोल बदलण्यासाठी काही मार्ग / पद्धती आहे काय ?

कानपूरच्या राष्ट्रीय साखर संस्थेने याबाबतीत एका पद्धतीचे समर्थन केले आहे आणि कृषी किंमत आयोगाने (अहवाल 1967-68) तसेच साखर चौकशी समितीने (अहवाल 1965) त्या पद्धतीला दुजोरा दिला आहे. प्रत्येक ऊस उत्पादकाने व्यक्तिशः कारखान्याला पुरवठा केलेल्या उसाच्या शर्करांशाच्या आधारे कारखान्याने ऊस उत्पादकाला त्याच्या उसाची किंमत चुकती केली पाहिजे. परंतु प्रत्येक ऊस उत्पादकाने पुरवठा केलेल्या उसाच्या शर्करांशाची तपासणी करण्यात काही व्यावहारिक अडचणी आहेत. त्यापेक्षाही त्या उसापासून उत्पादित साखरेच्या उताऱ्याची तपासणी करण्यातील अडचणी अधिक गंभीर स्वरुपाच्या आहेत. उसातील शर्करांशाची तपासणी एक वेळ शक्य होईल परंतु त्यापासून उत्पादित साखरेचा उतारा शोधणे शक्य होईलच असे नाही. कारण साखर उत्पादन प्रक्रिया ही एक एकजिनसी प्रक्रिया आहे. पहिल्या प्रकारच्या अडचणीविषयी भारत सरकारच्या तत्कालीन सचिवांनी पुढीलप्रकारे आपले मत नोंदविले आहे. "व्यक्तिशः ऊस उत्पादकांनी पुरवठा केलेल्या उसातील शर्करांशाच्या आधारे देयके चुकती करण्यात काही अडचणी आहेत. त्यापैकी एक प्रमुख अडचण म्हणजे एका वेळी सरासरी उत्पादकाने कारखान्याला पुरवठा केलेल्या उसाचे परिमाण फारच अल्प असते."[12]

याच्या पुढे जाऊन भारतीय साखर गिरणी संघाने एक नवीनच प्रश्न निर्माण केला. संघाने साखर उद्योग चौकशी आयोगापुढे (1974) असा युक्तिवाद केला आहे की, साखर उतारा ज्या प्रमाणात उसाच्या प्रतीवर अवलंबून असतो त्यापेक्षा त्या कारखान्याच्या उसाच्या निष्कर्षणाच्या कार्यदक्षतेवर जास्त प्रमाणात अवलंबून असतो. म्हणून साखर उताऱ्याच्या वाढीवर कारखान्यांनी आपला 80 टक्के हक्क सांगितला.[13] हा एक नवीन वितरणाचा वाद निर्माण झाला. प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी नंतर भार्गव समितीने (1975) उताऱ्याच्या वाढीवर ऊस उत्पादक व कारखाने यांचा समान हक्क मान्य केला. तात्पुरत्या स्वरुपाची ही एक तडजोड होती. त्यातून वितरणाच्या न्यायाचा (distributive justice) प्रश्न निकालात निघाला नाही. आजच्या उदारीकरणाच्या तसेच सगणित्रीकरणाच्या युगातही 'सरासरी' विरुद्ध 'व्यक्तिगत' किंमतीचा प्रश्न भिजत पडला आहे.

## सिद्धान्ताकडून तथ्याकडे

या मुद्याविषयीचे आतापर्यंतचे आपले विवेचन बऱ्याच प्रमाणात सैद्धान्तिक स्वरुपाचे होते. अनुभवाधिष्ठित पुरावा काय सांगतो यासाठी तक्ता 2 चा विचार करू.

व्यष्टीय पातळीवर ऊस उत्पादकाला त्याच्या व्यक्तिगत उसाच्या शर्करांशाच्या आधारे किंमत देण्यात काही अडचणी आहेत. शिवाय, त्यातून काही नवीन प्रश्न निर्माण होतात. म्हणून समष्टीय पातळीवर प्रत्यक्षात कारखान्यांनी एकत्रित उसाला दिलेली किंमत आणि त्या कारखान्यात उत्पादित साखरेचा उतारा यांच्यातील नातेसंबंध धन व प्रमाणशीर आहे काय, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील दहा कारखान्यांच्या सहा वर्षांतील (1987-88 ते 1992-93) वार्षिक अहवालांचा अभ्यास केला. अहवालांच्या आधारे पुढील निष्कर्ष येतात :

## तक्ता 2

**भारतातील उसाची उपज (yield) सांविधिक किमान किंमत आणि उसाला प्रत्यक्षात दिलेली किंमत**

| वर्ष | उपज (टन/हेक्टर) | सांविधिक किमान किंमत (रु./क्वि.) | मूळ शर्करांश उताऱ्या–करिता (टक्के | प्रत्येक 0·1% उतारा वाढीसाठी ज्यादा | रकाने (2), (3) व (4) या आधारावर किमान ऊस किमतीचा विस्तार (रु./क्वि.) | कारखान्यांना प्रत्यक्षात दिलेल्या किमतीचा विस्तार (रु./क्वि.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1982–83 | 56·4 | 13·00 | 8·5 | 0·152941 | 13·00 to 19·22 | 13·46 to 23·00 |
| 1983–84 | 56·0 | 13·50 | 8·5 | 0·158824 | 13·50 to 19·69 | 13·50 to 26·20 |
| 1984–85 | 57·7 | 14·00 | 8·5 | 0·164706 | 14·00 to 20·42 | 15·00 to 35·00 |
| 1985–86 | 59·9 | 16·50 | 8·5 | 0·19412 | 16·50 to 24·07 | 16·50 to 32·19 |
| 1986–87 | 60·4 | 17·00 | 8·5 | 0·20 | 17·00 to 25·00 | 17·60 to 28·10 |
| 1987–88 | 60·0 | 18·50 | 8·5 | 0·21765 | 18·50 to 26·77 | 18·50 to 38·60 |
| 1988–89 | 61·0 | 19·50 | 8 5 | 1·2294 | 19 50 to 27·99 | 19·50 to 49·50 |
| 1989–90 | 65·6 | 22·00 | 8·5 | 0·2588 | 22·00 to 32·09 | 22·00 to 56·00 |
| 1990–91 | 65·4 | 23·00 | 8·5 | 0·270588 | 23·00 to 34·36 | 30·00 to 60·10 |
| 1991–92 | 65·8 | 26·00 | 8·5 | 0·305882 | 26·00 to 38·54 | 26·00 to 52·00 |

**स्रोत :** Cooperative Sugar, March 1993, New Delhi, तक्ता 4, पृ. 339 आणि तक्ता 9, पृ. 343 वरून संकलित.

(1) 1987–88 ते 1992–93 या कालात निवड–लेल्या दहापैकी एकाही कारखान्याच्या बाबतीत दोन्ही चलांतील (उतारा व दर) परस्पर नाते–संबंध जसा धन (positive) नाही तसा तो ऋणही (negative) नाही.

(2) त्या चलांतील नातेसंबंध स्थिर (stab'e) किंवा प्रमाणशीर असल्याचे दिसत नाही.

(3) तो संबंध बऱ्याच प्रमाणात दुर्बल (weak) आहे.

(4) 1992–93 हे वर्ष असाधारण व चमत्कारिक आहे. त्या वर्षात उताऱ्यात विशेष सुधारणा झाली नसतानाही दरात लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचे एक स्पष्टीकरण असे की, 1992–93 हंगामासाठी सांविधिक किमान किमतीमध्ये प्रतिक्विंटल 26 रुपयांवरून 27 रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली. विशेषत: 1991–92 च्या हंगामात कारखान्यांनी ऊस उत्पादकांना द्याव–याच्या थकित रकमेत वाढ झाली. त्याचा एक परिणाम म्हणून 1992–93 च्या हंगामात उप–लब्ध ऊस खरेदी करण्याची कारखान्यांची क्षमता घटली. उसाखालील क्षेत्रात प्रचंड प्रमाणात घट होण्याची साधार भीती निर्माण झाली. अशा परिस्थितीत राज्यांनी सुचविलेल्या किमतीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ करण्यात आली. निर–निराळ्या राज्यात ती वाढ प्रतिक्विंटल रु.27·50 ते रु. 48·00 या टप्प्यात होती.

साखर उताऱ्यातील वाढीबरोबर ऊस किमतीत वाढ व्हावयास हवी, असे किंमत सिद्धान्तात स्पष्टीकरण मिळते. प्रत्यक्ष व्यवहारात ते नेहमीच योग्य ठरेल असे नाही. कारण उताऱ्यात वाढ होऊनही परिसर विकास प्रकल्प, कारखान्यातील किंवा कारखान्याच्या बाहेरील श्रमिकांच्या वेतनातील आकस्मिक वाढ, आधुनिकी–करण / विस्तारीकरण, इत्यादी बाबींवरील परिव्यय प्रसंगी अटळ ठरतो. अशा प्रकारच्या मर्यादा वरील निष्कर्षांवर पडतात. ही गोष्ट ध्यानात घेऊनच त्या निष्कर्षांकडे पाहावयाचे आहे.

## किंमत विरुपणे

पाठीमागे आपण राज्यांनी सुचविलेल्या किम–तींचा भार्गव सूत्राला धाब्यावर बसविणाऱ्या किमती म्हणून उल्लेख केला. आता त्यांचा अधिक सविस्तर विचार करू. 1975 मध्ये राज्यांनी सुचविलेल्या किमती अस्तित्वात आल्या. संबंधित राज्य सरकारांनी अनौप–चारिकपणे त्यांचा प्रघात सुरू केला. "साखरेचे वाढीव पातळीवरील बाजारभाव विचारात घेऊन आणि ऊस उत्पादकांचे तुष्टीकरण करण्याच्या हेतूने केन्द्राने ठरवि-लेल्या ऊस किमतीपेक्षा ज्या जास्त किमती राज्य सर–कारांनी ठरविल्या त्यांनी किंमत धोरणाचे अखिल भारतीय स्वरूप नष्ट करण्याची भयसूचना दिली,"[15] असे त्यांचे समुचित वर्णन करण्यात आले आहे. ते किती अन्वर्थक आहे ते पुढील काही घटनांवरून स्पष्ट होते.

1977-78 मध्ये साखरेच्या उत्पादनात अतिरेक (glut) होऊन जुलै 1978 मध्ये तिच्या किमती प्रति-क्विंटल रुपये 3.0 पर्यंत घसरल्या. परंतु संबंधित राज्य सरकारांनी राज्यांनी सुचविलेल्या किमतींमध्ये वाढ करण्याचे आपले धोरण तसेच पुढे चालू ठेवले. त्या ज्या रीतीने ठरविण्यात येतात ती रीत ध्यानात घेऊन त्यांना अधिपरिव्यय किमती ( mark-up prices ) असे संबोधण्यात आले. त्या सांविधिक किमान किमती–वरील आधिक्य नेहमीच दाखवितात. स्वाभाविकपणेच उसाच्या किंमत निर्धारणाच्या क्षेत्रात राज्यांनी निश्चित केलेल्या अशा प्रकारच्या किमतींनी किंमत विरुपणे निर्माण केली. म्हणूनच कृषी किंमत आयोगाने आपल्या 1978–79, 1979–80 आणि 1980–81 मधील अहवालात या किमती निकालात काढाव्यात, असे ठाम मत नोंदविले आहे.

संबंधित राज्य सरकारे आणि किमतींचा लाभ मिळणारे ऊस उत्पादक सोडले तर साखर कारखाने, कृषी किंमत आयोग, औद्योगिक परिव्यय व किमती मंडळ ( Bureau of Industrial Costs & Prices ) तसेच ऊस व साखर क्षेत्रातील तज्ज्ञ या सर्वांनी या किमतींच्या विरोधात आपली मते मांडली आहेत. सह–कारी साखर कारखाने राष्ट्रीय संघाच्या ( National Federation of Cooperative Sugar Facto-ries ) अलीकडील कालातील वार्षिक सर्वसाधारण

सभांमध्ये अध्यक्षीय भाषणात या किमतींना 'अटकाव' करण्याची मागणी न चुकता करण्यात आली आहे. कृषी किंमत आयोगाने, पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे, या किमती निकालात काढण्याविषयी अहवालात वारंवार शिफारस केली आहे. सांविधिक किमान किंमत आणि राज्यांनी सुचविलेली किंमत यांच्यात मोठ्या प्रमाणात असमानता किंवा 'विषममूल्यता' (disparity) वाढत आहे, असे औद्योगिक परिव्यय व किमती मंडळाने आपले मत दिले आहे परंतु अशा प्रकारच्या टीकेस पात्र ठरणाऱ्या किमती किती प्रमाणात विषम-मूल्यता निर्माण करतात याविषयी अनुभवाधिष्ठित पुरावा क्वचितच देण्यात येतो. विषममूल्यतेची संदिग्धता निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे प्रत्यक्ष, अद्यावत आणि अचूक ऊस उत्पादनाच्या हेक्टरी परिव्ययाचा अभाव. औद्योगिक परिव्यय व किमती मंडळ विशिष्ट वर्षातील प्रत्यक्ष उत्पादन परिव्यय काढण्यापेक्षा अलीकडील कालात उपलब्ध असलेल्या आधार-सामग्रीवर (data) विसंबून राहिल्याचे आढळते. त्याप्रमाणेच, सांविधिक किमान किमती सर्वसाधारणपणे कल्पित (notional) असल्याचे दिसून येते. अशा वेळी औद्योगिक परिव्यय व किमती मंडळ म्हणते त्या तथाकथित विषममूल्यतेचे परिगणकीकरण (quantification) करण्यात काही अडचणी अपरिहार्य ठरतात. अशा अडचणी ध्यानात घेऊन 1982-83 ते 1991-92 या दशकात उपलब्ध होणाऱ्या तक्ता 2 मधील संबंधित निर्देशकांच्या आधारे काही अनुमाने बांधण्याचा प्रयत्न करू.

1982-83 ते 1991-92 या दशकात सांविधिक किमान किमतीत 100 टक्के वाढ झाली आहे. परंतु राज्यांनी सुचविलेल्या किमतीतील वाढ 100 टक्क्यांपेक्षा जास्त होती. विशेषतः सांविधिक किमान किमती या दशकात 100 टक्के वाढल्या तरी याच दशकात सांविधिक किमान किमतीशी राज्यांनी सुचविलेल्या किमतीतील वाढ चारपट झाली आहे. म्हणजे समस्तरीय विषममूल्यतेपेक्षा स्तरछेद-विषमस्तरीय (cross-vertical) विषममूल्यता जास्त मोठी व गंभीर स्वरुपाची आहे. आणि आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, अलीकडील कालात अखंडितपणे वाढत जाणारी ही विषममूल्यता कमी करण्यासाठी औद्योगिक परिव्यय व किंमत मंडळाने राज्यांनी सुचविलेल्या किमतींना धक्का न लावता सांविधिक किमान किमतीत वाढ करण्याचा सपाटा सुरू ठेवला आहे. त्यावेळी सरासरी साखर उताऱ्यात वाढ होवो अगर न होवो.

## (इ) मूलाधार उताऱ्याची खुंटी व 'भ्रांती साधनसंपत्तीची'

आपण पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे उसाच्या किमान किमतीचे मूळ सिमला साखर परिषदेच्या ठरावात (1931) सापडते. आणि ऊस (नियंत्रण) आदेशानुसार (1966) सांविधिक किमान किमतीचा अमल सुरू झाला. 1972-73 च्या हंगामापासून 8·5 टक्के इतक्या साखरेच्या मूलाधार उताऱ्याचे प्रमाण स्वीकारण्यात आले. आजअखेर (1994-95 हंगाम) त्या मूलाधार उताऱ्याच्या खुंटीला आपण चिकटून आहोत. आश्चर्याची गोष्ट अशी की, सांविधिक किमान किमतीला प्रत्येक 0·1 टक्का वाढीवरील अधिमूल्यात कायमचे बंदिस्त करून ठेवण्यात आले आहे. 1972-73 मध्ये अधिमूल्य प्रतिक्विंटल 11 पैसे होते. 1991-92 मध्ये ते प्रतिक्विंटल 30 पैसे झाले. उताऱ्यातील वाढीसाठीच्या प्रोत्साहनाची (पर्यायाने उसाच्या उत्पादकतेतील वाढीची) यापेक्षा क्रूर चेष्टा अन्यत्र शोधून सापडणार नाही अशा परिस्थितीत उपलब्ध साधनसंपत्तीचा बाजवी वापर शक्य होईल काय? 1972-73 मध्ये (8·5 टक्के मूलाधार उतारा लागू केल्याचे वर्ष) उसाची उत्पादकता प्रतिहेक्टरी 50·2 टन होती; 1990-91 मध्ये ती प्रतिहेक्टरी 65·4 टनापर्यंत वाढली. 1981-82 ते 1990-91 या कालात सरासरी साखर उताऱ्यात 10·8 टक्क्यांवरून 9·86 टक्क्यांपर्यंत घट झाली. त्याच कालात ऊस उत्पादनात 1,86,858 हजार टनांपासून 2,40,287 हजार टनांपर्यंत वाढ झाली. आणि उसाखालील क्षेत्रात 3,193 हजार हेक्टरपासून 3,682 हजार हेक्टरपर्यंत वाढ झाली. दुसऱ्या शब्दांत, त्या कालात ऊस उत्पादनातील वाढ उसाच्या उत्पादकतेतील वाढीपेक्षा उसाखालील क्षेत्रातील वाढीमुळे जास्त झाली असे स्पष्ट होते.

उसाची उत्पादकता, त्यातील शर्करांशाचे प्रमाण आणि साखर उतारा या महत्त्वाच्या चलांच्या बाबतीत निराशाजनक परिस्थिती दिसते. त्यांच्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न उसाच्या किंमत प्रोत्साहनापुरता मर्या-

दित ठेवणे पुरेसे नाही. उसाची किंमत लवचिकता 0·34 ते 0·39 या टप्प्यात असल्याचे त्यागी (1974) यांनी स्पष्ट केले आहे. राजकृष्ण यांच्या अभ्यासानुसार (1967) ती 0·44 ते 0·60 या टप्प्यात होती. म्हणून ऊस उत्पादनास आवश्यक ठरणाऱ्या जास्त महत्त्वाच्या निविष्टींच्या (पाणी, बीज, रासायनिक खते, इत्यादी) इष्टतम (किंवा अनिष्टतम) वापराच्या प्रश्नाचा येथे विचार करणे अपरिहार्य ठरते. या निविष्टींच्या प्रचंड प्रमाणावरील अनुदानित (subsidised) पुरवठ्यामुळे 'साधनसंपत्तीची भ्रांती' (resource illusion) अधिकच गंभीर स्वरूप धारण करते.

'साधनसंपत्तीची भ्रांती' या शब्दप्रयोगाचे जनक आहेत 'The Borderless World' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक केनिचि ओह्मा (Kenichi Ohmae). 'The Economist' साप्ताहिकाने अर्जेंटिना देशाच्या संबंधात या शब्दप्रयोगाचा संदर्भ दिला आहे. भारताच्या बाबतीत तो तंतोतंत लागू पडतो. त्याचा मुक्त अनुवाद पुढीलप्रमाणे : "जन्मत: सधन असलेल्या विकसनशील देशांना सिंगापूरसारख्या अल्प प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्तीने युक्त देशांनी मागे टाकले आहे. साधनसंपत्ती-अभिमुख (resource orientnd) जागा (देश) त्यांच्या निरवातनिधीचे (treasure-trove) सरक्षण करण्यात इतक्या झपाटल्या जातात की साधनसंपत्तीच्या मूल्यात त्या क्वचितच भर टाकतात. आणि विपणन (marketing) तसेच सेवा त्यांना परक्या वाटतात."[15] हे स्पष्टीकरण भारतीय अर्थव्यवस्था आणि विशेषत: ऊस उद्योग यांच्या बाबतीत चांगलेच बोलके ठरते. अनुदानित निविष्टी हा भारतातील ऊस उद्योगाला वारसाने (स्वकष्टाने नव्हे) मिळालेला निरवातनिधी वाटतो. त्याचा सार्वत्रिक संचार झाल्यामुळे उसाच्या उत्पादकतेत अपेक्षेप्रमाणे क्वचितच वाढ झाली. देशी व विदेशी बाजारात स्पर्धात्मकक्षमता निर्माण होण्याचा प्रश्न दूरच.

राष्ट्रांचे स्पर्धात्मक लाभ उल्कापाताप्रमाणे आभाळातून खाली कोसळत नाहीत. त्या स्पर्धात्मक लाभाची गमके स्पष्ट करताना पोर्टर म्हणतात : "बहुतेक उद्योगांतील स्पर्धात्मक लाभ मिळवून देणारे घटक .... वारशाने येत नसून ते त्यांच्या निर्मितीने येतात -- अशा प्रकारे, विशिष्ट वेळेतील घटकांचा (भूमी, श्रम, भांडवल, संघटन इत्यादी) साठा, ते घटक ज्या प्रमाणात निर्माण होतात, त्यांच्यात सुधारणा होते आणि विशिष्ट व्यवसाय संस्थांच्या बाबतीत ते विशेषीकृत (specialised) बनतात, त्यापेक्षा (तो साठा) कमी महत्त्वाचा असतो."[16] दहा देशांतील प्रत्येकी दहा याप्रमाणे शंभर उद्योगांच्या अभ्यासाच्या आधारे पोर्टर पुढे लगेच प्रतिपादन करतात त्याप्रमाणे 'कदाचित अधिक आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, घटकांची विपुलता स्पर्धात्मक लाभ वाढविण्याऐवजी तो खराब करण्याची शक्यता असते."[17]

साधनसंपत्तीच्या भ्रांतीने प्रभावित आणि मूलाधार उताऱ्यातील वाढाव्यावरील अधिमूल्याचा पुरेसा आदर न करणाऱ्या सांविधिक किमान किमतीत वर्षानुवर्षे बंदिस्त ऊस उद्योगाची अवस्था साधनप्रणीत दुर्गुणांच्या (resource-led vices) 'दैवाने दिले व कर्माने नेले' या कर्मसिद्धान्तासारखी झाली आहे. त्यापासून त्या उद्योगाची अंशत: सुटका करण्यासाठी एक आशेचा किरण आहे. "ज्यादा उताऱ्यासाठी देण्यात यावयाच्या अधिमूल्यात (0·1 टक्का) बदल न करता उसाच्या सांविधिक किमान किमतीला 8·5 टक्के या उताऱ्याच्या खुंटीवर खिळऊन ठेवण्याची प्रक्रिया पुढे तशीच चालू ठेवणे उसाच्या उत्पादकतेत सुधारणा करण्याच्या हिताचे ठरत नाही."[18] दुसऱ्या शब्दात मूलाधार उताऱ्यातील वाढाव्यावर सध्या अस्तित्वात असलेल्या अधिमूल्यात पुरेशी वाढ केली तर ऊस उत्पादकतेत अधिक सुधारणा होईल. सुखद आपसमेळाची गोष्ट अशी की, 20 मार्च 1995 रोजी केन्द्राने 1994-95 हंगामासाठी लेव्ही साखर धोरण जाहीर केले. त्यानुसार प्रत्येक 0·1 टक्का वाढीवरील अधिमूल्यात प्रथमच वाढ केली. ही वाढ पाठीमागील हंगामासाठी (1993-94) औद्योगिक परिव्यय आणि किंमती मंडळाने प्रथमच सुचविली होती. एका वर्षानंतर का असेना परंतु या मंडळाच्या सूचनेचा आदर करून केन्द्राने योग्य दिशेत पाऊल टाकले. या धोरणाचा अधिकृत तपशील अद्याप समजू शकला नाही. उपलब्ध माहितीवरून असे दिसते की, हे धोरण तुलनेने जास्त उतारा असलेल्या महाराष्ट्र व गुजराथ विभागातील साखर कारखान्यांपुरते मर्यादित आहे.

अशा प्रकारे, सांविधिक किमान किमतीतील पुढील प्रमुख उद्दिष्टांच्या पूर्तीविषयीच्या विवेचनाच्या

आधारे येणारा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे. पाठीमागील जवळजवळ तीन दशकांत अस्तित्वात असलेल्या सांविधिक किमान किमती पुढील उद्दिष्टांची अपेक्षेप्रमाणे पुर्ती झाली नाही. उलट, काही नवीन समस्या निर्माण झाल्या. त्यांचे निवारण करण्यासाठी, अर्थातच, सांविधिक किमान किमतीच्या आवाक्याच्या बाहेरील अधिक व्यापक व विश्वसनीय बिगर-किमत घटकांवर लक्ष केन्द्रित करण्याची गरज आहे. किमत प्रोत्साहनांच्या माध्यमातून ऊस उत्पादनात व उत्पादकतेत वाढ करण्याच्या धोरणावरील ही एक मर्यादा आहे आणि तिचे संक्षेपात स्पष्टीकरण अगदी सुरूवातीला प्रास्ताविकात केले आहे.

## संभाव्य धोके

आतापर्यंत आपण ऊस किमत धोरणाचा आढावा घेतला. त्यात सर्वसाधारण किमत धोरणाची उद्दिष्टे, ऊस किमत धोरणाचा क्रमविकास (evolution), त्याची उद्दिष्टे, वळणे तसेच उद्दिष्ट पूर्ती, त्यातील काही कच्चे दुवे, सरकारी हस्तक्षेप आणि त्यातून निर्माण होणारी किमत विरुपणे यांच्यावर लक्ष केन्द्रित केले, अस्तित्वात असलेल्या धोरणाची वस्तुनिष्ठ चिकित्सा केली. आता अखेरीस ऊस किमत धोरणाच्या भावी वाटचालीतील काही संभाव्य धोके सूचित करणे बाकी आहे.

आतापर्यंत किमत धोरणातील किमत विरुपणांसारख्या कच्च्या दुव्यांनी अधिक गंभीर वळण घेतले तर अर्थव्यवस्थेत किमत आघाडीवर काही विपथगमने (deviations) व उत्पात घडून येणे अशक्य नाही. सर्वसाधारण किमत धोरणातून असे उत्पात व अशी विपथगमने देशोदेशांत आणि वेळोवेळी घडून आली आहेत असे त्या देशांचा आर्थिक इतिहास सांगतो. अगदी अलीकडील काही वर्षात तत्कालीन सोविएत युनियनमधील तसेच काही महिन्यांपूर्वी मेक्सिकोमधील ताज्या घटना अशा धोक्यांची साक्ष देतात.

(अ) साधनसंपत्तीची विल्हेवार हे किमत धोरणाचे एक मूलभूत उद्दिष्ट आहे. किमत निर्धारणाच्या सर्वसाधारण अर्थव्यवहारांचे किमान ज्ञान नसणारे किंवा ते असूनही त्याचा रास्त आदर करण्याचा निर्धार नसलेले ज्यावेळी अर्थकारण काबीज करून दिवसांनुदिवस लोकानुनयवादी (populist) वचननामे व हुकुमनामे काढण्याचा सपाटा सुरू करतात त्यावेळी गोंधळ, साधनसंपत्तीची भ्रांती, विरूपणे आणि विपथगमने अपरिहार्य ठरतात. आजवरचे ऊस किमत धोरण याला नेहमीच अपवाद राहील असे नाही. अलीकडील काही वर्षांत अशा लोकानुनयवादी धोरणांची आणि तुष्टीकरण करणाऱ्या वचननाम्यांची आवक वाढत आहे. काम करण्याचा मुलभूत हक्क, कर्जमाफी, 2 रुपये किलो तांदळाचे संगीत नाटक, 1·5 रुपये किलो ज्वारी, जून-ऑगस्ट 1995 या तीन महिन्यांसाठी दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना 15 किलो तांदूळ आणि त्याबरोबर मीठ व साबण मोफत, ही अशा घोषणांची / धोरणांची काही नमुनेदार उदाहरणे आहेत. यांच्या पुढील पाऊल म्हणजे मोफत आणि फुकापासरी भोजन. आणि या सर्वांवर कढी म्हणजे ऊस व कापूस यांची सरकारी खरेदी एकाच दराने व एककाने (unit) करण्याविषयीचा राजकीय हट्टवाद (political dogmatism). अशा प्रकारच्या घोषणा युद्धाची व धोरणांची आवक अर्थव्यवस्थेत वाढत गेली आणि त्यापैकी काहींची कार्यवाही करण्याचे प्रयत्न झाले तर या देशाच्या अर्थव्यवस्थेबरोबर ऊस उद्योगाचे जॉर्ज ऑर्वेलीय 'animal farm' मध्ये रूपांतरण होण्यास वेळ लागणार नाही असे निरूपाय म्हणून म्हणावे लागते.

(आ) पाठीमागील सहा दशकांत उसाची किमत, त्यातील शर्करांश व साखर उतारा यांच्यातील हरवलेला दुवा प्रस्थापित करण्याचे अनेक प्रयत्न झाले. समीकरणे, सूत्रे व प्रतिमाने यांची मांडणी करणाऱ्या पुढील काही सांख्यिकी अभ्यासांचा समावेश होतो. पाठीमागे योग्य त्या ठिकाणी त्यांचा आपण संदर्भ दिला आहे.

(1) 1932 मधील प्रशुल्क मंडळाची रास्त किमत.

(2) 1933 मधील संयुक्त प्रांत सरकारचे प्रमाणित सूत्र.

(3) 1955 मधील सुधारित ऊस (नियंत्रण) आदेशाची वाजवी किमत.

(4) 1965 मधील कृषी किमत आयोग

(आजचा कृषी परिव्यय आणि किमत आयोग).

(5) 1975 मधील भार्गव सूत्र.

(6) 1975 नंतरचे औद्योगिक परिव्यय आणि किमत मंडळाने लेव्ही साखरेच्या संदर्भातील ऊस उत्पादन परिव्ययांचे परिवर्तन करण्याविषयीचे अंदाज.

अशा प्रकारच्या सांख्यिकी कसरती करून अंदाज बांधण्याचे काम तज्ज्ञांकडून तसेच तज्ज्ञ समित्यांकडून सुखासुखी झाले नाही. त्यासाठी पैशातील व बौद्धिक त्याग (परिव्यय) सहन करावा लागला आहे. परंतु खेदाची गोष्ट अशी की, बहुतेक अभ्यासातील निष्कर्षांची / शिफारसींची कार्यवाही होऊ शकली नाही. त्या अभ्यासांवरील प्रचंड प्रमाणावरील गुंतवणूक खर्चावरील प्रत्याय दर (rates of return) तोट्यात चालणाऱ्या सरकारी क्षेत्रातील उपक्रमांप्रमाणे ऋण होण्याचे वारंवार प्रसंग निर्माण झाले. सांख्यिकी कसरती व परिगणना व्यय-लाभाच्या दृष्टिकोनातून सार्थकी लागल्याच नाहीत. त्या अभ्यासासाठीच्या गुंतवणूक खर्चावरील प्रत्याय दर ऋण असले तरी त्यांच्याविषयीचे राजकीय प्रत्याय दर (political rates of return) नेहमीच धन राहिले आहेत. एका टीकाकाराने टिप्पणी केल्याप्रमाणे "आकडे लबाडी करीत नाहीत, लबाडच प्रसिद्धीच्या झोतात वावरत असतात." (It is not the figures that lie, it is the liars who figure.)

येथे साठ वर्षांपूर्वी लॉर्ड केन्स यानी केलेल्या प्रतिपादनाचे अपरिहार्यपणे स्मरण होते. सदरचे प्रतिपादन त्यानी त्यांच्या 'General Theory' या अभिजात पुस्तकाच्या अखेरच्या प्रकरणात केले आहे. संपूर्ण विस्तृत परिच्छेद कालबाह्य (defunct) आर्थिक पंडितांशी मसलती करणाऱ्या अधिकारपदावरील 'वेड्या माणसांविषयी' (madmen in authority) आहे. जागेअभावी व वेळेअभावी संपूर्ण परिच्छेद येथे उद्धृत करता येत नाही. त्या परिच्छेदात एका ठिकाणी लॉर्ड केन्स म्हणतात, "आता लगेच किंवा थोड्या वेळाने विहित हितसंबंध नव्हे, तर आर्थिक पंडित व राजकीय तत्त्वज्ञ यांच्या कल्पना, शुभासाठी म्हणा किंवा अशुभासाठी म्हणा, धोकादायक ठरतात."[19] येथे माझे भाषण संपले. आता मराठी अर्थशास्त्र परिषदेविषयी दोन शब्द.

सतराव्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात परिषदेने 'लोकभाषेचे खुले व्यासपीठ' म्हणून ठसा उमटविला आहे, असा सार्थ उल्लेख झाला. परिषदेच्या भावी वाटचालीत अवघ्या मानवी व्यवहाराला आर्थिक 'संवादाचे' चलन पुरविणारी टाकसाळ म्हणून तिला एका उत्तम व्यासपीठाचा कार्यभाग पार करावयाचा आहे. त्यासाठी मराठीतील अर्थशास्त्रीय अध्ययन - संशोधन - अध्यापन यांच्यात जे उत्तम आहे त्याचे योगदान देऊ. जे सुमार असेल त्याची निंदा न करता त्याला बाजू देऊ. यापेक्षा सर्वोत्तम ते काय? ज्ञानदेवांच्या शब्दात :

उत्तमाते धरिजे । अधमाते अव्हेरिजे ।।
हें कांहीचि नेणिजे । वसुधा जेवि ।। (अ. 12, ओ. 145)

संवाद फळ निधाने । प्रमेयाची उद्याने ।।
लावी म्हणे गहने । निरंतर ।। (अ. 12 ओ. 13)

## संदर्भ टीपा


1 Samuelson, P. A. (1973), ECONOMICS, McGraw-Hill Kogakusha, p. 14

2 Kahlon, A. S. and D. S. Tyagi (1983). AGRICULTURAL PRICE POLICY IN INDIA, Allied Publishers, p. 2.

3 Janvry, Alain de and K. Subbarao (1986), AGRICULTURAL PRICE POLICY AND INCOME DISTRIBUTION IN INDIA, Oxford University Press, p. 93.

4 Excerpted from Khara, K. P. (1939), INDUSTRIAL PROTECTION IN INDIA; Adarkar, B. N., (1939), THE HISTORY OF INDIAN TARIFF, Bombay; Baru Sanjaya, (1990), THE POLITICAL ECONOMY OF INDIAN SUGAR, Oxford University Press, p. 93.

5 Adarkar, B. N., quoted in Shah, N. A. (1969) THE SUGAR INDUSTRY IN INDIA : STRUCTURE AND PROBLEMS, 1940, Ph. D. Thesis, Bombay, p. 93.

6 अहमदनगर जिल्ह्यातील 1987-88 ते 1992-93 कालातील संबंधित दहा सहकारी साखर कारखान्यांचे ( तक्ता 1 ) वार्षिक अहवाल. कारखान्यांच्या वार्षिक अहवालात सर्वसाधारण माहितीचे एक सदर असते. त्यात ऊस किंमत धरून व ऊस किंमत सोडून साखर उत्पादनाचा सरासरी प्रतिक्विंटल परिव्यय देण्याचा प्रघात आहे. त्या किमतींच्या आधारे निव्वळ ऊस किमतीचे प्रमाण संबंधित कारखान्यांच्या बाबतीत 50 टक्क्यांच्या आसपास असल्याचे दिसून येते.

7 Umesh. R, 'All is Not Well on the Sugar Front' in the series of 'The Budget Backdrop' articles, The Economic Times Research Bureau, THE ECONOMIC TIMES, 10 March, 1995.

8 See Kahlon, A. S. and D. S. Tyagi, पूर्वोक्त, पृ. 362.

9 REPORT OF AGRICULTURAL PRICES COMMISSION ON PRICE POLICY FOR SUGARCANE FOR 1968-69 SEASON, Government of India, Ministry of Food and Agriculture, Quoted in Baru Sanjaya, पूर्वोक्त, पृ. 152.

10 Samuelson, P. A., पूर्वोक्त, पृ. 530.

11 Sen, A. K. (1983), CHOICE, WELFARE AND MEASUREMENT, Oxford University Press, pp. 84-106.

12 Shivraman, B., Secretary to Government of India, Foreword to the Report of Agricultural Prices Commission, 1967-68, pp ii and iii.

13 THE REPORT OF THE SUGAR INDUSTRY ENQUIRY COMMISSION, 1974, Government of India, p. 176.

14 Kahlon, A. S. and D. S. Tyagi, पूर्वोक्त, पृ. 368.

15 Excerpted in THE ECONOMIST, 'Survey Argentina', November 26, 1994, p. 8.

16 Porter, Michael E. (1990), THE COMPETITIVE ADVANTAGE OF NATIONS, Macmilian Press, p. 74.

17 तत्रैव.

18 'Growth Sans Efficiency', THE ECONOMIC TIMES (Leader), 18 February, 1994.

19 Keynes, J. M. (1973), THE GENERAL THEORY OF EMPLOYMENT, INTEREST AND MONEY, Macmillan Press ( for Royal Economic Society ), p. 384.

□ □


# मराठी अर्थशास्त्र परिषद

**विश्वस्त मंडळ** ( 1995 – 98 )

1 डॉ. प्रफुल्ल सुळे, मुंबई
2 डॉ. रवीन्द्र स. सबनीस, मुंबई
3 श्री. किरण बाबूराव ठाकूर, बेळगाव

# भारताच्या वित्तीय क्षेत्रातील सुधारणा : समस्या आणि धोके *

**विनायक श्रीधर देशपांडे** **

विकसनशील देशांमध्ये ग्रामीण वित्त बाजारातील शासनाचा हस्तक्षेप ही एक सामान्य बाब असून या वित्त बाजारात विविध पद्धतीने हस्तक्षेप होत असतो. सरकारची मालकी असलेल्या व्यापारी बँकांनी ग्रामीण भागात शाखा उघडून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणे हा असाच हस्तक्षेपाचा प्रकार आहे. या सर्व बँका नफा मिळवितातच असे नाही. विनियमनामुळे (regulation) देखील बँकांच्या नित्याच्या व्यवहारावर परिणाम होतो. बऱ्याच देशांमध्ये कर्जावर सूट किंवा कर्जमाफी हे एक प्रमाणित धोरणच झाले आहे. कर्जाच्या व्याजाचा दर बाजार दरापेक्षा कमी असल्यामुळे साहजिकच कर्जाच्या मागणीत वाढ होते. त्यामुळे बँका निवडक पतपुरवठ्याच्या धोरणाचा अवलंब करतात. काही विकसनशील देशांतील सरकारे प्राधान्य क्षेत्रांना किती टक्के कर्जपुरवठा करावा याचीदेखील मर्यादा घालून देतात. भारतातील विदेशी आणि खाजगी बँकांवरदेखील असल्या प्रकारचे नियंत्रण आहे.

बाजार दरापेक्षा कमी व्याज दर आकारणे आणि निवडक पतपुरवठा या धोरणांसाठी अर्थातच काही किंमत मोजावीच लागते. रोनाल्ड मॅक्किनन (1973) यांच्या मते अशा धोरणांचा परिणाम वित्तीय पुरवठ्यावर दडपण येण्यावर होतो. बचत आणि कर्ज यांची वाटणी बाजार यंत्रणेचा अवलंब न केल्यामुळे व्यवस्थितरीत्या होऊ शकत नाही. बचत व कर्ज यांचा पुरवठा नैसर्गिकरीत्या होण्यासाठी वित्तीय क्षेत्रात उदारीकरण, सरकारी निर्नियंत्रण अशा प्रकारच्या धोरणांचा प्रचार उदारमतवादी करतात कर्जपुरवठ्याचा व्याजाचा दर बाजार दरापेक्षा कमी ठेवल्यास गुंतवणुकीला चालना मिळून बचतीवर त्याचा विपरित परिणाम होणार नाही यावर भर देऊन व्याजाचा दर कमी ठेवण्याच्या धोरणाचा काहींनी पुरस्कार केला.

मात्र हे मत मॅक्किनन ( 1973 ) आणि शॉ ( 1973 ) यांनी खोडून काढले आहे. त्यांच्या मते बाजार दरापेक्षा व्याजाचा दर कमी ठेवल्यास वित्तीय

* मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रासाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट निबंधासाठी 'कै. ग. प्र. पिंपरकर पारितोषिक' देण्यात येते. पुणे येथे संपन्न झालेल्या परिषदेच्या एकोणिसाव्या वार्षिक अधिवेशनात सदर पारितोषिकासाठी प्रस्तुत निबंधाची निवड करण्यात आली.

** पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

बचत कमी होऊ लागेल आणि गुंतवणूक ही सीमान्तिक आय जेथे कमी आहे तेथेदेखील होऊ लागेल आणि याचा परिणाम एकंदर गुंतवणुकीची कार्यदक्षता कमी होण्यावर होईल.

बाजारातील हस्तक्षेपावर अमेरिकेतील ओहायो राज्य विद्यापीठातील एका अभ्यास गटाने देखील आक्षेप घेतला आहे (अॅडॅम्स, ग्रॅम आणि फॉन पिशके, 1984). गरिबांना मदत करण्याच्या उद्दिष्टाने अमलात आणलेल्या धोरणांत अनेकदा सुसूत्रता नसते. या गटाने असे नमूद केले आहे की, सरकारमार्फत होणाऱ्या कर्जपुरवठ्यात कसूरदारांच्या संख्येचे प्रमाण जास्त असते आणि असल्या कार्यक्रमांचा फायदा गरिबांपेक्षा श्रीमंतच अधिक घेतात. सरकारी हस्तक्षेपावर आणि धोरणावर बरीच टीका झाल्यामुळे विकसनशील राष्ट्रांच्या ग्रामीण पत बाजारातील हस्तक्षेपाबद्दल पुनश्च विचार करण्याची आवश्यकता आहे.

आदर्श कर्ज बाजारात कर्जाचा व्यापार स्पर्धात्मक परिस्थितीत होत असून व्याजाच्या दराची निश्चिती मागणी व पुरवठ्याच्या साहाय्याने होते. गुंतवणूक ही फायद्याची असल्यास व्यक्ती जास्त व्याजाचा दर द्याव-यास तयार होतील. सैद्धान्तिकदृष्टचा त्यामुळे उत्तम गुंतवणूक संधीचीच निवड करावयास हवी. अशा प्रकारचा पत बाजार हा पारेटो कार्यदक्षतेच्या संदर्भात कार्यदक्ष होईल. दुसऱ्या एखाद्या व्यक्तीची स्थिती प्रतिकूल न होता एखाद्या व्यक्तीला चांगल्या स्थितीत आणता येते तेव्हा प्रमाणित आर्थिक संकल्पनेनुसार पारेटो कार्यदक्षता साधली जाते असे म्हणता येईल. दोन व्यक्तींना व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य दिल्यास बाजारात अशा प्रकारच्या सुधारणांची निर्मिती होते.

जर एका व्यक्तीला गुंतवणूक करण्याची संधी उपलब्ध झाली असेल परंतु भांडवलाचा अभाव असेल आणि दुसऱ्या व्यक्तीजवळ भांडवल असेल तर दुसऱ्याने पहिल्या व्यक्तीस भांडवलाचा पुरवठा केल्यास दोहोंना या व्यवहारातून फायदा होऊ शकेल. फक्त त्यांना या व्यवहारापासून मिळणाऱ्या फायद्याची विल्हेवाट कशी करायची याबाबतचा मार्ग शोधावा लागेल. दोघांच्या परिस्थितीत सारखी सुधारणा होत असल्यास स्वेच्छेने असल्या व्यवहारात ते सहभागी होतील.

जेव्हा कर्ज घेणाऱ्या व्यक्तीला पुन्हा ते कर्ज दुसऱ्याला देण्याची प्रेरणा होणार नाही आणि तो पुनर्विक्रीच्या व्यवहारात सहभागी न होता स्वतः साव-कार होणार नाही तेव्हा पारेटो कार्यदक्षता साध्य होईल. प्रथम मूलभूत कल्याण प्रमेयाद्वारे असे लक्षात येते की, स्पर्धात्मक बाजारात बाह्य घटकांचा (externalities) अभाव असल्यास त्याची परिणती पारेटो कार्यदक्षतेत (Pareto efficient outcome) होते. परंतु पूर्ण स्पर्धेच्या प्रमाणित प्रारुपात पत बाजाराच्या संदर्भात काही उणिवा सैद्धांतिक तसेच व्यावहारिकदृष्टचा असल्याचे दिसते. ऋणको परतफेड करण्यास समर्थ नसल्यास किंवा त्याची परतफेड करण्याची इच्छा नसल्यास पत बाजाराकरिता सक्तीने कायद्याचा आधार घ्यावा लागेल. परंतु याकरिता लागणारा खर्च खूप जास्त होत असेल तर धनको किंवा सावकार कर्ज देणे बंद करू शकतील आणि त्याचा परिणाम विकसनशील राष्ट्रांतील गरीब शेतकऱ्यांवर होईल.

परिपूर्ण माहितीच्या अभावी पत बाजार आदर्श बाजारापासून बराच दूर होत जातो. माहिती परिपूर्ण नसल्यास धनको काही व्यक्तींना कर्ज देण्याचे नाकारू शकतो. कर्ज घेणारी व्यक्ती कर्जाचा वापर योग्य रीतीने करेल किंवा नाही. ऋणको कितपत विश्वासपात्र आहे याबाबतची योग्य माहिती प्राप्त न झाल्यास कर्जदार कर्ज देण्याबाबत साशंक होतात.

या व्यावहारिक अडचणी कर्जाच्या वाटपातील कार्यदक्षतेचा विचार करताना लक्षात घेणे आवश्यक आहे. कल्याणाच्या अर्थशास्त्राच्या प्रमेयाची चाचणी करताना बऱ्याच गृहितांचा आधार घ्यावा लागतो. काही आवश्यकच असतात तर काही सुलभता आणण्या-साठी उपयोगी पडतात. सामान्यपणे हे प्रमेय सर्वत्र लागू होतीलच असे नाही. याकरिता बाजार संरचना परिपूर्ण असण्याची आवश्यकता आहे. वित्त बाजाराच्या संदर्भात ही सर्व गृहिते अडथळे निर्माण करतात.

बाजार अपूर्ण राहिल्यास अर्थव्यवस्था पारेटो संरोधित इष्टतमन (constrained Pareto optimal) नाही असे म्हणता येईल. येथे सरकार हस्तक्षेप करून आणि माहितीचा प्रसार करून बाजाराचा फायदा सर्वांना मिळेल असा प्रयत्न करू शकते.

## भारतातील वित्तीय क्षेत्र

भारतातील बँक व्यवसायाचे क्षेत्र ग्रामीण विकास घडविण्याकरिता एक महत्त्वपूर्ण माध्यम यादृष्टीने उदयास आले आहे. मागास भागाचा विकास साधण्याच्या दृष्टीने बँक व्यवसायाची सेवा सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचविण्याकरिता विविध धोरणांचा अवलंब 1969 च्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर आला. देशाच्या कानाकोपऱ्यात बँकांचे जाळे पसरले गेले. ग्रामीण भागातील प्रत्येक सामान्य व्यक्तीला बँक सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व्यापारी बँका, विभागीय ग्रामीण बँका आणि सहकारी पतसंस्था यांचा सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

बाजारयंत्रणेचा अवलंब केल्यास आर्थिक विकास साधता येतो या विचाराला मान्यता मिळत असल्याचे दिसते. पतपुरवठ्याच्या प्रत्यक्ष पद्धती उत्पन्नाची विभागणी करण्यास किंवा वास्तव वस्तूबाजारातील अपूर्णता दूर करण्यास परिणामकारक होऊ शकत नाही असा काही देशांचा अनुभव आहे. यामुळे जास्तीत जास्त देश आपली वित्तीय पद्धती अधिकाधिक शिथिल करण्याच्या प्रयत्नात आहेत. काही देशांची वित्तीय व्यवस्था असल्या शिथिलीकरणाच्या धोरणामुळे कोसळली आणि त्या देशांना पुन्हा नियंत्रणाचा अवलंब करावा लागला तर इतर काही देशांना वित्तीय सेवेचा दर्जा वाढविण्यात, परिव्यय कमी करण्यात आणि विकास दर उंचावण्यात यश प्राप्त झाले

वित्तीय सुधारणांत व्याजाचा दर मुक्त करणे, प्रत्यक्ष पतपुरवठा पद्धती बंद करणे, नवीन वित्तीय संस्थांचा वित्त बाजारात शिरकाव करण्यास किंवा अस्तित्वात असलेल्या संस्था बाजाराबाहेर निघण्यास असलेले बंधन काढून घेणे, वित्तीय निर्णय घेण्याच्या दृष्टीने तसेच धनकोला माहिती पुरविण्याच्या सोयीत सुधारणा आणणे, वित्तीय व्यवहारातील भेदभावकारी कराधान ( discriminatory taxes ) काढून टाकणे या बाबींचा समावेश करण्यात येतो या धोरणांचा अवलंब न केल्यास किंवा हळूहळू सुधारणा आणल्यास वित्तीय संस्था अकार्यदक्ष होऊन साधनसंपत्तीचा गैरवापर असाच सुरू राहील आणि याचा परिणाम विकास दर कमी होण्यावर होईल. तसेच या धोरणांचा विस्ताढधाईने अवलंब केल्यास रोजगार निर्मितीत सातत्य न राहून उत्पन्नात घट होऊ शकेल आणि अमलात आणलेल्या सुधारणा चालू ठेवता येणार नाहीत किंवा पुनश्च बंधने टाकावी लागतील.

थोडक्यात, सुधारणांची गती आणि पद्धती या बाबी वित्तीय सुधारणांचे यश प्राप्त करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. वित्तीय शिथिलीकरणाचे आतापर्यंत प्राप्त झालेले अनुभव हे तात्पुरत्या स्वरुपाचे आहेत.

समष्टीय आर्थिक स्थिरता काही प्रमाणात निर्माण झाल्याशिवाय वित्तीय शिथिलीकरण अत्यंत कठीण आहे आणि तसेच अशा धोरणांच्या यशाची देखील नेहमीच खात्री देता येणार नाही. अर्जेन्टिना, ब्राझील, कोलंबिया, मेक्सिको तसेच चिली या देशांमध्ये शिथिलीकरणाचे धोरण भावफुगवटयाची स्थिती अत्यंत बिकट असताना अमलात आणण्यात आले होते. अशा स्थितीत वित्तीय संपत्तीवर मिळणारी वास्तविक प्राप्ती कमी होऊन वित्तीय संस्थांची नफा प्राप्त करण्याची क्षमता कमी होत जाते. बचतीच्या पुर्नवित्तीयीकरणावर याचा विपरित परिणाम होऊन आर्थिक विकास आणि कार्यदक्षता कमी होते.

वित्तीय सुधारणा होत असताना सापेक्ष किमतीत बदल घडून येत असतो. हा बदल आर्थिक व्यवहारात सामावून घेतला जाईल किंवा नाही याचा देखील अंदाज घेणे आवश्यक आहे. हे बदल किमतींच्या अस्थिरतेच्या वातावरणात अमलात आणल्यास योग्य व्याजाचा दर निश्चित करणे तसेच परिणामाचे विश्लेषण करणे कठीण होते. वित्तीय क्षेत्र सक्षम होण्यासाठी सातत्याने काही प्रमाणात समष्टीय स्थिरता आणणे आवश्यक आहे.

दिवाळखोरीत निघालेल्या वित्तीय संस्थांना शिथिलीकरणाचे धोरण सक्षम करू शकेल हा समज चुकीचा आहे. विकसनशील राष्ट्रांमधील बऱ्याच वित्तीय संस्था दिवाळखोर झालेल्या आहेत. समायोजनेच्या काळात ( adjustment period ) वित्तीय शिथिलीकरणाचा परिणाम वित्तीय संस्थांचे उत्पन्न कमी होण्यावर होतो. बँका व वित्तीय संस्थांना सक्षम होईपर्यंतच्या कालापर्यंत बराच त्रास सहन करावा लागतो. हे सर्व

प्रश्न सोडविण्यासाठी संपूर्ण वित्तीय शिथिलीकरणाच्या पूर्वी संरचनात्मक बदल करणे आवश्यक आहे.

## भारतातील वित्तीय व्यवस्थेची समष्टीय बाजू

भारतातील वित्तीय व्यवस्थेच्या विकासाचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने काही भांडवल / वित्तीय घनीकरण (financial deepening) गुणोत्तरे बघता येतील. अर्थव्यवस्थेत एक क्षेत्र दुसऱ्या क्षेत्राकडून कर्ज घेत असते. अर्थव्यवस्थेत प्रचलित करण्यात आलेले वित्तीय दावे ( financial claims ) प्राथमिक दावे आणि दुय्यम दावे अशा दोन भागांत विभागण्यात येतात. गैर–वित्तीय क्षेत्रांकडून किंवा कर्ज घेणाऱ्यांकडून जेव्हा मागणी केली जाते (दावे प्रचलित करण्यात येतात) त्याला 'प्राथमिक दावे' ( primary issues ) असे म्हणतात. याउलट, ही मागणी वित्तीय मध्यस्थांमार्फत (बँका आणि इतर वित्तीय संस्था) झाल्यास 'दुय्यम दावे' असे संबोधले जाते वित्तीय प्रवाहाचे हे प्रमाण वित्तीय विकासाचे निर्देशक म्हणून आधार मानण्यात येते. भारताच्या संदर्भात वित्तीय प्रवाह तक्ता 1 मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता 1**

**वित्तीय विकास गुणोत्तर**

| गुणोत्तर | 1951-52 | 1970-71 | 1980-81 | 1991-92 |
|---|---|---|---|---|
| वित्त गुणोत्तर | 0·75 | 17·15 | 33·03 | 41·3 |
| वित्तीय आंतर–संबंध गुणोत्तर | 0·08 | 1·18 | 1·49 | 2·29 |
| मध्यमावधी गुणोत्तर | 0·27 | 0·66 | 0·76 | 0·79 |

स्रोत : Reserve Bank of India Bulletin, June 1994.

(1) वित्तीय विकास आणि एकंदर आर्थिक अभिवृद्धी यातील संबंध वित्त गुणोत्तरात ( finance ratio ) प्रतिबिंबित होतो. एकूण वित्तीय प्रचलनाचे ( financial issues ) राष्ट्रीय उत्पन्नाशी गुणोत्तर काढल्यास वित्त गुणोत्तर मिळू शकेल. भारतात 1951–52 या दरम्यान 1 टक्क्यापेक्षा कमी असलेले वित्त गुणोत्तर 1970 च्या सुमारास 17 टक्क्यांपर्यंत पोहोचले आणि त्यानंतर 1991–92 ला ते हळूहळू 43.3 टक्के झाले.

(2) वित्तीय आंतरसंबंध ( financial interrelations ) गुणोत्तर, वित्तीय विकास आणि भौतिक गुंतवणुकीतील अभिवृद्धी या दोघांमधील संबंधाद्वारे दर्शविता येईल. वित्तीय दाव्यातील वाढीशी निव्वळ भांडवल निर्मितीचे प्रमाण काढल्यास वित्तीय आंतर–संबंध गुणोत्तर मिळते. वित्तीय आंतरसंबंध गुणोत्तर 1991–92 च्या दरम्यान फक्त 0.08 इतके होते. 1970 च्या सुरुवातीला हे गुणोत्तर 1 पेक्षा अधिक होऊन 1951–52 ला 2.29 पर्यंत वाढत गेले.

(3) मध्यमावधी गुणोत्तर ( intermediation ratio ) हा देखील वित्तीय विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्देशांक आहे. दुय्यम प्रचलनाचे एकूण प्रचलनाशी गुणोत्तर काढल्यास ( ratio of secondary issues to total issues ) वित्तीय संस्थांचे, वित्तीय व्यवहारात असलेले महत्त्व लक्षात येऊ शकेल. हे गुणोत्तर 1951–55 या कालात 0.27 होते तर 1970 च्या दरम्यान साधारणपणे 0.7 वर स्थिरावले आणि 1991–92 ला 1.28 पर्यंत ते वाढत गेले.

वित्तीय विकासाच्या गुणोत्तराची प्रवृत्ती वित्तीय क्षेत्रात झपाट्याने होणाऱ्या वाढीची सूचक आहे वित्तीय व्यवस्थेच्या सर्वच भागात सुधारणा झाल्याचे दिसते. परंतु सर्वात महत्त्वपूर्ण विकास बँकव्यवस्थेत झाला आहे असे आढळते. जून 1969 ते जून 1993 या दरम्यान बँकांच्या शाखा 8,262 वरून 61,248 पर्यंत वाढत गेल्या. याचा परिणाम म्हणजे एक बँक 1969 मध्ये 65,000 सरासरी लोकसंख्येची सेवा करीत होती तर 1993 साली ही संख्या 11,000 पर्यंत खाली आली. बँकांच्या ठेवी स्थूल देशांतर्गत उत्पादिताच्या प्रमाणाशी [ चालू किमतीला ] घेतल्यास, 1969–70 च्या 13 टक्क्यांवरून 1992–93 ला हे प्रमाण 40 टक्क्यांपर्यंत वाढत गेले. बचत वृद्धी करण्यात बँकांचे महत्त्व यावरून लक्षात येते.

बँकांचे जाळे सर्वत्र पसरविण्यात आणि वित्तीय सोयी लोकांपर्यंत पोहोचविण्यात भारतातील वित्तीय व्यवस्थेने प्रगती केली आहे यात शंका नाही. परंतु याबरोबरच वित्तीय संस्था कितपत कार्यदक्ष आहेत हा प्रश्न निर्माण होतो. कार्यदक्षतेची ठराविक व्याख्या करणे कठीण आहे. कार्यदक्षता विविध दृष्टीने बघता येईल. खातेदाराच्या दृष्टीने बँकांची क्षमता त्याला धनादेश किती लवकर वठविता येतो किंवा ड्राफ्ट अथवा निधी एका ठिकाणाहून दुसरीकडे किती जलद आणि किती खर्चात पाठविता येईल यावर अवलंबून राहील.

वित्तीय व्यवस्था उपलब्ध निधीचे स्थलांतरण आधिक्य असलेल्या क्षेत्राकडून कमतरता असलेल्या क्षेत्राकडे किती व्यवस्थितरीत्या करू शकेल यावर देखील कार्यदक्षतेचे मापन करता येईल. निधी उभारण्याकरिता लागणारा खर्च आणि निधी कर्ज रूपात देताना त्यावरील आकारण्यात येणारा दर या दोहोंमधील तफावत जितकी कमी होईल तितकी वित्तीय व्यवस्था कार्यदक्ष होऊ शकेल. यादृष्टीने वित्तीय क्षेत्रातील सुधारणेचा प्रमुख उद्देश व्याजाचा दर सुसंघटित ( rationalisation ) करणे आणि सध्या अस्तित्वात असलेल्या प्रबंधित व्याज दराच्या पद्धतीत बदल करणे हा होय. प्रबंधित व्याज दर पद्धतीत ( administered interest rate ) अंतर्गत अर्थसाहाय्य ( cross subsidy ) हा घटक अंतर्भूत असल्यामुळे काही कर्ज घेणाऱ्यांना जास्तीचा दर आकारण्यात येतो यामुळे बँका निधी उभारण्याकरिता लागणाऱ्या खर्चापेक्षा फार जास्त दर आकारतात असा समज कर्ज घेणाऱ्यांचा होतो. सध्याच्या स्थितीत बदल करण्याची आवश्यकता सांगताना काही तज्ज्ञांच्या मते प्रबंधित व्याज दर पद्धती अस्तित्वात असल्यास, निधी उभारण्यासाठी लागणारा खर्च आणि कर्ज देण्यासाठी आकारण्यात येणारा दर यातील फरकाच्या आधारे कार्यदक्षता निश्चित करता येणार नाही.

काही क्षेत्रांना सवलतीच्या दराने कर्जपुरवठा करता येण्याच्या दृष्टीने आपल्या देशात प्रबंधित व्याज दर पद्धतीचा अवलंब करण्यात आला. वित्तीय संस्थांवर काही बंधने लादण्यात आल्यामुळे सरकारला सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध होणे शक्य झाले. परंतु या बंधनांमुळे वित्तीय संस्थांना आपापली साधने वाढविणे कठीण झाले. अग्रक्रम क्षेत्रांना पुरविण्यात येणाऱ्या कर्जावर मर्यादा असल्यास वित्तीय संस्थांवर पडणारा भार ग्राह्य आहे असे मानता येईल. यामुळे अंतर्गत अर्थसाहाय्यावर देखील मर्यादा येतात. व्याजाच्या दराच्या संरचनेतील बदल हे अग्रक्रम क्षेत्रांना देण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष कर्जपुरवठ्याशी संबंधित असतात. प्रत्यक्ष कर्जपुवठ्यात कर्ज किती प्रमाणात प्राधान्य क्षेत्रांना दिले ही मूलभूत अडचण नसून सवलतीच्या व्याज दराचा फायदा कोणत्या कर्जधारकांनी किती वेळा घेतला हे पाहणे आवश्यक आहे.

## रिझर्व्ह बँक आणि व्याजाचे अविनियमन

दोन लाखाच्या वरील कर्जाच्या रकमांसाठी रिझर्व्ह बँकेने अविनियमन व्याजाच्या दराचा अवलंब केला आहे. सामान्यपणे अविनियमन व्याज दर नाणे बाजार व्यवस्थितरीत्या विकसित झाल्यावरच अमलात आणावयास हवा. अविनियमन व्याजाच्या दरासाठी संदर्भ दर विकसित करणे आवश्यक आहे. विकसित देशांत बँक दर, किंवा रिझर्व्ह बँक ज्या दराने इतर बँकांना प्रथम दर्जाच्या विपत्रांवर निधी पुरविते तो दर, इतर व्याज दरासाठी प्रमाण ( standard ) म्हणून ठरला जातो. बँक दर पतपुरवठ्यासाठी लागणाऱ्या खर्चावर आधारलेला असतो रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांना जी कर्जे देते त्यावर आकारण्यात येणाऱ्या दरात वेळोवेळी बदल करण्यात येतो.

नरसिंहम समितीच्या शिफारसीनुसार, बँक दर हा आधारभूत दर मानून बाजारातील व्याज दराच्या बदलाचा संकेत यावरून मिळू शकतो. बँक दर अधिक परिणामकारक होण्यासाठी रिझर्व्ह बँकेची व्यापारी बँकांना निधी उपलब्ध करून देण्याची तयारी हवी. त्या दराप्रमाणे बँकांजवळ असलेले राजकोष पत्र वटविण्यात यावे. वटाव आणि वित्त गृहातर्फे ( Discount and Finance House) पुर्नवित्त व्यावस्था ( refinancing ) सध्या अस्तित्वात आहे. परंतु वटाव आणि वित्तगृहे भारतात हुंडी बाजाराच्या विकासाला मदत करण्यात आतापर्यंत तरी यशस्वी झालेले नाहीत.

व्याजाच्या दराचे उदारीकरण (liberalisation) केले म्हणजे निरंकुशतेच्या धोरणाचा ( laissez–faire

policy ) अवलंब करण्यात आला असे नाही. याकरिता प्रशासकीय व्याज दराच्या पद्धतीत बदल करताना अप्रत्यक्ष मुद्रा व्यवस्थापनाचे तंत्र बाजाराच्या माध्यमातून कार्यान्वित करावे लागते. या अप्रत्यक्ष मुद्रा व्यवस्थापनात अधिकारी व्याजाच्या दराच्या पातळीचे लक्ष्य ( target ) ठरवू शकतात किंवा चलन आणि पत ( credit ) वाढीचे ध्येय गाठण्यासाठी व्याजाच्या दरात बदल करू शकतात. उदार व्याज दराच्या पद्धतीत देखील योग्य व्याजाच्या दराची पातळी गाठण्याकरिता सतर्क राहावे लागते. तसेच त्याकरिता विशेष प्रयत्न करण्याची देखील आवश्यकता असते.

भारतातील बँका कर्जाची वाटणी मोठ्या प्रमाणावर करण्यात यशस्वी झाल्या आहेत परंतु दीर्घकालिकता आणि स्वयंनिर्वाहिता ( Sustainability and Viability ) याबाबतीत बँकांची विशेष प्रगती झाली नसल्याचे दिसते. सुधारणा कार्यक्रमांतर्गत व्याजाच्या दरात सुसूत्रीकरण ( rationalisation ) आणणे, नवीन बँका आणि इतर वित्तीय मध्यस्थांना वित्तीय क्षेत्रात प्रवेश करण्यास मोकळीक देणे, बँकांची कर्ज देण्याची क्षमता वाढावी म्हणून पत राखीव गुणोत्तर ( Credit Reserve Ratio ) 10 टक्क्यांवर आणि वैधानिक तरलता गुणोत्तर (Statutory Liquidity Ratio ) 25 टक्क्यांपर्यंत आणणे या प्रमुख बाबींचा समावेश आहे. याव्यतिरिक्त बँकांचा भांडवलाधार ( capital base ) अधिक प्रभावशाली करण्याकरिता रिझर्व्ह बँकेने एप्रिल 1992 या वर्षी जोखीम–भारित जिंदगी गुणोत्तर पद्धती ( Risk Weighted Assets Ratio System ) अमलात आणली. याआधारे भारतातील बँकांचे भांडवल पुरेसे आहे किंवा नाही याचा अंदाज घेता येईल. भांडवल इष्टतम प्रमाण 8 टक्क्यांपर्यंत साधावे अशी अट लादण्यात आली. भारतात कार्यरत असणाऱ्या विदेशी बँकांसाठी ही 8 टक्के मर्यादा 31 मार्च 1993 पर्यंतची होती. इतर बँकांसाठी 31 मार्च 1993 पर्यंत भांडवल पुरेपणा निकष ( capital adequacy norm ) 4 टक्क्यांपर्यंत आणावयाचा होता आणि 31 मार्च 1996 पर्यंत हे प्रमाण 8 टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे लक्ष्य आहे.

भांडवलाचे पुरेसे प्रमाण साधण्याच्या दृष्टीने बँकांनी आपल्या संपत्तीचे पुनर्मूल्यांकन करावे अशी समितीची शिफारस आहे. संपत्तीच्या पुनर्मूल्यांकनामुळे बँका पुरेसा निधी निर्माण करू शकतील. बँका भांडवल वाढविण्याकरिता सामान्य भागभांडवल किंवा कर्जाची उभारणी करण्यास मुक्त आहेत. परंतु हे बाजाराच्या लौकिकतेवर (Reputation) अवलंबून आहे. दुबळ्या (weak) बँकांना असल्याप्रकारे निधीची उभारणी करणे त्यांच्या कमी भांडवली आधारामुळे कठीण होईल तसेच या बँकांना ठरवून दिलेले निकष साधण्याकरिता सरकारवर अवलंबून राहावे लागेल.

बँकविषयक व्यवस्था सक्षम व्हावी ह्या उद्देशाने ठरविण्यात आलेल्या विनियमनाचे प्रत्यक्षरीत्या पालन होत आहे किंवा नाही हे बघण्याकरिता वित्तीय पर्यवेक्षण मंडळ ( Board for Financial Supervision ) स्थापन करण्यात आले आहे. हे मंडळ रिझर्व्ह बँकेच्या अधिपत्याखाली कार्यरत राहील. 22 डिसेंबर, 1993 ला मंडळाच्या कामाला हातभार लावण्याकरिता ' पर्यवेक्षण विभाग ' अशा वेगळ्या विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

## भारतीय बँकांपुढील आव्हाने

सरकारी क्षेत्रातील बँकांपुढे वित्तीय सुधारणा करून वित्त बाजार सक्षम करणे हे एक महत्त्वपूर्ण कार्य आहे. बदलत्या वातावरणात बँकांच्या कार्यप्रणालीत आमूलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे. अविनियमित ( deregulated ) व्याजाच्या दर पद्धतीत बँकांना त्या वातावरणाशी समरस करण्याकरिता तयार होणे आवश्यक आहे. ठेवी आणि कर्ज, एकंदर तरलता, मागणी घटक आणि त्याचा नफ्यावर होणारा परिणाम हे घटक विचारात घेऊन बँकांनी व्याजाचा दर निश्चित करण्याकरिता तयार असणे आवश्यक आहे.

मागणीदेय पैसा बाजारात (call money market) नुकताच झालेला गोंधळ लक्षात घेणे सयुक्तिक होईल. उद्योगामार्फत कर्जाची मागणी कमी प्रमाणात झाल्यामुळे आणि रिझर्व्ह बँकेच्या पतपुरवठ्याबाबतच्या कडक नियमांमुळे कर्ज–ठेवी गुणोत्तर ( credit–deposit ratio ) बऱ्याच प्रमाणात खाली घसरले. याचा परिणाम म्हणजे व्यापारी बँकांजवळ मोठ्या प्रमाणात अतिरिक्त रक्कम जमा झाली आणि बँकांनी मोठ्या प्रमाणावर

सरकारी ठेवींमध्ये गुंतवणूक केली. ही रक्कम 29,000 कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. यामुळे वैधानिक तरलता गुणोत्तर (SLR) 31.5 टक्क्यांच्या ऐवजी 39 टक्क्यांपर्यंत गेले. याचा परिणाम म्हणजे कंपन्या अग्रिम कर आणि लाभांश देण्याकरिता मागणीदेय पैसा बाजारात निधीची मागणी करू लागल्या आहेत. दरम्यान सरकारी ठेवींवरील मिळकत घसरली, बँका पैशाची वसुली करण्यात अयशस्वी झाल्या आहेत तसेच मागणीदेय पैसा बाजारात बँका पैसा पुरवू शकल्या नाहीत. मागणीदेय बाजारातील पैशाचा दर (call money rate) यामुळे 50 टक्क्यांच्या वरपर्यंत वाढत गेला. अशा स्थितीत वैधानिक तरलता गुणोत्तर कमी करण्याच्या धोरणाला काहीच अर्थ राहात नाही.

नरसिंहम समितीने सुचविले की, सरकारी मालकी असलेल्या व्यापारी बँकांचा उपयोग राजकीय पक्षांनी सत्तेसाठी करू नये. मालकी आणि बँकांचे व्यवहार या दोन बाबी वेगळ्या समजून बँकांना त्यांच्या कार्यासाठी स्वायत्तता द्यावी. परंतु भावी कालातील सरकार हे धोरण तसेच राबविणार किंवा नाही याबाबत सत्तेवर असणाऱ्या सरकारला शाश्वती नसते. समितीने एका अत्यंत वादग्रस्त मुद्द्याला स्पर्श केला आहे यात शंका नाही. राष्ट्रीय बँकांना स्वायत्तता देऊन नफा मिळविण्याच्या प्रेरणेनुसार कार्य करू द्यावे. राष्ट्रीय बँकांचा प्रमुख उद्देश कार्यदक्षता राखून नफा मिळविणे आहे असे समितीने नमूद केले. राष्ट्रीयीकरणापूर्वी नफा मिळविण्याची प्रेरणा हा प्रमुख उद्देश ठेऊनच बँका मुख्यत्वेकरून शहरी भागात कार्यरत होत्या आणि त्यामुळे शेती आणि ग्रामीण भाग दुर्लक्षित राहून त्यांना पुरेसे कर्ज मिळाले नाही अशी टीका झाली. राष्ट्रीयीकरणानंतर उच्च वर्गीयांसाठीच्या बँक व्यवसायाचे (class banking) रूपांतर लोकांसाठीच्या बँक व्यवसायामध्ये (mass banking) झाले. राजकीय कार्यकर्त्यांनी बँकांचा उपयोग राजकीय स्वार्थासाठी केल्यामुळे काही प्रमाणात बँकांची कार्यदक्षता तसेच नफ्याचे प्रमाण कमी झाले.

राष्ट्रीयीकरणानंतर राजकीय पक्षांतर्फे होणारा बँकांचा गैरवापर आणि सामाजिक बँक व्यवसाय सेवा या दोन गोष्टी वेगळ्या करण्याची आवश्यकता होती. कर्जनिर्धारण (loon assessme..t), वसुली आणि हिशेब / हिशेब तपासणी यातून राजकारण संपूर्णतः नष्ट करणे हे आज अधिक आवश्यक आहे. अग्रक्रमानुसार कर्जपुरवठा करण्याच्या धोरणात बदल करण्याची सध्या तरी अनुकूल स्थिती नाही.

बँकांची मध्यस्थांची असलेली भूमिका उत्तरोत्तर कमी होत असल्यामुळे बँकेतर वित्तीय संस्थांचा व्यवसाय अधिक वाढण्याची शक्यता आहे. खाजगी बँकांना वित्तीय बाजारातील प्रवेश खुला केल्यामुळे मोठे उद्योगपती स्वतःच्या बँका स्थापन करू शकतात. व्यापारी बँकांतील खाती अशा खाजगी बँकांकडे वळल्यास बँकांच्या नफ्यावर त्याचा विपरित परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

समितीने पर्यवेक्षण (supervision) आणि विनियमनाची (regulat;on) जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर सोपविली आहे. परंतु रिझर्व्ह बँक स्वतःच केन्द्रीय वित्त मंत्रलयाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आहे. पैसाविषयक धोरण कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तरी रिझर्व्ह बँकेला केन्द्रीय वित्त मंत्रालयापासून स्वतंत्र करणे आवश्यक आहे. वित्तीय पर्यवेक्षण मंडळाचे कार्य आणि बँकाचे कार्य यात स्पष्टता असणे आवश्यक आहे. मंडळ आणि बँकांचे कार्य परस्परव्यापी (overlapping) होऊ नये याची दक्षता घेण्याची गरज आहे.

राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये चालणारा गोंधळ दूर करण्याकरिता नवीन खाजगी बँकांना तसेच विदेशी बँकांना अधिक प्रोत्साहन देण्यात यावे, अशी नरसिंहम समितीची महत्त्वपूर्ण सूचना आहे. राष्ट्रीयीकृत बँका या कार्यदक्ष नसल्यामुळेच नफ्याची योग्य प्राप्ती करू शकल्या नाहीत असे गृहीत धरूनच ही शिफारस समितीने केल्याचे दिसते. ग्रामीण भागातील सावकाराला पर्याय आणि कर्जाचे वितरण करून रोजगार निर्माण करणे या दोन प्रमुख उद्देशांमुळे बँकांच्या शाखांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरविण्यात आले. यामुळेच ग्रामीण भागातील अनेक शाखांना तोटा सहन करून कार्य करावे लागले ही वस्तुस्थिती आहे.

खाजगी क्षेत्रातील आणि विदेशी बँकांना शाखा उघडण्यासाठी अनुज्ञप्ती (licence) पद्धती होती.

परंतु त्यानी शाखा कुठे उघडू नयेत एवढेच बंधन होते. त्यामुळे त्याना संभाव्य लाभप्रदता असणाऱ्या क्षेत्रात शाखा उघडून लाभप्रदता वाढविता आली नाही हे जरी खरे असले तरी जेथे अत्यंत कमी किंवा संभाव्य व्यवसाय नाहीच अशा ठिकाणी शाखा स्थापन करून त्याना तोटा देखील सहन करावा लागला नाही. राष्ट्रीयीकृत बँकांना कार्यदक्ष करण्याकरिता खाजगी क्षेत्रातील बँकांना प्रोत्साहन देऊन स्पर्धात्मिक दबाव तंत्राचा वापर करावा असे समितीने सुचविले आहे. अतिरिक्त कर्मचाऱ्यांना कामावरून काढणे, संगणित्राचा वापर आणि विशेष चांगल्या कामाबद्दल प्रेरणा या गोष्टी अमलात आणल्यास बँकांमध्ये सुधारणा होऊ शकेल. इतर स्पर्धकांना देण्यात येणाऱ्या सोयी राष्ट्रीयीकृत बँकांनासुद्धा पुरविण्यात याव्यात. राष्ट्रीयीकृत बँका लाभप्रद का होऊ शकल्या नाहीत याचा खोलवर विचार न करता निव्वळ नव्या बँकांना आमंत्रित केले तर खाजगी आणि राष्ट्रीयीकृत अशा दोन्ही प्रकारच्या बँकांना मूलतःच एका स्तरावर आणणे कठीण जाईल. खाजगी बँका आणि विदेशी बँका बडोदा, हैदराबाद, बंगळूर यासारख्या शहरात जेथे राष्ट्रीयीकृत बँका मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत तेथे परवाने मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत.

बँकांची लाभप्रदता शेती आणि इतर प्राधान्य क्षेत्रांना पुरविण्यात येणाऱ्या कर्जामुळे कमी झाली असा आरोप नेहमीच केला जातो. सध्याच्या एकूण कर्ज वाटपाच्या 40 टक्के प्राधान्य क्षेत्राला देण्यात येणारे कर्ज 10 टक्क्यावर आणावे आणि अत्यंत गरजू आणि लहान लाभधारकांकरिताच ते मर्यादित ठेवावे अशी समिती सुचविते. परंतु हे सर्वश्रुत आहे की बँकांच्या बुडीत कर्जात मोठ्या उपक्रमींना देण्यात येणाऱ्या कर्जाचा देखील समावेश असतो. नरसिंहम समितीच्या मते, विषमतेची दरी दूर करण्यासाठी कर्जव्यवस्थेचा आधार न घेता राजकोषीय धोरणांचा अवलंब करण्यात यावा. विकास कार्यक्रमांतर्गत (जसे, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम) देण्यात येणारी भांडवलावरील सूट तसेच व्याजावरील सूट काढून घेण्यात यावी, कारण यामुळे पुरवठा संरचनेत विरुपण येते.

प्राधान्य क्षेत्राला दिलेल्या कर्जाबाबतची माहिती तक्ता 2 मध्ये दिली आहे. कर्जाच्या रकमेत जून 1991 ते जून 1993 पर्यंत वास्तविक वाढ झाल्याचे जरी दिसत असले (रु. 42,093 कोटी पासून रु. 47,848 कोटी) तरी बँकेच्या निव्वळ पतपुरवठ्यात या क्षेत्राचा वाटा जून 1991 च्या 40.9 टक्क्यांवरून जून 1993 च्या 35.9 टक्क्यांपर्यंत घसरला. निर्देशित करण्यात आलेले 40 टक्क्यांचे प्राधान्य क्षेत्रासाठी असलेले ध्येय या दरम्यान गाठण्यात आले नाही. शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या जलद विकासाबरोबरच ग्रामीण कर्जाची मागणीही निश्चितच वाढणार आहे. भूतकाळातील प्रवृत्ती आणि तांत्रिक तसेच शेती क्षेत्रात घडून येत असलेल्या बदलांचा आधार घेऊन कृषी पत आढावा समितीने (ACRC) संपूर्ण शेती व्यवस्थेची कर्जाची मागणी येणाऱ्या वर्षांत किती राहील याचे अंदाज वर्तविले आहेत. हा संपूर्ण अभ्यास सखोल स्वरुपाचा आहे. इथे फक्त शेती उत्पादनाच्या उपपद्धती (agricultural production sub-systems)

**तक्ता 2**

**राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत प्राधान्य क्षेत्रांना करण्यात आलेले कर्जवाटप**

(थकबाकी रक्कम कोटी रुपयांमध्ये)

| क्षेत्र | जून 1991 | जून 1993 |
|---|---|---|
| शेती | 16,864 | 19,774 |
| | (16·4) | (14·8) |
| लघुउद्योग | 16,590 | 18,841 |
| | (16·1) | (14·1) |
| इतर प्राधान्य क्षेत्रे | 8,639 | 9,234 |
| | (8·4) | (7·0) |
| एकूण | 42,093 | 47,848 |
| | (40·9) | (35·9) |
| बँकेचा निव्वळ पतपुरवठा | 1,02,959 | 1,13,231 |

**टीप :** कंसातील आकडे बँकेच्या निव्वळ पतपुरवठ्याशी टक्केवारी दर्शवितात.

**स्रोत :** Economic Survey आणि Reserve Bank of India Bulletin चे संबंधित वर्षांचे अंक.

आणि शेती निविष्टी वाटणी उपपद्धती ( agricultural input distribution sub - system ) याकरिता लागणाऱ्या अल्पकालीन कर्जाचा उल्लेख केला आहे. समितीच्या अहवालातील 1989-90, 1994-95 आणि 1999–2000 या वर्षांसाठी अल्पकालीन कर्जाच्या मागणीचे अंदाज तक्ता 3 मध्ये दिले आहेत. तक्ता 4 मध्ये कर्जाची मागणी व पुरवठा याबाबतची माहिती दिली आहे. तक्ता 4 च्या आधारे असे लक्षात येते की, पत पद्धतीवर ( credit system ) 1995 नंतर बराच ताण पडणार आहे.

**तक्ता 3**

**कृषी उत्पादन आणि कृषी निविष्टी वाटणी उप–पद्धतीसाठी अल्पकालीन कर्जाची मागणी**

(रक्कम कोटी रुपयात 1984-84 च्या किमतीवर आधारित)

| तपशील | 1989-90 | 1994-95 | 1999-2000 |
|---|---|---|---|
| **(अ) कृषी उत्पादन उप-पद्धती** | | | |
| पीक उत्पादन | 8,861 | 15,733 | 23,888 |
| पशुधन | 772 | 939 | 1,185 |
| मत्स्यव्यवसाय | 60 | 120 | 200 |
| **(आ) कृषी निविष्टी** | | | |
| वाटणी उप–पद्धती | 177 | 315 | 478 |
| **एकूण** | **9,870** | **17,107** | **25,751** |

**स्रोत :** कृषी पत आढावा समितीचे अंदाज.

ग्रामीण पत संस्थांपुढे गरिबांना ठराविक कालात पतयोग्य ( creditworthy ) कसे करावे हे महत्त्वाचे आव्हान आहे. सध्याच्या बँक व्यवसायाच्या कार्यदक्षतेत सुधारणा करून या आव्हानाला सामोरे जाता येईल का ? विशेषकरून, ग्रामीण अर्थव्यवस्थेतच संरचनात्मक बदल करण्याची आवश्यकता आहे का ? व्यापारी बँकांमध्ये कार्यदक्षतेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने बरेच

**तक्ता 4**

**कृषी उत्पादन आणि कृषी निविष्टी वाटणी उप-पद्धतीसाठी कर्जाची मागणी आणि साधनांचा पुरवठा**

(कोटी रुपये)

| | 1989-90 | 1994-95 | 1999-2000 |
|---|---|---|---|
| मागणी | 27,551 | 57,316 | 1,10,873 |
| पुरवठा | 28,694 | 51,829 | 89,447 |
| पुरवठ्याचे अधिक्य | +1,143 | –5,487 | –21,426 |

**टीप :** 1984-85 च्या किमतींचा आधार घेऊन निविष्टींच्या किमती 5 टक्के प्रतिवर्षी वाढविण्यात आल्या आहेत.

**स्रोत :** Dantwala, M. L., ' Rural credit - Restructuring the System ', The Economic Times, March 30, 1990.

नवीन बदल करण्यात आले. अग्रणी बँक योजना किंवा सेवा क्षेत्र दृष्टिकोन ( service area approach ) (Lead Bank Soheme) हे उदाहरणादाखल सांगता येतील. केळकर कार्यकारी गटाने ( Kelkar Working Group ) क्षेत्रीय ग्रामीण बँका सक्षम होण्याच्या दृष्टीने विविध सूचना केल्या होत्या. प्राथमिक कृषी पत संस्थांनी ( PACS ) केलेले कार्यदेखील दुर्लक्षित करून चालणार नाही. ग्रामीण पतयंत्रणेच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, गरिबांना पतयोग्य करण्याच्या उद्देशांची पूर्ती अजून झालेली नाही.

## पैसाविषयक व्यवस्थापन

सद्य:स्थितीत पैशाचा पुरवठा सातत्याने वर्षाकाठी 16 ते 17 टक्क्यांनी वाढतो आहे. पुढल्या काही महिन्यात यात अधिक वाढ होण्याची शक्यता आहे. हे निवडणुकीचे वर्ष असल्यामुळे सरकारला पुरविण्यात येणाऱ्या कर्जातही वाढ होणे स्वाभाविक आहे. याचा परिणाम किमतींवर झाल्याशिवाय राहणार नाही.

चलनवाढीवर नियंत्रण आणण्याकरिता रोकड संचिती गुणोत्तर (CRR) वाढवून पैसा गुणकावर (money multiplier) परिणाम होऊन चलनवाढीच्या दराला आळा बसू शकतो. 1970 आणि 1980 च्या सुमारास रिझर्व्ह बँकेने या तंत्राचा वापर यशस्वीरीत्या केला होता. परंतु रिझर्व्ह बँक रोकड संचिती गुणोत्तर कमी करण्याकरिता बांधील आहे. तसेच सांविधिक तरलता गुणोत्तर (SLR) वाढविण्यात अर्थ नाही. बहुतेक बँकांजवळ अगोदरच लादण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा बऱ्याच जास्त प्रमाणात प्रतिभूती (securities) आहेत. स्थूल देशांतर्गत उत्पादिताची अभिवृद्धी 5.5 टक्के दराने होत राहील हा आधार घेऊन पैशाच्या पुरवठ्याची वाढ 15.5 टक्क्यांपर्यंत निर्धारित करण्यात आली होती. उत्पादिताचा अभिवृद्धी दर जरी वाढला तरी वाढणारे चलन तेवढ्या प्रमाणात सामावून घेणे कठीण जाईल. केन्द्र सरकारला पुरविण्यात येणाऱ्या कर्जात वाढ झाल्यास रिझर्व्ह बँकेला पतपुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक होईल.

भविष्यात सरकारला कर्ज पुरविण्याच्या प्रक्रियेवर आळा घालण्यासाठी रिझर्व्ह बँक आणि सरकार या दोहोंमधील कराराला कायद्याच्या चौकटीत बसविणे हा एकमेव मार्ग दिसतो. संरचनात्मक बदलांच्या प्रक्रियेत भारताने कशा प्रकारे सावध राहावयास हवे याचे उदाहरण म्हणून मेक्सिकोतील अरिष्टाचा उल्लेख करता येईल लोकानुनयाकरिता सावधानता थोडी जरी दुर्लक्षित केली तरी त्यामुळे संकट येण्याची शक्यता असते. पैसाविषयक धोरण आणि राजकोषीय धोरण ही नेहमीच कडक नियंत्रणात असण्याची आवश्यकता आहे. मेक्सिको सरकारचा अर्थसंकल्प अगदी अल्प प्रमाणावर अर्थसंकल्पीय तूट दर्शवीत होता, परंतु निवडणुकीच्या दबावामुळे पैसाविषयक धोरणात काही प्रमाणात शिथिलता होती. सध्याचे राज्यातील निवडणुकांचे निकाल बघता अशा सापळ्यात (trap) भारत अगदी सहजपणे येऊ शकतो.

## समारोप

सरकारने अवलंबिलेल्या संरचनात्मक बदलाच्या अंतर्गत वित्तीय व्यवस्थेतील बदल हा देखील एक महत्त्वपूर्ण भाग आहे. अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांत होणाऱ्या बदलांना अनुसरून वित्तीय क्षेत्रात बदल करण्यात यावा यादृष्टीने 1991 या वर्षी नरसिंहम समिती स्थापन करण्यात आली. अत्यंत अल्पकालात समितीने आपला अहवाल सादर केला.

राष्ट्रीयीकृत बँकांना स्वायत्तता देऊन नफ्याच्या प्रेरणेने त्यांनी कार्य करावे या वादग्रस्त मुद्याला समितीने स्पर्श केला. बँकांनी आपली कार्यदक्षता नफा मिळविण्याच्या उद्देशाने वाढवावी असे समिती सुचविते. प्राधान्य क्षेत्रांना देण्यात येणाऱ्या कर्जांवर याचा निश्चितच परिणाम होणार आहे. बँकांमार्फत पूर्ण करण्यात येत असलेल्या सामाजिक जबाबदाऱ्या आणि बँकांची लाभप्रदता या दोहोंचा मेळ कसा साधता येईल हा महत्वाचा प्रश्न आहे. लाभप्रदतेच्या तत्त्वाला अधिक प्राधान्य देण्यात येत असल्यामुळे समानतेचे उद्दिष्ट कितपत साध्य होईल याबाबत शंका वाटते. बाजारयंत्रणा व्याज दर निश्चितीकरिता देखील कार्यान्वित व्हावी असे समिती सुचविते अविनियमित व्याज दर नाणे बाजार विकसित झाल्यावरच अमलात आणावयास हवा. प्रबंधित व्याज दराच्या पद्धतीत बदल करताना अप्रत्यक्ष पैसा व्यवस्थापनाचे तंत्र बाजाराच्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात यावे. पूर्ण स्पर्धेच्या प्रमाणित प्रारुपात पत बाजाराच्या संदर्भात सैद्धान्तिक तसेच व्यावहारिकदृष्टचा काही उणिवा असल्याचे दिसते. समष्टीय आर्थिक स्थैर्य साध्य झाल्याशिवाय वित्तीय क्षेत्रात शिथिलीकरण आणल्यास अर्थव्यवस्थेत अनिश्चितता निर्माण होऊ शकेल.

## संदर्भ सूची

1 Besley, Timothy, 'How Do Market Failures Justify Interventions in Rural credit Markets?', The World Bank, RESEARCH OBSERVER, Vol. 9, No. 1, January, 1994.

2 Dantwala, M. L. (March 30, 1990) 'Rural Credit - Restructuring the System', THE ECONOMIC TIMES, March 30, 1990.

3 Ghei, Nita 'Learing From the Mexican

Crisis', THE ECONOMIC TIMES, January 25, 1995.

4 Krishnakumar, B., 'Capital Adequacy Norms Lagging Behind', THE ECONOMIC TIMES, May 14, 1992.

5 Pande, A B., 'Challenges before Indian Banking', HITAVADA, August 13, 1995.

6 Raghavan, V., 'RBI and Interest Deregulation', THE ECONOMIC TIMES, Oct. 28, 1994.

7 Rangarajan, C., 'Indian Financial Systems – The Emerging Horizon,' RESERVE BANK OF INDIA BULLETIN, June 1994.

8 Report on Trends and Progress of Banking in India : 1992-93, RESERVE BANK OF INDIA BULLETIN (supplement), May 1994.

9 Sarkar, Keya, 'Banking on competition,' THE ECONOMIC TIMES, December 26, 1991.

10 Singhal, Rajrishi, 'Monetary Management Walking the Tightrope', THE ECONOMIC TIMES, August 17, 1995.

11 Stiglitz, Joseph E. (1993), 'THE ROLE OF STATE IN FINANCIAL MARKETS,' Proceedings of the World Bank Annual Conference on Development Economics.

12 Thimmaih, G., 'Narasimham Report : Ill-thought Out Effort,' THE ECONOMIC TIMES, February 24, 1992.

□ □


## मराठी अर्थशास्त्र परिषद, प्रकाशन चौथे

### अर्थमीमांसा – वैज्ञानिक की कलात्मक ?

**लेखक : नी. वि. सोवनी**

किमत रु. 250 (सूट 10 टक्के)

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना उपयुक्त संग्राहद्य ग्रंथ.

सूट वजा जाता निव्वळ किमत रु. 225 पुढील पत्त्यावर मनी ऑर्डर / डिमांड ड्राफ्टने पाठविल्यास ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक–पोस्टने पाठविला जाईल. डिमांड ड्राफ्ट नाशिक येथील व्यापारी बँकेच्या शाखेवर देय असावा आणि तो '**मराठी अर्थशास्त्र परिषद**' या नावाने काढावा.

**पत्ता** : प्रा. गुलाबराव तायडे, कार्यवाह–खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
9, नहुष सहकारी गृहनिर्माण संस्था, गंगापूर रस्ता, नाशिक 422 005

# मराठी अर्थशास्त्र परिषदेची वार्षिक अधिवेशने

| वार्षिक अधिवेशन | अधिवेशनाचे दिनांक | संस्था व ठिकाण | अध्यक्ष | अध्यक्षीय भाषणाचा विषय | चर्चासत्रांचे विषय |
|---|---|---|---|---|---|
| पहिले | 25, 26 नोव्हेंबर, 1977 | पोदार वाणिज्य आणि अर्थ-शास्त्र महाविद्यालय, मुंबई | प्रा. नी. वि. सोवनी, पुणे | मराठीतील अर्थशास्त्रीय वाङमय, इतिहास, परंपरा, समस्या व भावी वाटचाल | 1 चलन अतिवृद्धी<br>2 महाराष्ट्र सरकारची रोजगार हमी योजना |
| दुसरे | 26, 27, 28 ऑक्टोबर, 1978 | नागपूर विद्यापीठ, नागपूर | प्रा. वि. म. दांडेकर, पुणे | भारतीय अर्थव्यवस्थेतील अंतर्गत वसाहतवाद | 1 नफ्याविषयी सिद्धान्तन<br>2 लोकसंख्या आणि आर्थिक विकास<br>3 महाराष्ट्रातील एकाधिकार कापूस खरेदी योजना |
| तिसरे | 26, 27, 28 ऑक्टोबर, 1979 | मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | डॉ. श्री. आ. देशपांडे, नागपूर | ग्रामीण विकासाच्या समस्या | 1 अर्थशास्त्रातील खंड सिद्धान्तन<br>2 महाराष्ट्रातील प्रादेशिक विकास व नियोजन<br>3 महाराष्ट्रातील शासकीय उद्योग व उपक्रम यांचे व्यवस्थापन व प्रश्न |
| चौथे | 31 ऑक्टोबर, 1, 2 नोव्हें., 1980 | श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेचे महाविद्यालय, धुळे | डॉ. वि. वि. बोरकर, औरंगाबाद | महाराष्ट्रातील आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय | 1 अर्थशास्त्रातील समतोलाची संकल्पना<br>2 महाराष्ट्रातील शेतीमालाच्या विनियमित बाजारपेठा<br>3 महाराष्ट्रातील करव्यवस्था |
| पाचवे | 19, 20, 21 नोव्हेंबर, 1981 | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | प्रा. या. शि. महाजन जळगाव | भारतातील सरकारी क्षेत्र–काही समस्या | 1 उद्योग संस्थांविषयीचे आधुनिक सिद्धान्तन<br>2 भारतातील चलनविषयक धोरण<br>3 स्वयंसेवी संघटना आणि ग्रामीण विकास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सहावे | 25, 26, 27 नोव्हेंबर, 1982 | कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, संगमनेर (अहमदनगर) | डॉ. आनंद नाडकर्णी, पुणे | भारतीय करव्यवस्था | 1 अर्थशास्त्रातील वेतन सिद्धान्तन<br>2 भारताच्या परकीय चलनसंचयाचे प्रश्न<br>3 केन्द्र–राज्य वित्तीय संबंध |
| सातवे | 28, 29, 30 ऑक्टोबर, 1983 | श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ, पुणे येथील महाविद्यालय | डॉ. स. ह. देशपांडे, मुंबई | मार्क्सवाद आणि सामाजिक न्याय | 1 कार्ल मार्क्स यांचे अर्थशास्त्र<br>2 भारतातील औद्योगिक संरचना<br>3 सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ |
| आठवे | 7, 8, 9 डिसेंबर, 1984 | श्री स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालय, अंबेजोगाई (बीड) | डॉ. वि. बा. घुगे, कोल्हापूर | भारतातील भावफुगवटा | 1 केन्स यांचे अर्थशास्त्र आणि नंतर<br>2 डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे आर्थिक विचार<br>3 महाराष्ट्रातील नागरीकरण आणि त्याच्या समस्या |
| नववे | 1, 2, 3 नोव्हेंबर, 1985 | पदव्युत्तर शिक्षण व संशोधन केन्द्र, मुंबई विद्यापीठ, रामनाथी देव–स्थान, फोंडा, गोवा | डॉ. ह. कृ. पराजपे, पुणे | भारतातील नियोजनातील दिशाबद्दल इष्ट आहे का? | 1 अर्थशास्त्र : व्याख्या व व्याप्ती<br>2 महाराष्ट्राच्या कृषी उत्पादनाच्या समस्या<br>3 गोव्याचा आर्थिक विकास व नियोजन |
| दहावे | 25, 26, 27 ऑक्टोबर, 1987 | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला | डॉ. रवीन्द्र स. सबनीस, मुंबई | भारतातील पैशाविषयीचे धोरण | 1 सनातन अर्थशास्त्रातील विचार आणि आर्थिक विकास<br>2 भारताचे राष्ट्रीय उत्पन्न : संकल्पना आणि मापन<br>3 महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाच्या समस्या |

| वार्षिक अधिवेशन | अधिवेशनाचे दिनांक | संस्था व ठिकाण | अध्यक्ष | अध्यक्षीय भाषणाचा विषय | चर्चासत्रांचे विषय |
|---|---|---|---|---|---|
| अकरावे | 1, 2, 3, 4 जानेवारी, 1987 | रयत शिक्षण संस्था, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय, सातारा | डॉ. गि. सो. कल्याणकर, औरंगाबाद | भारताचा परकीय व्यापार आणि व्यापारविषयक धोरण | 1 समाजवादी अर्थव्यवस्थेतील आर्थिक नियोजन आणि त्यातील बाजार–व्यवस्था<br>2 नाका कर<br>3 महाराष्ट्रातील अर्थशास्त्र अध्यापनाच्या समस्या |
| बारावे | 25, 26, 27 नोव्हेंबर, 1988 | साहित्य, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय शहादा (धुळे) | प्रा. सौ. नलिनी पंडित, मुंबई | स्त्रिया आणि आर्थिक विकास | 1 शिक्षणाचे अर्थशास्त्र<br>2 भारतातील भांडवल बाजाराचे बदलते स्वरूप<br>3 महाराष्ट्रातील साखर उद्योग |
| तेरावे | 9, 10, 11 नोव्हेंबर, 1989 | गोविंदराव सेक्सरिया अर्थ–वाणिज्य महाविद्यालय, नागपूर | डॉ. रवीन्द्र दोशी, कोल्हापूर | महाराष्ट्रातील कृषी विपणन व्यवस्था | 1 सार्वजनिक खर्चाचे सिद्धान्त<br>2 भारतातील दारिद्र्यनिवारणाच्या योजनांचे मूल्यमापन<br>3 महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय<br>4 केंद्र–राज्य वित्तीय संबंध व पंचायत राज्य विधेयक |
| चौदावे | 10, 11, 12 नोव्हेंबर, 1990 | सोलापूर जिल्हा अर्थशास्त्र अध्यापक समिती व भारती विद्यापीठ, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सोलापूर | डॉ. श्री. वि. खांदेवाले, नागपूर | जर्मनीचे एकीकरण : 1990–युरोपचा एकच बाजार : 1992 | 1 आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास<br>2 भारताच्या अर्थव्यवस्थेतील नियोजन–कालातील संरचनात्मक बदल<br>3 महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँका–स्वरूप आणि समस्या<br>4 भारताच्या अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मितीची शक्यता व समस्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंधरावे | 29, 30 नोव्हेंबर 1 डिसेंबर, 1991 | प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड | डॉ. ज. फा. पाटील कोल्हापूर | तुटीचे (अन) अर्थकारण : भारताच्या राजकोषीय व्यवहारांचे एक विश्लेषण | 1 पैसाविषयक सिद्धान्तातील आधुनिक प्रवाह<br>2 भारतातील अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांच्या समस्या<br>3 महाराष्ट्र आणि गोवा राज्यांतील पर्यटन व्यवसाय<br>4 भारताचे नवे औद्योगिक धोरण |
| सोळावे | 25, 26, 27 डिसेंबर, 1992 | के. टी. एच. एम. कॉलेज, नाशिक | डॉ. शशिकांत गंधे, नवी दिल्ली | लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी | 1 कल्याणाच्या अर्थशास्त्रातील आधुनिक विचार<br>2 भारतातील ग्रामीण उद्योगीकरण<br>3 महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायाचे अर्थशास्त्र<br>4 देशाच्या अर्थव्यवस्थेत अर्थसाहाय्याचे योगदान |
| सतरावे | 27, 28, 29 नोव्हेंबर, 1993 | लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली | डॉ. व्यं. सु. पाटणकर, धुळे | भारतातील परिवहन : विकास आणि धोरण | 1 उपभोक्त्याच्या वर्तनाचे आर्थिक सिद्धान्तन<br>2 भारताची करव्यवस्था<br>3 महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था<br>4 डुंकेल प्रस्ताव आणि भारत |
| अठरावे | 2, 3, 4 जानेवारी, 1995 | दि साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटी, बेळगांव | डॉ. रव्यां. घु. पठाण, पुणे | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भारतीय कृषी अर्थव्यवस्था : संरक्षणवादी नीतीपासून उदारीकरणापर्यंत वाटचाल | 1 पर्यावरणाचे अर्थशास्त्र<br>2 भारतीय रुपयाची परिवर्तनीयता<br>3 पश्चिम घाट विकास योजना<br>4 महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळे<br>5 भारतातील खाजगीकरणाचे धोरण |

| वार्षिक अधिवेशन | अधिवेशनाचे दिनांक | संस्था व ठिकाण | अध्यक्ष | अध्यक्षीय भाषणाचा विषय | चर्चासत्रांचे विषय |
|---|---|---|---|---|---|
| एकोणिसावे | 4, 5, 6 नोव्हेंबर, 1996 | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे | प्रा. शि. मा. माने, सातारा | भारतातील ऊस किंमत धोरण (उसाच्या किमतीचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र) | 1 आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धान्तातील नवे प्रवाह<br>2 भारतातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणा<br>3 महाराष्ट्रातील अर्थशास्त्राचे विद्यापीठीय अभ्यासक्रम : सुधारणा आणि पुनर्रचना<br>4 महाराष्ट्र शासनाची झुणका-भाकर योजना : उत्पत्ती, प्रयोजन, प्रश्न व पर्याय |

☐ ☐

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## परिषदेचे सदस्य आणि हितचिंतक यांना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील आणि कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे आणि परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने वेळोवेळी घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून आणि परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या/अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत सातत्याने ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद' चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य आणि अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील आणि परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्ट, मनिऑर्डर इत्यादी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत आणि ते नाशिक येथील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद' च्या अंकात दिली जातील.

**गुलाबराव तायडे**
कार्यवाह–खजिनदार

# आर्थिक वार्ता

रवीन्द्र दोशी *

## 1

## सॉफ्टवेअरच्या बाजारात अमेरिका अग्रणी

संगणित्राचा ( computer ) वापर हा जगात सर्वत्रच आता रोजच्या जीवनातील अपरिहार्य गरज बनत चालली आहे. त्यामुळे समाजाच्या संपूर्ण जीवन-पद्धतीतही आमूलाग्र परिवर्तन होऊ घातले आहे. आता आपण संगणित्राच्या युगात वावरत असून या उपकरणाच्या नवनवीन प्रकारांतून सातत्याने ज्ञानाची आणि व्यावहारिक उपयोगाची नवनवीन कवाडे दररोज उघडू लागली आहेत.

सॉफ्टवेअर हा संगणित्राच्या वापरातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ज्या कार्यासाठी संगणित्र वापरावयाचे त्याच्यासाठी म्हणून बनविलेली चौकोनी, पातळ आणि दिवसेंदिवस लहान आकाराची परंतु कितीतरी अधिक पटीने माहिती साठविण्याची क्षमता असलेली लहानशी तबकडी ( floppy ) वापरून संगणित्राच्या माध्यमातून अनेक किमया केल्या जात आहेत. त्यामुळे संगणित्रासाठी विविधांगी तबकड्या निर्माण करण्याला आता जगात प्रचंड महत्त्व दिले जात आहे. हा एक अतिकिफायतशीर उद्योग बनला आहे. हे पाहता या क्षेत्रात आजमितीला जगात अग्रस्थानी कोणता देश आहे आणि तो का आहे हे जाणून घेणे उद्बोधक ठरेल.

आपली अगदी सहजपणे समजूत होईल की, इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या उत्पादनात जपानचा हात धरणारे जगात दुसरे कुणी नाही. त्यामुळे सॉफ्टवेअर उद्योगातही जपानच अग्रस्थानी असणार. वस्तुस्थिती याहून वेगळी आहे. जगाच्या सॉफ्टवेअर बाजारात जपानचे स्थान जवळजवळ नगण्य आहे. अमेरिकेने हे मानांकित स्थान मिळविले आहे एवढेच नव्हे तर जागतिक सॉफ्टवेअर

* प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

बाजारात अमेरिकेत बनलेल्या सॉफ्टवेअर संचांचा वाटा जवळपास 75 टक्क्यांचा आहे. या संदर्भात अमेरिकेतील स्टॅनफर्ड विद्यापीठातील काही संशोधकांनी जपान आणि अमेरिकेतील 60 उद्योगांमध्ये प्रत्यक्ष मुलाखती घेऊन सॉफ्टवेअरच्या झपाट्याने वाढणाऱ्या उद्योगात अमेरिकेने एवढे मोठे यश कसे मिळविले आणि याउलट जपान अगदीच मागे का राहिला आहे याची गमके शोधण्याचा खटाटोप केला. हा अभ्यास बहुविद्याशाखीय (multidisciplinary) संशोधनाचा असून संगणित्र उद्योग प्रकल्पाचा (Computer Industry Project) एक भाग आहे. याकरिता आल्फ्रेड पी. स्लोन प्रतिष्ठानाने निधी पुरविला आहे.

या प्रकल्पाचे धुरीणत्व स्टॅनफर्ड विद्यापीठातील एडवर्ड ए. फिजेनबॉम (Feigenbaum) या संगणित्र विभागातील प्राध्यापकाकडे होते. ते म्हणतात, "वास्तविकत: उपभोक्ता इलेक्ट्रॉनिक्स (consumer electronics), लॅपटॉप (laptop) संगणित्र, संगणित्राची स्मरणशक्ती (memory) अशासारख्या क्षेत्रांत जपानचा हातखंडा असताना देखील वार्षिक 1,00,000 दशलक्ष डॉलर उलाढाल असलेल्या केवळ अमेरिकेतील सॉफ्टवेअर बाजारात जपानचे अस्तित्वही आढळत नाही ही बाब आश्चर्यकारक अशीच वाटते." भविष्यकालात सॉफ्टवेअर बाजाराचे महत्त्व वेगाने वाढणार आहे. आता संगणित्रांना व्यापक बाजार उपलब्ध होऊ लागला असल्याने त्यांच्या किमती कमी होऊन त्यांच्या विक्रीतून व्यवसाय संस्थांना मिळणारा नफा घसरू लागला आहे. तथापि याचबरोबर सॉफ्टवेअरच्या उत्पादनाला प्रचंड वेग आला आहे. यामध्ये वर्धितमूल्य (value addition) मोठे असून नफ्याचा गाळा खूपच जास्त आहे.

अमेरिकेत सॉफ्टवेअर उत्पादनांचा उद्योग फोफावण्याला अनेक आर्थिक, संयोजनात्मक आणि सांस्कृतिक घटक कारणीभूत असल्याचा निष्कर्ष उपरोक्त प्रकल्पातून प्रस्थापित केलेला आहे. हे विवरण थोडे तपशिलात पाहणे उद्बोधक ठरेल.

(1) सॉफ्टवेअर उद्योगात तीव्र स्पर्धा घडत राहावी यादृष्टीने अमेरिकेच्या सरकारने अनेकविध परिणामकारक पाऊले उचलली आहेत. यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे आय. बी. एम. या सर्वात मोठ्या कंपनीला मक्तेदारीविरुद्ध कायद्याचा (anti-trust law) बडगा दाखविला. परिणामी सॉफ्टवेअर उत्पादन आणि संगणित्र यांच्या किमती स्वतंत्रणे ठरवून त्यांची विक्रीदेखील स्वतंत्रपणे करण्याचा करार कंपनीला 1968 मध्ये करणे भाग पडले. सरकारच्या या कृतीमुळेच अमेरिकेत सॉफ्टवेअर उत्पादनांचा स्वतंत्र बाजार अस्तित्वात येऊ शकला. याउलट, जपानी उत्पादकांनी मात्र संगणित्र आणि सॉफ्टवेअर संच यांची मोट बांधल्यामुळे स्वतंत्रपणे सॉफ्टवेअर कार्यक्रमांचे उत्पादन करणाऱ्यांची पंचाईत तर झालीच, शिवाय या क्षेत्रात स्पर्धा करणे दुरापास्त ठरले.

(2) गेल्या 30 वर्षांच्या कालखंडात अमेरिका सरकारने संगणित्र शास्त्रातील प्रगत संशोधनाला प्रोत्साहन देऊन त्याकरिता आवश्यक लागणारा निधी शासनामार्फत उपलब्ध करून दिला. त्यामुळेच 'इंटरनेट संगणित्र जाळे' (Internet Computer Network) यासारख्या नवनव्या कल्पना प्रत्यक्षात उतरू शकल्या. त्याचबरोबर या क्षेत्रात महत्त्वपूर्ण ठरतील अशा नव्या वाटा निर्माण करण्याचे कार्य विद्यापीठांतील प्रयोगशाळांनी केले. Mosaic Communication हे याचे अगदी अलीकडचे फलित आहे. इंटरनेट व्यवस्थेमधील हे पुढचे पाऊल आहे. काही तरुण अभियंते आणि पदवी परिक्षेचे विद्यार्थी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून ही नवी वाट निर्माण झाली आहे. केवळ निधी उपलब्ध झाला म्हणून नव्हे तर संशोधकांना संशोधनकार्यासाठी मिळणारे स्वातंत्र्य यामुळेच अशा तऱ्हेची नाविन्यनिर्मिती होऊ शकते असे तेथील शास्त्रज्ञांना वाटते. या पार्श्वभूमीवर जपानचे चित्र अगदीच फिके आहे. जपानने 1983 पर्यंत तरी सॉफ्टवेअरचे मूलभूत संशोधन करण्यासाठी सरकारतर्फे फक्त मर्यादित प्रमाणावरच आर्थिक पाठबळ दिले.

(3) अमेरिकेतील सॉफ्टवेअर उद्योगाची भरभराट साहसी भांडवलदारांच्यामुळे (venture capitalists) होऊ शकली. त्यांनी विविध प्रकारच्या आणि स्पर्धाशील अशा अनेक व्यवसाय संस्थांच्या उभारणीत लक्ष घालून भांडवल गोळा केले. प्रत्येक व्यवसाय संस्थेला पुरेसे भांडवल उपलब्ध होईल हे पाहिले. नव्याने उभारलेल्या दहापैकी एक व्यवसाय संस्था जरी

यशस्वी झाली तरी प्रचंड नफा मिळू शकेल असा त्यांचा व्यूह (strategy) होता. या वृत्तीला आणि कृतीला समांतर असे जपानमध्ये काहीच नव्हते. त्याकारणाने तुलनेने लहान असणाऱ्या व्यवसाय संस्थांना आवश्यक तेवढे भांडवल उभे करणे कष्टाचे होते.

(4) सॉफ्टवेअर कार्यक्रमाच्या उत्पादनातील चाचेगिरी (piracy) ही अमेरिकेची कधीच डोकेदुखी नव्हती. याउलट, जपान आणि जगातील इतर अनेक देशांना ती एक मोठी समस्या बनलेली आहे. एका तबकडीसाठी थोडे डॉलर देऊन सॉफ्टवेअर कार्यक्रम आणि त्यांच्या मार्गदर्शक पुस्तिकांच्या अत्युत्तम प्रती काढणे आता शक्य झाल्याने या प्रकारच्या चाचेगिरीला जगात ऊत आला आहे. त्यामुळे सॉफ्टवेअर उत्पादनांच्या व्यवसाय संस्थांना भरपूर नफा कमविणे अशक्यप्राय झाले आहे.

सॉफ्टवेअर कार्यक्रमांच्या चाचेगिरीमुळे अमेरिकेतील व्यवसाय संस्थांचे कोट्यवधी डॉलरचे नुकसान होत असले तरी त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाला अजिबात धोका नसतो असे सॉफ्टवेअर उत्पादकांना वाटत असल्याचा निष्कर्ष संशोधकांनी काढला आहे. जपानमधील सॉफ्टवेअर विक्रेत्यांना मात्र ही चाचेगिरी अत्यंत त्रासदायक वाटते. हा फरक कशामुळे? त्याचे एक कारण म्हणजे, अमेरिकी प्रशासनाने सॉफ्टवेअर आर्यक्रमाच्या संशोधकाचा बौद्धिक स्वामित्वाचा अधिकार (intellectual property right) जपण्यासाठी परिणामकारक उपाययोजना केलेल्या आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, जपानमध्ये या चाचेगिरीच्या उपक्रमात जपान सरकारची विविध खातीच अग्रक्रमावर आहेत! याचे कारण म्हणजे, या सरकारी खात्यांना फक्त संगणित्रे खरेदी करण्यासाठीच पैसे पुरविले जातात; सॉफ्टवेअर खरेदीसाठी पैसा दिला जात नाही.

हे झाले वरवरचे कारण. जपानमधील चाचेगिरीचे खरे कारण खोलवर जाऊन शोधण्याचा प्रयत्न संशोधकांनी केला. जपानच्या दृष्टीने संगणित्रे, मोटारी, दूरदर्शन संच अशासारख्या वस्तू दृश्य आहेत त्याप्रमाणे सॉफ्टवेअर कार्यक्रम दृश्य नसतो. त्यामुळे संगणित्रे उत्पादकांनी आपल्या संगणित्र यंत्रासोबतच सॉफ्टवेअर कार्यक्रमाची मोट बांधण्याचे धोरण बदलून दोन्ही उत्पादनांची फारकत करावी यासाठी जपान सरकारने केलेल्या प्रयत्नांना व्यवसाय संस्थांकडून फारसा प्रतिसाद मिळू शकला नाही. विशेष म्हणजे, उपलब्ध सॉफ्टवेअर कार्यक्रमांच्या मुक्तपणे प्रती काढण्यात जपानी लोकांना वावगे असे काहीच वाटत नाही!

(5) अमेरिकेत सॉफ्टवेअर कार्यक्रमांच्या निर्मात्याला बराच मान असतो. अशा निर्मात्यांना त्यांच्या कामाबद्दल प्रचंड पैसा दिला जातो. लक्षात घेण्यासारखे म्हणजे, सॉफ्टवेअर उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या 'मायक्रोसॉफ्ट' कंपनीचा संस्थापक बिल गेट्स आणि त्यांच्यासारखे इतर हे जनसामान्यांचे नाईत (heroes) बनले आहेत. त्यामुळेच कित्येक बुद्धिमान मुले आपल्या आयुष्याचे सोने करण्याकरिता सॉफ्टवेअर क्षेत्राकडे वळतात. नेमकी उलट परिस्थिती जपानमध्ये आहे. तिथे सॉफ्टवेअर उद्योगात काम करणे कमी दर्जाचे मानले जाते. अलीकडे या क्षेत्रातील व्यवसाय संस्थांनी वेतनपातळी वाढविली असली तरी जपानी लोकांमध्ये हवा तसा मानसिक बदल अजून घडलेला नाही.

(6) अमेरिकेत उपक्रमशीलता (entrepreneurship) ही गौरविली जाते. एखाद्या मोठ्या व्यवसाय संस्थेचा आपण एक घटक आहोत याचा तेथील लोकांना सार्थ अभिमान वाटतो. उपक्रमी (entrepreneur) बनण्याचा लोकांमध्ये ओढा आहे. नवनवे उपक्रम अंगीकारून त्यातील जोखीम पत्करण्याचे धाडस दाखविणाऱ्यांना समाजामध्ये मानाचे स्थान अमेरिकेत लाभते. कुणी अयशस्वी झाला तरी त्याची समाजाकडून मानहानी केली जात नाही. एका परीने, मोठी व्यावसायिक जोखीम पत्करल्यानंतर काही कारणांनी अपयश आले तरी अमेरिकेतील समाज तीही घटना तितक्याच दिलखुलासपणे स्वीकारतो; अपयशालाही सामाजिक स्वीकार्यता आहे. एखाद्या माणसाने दोन नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केले आणि दुर्दैवाने या दोन्हीतही तो अयशस्वी झाला तरी तिसऱ्या एखाद्या उपक्रमातून आपले नशीब काढण्यासाठी अमेरिकेत सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध होतात. जपान आणि इतर अनेक देशांत उपक्रमांविषयी समाजाचा अमेरिकेसारखा व्यापक दृष्टिकोनही नाही आणि समाजाचे पुरेसे पाठबळही मिळत नाही.

(7) तरुण पिढीकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन हेदेखील अमेरिकेचे बलस्थान आहे. तरुण मुले पदवीधर बनून उद्योगांमध्ये पदार्पण करतात तेव्हा त्यांच्या या निर्णयाबद्दल त्यांचे कौतुक करून त्यांच्या कारकिर्दीच्या प्रारंभापासूनच त्यांच्यावर मोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या जातात. त्यामुळे व्यवसाय संस्थेच्या उत्पादनकार्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी ही तरुण मुले कसोशीने प्रयत्न करतात. असे जपानमध्ये घडत नाही. त्यांच्याकडे विशिष्ट कालासाठी नियुक्ती मिळविलेल्या श्रेणीरूप अधिकाऱ्यांची उतरंड (hierarchy) असते. तिथे महत्त्वाचे सर्व निर्णय वरिष्ठ पातळीवरून होतात. त्याकारणाने सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात वेगाने वाहणाऱ्या नव्यानव्या तंत्रांचा अंगिकार करण्याचे कार्य अतिशय धीमेपणाने होते.

[ संदर्भ : Salisbury, David F -, ' The Software Market : Why America Leads ', SPAN, November 1995. ]

□ □

## 2

# शेतीतील उच्च तंत्रवैज्ञानिक अभिवृद्धी क्षेत्रे

विकसनशील देशांच्या आर्थिक विकासकार्यात ग्रामीण विकासाला अनन्यसाधारण महत्त्व असते. उद्योग, सेवा, तंत्रविज्ञान वगैरे क्षेत्रांत कितीही आघाडी मारली तरी ग्रामीण क्षेत्रात सर्वांगीण परिवर्तन झाल्याखेरीज आर्थिक विकासाची अंगीकृत उद्दिष्टे साधता येत नाहीत असा सार्वत्रिक अनुभव आहे. दुसरे असे की, ग्रामीण विकासाचा केन्द्रबिंदू शेतीचे क्षेत्र असते, कारण बव्हंशी ग्रामीण जनतेचे आर्थिक व्यवहार या ना त्या रीतीने शेतीशी जोडलेले असतात. वास्तव ग्रामीण विकास म्हणजे शेती आणि ग्रामीण उद्योगांचा विकास असे जणू समीकरणच तयार झाले आहे. त्या दृष्टीनेच धोरण आणि कार्यक्रम आखले जातात.

ग्रामीण विकाससंबंधीच्या या चाकोरीमध्ये आता बदल करणे अपरिहार्य ठरू लागले आहे. केवळ दृष्टिकोनच नव्हे तर प्रयत्नांची दिशाही बदलायला हवी. कारण भारतात शेती क्षेत्रात उच्च तंत्रविज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. ते वापरणारी क्षेत्रे ही अभिवृद्धी केन्द्रे म्हणून पुढे येऊ लागली आहेत एवढेच नव्हे तर त्यामुळे ग्रामीण–शहरी अशी विभागणीही विरल होऊ लागली आहे. रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढ या दोन निकषांवर धासून पाहिल्यास या उच्च तंत्रविज्ञानाच्या वापरक्षेत्रात सामाजिक आणि आर्थिक लाभ विश्वास बसणार नाही इतके मोठे आहेत. या क्षेत्रांतील प्रकल्प आर्थिकदृष्ट्या किफायतशीर असल्यामुळे बँकांनादेखील त्यांच्याकरिता पैसा कर्जाऊ देण्यात कोणतीही जोखीम पत्करावी लागत नाही. म्हणून अशा क्षेत्रांना बँकांनी पतपुरवठा करावा यासाठी कोणत्याही आर्थिक संस्थेला नैतिक दबावाच्या मार्गाचा अवलंब करावा लागत नाही.

पुष्पशेती ( floriculture ), जलशेती ( aquaculture ) आणि उतकशेती ( tissue-culture ) या उच्च तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रांनी भारतीय शेती क्षेत्रात काही प्रदेशात आपले पाय रोवावयाला सुरुवात केली आहे. ही क्षेत्रे अधिकाधिक लोकप्रिय कशी होतील हे आता पाहिले पाहिजे; ही आता आपली गरज आहे. गुलाब आणि इतर विविध प्रकारची फुले आणि उतकशेतीत बनलेली रोपे यांच्या निर्यातीला खूप वाव असून त्यापासून भारताला प्रतिवर्ष सुमारे 100 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकेल असा अंदाज आहे. त्याचप्रमाणे जलशेतीच्या क्षेत्रातही वर्धितमूल्य उत्पादने निर्माण करण्यासाठी तसेच त्यांची पैदास वाढविण्यासाठी उच्च तंत्रविज्ञान वापरले जाऊ लागले आहे. जनन–अभियांत्रिकी ( genetic engineering ) चा अंतर्भाव असलेले वनस्पती प्रजननाचे ( plant breeding ) नवे तंत्रविज्ञान, वनस्पतींच्या जीवनरसांचे एकीभवन ( protoply fusion ) आणि उतकशेती यांच्यामुळे अधिक उपज देणाऱ्या वनस्पतींच्या जाती (high-yielding varieties ) विकसित करण्याला बरीच चालना मिळते. उदाहरणार्थ, सूर्यफुलाचे तेल आणि पामतेल यांच्या बियाणांच्या नव्या जातींच्या शोधामुळे भारताला खाद्यतेलांच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनणे शक्य आहे. तसे झाल्यास भारत दरवर्षी साधारणतः 1,000 कोटी रुपयांइतक्या विदेशी चलनाची बचत करू शकेल.

जैवपुंज ( biomass ) हे असेच एक उपयुक्त असणारे क्षेत्र आहे. त्याचा उपयोग करून इमारतीसाठी आणि रस्ते बांधणीसाठी वस्तू बनविता येतात; त्यापासून ऊर्जानिर्मिती होऊ शकते. या गोष्टी आता सिद्ध झालेल्या आहेत. भारत सरकारच्या जीव-तंत्रविज्ञान ( biotechnology ) विभागातील इंधन, खत आणि लाकूड याकरिता जैवपुंजाचे उत्पादन यासंबंधी अभ्यास करणाऱ्या आणि त्याची कार्यवाही करणाऱ्या गटाने उतकशेती आणि सूक्ष्म प्रचारण ( micro-propagation ) तंत्राकरिता 14 प्रकारच्या संभाव्य वनवृक्षांची नोंद केली आहे. अशा रीतीने जीव-तंत्रविज्ञानाच्या साहाय्याने पडिक जमीन विकास कार्यक्रमाला अधिक वेग देता येणे शक्य होईल.

खतांच्या वापरातही आता क्रान्तीकारक बदल होऊ लागले आहेत. गेल्या 30–35 वर्षांमध्ये शेती उत्पादनात मोठी वाढ मिळविण्याकरिता रासायनिक खतांचा मुक्तहस्ते वापर सुरू झाला. या खतांचा दर-हेक्टरी वापर जितका वाढविता येईल तितका वाढविण्याचा खटाटोपही होऊ लागला. त्यातून शेतीमालाचे उत्पादन वाढण्याला मदत झाली खचितच. तथापि जमिनी नापीक किंवा कमी कसदार होण्याच्या आपत्तीही उद्‌भवल्या. अधिक उत्पादन मिळविण्याच्या नादात या खतांचा अतिवापरही होत राहिला. त्यांच्या जोडीला रासायनिक जंतुनाशके, कीटकनाशके, तणनाशके वगैरेंचाही वापर वेगाने वाढला. त्यांचेही दुष्परिणाम अनुभवाला येऊ लागले. या रासायनिक वस्तूंचा वापर कमी करण्याची निकड त्यातून स्पष्ट झाली. भारतातदेखील रासायनिक खते आणि जंतुनाशके यांना जमीन आणि मानवी आरोग्य यांना हानीकारक न होणारे उपयुक्त पर्याय शोधण्याचे काम सुरू झाले. जैव-खते ( bio-fertilisers ) आणि जैव-जंतुनाशके ( bio-pesticides ) अशी पारिस्थितिकी-अनुकूल ( eco-friendly ) उत्पादनांची निर्मिती हे यादृष्टीने टाकलेले पाऊल आहे. भारताने आता रासायनिक खते व जंतुनाशके यांच्याकडून जैव-खते आणि जैव-जंतुनाशके यांच्याकडे बदल करावयाला पाहिजे. असे केल्याने आजमितीस देशाला रासायनिक खते आणि जंतुनाशके यांच्या आयातीकरिता मोठ्या प्रमाणात जे विदेशी चलन खर्ची घालावे लागते त्याची बचत होईल. विशिष्ट पिकांकरिता अनुकूल ठरणारे आणि पिकांमध्ये नायट्रोजनचे प्रमाण वाढविण्याची क्षमता असलेले जंतू निर्माण करण्याचे प्रयत्न जारीने चालू आहेत. जैविक पद्धतीने वनस्पतींमध्ये नायट्रोजनचे प्रमाण वाढविण्याच्या या प्रयत्नांसोबतच शेवाळासारख्या ( algie ) जैव-खतांच्या वापरावरही भर दिला जात आहे. या खतांच्या वापरामुळे शेतीच्या प्रत्येक हंगामात दर हेक्टरी 25 ते 30 किलोग्रॅम नायट्रोजन मिळू शकते. लिंबोण्यांपासून जंतुनाशके तयार करण्यात भारताला यश मिळाले आहे हे सर्वश्रुत आहे. भारतात घडत असलेले हे विविधांगी बदल ध्यानात घेतल्यास, जैव-खाद्यांसाठी ( organic foods ) बाजारांचा शोध घेणे आता भारताला शक्य आहे.

हरियाणा सरकारने पादपगृह तंत्रविज्ञानाचा ( greenhouse technology ) प्रसार जोमाने चालविला असून त्यामध्ये सरकारला लोकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळू लागला आहे. आतापर्यंत या तंत्रविज्ञानाचा वापर फुलांची रोपटी जोपासण्यासाठी आणि त्यांचे संवर्धन करण्यासाठी केला जात होता. आता फळांच्या उत्पादनाकरिताही त्याचा वापर सुरू झाला आहे. या तंत्रविज्ञानाचा वापर केल्याने फळांचे उत्पादन पाचपट किंवा काही ठिकाणी त्याहूनही अधिक वाढल्याचा अनुभव आला आहे. परिणामी सोनेपतनजिक कुंडली या ठिकाणी आशिया खंडातील सर्वात मोठा फळे आणि भाजी बाजार उभा करण्याच्या कामाला हरियाणा सरकार लागले आहे.

नवीकरणक्षम ऊर्जा स्रोतांच्या ( renewable sources of energy ) वापरावर भर देण्याच्या धोरणामुळे ग्रामीण उद्योगीकरणाच्या क्षेत्रात नवी क्षितिजे दृष्टिपथात येत आहेत. वायुऊर्जा ( wind energy ), उसाच्या चिपाडांच्या भुश्श्याचा वापर करून वीजनिर्मिती, जैवपुंज ऊर्जा (biomass energy) आणि सागरी ऊर्जा ( ocean energy ) अशा विविध मार्गांपासून वीजनिर्मिती करणे हे दीर्घकालात किफायतशीर असते. तामिळ नाडूने वायुऊर्जा वापरून वीजनिर्मिती करण्यात भरीव यश मिळविले आहे. भारताच्या इतर प्रदेशात शक्य असेल त्या त्या सर्व ठिकाणी असा उपक्रम राबविण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.

शेतीच्या क्षेत्रात भारतामध्ये उच्च तंत्रविज्ञानाचा वापर कशा रीतीने केला जात आहे. याची कल्पना वरील सर्व तपशिलावरून येईल. अर्थात हे बदल सर्व-व्यापी असे मात्र नाहीत. यासंबंधात पुढील मुद्दे ध्यानात घ्यावे लागतील.

(1) नव्या तंत्रविज्ञानाचा यशस्वीपणे वापर करण्यात आल्याच्या काही घटना आपल्यापुढे येतात. मात्र या घटना अजून तरी पृथक ( isolated ) आणि तुरळक ( sporadic ) अशाच आहेत. त्या तशा राहता कामा नये. त्यांचे रूपांतर हरित क्रान्तीसारख्या एखाद्या जनचळवळीमध्ये ( mass movement ) झाले पाहिजे.

(2) विशिष्ट प्रकारचे नवे तंत्रविज्ञान विकसित करण्याच्या महत्त्वपूर्ण कामात सरकारी, खाजगी आणि कंपन्यांच्या क्षेत्रात अनेक संस्था गुंतलेल्या आहेत. मात्र प्रत्येकाचे काम पृथकपणे चाललेले असून एकमेकांच्या कामात सांधमोड झालेली नाही. त्या सर्वांना मिळून प्रयत्नांची नेमकी दिशा दाखवून द्यावयाला हवी. तसेच सर्वांचे पृथक प्रयत्न परस्परपूरक ठरू शकतील याची जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण करून देणे गरजेचे आहे. याकरिता अशा स्वतंत्रपणे चालणाऱ्या कामांमध्ये सम-न्वय साधला पाहिजे आणि त्यातून रोजगार आणि उत्पन्न निर्मितीची उद्दिष्टे गाठण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

(3) देशात अतिप्रचंड वीज केन्द्रे आणि लोखंड पोलाद कारखाने स्थापन केले म्हणजे काहीतरी भव्य-दिव्य घडते आहे असे जनतेला वाटते. या पार्श्वभूमीवर पाहता शेतीतील उच्च तंत्रविज्ञानाचा विकास अजून तरी धीमेपणाने होत असून तो लोकांना दैदिप्यमान वाटत नाही. त्यामुळेच या क्षेत्रातील प्रकल्पांकडे लोकांचे म्हणावे तितके लक्ष गेलेले नाही. असे असले तरी, अशा प्रकल्पांमुळे शेती क्षेत्रात दूरगामी परिणाम घडून येण्याची संभाव्यता ध्यानात घेऊन त्यांच्या विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले गेले पाहिजे. तसे केल्यास भारतातील अनेक समाजघटकांच्या जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणणे शक्य होईल.

[ संदर्भ : Mujumdar, N. A., ' Hi - tech Growth Segments in Agriculture ', CENTRAL BANK OF INDIA ECONOMIC BULLETIN, Vol - 16, No. 11, November 1995. ]

□ □

## 3

# भारतातील आंतर – राज्य आर्थिक विषमता

(1951-89)

भारताच्या आर्थिक विकासाचा अभ्यास करताना वेळोवेळी आर्थिक विषमतेच्या प्रश्नाचा विचार केला जातो. ग्रामीण – शहरी विषमता, विविध उत्पन्न गटा-तील विषमता, राज्याराज्यातील विषमता अशा वेग-वेगळ्या आयामांनी या प्रश्नाकडे पाहिले जाते. अभ्या-सकांचे निष्कर्ष भविष्यकालीन धोरणे आखण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.

भारतातील आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून राज्या-राज्यातील विषमता कमी होण्याला कितपत हातभार लागला आहे यासंबंधीचे संशोधनात्मक अभ्यास सातत्याने चालू आहेत. अर्थात हे अभ्यास करताना वापरलेले निकष कितीसे सयुक्तिक आणि पुरेसे होते हा एक वादाचा मुद्दा होत राहतो. तथापि गेल्या दोन दशकांत या संदर्भात वापरलेल्या निकषांमध्ये जलसिंचन, वीज, वाहतूक अशा घटकांना विशेष महत्त्व दिले गेले. एकोणीससे सत्तरच्या दशकात अशाच प्रकारच्या अभ्यासातून एका महत्त्वाच्या कलाकडे ( trend ) विशेष लक्ष वेधण्यात आले. पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र आणि गुजरात या चार राज्यांचा आर्थिक विकास वेगाने घडत होता तर याउलट तामिळ नाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि केरळ या चार दक्षिणी राज्यांचा आर्थिक विकास धीमेपणाने होत होता. वेगाने विकास आणि धीमेपणाने विकास या संज्ञा भारतीय सरासरीच्या संदर्भात वापरल्या आहेत. अर्थात नंतरच्या काळात हे चित्र काहीसे बदलले आहे. लोकसंख्या अभिवृद्धीचा मोठा दर हा काही राज्यांच्या विकासातील मोठा अडसर होता. 1981 आणि 1991 च्या जनगणने-मधून उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या लोकसंख्या अभिवृद्धी

दराबाबत काळजी करण्यासारखी परिस्थिती असल्याचे स्पष्ट झाले आहे तर धीमेपणाने विकास साधणाऱ्या तामिळ नाडू, केरळ आणि ओरिसा या राज्यांच्या बाबतीत त्यांचा लोकसंख्या अभिवृद्धीचा दर हा अडसर ठरण्याची शक्यता नाही याची जाणीव झाली.

आजही आर्थिक विकासाच्या बाबतीत आंतर राज्य विषमता आढळते. तथापि 1951 पासूनच्या चार दशकांच्या कालखंडात राज्यांच्या तौलनिक स्थानात कसा बदल झाला आहे याचे अवलोकन करणे उद्बोधक ठरेल. त्यामुळे ग्रामीण भारताचा आधार असलेल्या कृषी क्षेत्राची अभिवृद्धी कशी होत गेली आणि त्याचबरोबर उद्योगाला तसेच ग्रामीण–नागरी जीवनाला आधार असणाऱ्या पायाभूत संरचना ( infra-structure ) कितीशा वाढल्या यावर प्रकाश टाकता येईल.

गेल्या दोन दशकांत शेतमजुरांपैकी कितीजण द्वितीय किंवा तृतीय क्षेत्रांकडे वळले यापेक्षा त्यांच्या संख्येत किती अभिवृद्धी झाली याला अधिक महत्त्व द्यावयाला पाहिजे. या संदर्भात रोजगारात झालेल्या बदलांसंबंधीची टक्केवारी पाहण्याऐवजी स्थूल संख्येतील बदल अभ्यासणे अधिक उपयुक्त ठरेल. वस्तुतः ऐंशीच्या दशकात (1981–91) गव्हाच्या उत्पादकतेत मोठया प्रमाणावर वाढ झाल्याने शेती उत्पादनातील अभिवृद्धीचे आकर्षक आकडे आपल्यासमोर येत होते त्याचवेळी शेती क्षेत्रात गुंतलेल्या श्रमिकांची टक्केवारीही वाढत होती. ही टक्केवारी संपूर्ण भारतासाठी 1·62 टक्क्यांनी वाढली, तर या पार्श्वभूमीवर पंजाबमध्ये 1·89 टक्क्यांनी, हरियाणात 1·67 टक्क्यांनी, महाराष्ट्रात 2·03 टक्क्यांनी, गुजराथेत 3·68 टक्क्यांनी आणि उत्तर प्रदेशात 2·43 टक्क्यांनी वाढली. ही वाढ अखिल भारतीय सरासरीपेक्षा जास्त होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, बिहारमध्ये ही टक्केवारी 1·55 टक्क्यांनी घसरली! तिथे हे का घडावे याची कारणे स्पष्ट नाहीत. बिहारखेरीज इतर राज्यांच्या बाबतीत ग्रामीण लोक–संख्येच्या अभिवृद्धीचा दर अपेक्षेपेक्षा अधिक राहिल्याने श्रमिकांच्या अभिवृद्धीची टक्केवारी अखिल भारतीय टक्केवारीपेक्षा जास्त राहिली. दुसऱ्या बाजूने, केरळ, तामिळ नाडू आणि ओरिसामध्ये 1981–91 या दश–कात लोकसंख्या अभिवृद्धीचा दर मर्यादित प्रमाणात राहून देखील शेतीतील श्रमिकांच्या अभिवृद्धीचे दर अनुक्रमे 3·26 टक्के, 1·85 टक्के आणि 1·64 टक्के असे अखिल भारतीय टक्केवारीपेक्षा अधिक राहिले. थोडक्यात, कृषी क्षेत्राच्या अभिवृद्धीचा दर 1965–80 या कालखंडापेक्षा 1981–91 या कालखंडामध्ये जास्त राहिला असला तरी त्याचवेळी कृषी क्षेत्राकडे, विशेषतः गहू उत्पादन करणाऱ्या राज्यांकडे, श्रमिकांचा ओघ वाढत राहिला.

### राज्यांचे दरडोई उत्पन्न आणि त्यांचे क्रमांक

आता राज्यांच्या तौलनिक स्थानांचा विचार करू प्रथमतः त्यासाठी 17 राज्यांच्या 1950–51, 1960–61, 1970–71, 1980–81 आणि 1988–89 या वर्षांतील दरडोई उत्पन्नाची माहिती वापरून त्यांची क्रमवारी कशी होती ते पाहता येईल. तपशील तक्ता 1 मध्ये दिला आहे यामध्ये प्रत्येक दशकानंतर दरडोई उत्पन्नाच्या निकषावर प्रत्येक राज्य कोणत्या क्रमावर राहिले आणि 1950–51 ते 1988–89 या प्रदीर्घ कालखंडात या क्रमवारीत कसे बदल झाले ते एका दृष्टिक्षेपात समजते. विशेषतः 1988–89 ची क्रमवारी अलीकडच्या परिस्थितीवर प्रकाशझोत टाकते. यातून राज्याराज्यांतील विषमतेची दरी किती रुंद आहे हे प्रतीत होते. उदाहरणार्थ, या वर्षात सर्वोच्च स्थानी असलेल्या पंजाबचे दरडोई उत्पन्न 3,552 रुपये होते, तर सतराव्या स्थानावरील बिहारचे उत्पन्न 1,071 रुपये होते. उच्च–नीच उत्पन्नातील ही दरी काळजी करावयाला लावील इतकी मोठी आहे हे स्पष्ट आहे.

आणखी एक गोष्ट. विचाराधीन 17 राज्यां–मध्येही क्रमवारीत येणारी वरची सहा राज्ये आणि खालची सहा राज्ये यांच्या दरडोई उत्पन्नामध्येही लक्षणीय तफावत आढळते. पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक आणि तामिळ नाडू ही पहिल्या सहा क्रमांकाची राज्ये होत. यामध्ये महाराष्ट्र आणि गुजराथ ही राज्ये 1980–81 पासूनच्या कालखंडात तिसऱ्या आणि चौथ्या स्थानांदरम्यान घुटमळताहेत; फक्त परस्परांच्या जागा बदलल्या आहेत. पंजाब आणि हरियाणा यांनी आपले पहिले आणि दुसरे क्रमांक टिक–विले आहेत. कर्नाटक आणि तामिळ नाडू या आता पाचव्या आणि सहाव्या क्रमांकावर आलेल्या राज्यांनी

## तक्ता 1

### राज्यांचे दरडोई उत्पन्न आणि त्यांची क्रमवारी

(दरडोई उत्पन्न रुपयात)

| | राज्य | 1950–51: 1960–61 च्या किमतीनुसार उत्पन्न (NCAER) | 1950–51: क्रमवारी | 1960–61: 1960–61 च्या किमतीनुसार उत्पन्न (NCAER) | 1960–61: क्रमवारी | 1970–71: 1970–71 च्या किमतीनुसार उत्पन्न (SSB) | 1970–71: क्रमवारी | 1980–81: 1970–71 च्या किमतीनुसार उत्पन्न (SSB) | 1980–81: क्रमवारी | 1988–89: 1980–81 च्या किमतीनुसार उत्पन्न (SSB) | 1988–89: क्रमवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आंध्र प्रदेश | 258 | 11 | 289 | 13 | 585 | 10 | 647 | 8 | 1,862 | 9 |
| 2 | आसाम | 335 | 6 | 428 | 7 | 535 | 13 | 558 | 12 | 1,558 | 11 |
| 3 | बिहार | 181 | 17 | 222 | 15 | 402 | 17 | 441 | 17 | 1,071 | 17 |
| 4 | गुजराथ | 381 | 3 | 403 | 4 | 829 | 3 | 904 | 4 | 2,506 | 4 |
| 5 | हरियाणा | 364 | 5 | 396 | 5 | 877 | 2 | 1,060 | 2 | 3,086 | 2 |
| 6 | हिमाचल प्रदेश | 270 | 10 | 295 | 10 | 651 | 6 | 711 | 6 | 1,948 | 7 |
| 7 | जम्मू व काश्मीर | 227 | 16 | 248 | 16 | 548 | 12 | 642 | 10 | 1,584 | 12 |
| 8 | कर्नाटक | 287 | 8 | 313 | 9 | 641 | 8 | 687 | 7 | 2,041 | 5 |
| 9 | केरळ | 304 | 7 | 326 | 8 | 594 | 9 | 621 | 9 | 1,447 | 15 |
| 10 | मध्य प्रदेश | 236 | 15 | 293 | 11 | 484 | 16 | 517 | 15 | 1,436 | 16 |
| 11 | महाराष्ट्र | 373 | 4 | 480 | 2 | 783 | 4 | 957 | 3 | 2,960 | 3 |
| 12 | ओरिसा | 252 | 13 | 268 | 15 | 485 | 15 | 477 | 16 | 1,455 | 14 |
| 13 | पंजाब | 444 | 2 | 485 | 1 | 1,070 | 1 | 1,354 | 1 | 3,552 | 1 |
| 14 | राजस्थान | 256 | 12 | 272 | 14 | 645 | 7 | 537 | 13 | 1,620 | 10 |
| 15 | तामिळ नाडू | 245 | 14 | 344 | 6 | 581 | 11 | 584 | 11 | 2,030 | 6 |
| 16 | उत्तर प्रदेश | 271 | 9 | 292 | 12 | 486 | 14 | 519 | 14 | 1,545 | 13 |
| 17 | पश्चिम बंगाल | 471 | 1 | 462 | 3 | 722 | 5 | 793 | 5 | 1,930 | 8 |

आपल्या विकास कामांना वेग देऊन पूर्वीपेक्षा खूपच वरचा क्रमांक मिळविला आहे. दुसऱ्या बाजूने, 12 ते 17 क्रमांकावर पुढील राज्ये त्या क्रमाने आढळतात : जम्मू व काश्मीर, उत्तर प्रदेश, ओरिसा, केरळ, मध्य प्रदेश आणि बिहार. 1950–51 पासूनच्या संपूर्ण कालखंडात बिहार सतराव्या स्थानावरच स्थिर आहे. एवढेच नव्हे तर शेवटच्या वर्षात सोळाव्या क्रमांकावरील मध्य प्रदेश ( रु. 1,436 ) आणि सतराव्या क्रमांकावरील बिहार ( रु. 1,071 ) यांच्या दरडोई उत्पन्नातील तफावत बरीच जास्त आहे.

तक्ता 2 मध्ये 17 राज्यांच्या विचाराधीन पाचही वर्षांच्या दरडोई उत्पन्नांची सापेक्ष स्थिती दाखविली आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये तुलना करणे अधिक वास्तव होईल.

तक्ता 2 मध्ये दरडोई उत्पन्नातील सापेक्षता दाखविली आहे. त्याकरिता अखिल भारतीय दरडोई उत्पन्न हे 100 बरोबर मानले आणि त्यावरून प्रत्येक राज्याचे त्या त्या वर्षाचे उत्पन्न सापेक्षतः किती होईल हे काढले आहे. राज्यांची आकडेवारी पाहिल्यास पश्चिम बंगालचे सापेक्ष उत्पन्न 1950–51 मधील 155 वरून 1988–89 मध्ये 100 पर्यंत घसरले. हा बदल विशेष ध्यानात घेण्यासारखा आहे. पंजाबने 1980–81 मध्ये 191·5 हा सर्वोच्च बिंदू गाठला. अखिल भारतीय पातळीच्या जवळपास दुप्पट उत्पन्न असणारे हे राज्य. उलट दिशेने बिहार, केरळ आणि ओरिसा ही राज्ये कशी सरपटतच चाललेली आहेत तेही पाहता येईल. बिहारने 1950–51 मधील 59·7 वरून 1988–89 मध्ये 55·7 अशी अधोगती साधली आहे; केरळने 100 वरून 75·3 पर्यंत पायउतार केला आहे तर

**तक्ता 2**

**राज्यांच्या दरडोई उत्पन्नांची सापेक्ष स्थिती**

| | राज्य | 1950–51 | 1960–61 | 1970–71 | 1980–81 | 1988–89 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आंध्र प्रदेश | 85·2 | 86·0 | 91·1 | 91·5 | 88·0 |
| 2 | आसाम | 110·6 | 97·6 | 83·3 | 78·9 | 81·1 |
| 3 | बिहार | 59·7 | 66·1 | 62·6 | 62·4 | 55·7 |
| 4 | गुजराथ | 125·7 | 119·9 | 129·1 | 127·9 | 130·4 |
| 5 | हरियाणा | 120·1 | 117·9 | 136·6 | 149·9 | 160·6 |
| 6 | हिमाचल प्रदेश | 89·1 | 87·8 | 101·4 | 100·6 | 101·4 |
| 7 | जम्मू व काश्मीर | 74·9 | 73·8 | 85·4 | 90·8 | 80·5 |
| 8 | कर्नाटक | 94·7 | 93·2 | 99·8 | 97·2 | 106·2 |
| 9 | केरळ | 100·3 | 97·0 | 92·5 | 87·8 | 75·3 |
| 10 | मध्य प्रदेश | 77·9 | 87·2 | 75·4 | 73·1 | 74·7 |
| 11 | महाराष्ट्र | 123·1 | 142·9 | 122·0 | 135·4 | 154·0 |
| 12 | ओरिसा | 83·2 | 79·8 | 75·5 | 67·5 | 75·7 |
| 13 | पंजाब | 146·5 | 144·3 | 166·6 | 191·5 | 184·8 |
| 14 | राजस्थान | 84·5 | 81·0 | 100·5 | 76·0 | 84·3 |
| 15 | तामिळ नाडू | 80·9 | 102·4 | 90·5 | 82·6 | 105·6 |
| 16 | उत्तर प्रदेश | 89·4 | 86·9 | 75·7 | 73·4 | 80·5 |
| 17 | पश्चिम बंगाल | 155·4 | 137·5 | 112·5 | 112·7 | 100·4 |

ओरिसाने 83·2 वरून 1980–81 मध्ये 67·5 पर्यंत घसरण दाखविल्यानंतर 1988–89 मध्ये 75·7 पर्यंत पोचून थोडीशी उभारी दाखविली आहे.

किंमत सापेक्षतेच्या बाबतीत एका बाजूला पंजाब आणि हरियाणा आणि दुसऱ्या बाजूला बिहार, ओरिसा, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश असे विषम चित्र आढळते. त्यांच्या किंमत सापेक्षतेमध्ये एवढी मोठी तफावत का आहे याचा शोध घेतला पाहिजे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या ऐंशीच्या दशकातील उच्च अभिवृद्धी दराचा राज्य देशांतर्गत उत्पादित (State Domestic Product) आणि दरडोई उत्पन्न यांच्या संबंधातील पूर्वीची विषमता बदलण्याच्या दृष्टीने फारसा प्रभाव पडला नाही असे वाटते. उच्च अभिवृद्धी दराचा फायदा कमकुवत राज्यांनाच लाभला. पंजाब आणि हरियाणा यासारख्या राज्यांना त्याच्या जोडीला तेथील पायाभूत संरचनेत झालेल्या सुधारणांची मदत झाली.

## पायाभूत संरचनेचा विकास

राज्यांमधून पायाभूत संरचनेचा विकास किती झाला आहे यासंबंधीची आकडेवारी 1961 आणि 1989 या वर्षांसाठी पुढील संदर्भात उपलब्ध आहे. (1) जलसिंचन क्षेत्राची टक्केवारी, (2) दर एक लाख माणसांमागे स्थापित क्षमता (installed capacity), (3) दर एक लाख माणसांमागे वीजनिर्मिती, (4) दर 100 चौ. किलो मीटरमागे रस्त्यांची लांबी, या चार निकषासंबंधीची अखिल भारतीय आकडेवारी 1961 सालासाठीची उपलब्ध आहे. त्यानुसार गेल्या तीन दशकभराच्या कालात प्रत्येक राज्यातील पायाभूत सुविधांमध्ये कितपत सुधारणा झाल्या आहेत यासंबंधीची अनुमाने काढता येतील. या संदर्भातील सर्व तपशील तक्ता 3 मध्ये दिला आहे.

तक्ता 3 नुसार 1961 आणि 1989 मध्ये पहिल्या सहा क्रमांकांच्या राज्यांच्या बाबतीत जलसिंचनाची टक्केवारी आणि वीजनिर्मिती हे दोन घटक विशेष प्रभावी होते. केरळ आणि तामिळ नाडू यांनी रस्त्यांच्या लांबीमध्ये आघाडी मारली होती. 1989 मध्ये पंजाबमधील पिकाखालील शेतीपैकी 91 टक्के जमीन सिंचनाखाली होती; स्थापित क्षमता आणि वीजनिर्मिती या क्षेत्रांतही पंजाब आघाडीवर होते. या दोन्हींचाही भरीव फायदा पंजाबमधील शेती क्षेत्राला मिळाला. पंजाबपाठोपाठ क्रम हरियाणाचा लागतो. या राज्यात 66 टक्के शेतजमीन जलसिंचनाखाली होती आणि दर लाख लोकांमागे स्थापित क्षमता 11 होती. अखिल भारतासाठी स्थापित क्षमता 6·8 होती. महाराष्ट्र आणि गुजराथ ही दोन राज्ये भारतीय सरासरीपेक्षा कमी होती. मात्र ही दोन्हीही राज्ये वीजनिर्मितीच्या बाबतीत भारतीय सरासरीपेक्षा वर होती आणि 17 राज्यांच्या गटात अनुक्रमे दुसऱ्या आणि चौथ्या स्थानावर होती. वास्तव ही राज्ये आपल्या राज्य देशांतर्गत उत्पादिताचा (SDP) जास्त भाग शेतीऐवजी उद्योगापासून मिळवितात. उत्तर प्रदेश आणि तामिळ नाडू जलसिंचनाच्या बाबतीत सुस्थितीत असले तरी वीजनिर्मिती क्षेत्रात मागे आहेत. केरळ आणि ओरिसा राज्ये जलसिंचन आणि वीजनिर्मिती या दोन्हीही अंगांनी मागे आहेत, मात्र रस्तेबांधणी मध्ये ती पुढे असूनही यातून त्याना फारशी प्रगती साधणे शक्य झालेले दिसत नाही. महाराष्ट्र आणि गुजराथ राज्यांना सागरी वाहतूक आणि वित्तीय उलाढालींमुळे बराच फायदा मिळाला आहे. बिहारमध्ये जलसिंचनाची प्रगती समाधानकारक असली तरी वीजनिर्मितीच्या सुविधा अत्यंत कमी असल्यामुळे औद्योगिक प्रगतीचा वेग खूपच मंद आहे.

## 1990–2000 दरम्यान अभिवृद्धी दरातील संभाव्य बदल

1951–89 या कालखंडात उच्च क्रमवारीतील पहिली पाच राज्ये आणि तळाची सहा राज्ये यांच्या दरडोई उत्पन्नातील तफावत वाढली आहे. जलसिंचन आणि वीजनिर्मिती क्षेत्रात उच्च क्रमवारीतील राज्यांना जो लाभ मिळालेला आहे त्या आधारावर ती राज्ये दरडोई उत्पन्नात भरीव वाढ मिळवू शकली आहेत. तथापि काही राज्यांच्या परिस्थितीत खचितच सुधारणा झाली आहे. तामिळ नाडू आणि कर्नाटक यांनी विकासाचे प्रयत्न विशेष नेटाने केल्यामुळे 1970–71 मधल्या अनुक्रमे 11 आणि 8 या स्थानांवरून आता अनुक्रमे 6 आणि 5 या स्थानांपर्यंत प्रगती केली आहे. त्याचप्रमाणे राजस्थान आणि मध्य प्रदेश यांनी 1981–89 मध्ये अभिवृद्धीचे उच्च दर नोंदविले आहेत. त्यांच्या

तक्ता 3

**राज्यनिहाय पायाभूत संरचना विकास**

| | राज्य | 1961 | | | | | | | | 1989 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जलसिंचन क्षेत्र | क्रम-वारी | स्थापित क्षमता | क्रम-वारी | वीज-निर्मिती | क्रम-वारी | रस्त्यांची लांबी | क्रम-वारी | जलसिंचन क्षेत्र | क्रम-वारी | स्थापित क्षमता | क्रम-वारी | वीज-निर्मिती | क्रम-वारी | रस्त्यांची लांबी | क्रम-वारी |
| 1 | आंध्र प्रदेश | 29·38 | 4 | 0·7 | 13 | 2·8 | 11 | 19·90 | 11 | 35·84 | 7 | 6·2 | 6 | 2·2 | 5 | 43·55 | 10 |
| 2 | आसाम | 23·63 | 7 | 0·2 | 17 | 0·3 | 17 | 24·02 | 9 | 15·07 | 14 | 2·1 | 17 | 0·4 | 17 | 66·33 | 4 |
| 3 | बिहार | 18·56 | 11 | 0·7 | 11 | 3·2 | 10 | 46·55 | 3 | 36·31 | 6 | 2·2 | 16 | 0·4 | 16 | 37·11 | 11 |
| 4 | गुजराथ | 7·51 | 15 | 1·7 | 4 | 6·5 | 5 | 13·10 | 13 | 28 88 | 8 | 9·7 | 4 | 3·7 | 4 | 28·30 | 14 |
| 5 | हरियाणा | 29·20 | 5 | 2·7 | 1 | 10·9 | 1 | 28·06 | 8 | 65· 6 | 2 | 11·0 | 2 | 3·8 | 3 | 49·51 | 7 |
| 6 | हिमाचल प्रदेश | 15·61 | 12 | 0·7 | 12 | 0·9 | 15 | 5·98 | 16 | 17·35 | 13 | 3·1 | 15 | 1·3 | 13 | 34·01 | 12 |
| 7 | जम्मू व काश्मीर | 30·07 | 3 | 0·6 | 15 | 1·1 | 14 | 4·73 | 17 | 41·06 | 5 | 3·4 | 14 | 1·4 | 11 | 6·91 | 17 |
| 8 | कर्नाटक | 9·22 | 14 | 0·8 | 8 | 4·6 | 7 | 32·62 | 7 | 18·05 | 12 | 6·8 | 5 | 2·0 | 8 | 51·98 | 6 |
| 9 | केरळ | 21·83 | 8 | 0·8 | 7 | 3·8 | 8 | 50·27 | 2 | 13·92 | 15 | 5·1 | 9 | 2·1 | 7 | 271·06 | 1 |
| 10 | मध्य प्रदेश | 5·16 | 17 | 0·8 | 9 | 2·1 | 12 | 8·45 | 15 | 13·41 | 16 | 5·6 | 7 | 2·1 | 6 | 16·78 | 16 |
| 11 | महाराष्ट्र | 6·48 | 10 | 1·9 | 3 | 9·1 | 2 | 16·58 | 12 | 11·98 | 17 | 10·9 | 3 | 4·2 | 2 | 47·76 | 8 |
| 12 | ओरिसा | 18·65 | 10 | 0·7 | 10 | 3·4 | 9 | 20·08 | 10 | 23·31 | 10 | 4·6 | 11 | 1·3 | 12 | 67·76 | 3 |
| 13 | पंजाब | 41·10 | 2 | 1·4 | 6 | 5·2 | 6 | 35·64 | 5 | 91·00 | 1 | 14·5 | 1 | 6·3 | 1 | 65·06 | 5 |
| 14 | राजस्थान | 12·49 | 13 | 0·3 | 16 | 0·5 | 16 | 12·04 | 14 | 21·29 | 11 | 3·5 | 13 | 1·3 | 14 | 19·46 | 15 |
| 15 | तामिळ नाडू | 44·20 | 1 | 1·6 | 5 | 7·4 | 4 | 35·98 | 4 | 47·51 | 4 | 5·2 | 8 | 1·7 | 9 | 98·52 | 2 |
| 16 | उत्तर प्रदेश | 25·48 | 6 | 0·6 | 14 | 1·7 | 13 | 33·64 | 6 | 48·62 | 3 | 3·9 | 12 | 1·1 | 15 | 31·09 | 13 |
| 17 | पश्चिम बंगाल | 21·51 | 9 | 2·1 | 2 | 7·8 | 3 | 73·82 | 1 | 23·92 | 9 | 4·9 | 10 | 1·4 | 10 | 46·36 | 9 |
| | **भारत** | **18·34** | – | **1·1** | – | **4·4** | – | **23·93** | – | **30·43** | – | **6·8** | – | **2·4** | – | **28·31** | – |

दरडोई उत्पन्नाची पातळी तुलनेने खाली असली तरी या राज्यांनी विकास प्रक्रियेला चांगली गती दिल्याचे यावरून जाणवते. अगोदरच्या दोन दशकांत कोरडवाहू शेतीचे काम फारसे समाधानकारक नव्हते. शेवटच्या दशकात मात्र तेलबिया आणि कडधान्ये यांच्या उत्पादनाने उभारी दाखविली. उपरोक्त काही राज्यांमधील घडणाऱ्या अनुकूल बदलांमुळे विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात उपरोक्त राज्ये अभिवृद्धीचा दर वाढवून आपली क्रमवारी सुधारण्याचा दाट संभव आहे. मात्र अशा राज्यांची संख्या थोडी आहे. तळातल्या राज्यांमध्ये या दृष्टीने पुरेशी हालचाल जाणवत नाही. ही स्थिती अशीच राहून त्यांच्या दरडोई उत्पन्नात गोगलगाईच्या गतीनेच वाढ होत राहिली तर मात्र राज्याराज्यांच्या उत्पन्नातील विषमता कमी होण्याऐवजी वाढतच राहील. असे घडता कामा नये. ही विषमता वाढणार नाही, एवढेच नव्हे तर, ती कमी होत जाईल याकरिता विशेष प्रयत्न करावे लागतील. शेती क्षेत्र त्यासाठी वरदान ठरण्याची शक्यता आहे. उच्च तंत्रविज्ञानाची कास धरून या क्षेत्राला अधिक गतिमान करता येऊ शकेल. अभिवृद्धीच्या दरात वाढ करावी या उद्दिष्टाबरोबरच राज्याराज्यांतील आर्थिक विषमता कमी करण्यावरही भर द्यावयाला हवा. याकरिता आतापर्यंत ज्या राज्यांची हेळसांड झालेली आहे आणि ज्या राज्यांनी आतापर्यंत आपल्या आर्थिक विकासाकडे पूर्ण जाणिवेने लक्ष दिलेले नाही त्यानी विशेषतः ग्रामीण क्षेत्रातील गुंतवणूक आणि पायाभूत संरचनेतील सुधारणा यासाठी प्राधान्येकरून प्रयत्न करावयाला हवेत. राज्यांनी संकुचित वृत्तीने केवळ राजकीय लाभहानीच्या गुंत्यात स्वतःला गुंतवून घेऊन आर्थिक विकासाच्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष केल्यास दारिद्र्य आणि मागासलेपणा यानी ग्रासलेले करंटे जीवन त्यांच्या पाचवीला पुजलेले राहील याची खातरजमा बाळगावी.

[संदर्भ : QUARTERLY ECONOMIC REPORT, Indian Institute of Public Opinion, July–September, 1993.]

□ □

4

# आर्थिक विकासामुळे पर्यावरणाला बाधा येते काय ?

अलीकडे जगात सर्वत्रच पर्यावरणासंबंधी बरेच बोलले आणि लिहिले जात आहे एवढेच नव्हे तर सरकारी पातळीवरूनही अगदी जनसामान्यांपर्यंत पर्यावरणाबद्दल जागरुकता निर्माण करण्याकरिता जारीने प्रयत्न होत आहेत. विविध प्रसार माध्यमांनी देखील या कामात आपला वाटा उचलला आहे. पर्यावरणाबद्दल लिहिताना आणि चर्चा करताना अगदी हमखासपणे वादाचा एक विषय पुढे आणला जातो. पर्यावरणाचे संरक्षण करण्याकरिता काही कडक निर्बंध लादले तर त्यामुळे आर्थिक विकासाची गती मंदावते अशी भूमिका घेणारा एक पक्ष, तर पर्यावरणाची पुरेशी काळजी घेतल्यामुळे आर्थिक विकासाला प्रेरणा मिळते असा विचार मांडणारा दुसरा पक्ष. यातील नेमकी कोणती बाजू स्वीकारार्ह आणि वास्तव आहे ? दोन्ही बाजूंचा थोडा खोलवर जाऊन विचार केला तर वास्तवाची जाणीव व्हावी.

प्रथम आर्थिक विकासाची संकल्पना स्पष्ट केली पाहिजे. आर्थिक विकासाची संख्यात्मक आणि गुणात्मक विकास अशी दोन अंगे असतात. संख्यात्मक दृष्टिकोनातून समाजाच्या सर्व गरजा योग्य रीतीने भागविल्या जातील अशी वर्तमान परिस्थिती आणि त्याचबरोबर भविष्यकालीन पिढ्यांनाही त्यांच्या गरजा चांगल्या रीतीने भागविता येण्याची शक्यता अंतर्भूत असलेली सामाजिक–आर्थिक परिस्थिती निर्माण करणे म्हणजे आर्थिक विकास. एकंदर आर्थिक व्यवस्थेमध्ये समाजाच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने दर्जात्मक सुधारणा घडवून आणल्यास त्यातून गुणात्मक विकास साधला जातो. प्रत्येक अर्थव्यवस्थेत तंत्रवैज्ञानिक बदल सतत घडून येत असतात त्याचप्रमाणे बाजारात ग्राहकांची पसंतीही बदलत राहते. आताच्या भडक जाहिरातींच्या युगात ग्राहक ( उपभोक्ता ) निर्मळ मनाने वस्तूंची निवड करूच शकत नाही. या बाबी आर्थिक विकासाशी निगडित असतात.

खरे तर पर्यावरणाचे रक्षण आणि आर्थिक विका–

साची निकड यामध्ये संघर्ष असण्याचे कारण नाही, उलट दोन्ही परस्परांना पूरक ठरू शकतात असा विचार अमेरिकेच्या पर्यावरण संरक्षण संस्थेतील अधिकारी डेव्हिड गार्डिनर यानी ठामपणे मांडलेला आहे. त्यांची संस्था आणि मिसुरी विद्यापीठ यानी संयुक्तपणे एक अभ्यास केला होता. त्यामध्ये परंपरागत शेतीपद्धती आणि आधुनिक शेतीपद्धती यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. परंपरागत शेतीपद्धती पर्यावरण-अनुकूल असते असे सांगणाऱ्यांना उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले आहे की, शेत नांगरटीची कमी गरज भासेल अशी पीक संरचना, पीक संरचनेत अधिक विविधता आणि रासायनिक खते व जंतुनाशके वापरताना दाखविलेली हुशारी यामुळे उत्पादन परिव्यय घटतो, पर्यावरणाशी संबंधित जोखमी कमी होतात आणि अंतिमतः अल्पकालीन नफा वाढतो. अशी अनेक उदाहरणे दाखल्यासाठी देता येतील. तथापि मूळ मुद्दा आहे तो दृष्टिकोनाचा. आतापर्यंत असलेला नकारात्मक दृष्टि-कोन (दोन्हींतील संघर्षाचा) सोडून देऊन दोन्हींची परस्परपूरकता दाखविणारा सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

पर्यावरण आणि आर्थिक विकास यांच्यामध्ये परस्परांना पूरक होईल अशी सांगड घालता येते. ही सांगड तंत्रवैज्ञानिक विकासाशी निगडित असते. परंतु तंत्रवैज्ञानिक बदल म्हटले की प्रदूषणाचा बागुलबुवा पुढे उभा केला जातो. परिणामी प्रदूषण टाळण्यासाठी प्रकल्प रद्द होतो. असे झाल्याने आर्थिक विकासाची गाडी पुढे सरकत नाही. हे मानायला बरवर ठीक आहे. परंतु अलीकडच्या काही वर्षांत पर्यावरण आणि आर्थिक विकास यांच्या संबंधांचे आयाम वरचेवर बदलू लागले आहेत. त्यांची दखल घेऊनच आपणाला निर्णायक मत मांडावे लागेल. म्हणून पर्यावरणाचे धोरण आर्थिक विकासाच्या धोरणाशी संघर्ष करणारे ठरते काय असा प्रश्न विचारण्याऐवजी आम्ही पर्यावरणाचे रक्षण करून आर्थिक विकास कशा रीतीने साध्य करू शकतो असा प्रश्न विचारणे अधिक उचित ठरेल. सध्या:स्थितीत किमती आणि संस्थात्मक सुधारणांच्या माध्यमातून कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या हानीकारक पदार्थांच्या-मुळे प्रदूषणाचा धोका कमी करण्याचे प्रयत्न होतात. त्याचबरोबर प्रदूषण टाळू शकणारे तंत्रविज्ञान आणि त्याला पोषक व्यवस्थापन यांची आपणाला आता गरज आहे. भविष्यकाळात प्रदूषण टाळून स्वच्छ पर्यावरण राखण्यासाठी साहाय्यभूत ठरणाऱ्या वस्तू आणि सेवा यांची मागणी देशात आणि विदेशातही वाढण्याचा संभव आहे. प्रदूषणाचे धोके टाळले जावेत याबाबतीत जागतिक एकमत आहे. त्यादृष्टीने प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे; प्रयत्न चालूही आहेत. कारखान-दारीमध्ये प्रदूषणाचे धोके टाळून उद्योगांचे दीर्घकालिक अस्तित्व राखण्याच्या हेतूने नव्या तंत्रविज्ञानाचा स्वीकार केला जावा याकरिता विशेष प्रोत्साहनांचा मार्ग अनुसरावा लागेल. तसे केल्याने पर्यावरणाची काळजी घेऊन आर्थिक विकास साधण्याचे कार्य साध्य होऊ शकेल. प्रश्न आहे तो पर्यावरणाला पोषक असणारे तंत्रविज्ञान निर्माण करून त्याचा सर्वत्र प्रसार करण्याचा. तसे केल्यास वस्तू व सेवांच्या उत्पादनपद्धतीत आमू-लाग्र बदल होऊन मानवी कल्याण सहजपणे साधले जाईल. ऊर्जेचा वापर आणि इंधनासाठी पर्यायी स्रोत, जीव-तंत्रविज्ञान (bio-technology) आणि निविष्टी आणि हानीकारक जंतुनाशकांचा कमी वापर करणाऱ्या कृषी तंत्रविज्ञानाचा विकास आणि कमीत कमी प्रदूषण करणारे अथवा प्रदूषण टाळू शकणारे औद्योगिक तंत्र-विज्ञान या क्षेत्रांमध्ये पर्यावरणाला पोषक असणारे आधुनिक तंत्रविज्ञान विकसित करण्याला बराच वाव आहे.

कारखानदारवर्गही पर्यावरण संरक्षणाकडे विशेष लक्ष देऊ लागला आहे. त्यासाठी कायद्यांचा आणि नियमांचा बडगा आहे एवढेच एक कारण त्यामागे नाही. कारखान्यांनाही आता अशा प्रयत्नांतून व्यव-सायाच्या नव्या संधी दिसू लागल्या आहेत आणि त्या किफायतशीर ठरतील असा आशेचा सूर निघू लागला आहे. पर्यावरणाला अनुकूल (environment-frien-dly) तंत्रविज्ञान झपाट्याने विकसित करून आंतर-राष्ट्रीय बाजारात आघाडी घेण्याचा प्रयत्न सध्या अमे-रिकेने जारीने सुरू केलेला आहे. Organisation for Economic Cooperation and Develop-ment यांच्या अंदाजानुसार अमेरिकेकडून उत्पादन होत असलेल्या या प्रकारच्या तंत्रविज्ञानाचे मूल्य 2,00,000 दशलक्ष डॉलर ते 3,00,000 दशलक्ष डॉलर आहे आणि पुढील दशकभरात यामध्ये सातत्याने वाढ होण्याचा संभव आहे. पर्यावरणाला अनुकूल तंत्र-विज्ञानाचा वापर हे सर्वच आर्थिक क्षेत्रे, उद्योग, सेवा

याचे विपणनाचे एक साधन बनलेले आहे. ते शक्तिशाली साधन आहे. यातून पर्यावरणाला हानीकारक नसणाऱ्या वस्तूंना प्राधान्य देण्याचा उपभोक्त्यांचा दृष्टिकोनही स्पष्टपणे प्रतीत होतो हा बदल खचितच महत्त्वपूर्ण मानला पाहिजे.

एकंदरित, पर्यावरण आणि आर्थिक विकास यांची उद्दिष्टे परस्पर निगडित आहेत याची जाणीव झाली पाहिजे, हे मान्य केले पाहिजे आणि त्याचा प्रचार केला पाहिजे. असे झाले तरच दोन्हींचेही फायदे समाजाला मिळू शकतील. ते किती मिळण्याची शक्यता आहे याचा अभ्यास अमेरिकेत न्यूयॉर्क शहरात पर्यावरणावर संशोधन करणाऱ्या 'इनफॉर्म इनकॉर्पोरेटेड' या संस्थेने केला आहे. त्यांच्या निष्कर्षानुसार, प्रदूषण टाळण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न प्रदूषण घडण्याच्या मूळ ठिकाणालाच केला गेल्यामुळे टाकाऊ पदार्थांच्या वहनाचे प्रमाण 90 टक्के अथवा त्याहूनही अधिक घटले आहे. त्यामुळे आर्थिक बचत मोठ्या प्रमाणावर होऊ शकली. त्यांच्या निष्कर्षानुसार ही बचत 62 प्रकल्पांमध्ये प्रतिवर्षी सुमारे 21 दशलक्ष डॉलर इतकी आहे. या संस्थेने कॅलिफोर्नियातील चिकट पदार्थ बनविणाऱ्या एका कारखान्याचा अनुभव सांगितला आहे. त्यांनी आपल्या तंत्रविज्ञानाच्या वापरात अशा रीतीने बदल केले की त्यामुळे कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या फेनॉलमिश्रित पदार्थांचे प्रमाण 93 टक्क्यांनी घटले. हा पदार्थ कारखाना स्थळावरील खास बनविलेल्या लहानशा तळ्यात साठविला जावयाचा. त्याची विल्हेवाट लावण्याकरिता तसेच त्याच्या कारणाने उद्भवणाऱ्या कायदेशीर कटकटी मिटविण्याकरिता त्या व्यवसाय संस्थेला वार्षिक 1,50,000 डॉलर खर्च करावा लागत असे. तंत्रविज्ञानातील सुधारणेमुळे ती व्यवसाय संस्था एवढ्या खर्चाची वार्षिक बचत करू शकली. न्यू जर्सी शहरातील एका रासायनिक पदार्थांच्या कारखान्याचा अनुभवही असाच आहे. त्या कारखान्याने उपयोगात आणल्या जाणाऱ्या रासायनिक वस्तूंच्या प्रवाहाचे संगणित्रीकरण केले आणि त्यातून प्रदूषण कमी करू शकणाऱ्या 21 वस्तू निवडून त्यांच्या वापरात सुधारणा केली. यामुळे त्या व्यवसाय संस्थेला प्रदूषणकारी टाकाऊ वस्तूंची 2,70,000 किलोग्रॅम इतकी बचत करून वार्षिक 5 लक्ष डॉलरच्या खर्चाची बचत करणे शक्य झाले.

अमेरिकेतील राज्यांनाही अशा प्रकारचे अनुभव आले आहेत. टाकाऊ वस्तूंवर प्रक्रिया करून त्यांच्यापासून पुन्हा वापरण्यायोग्य विविध प्रकारच्या नव्या वस्तू बनविण्यावर अमेरिकेने बराच भर दिला आहे. मिनेसोटा राज्यातील अशी कामे करणाऱ्या सहा कारखान्यांनी 1,700 माणसांना रोजगार उपलब्ध करून दिला, त्यातून 39 दशलक्ष डॉलरचे वेतनउत्पन्न निर्माण केले आणि स्थूल राज्य उत्पादितात 100 दशलक्ष डॉलरची भर घातली. मेन राज्यात अशा पुनर्निर्मितीच्या ( recycling ) उद्योगांमुळे वेतन, नफा, बचत वगैरे रूपाने सुमारे 300 दशलक्ष डॉलरची भर पडून 2,000 हून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. महत्त्वाचे म्हणजे, अमेरिकेने प्रदूषणकारी टाकाऊ वस्तूंवर पुन्हा प्रक्रिया करून त्यासून वापरयोग्य नवीन वस्तू बनविण्याच्या उपक्रमाला प्रोत्साहन देण्याचे धोरण अलीकडच्या काही वर्षांत जाणीवपूर्वक अनुसरल्यामुळे प्रदूषणाचा प्रश्न सुकर करणे आणि त्याचबरोबर नव्या उद्योगांना चालना देणे अशी दोन्हीही उद्दिष्टे एकाच वेळी साधता येऊ लागली आहेत.

अमेरिकेतील पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाने पर्यावरण संरक्षणाची अंगीकृत उद्दिष्टे साध्य करण्याचा जणू चंग बांधला आहे. त्या प्रयत्नांमध्ये त्यांनी पुरेशी लवचिकता राखली आहे. त्यामुळे तंत्रवैज्ञानिक नवनिर्मितीचे कार्य साधतासाधता नवे रोजगारही निर्माण करणे शक्य झाले आहे. अधिक चांगले आणि सुरक्षित पर्यावरण या उद्दिष्टाकडे आशादायक वाटचाल होत राहिली आहे. या प्राधिकरणाने अलीकडेच अमेरिकेतील उद्योगाचे क्षेत्र, राज्य सरकारे आणि पर्यावरण रक्षणासाठी कार्य करणाऱ्या संस्था यांच्याशी सहयोग करण्याचा आपला मनोदय व्यक्त केला आहे. प्रत्येक उद्योगनिहाय पर्यावरण रक्षणासाठी कायकाय करणे शक्य आहे याचा मागोवा या सहयोगकार्यातून घेतला जाणार आहे. परिणामी, पर्यावरण रक्षणासाठीची बंधने आणि नियम ही आर्थिक विकासातील अडसर नाहीत अशी भावना आर्थिक उपक्रमांच्या क्षेत्रात रुजेल त्याचप्रमाणे पर्यावरणाचे रक्षण आणि आर्थिक विकास यांच्यामध्ये समन्वय असू शकतो असा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होईल. थोडक्यात, आर्थिक विकास किंवा पर्यावरण रक्षण असा पर्याय नसून आर्थिक विकास आणि पर्यावरण रक्षण

असा एकच एक मार्ग स्वीकारता येतो याबाबतीत आता तज्ज्ञांमध्येही बऱ्याच प्रमाणात एकमत होऊ लागले आहे.

आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण ही दोन्ही एकाच म्यानात राहू शकतात या विचाराला पुष्टी देण्यासाठी अमेरिकेचे अलीकडच्या दोन दशकातील काही अनुभव पुन्हा एकदा वानगीदाखल ध्यानात घेता येतील. 1970 ते 1990 या दोन दशकांत अमेरिकेतील दरडोई विनियोज्य (disposable) व्यक्तिगत उत्पन्न 42 टक्क्यांनी वाढले. याच दरम्यान, केवळ 1988 ते 1990 एवढ्याच कालावधीत हवेचे प्रचंड प्रदूषण करणाऱ्या विमानांच्या धुरातून बाहेर पडणाऱ्या शिशाचे प्रमाण 90 टक्क्यांनी घटले. याच दोन दशकांत अमेरिकेच्या सर्वच महानगरांमधून सल्फर डायॉक्साईड व कार्बन मोनॉक्साईड या अत्यंत प्रदूषणकारी द्रव्यांचे प्रमाण लक्षणीय प्रमाणात घटले आहे. पाण्याच्या बाबतीतही असाच अनुभव आहे. लक्षात घेण्याची बाब म्हणजे पर्यावरण रक्षणासाठी जी बंधने घातली गेली आहेत त्यांचा उद्देश उद्योग बंद पाडून बेकारी निर्माण करण्याचा अजिबात नाही. याउलट, ज्यांचे वर्णन पर्यावरण अनुकूल उद्योग म्हणून करता येईल अशा उद्योगांत मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झालेला आहे. अमेरिकेतच हा रोजगार 10 लक्ष माणसांचा आहे. यास्तव पर्यावरण रक्षणाच्या रोजगार निर्मितीच्या या क्रियात्मक बाजूकडे टीकाकारांनी दुर्लक्ष करू नये.

हा सर्व तपशील कितीही खरा असला तरी त्यामुळे टीकाकारांच्या सर्वच मुद्यांचे खंडन होत नाही. याकरिता आता प्रतिपक्षाची बाजू समजून घेऊ. पर्यावरणाच्या रक्षणाकरिता घातलेल्या बंधनांमुळे रोजगार वाढ घडते असे सोदाहरण सांगण्यात आले. प्रत्यक्षात देशातील एकंदर रोजगाराच्या पातळीवर पर्यावरण बंधनांचा फार मोठा प्रभाव कधीच पडत नाही हे कटाक्षाने लक्षात घेतले पाहिजे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय राजकोषीय आणि पैसाविषयक धोरणे, बचत-गुंतवणुकीविषयीचा दृष्टिकोन, श्रमिकांची गुणवत्ता अशा अनेकविध घटकांचा परिणाम देशातील एकंदर रोजगारावर पडत असतो. पर्यावरणाच्या निर्बंधांमुळे रोजगारात होणारे बदल तात्कालिक स्वरूपाचे आणि म्हणून अल्पकालीन असतात. याउलट, उपरिनिर्दिष्ट घटकपुंजांमुळे रोजगारांच्या पातळीत दीर्घकालीन बदल घडून येतात.

दुसरे, पर्यावरण उद्योगांमुळे निर्माण होणारा रोजगार तुलनेने अत्यल्प असतो. अशा उद्योगांमुळे अमेरिकेत 10 लक्ष रोजगार निर्माण झाले आहेत असा दाखला देण्यात आला खरा. तथापि संपूर्ण अमेरिकेत नागरी उपक्रमांमध्ये जेवढी लोकसंख्या रोजगारात गुंतली आहे त्याच्या फक्त 0·8 टक्के लोकसंख्या पर्यावरण उद्योगात काम करते. हे प्रमाण अगदीच नगण्य आहे. रिचर्ड शिमॅलेन्सी (Shimaiensee) हे अर्थशास्त्रज्ञ तर म्हणतात की, अमेरिकेतील एकंदर रोजगारात प्रतिवर्षी होणारे चढउतार हे पर्यावरण उद्योगांतील एकूण रोजगारापेक्षा थोडे कमी असतात. हा दाखला देताना पर्यावरणातील रोजगाराला कमी लेखणे हा उद्देश नाही. या उद्योगांमुळे निर्माण होणारा रोजगार एकंदर अर्थव्यवस्थेमध्ये फार थोडा असतो हे दाखविणे एवढाच मर्यादित उद्देश यामागे आहे. हे उद्योग वर्धिष्णु आहेत आणि त्यांच्या वस्तू व सेवांना वाढती मागणी आहे. एवढे असूनही, अमेरिकेतील 'Resources for the Future' या संस्थेचे अध्यक्ष पॉल पोर्टनी (Portney) यांनी अमेरिकेच्या संदर्भात अगदी मार्मिक भाष्य केले आहे. ते म्हणतात की, भले अमेरिकेला पर्यावरण उद्योगाच्या वस्तू व सेवा बाजारात जागतिक क्षेत्रात आघाडीचे स्थान मिळवावयाचे असो, परंतु जर एखाद्या अमेरिकेतील उपक्रमीला पर्यावरण उद्योग एका बाजूला आणि मोटारी बनविणे, रासायनिक उत्पादने किंवा शेती दुसऱ्या बाजूला यामधून उपक्रमाची निवड करण्याचा पर्याय दिला तर प्राधान्य निर्विवादपणे दुसऱ्या गटाला मिळेल.

आणखी एक मुद्दा. पर्यावरणाच्या धोरणाचे मूल्यमापन किती रोजगार निर्माण होतो या निकषावर करणे कितीसे सयुक्तिक आहे? पर्यावरणाचे उद्योग निर्माण होऊन दीर्घकालात रोजगारात काही भर पडेल हे कुणीच नाकारत नाही. परंतु पर्यावरण धोरणामुळे रोजगाराची हानी करणारेही काही निर्णय घ्यावे लागतात याकडे डोळेझाक करता येणार नाही. समजा, एखाद्या मोठ्या रासायनिक वस्तू बनविणाऱ्या कारखान्यातून समाजविघातक द्रव्यांचा लोंढा टाकाऊ वस्तू म्हणून बाहेर पडत असेल तर असा कारखाना बंद

करावयाला लावणे भाग पडते. यामुळे जरी कित्येक लोकांना आपला रोजगार गमवावा लागला तरी समाजाचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे होणारा फायदा त्यापेक्षा मोठा आणि दीर्घकालिक असेल. या प्रकारच्या मांडणीला दुसरी एक बाजू आहे, तीही ध्यानात घ्यावी लागेल. एखादा नवा उद्योग सुरू झाल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला, मात्र त्यामुळे पर्यावरणाच्या परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी काही हातभार लागला नाही तर हे धोरण पर्यावरणाची समस्या सुकर करण्याला निरुपयोगी ठरेल. रोजगार–निर्मिती एवढेच उद्दिष्ट समोर ठेवणे संकुचितपणाचे होईल.

पर्यावरण आणि आर्थिक विकास यासंबंधीची उलटसुलट मते कशी आहेत याचे विवरण केले. त्यामुळे कदाचित एक संभ्रमावस्था निर्माण होण्याची शक्यता आहे. पर्यावरण आणि आर्थिक विकास यांचा मेळ कसा घालावयाचा? तो घातला तर पाहिजेच. त्यासाठी समन्वयाचेच धोरण अनुसरावे लागेल. पारिस्थितिकी व्यवस्था ( ecosystem ) बिघडणार नाही, जनतेच्या आरोग्याला हानी पोचणार नाही, निसर्गसौंदर्य लोप पावणार नाही, वगैरे बाबींना नजरेआड करता येणार नाही. दुसऱ्या बाजूने, विविध उपक्रम तर सुरू केलेच पाहिजेत. मग हानी–लाभाचे त्रैराशिक मांडावे लागेल आणि अंतिम निर्णय करावा लागेल परंतु कित्येक वेळा लाभ–हानीचे गणित आकडेमोडीने सांगता येत नाही. त्यासंबंधीची वर्णनात्मक मांडणी करूनच सारासार विचाराने निर्णय करावे लागतात. किंबहुना, कित्येकदा आकडेमोड करता येत असली तरी त्या आधारावर धोरणात्मक निर्णय करण्यात धोका असतो. सारे गणित करताना कोणत्या ना कोणत्या कारणास्तव भविष्यकालीन हानी लाभापेक्षा जास्त असल्याचा निष्कर्ष काढला गेला तर त्यामुळे आर्थिक धोरणाशी एक प्रकारे संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. असे असले तरी लाभ–हानीचा अभ्यास टाकाऊ म्हणून बाजूला सारता येणार नाही. ते धोरणात्मक निर्णय करण्यासाठी एक उपयुक्त साधन आहे. ते स्वीकारणीय होण्यासाठी मात्र तपशील शक्य तेवढा स्पष्टपणे आणि प्रांजळपणे मांडला गेला पाहिजे, म्हणजे लोकांना कोणत्याही उपक्रमासंबंधीची सत्य माहिती समजेल. याला अधिक महत्त्व आहे. पर्यावरणासंबंधीच्या संख्यात्मक माहितीबरोबरच गुणात्मक बाबीही विचारात घेतल्या पाहिजेत, नाहीतर धोरणात्मक निर्णय चुकीचे ठरण्याची शक्यता असते.

गार्डिनर यांच्या मते पर्यावरणाच्या धोरणामुळे किफायतशीर उद्योगांना प्रेरणा मिळून असे उपक्रम वाढू लागतात. वास्तवात अशा घटना विरळ असतील आणि त्यातूनच मिळणारा नफा फार जास्त असण्याचा संभव नाही. भरपूर नफा मिळविण्याची अभिलाषा बाळगणारा उपक्रमी नफ्याची इतर क्षेत्रे शोधण्याचाच अधिक प्रयत्न करण्याची शक्यता ती शोधताना विकल्पी परिव्ययाचा (opportunity cost) विचार होऊ शकेल. समजा, एखाद्या उपक्रमीने पर्यावरणाची बंधने पाळून एखादा उपक्रम सुरू केला. त्यातून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून नफा मिळत राहिला तर हा निर्णय चूक की बरोबर मानावयाचा? प्रथमदर्शी हा निर्णय उत्तम असल्याचाच निर्वाळा कुणीही देईल. पॉल पोर्टनी मात्र तो चुकीचा मानतात. त्यांच्या दृष्टिकोनातून त्या उपक्रमीने आपल्या उपक्रमात कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, व्यवसायाचा विस्तार करणे, संशोधनकार्याला चालना देणे इत्यादी कारणांसाठी पैसा खर्चून भरपूर नफा कमविला तर ते अधिक किफायतशीर मानता येणार नाही काय? या कारणांसाठी होणारा परिव्यय हा विकल्पी परिव्यय असेल. पदरमोड करून उत्पादक पर्यावरणाची बंधने पाळणे आणि उत्पादक परिव्यय करून ती पाळणे यामध्ये दुसरा पर्याय सर्वार्थाने अधिक पसंत राहील. कारण केलेल्या परिव्ययातून दीर्घकालीन लाभ निर्माण होऊ शकतात आणि ते समाजाच्या कल्याणात भर घालतात.

सारांश, पर्यावरणाच्या रक्षणासाठी पैसा खर्च करणे हे केव्हाही समाजाच्या हिताचे असते. म्हणून यासाठी काही ना काही परिव्यय (cost) असतो ही गोष्ट नजरेआड करता येणार नाही.

[संदर्भ : Gardiner, David and Paul R. Portney, ' Environment and Economic Growth ', SPAN, January 1996.]

☐ ☐

# भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणाचे सैद्धान्तिक आधार

सु. गो. भानुशाली*

भारताच्या नियोजन पर्वातील आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणात 1980 पर्यंत शासनाने अंतर्मुखी ( inward-looking ) धोरण अमलात आणल्याचे जाणवते. राऊल प्रेबिश, गुन्नर मिर्दाल यांनी या धोरणाचा पुरस्कार केला होता आणि भारतातील धोरण आखणाऱ्या व्यक्तींच्या विचारसरणीवर त्याचा प्रभाव होता. देशाने आपला विकास घडवून आणण्यासाठी आपल्याजवळील साधनसंपत्तीची निर्यात होऊ न देता तिचा विकास करून देशांतर्गत उत्पादन वाढवावे अशी ती विचारसरणी होती. भारतात हे धोरण अमलात आणतानासुद्धा फार ढिलाई दाखविली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण औदासिन्य, निराशवादी उपेक्षा आणि अनेक वस्तूंच्या निर्यातीला मोडता घालण्याची कृती या लक्षणांनी युक्त होते. त्यासाठी कोटा, कर आणि नियंत्रणे यांचा मुक्त वापर केला गेला. जगाच्या आयातीतील भारताचा वाटा 2·1 टक्क्यांवरून ( 1951 ) 1·4 टक्क्यांपर्यंत (1960) खाली आला. 120 कोटी डॉलरच्या जवळपास निर्यात ठप्प झाली. जगातील निर्यातवाढीचा दर दरसाल 6·2 टक्के असताना भारताची निर्यात 0·2 टक्के दराने वाढत होती. आयात मुक्तपणे करू दिली जात होती. आयातीचा अगोदर कमी केलेला कोटा देशी उत्पादकांमध्ये स्पर्धा वाढविण्यासाठी पूर्वीच्या पातळीवर आणण्यात आला.

महालनोबिस अशा अंतर्मुखी आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणाचा पुरस्कार करीत असत. निर्यात उत्पन्नातील अस्थिरता, प्रतिकूल मूल्यतुल्यता दर ( terms of trade), परकियांची भारतीय वस्तूसाठी असलेली मागणीची अल्प लवचिकता या कारणांमुळे निर्यात उत्पन्न स्थिर राहील. म्हणून निर्यात वृद्धीवर भर देणारे बहिर्मुखी ( outward-looking ) धोरण राबवून भारताच्या विकासाला हातभार लागणार नाही. त्यापेक्षा अंतर्मुखी धोरण अवलंबिल्यामुळे देशातील साधनसंपत्तीच्या वापराने विकासाचा वेग वाढविता येईल अशी महालनोबिस यांची विचारधारणा होती.

* अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आणि सहायक संपादक, 'अर्थसंवाद', कोल्हापूर.

## आयात पर्यायी धोरण

1957–58 पासून भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणात परिवर्तन झाल्याचे दिसून येते पहिल्या पंचवार्षिक योजनेतील मुक्त आयात धोरणाऐवजी आता आयात पर्यायी धोरण पुरस्कारण्यात आले. मात्र विकासातील निर्यातीचे महत्त्व कमी लेखण्यात आले. आयातपर्याय म्हणजे आयात घट नव्हे; देशांतर्गत उत्पादन वाढविण्याची ती सकारात्मक प्रक्रिया होय. आयातपर्यायाच्या सुरुवातीच्या कालात भांडवली वस्तूंची, तांत्रिक ज्ञान ( technical know-how ) आणि कच्च्या मालासाठी असलेली मागणी वाढल्यामुळे आयात वाढते. आयातपर्याय म्हणजे देशाच्या आर्थिक विकासाचा कमाल दर गाठण्यासाठी दुर्मिळ साधनांच्या वाटपाची पद्धती होय.

रॅग्नार नर्कसे यांच्या म्हणण्याप्रमाणे विकसनशील देशांना परंपरागत आणि नवीन वस्तूंची निर्यात वाढविण्यात अडचणी येतात तेव्हा आर्थिक कुंठितता ( stagnation ) टाळण्याचा आयातपर्यायाचे धोरण हा मार्ग होय. निर्यात प्रवर्तन आणि निर्यात विविधीकरण यासाठी आयात पर्यायाचे धोरण आवश्यक आहे. गुन्नर मिर्दाल यांच्या मते विकासासाठी निर्यातीतून फारच अल्प उत्तेजन मिळते तेव्हा आयात पर्यायाचेच धोरण योग्य ठरते.

राऊल प्रेबिश यांचे म्हणणे असे की, उद्योगीकरण विकासाचा आणि दारिद्र्यनिर्मूलनाचा प्रमुख आधार होय. किंमत व्यवस्थेतून साधता येणारे उद्योगीकरण अपुरे असते. म्हणून आयात करांच्या भिंती उभारा, मागणी निर्माण करण्यासाठी विकास योजना राबविताना आयात निर्बंधित करा. आयातीतील बचत-गुंतवणुकीतून वाढती उत्पादकता आणि वाढता नफा असे आवर्तन त्यातून निर्माण होऊन देशाचा विकास साधता येतो. हर्षमन यांच्या मते, आत्मविश्वासाने विकास साधण्यासाठी लागणारा औद्योगिक पाया आयात-पर्यायातून निर्माण करता येतो.

अशा प्रकारे करभिंती उभारून अमेरिका, सोविएत रशिया, ऑस्ट्रेलिया, स्पेन, पोर्तुगाल, जपान, मेक्सिको आणि ग्रीस या राष्ट्रांनी विकास साधला. भारतात आयातपर्याय धोरणाच्या सुरुवातीच्या कालात उपभोग्य वस्तूंच्या आणि नंतरच्या कालात अर्धसिद्ध वस्तू ( intermediate goods ) आणि गुंतवणूक वस्तूंच्या आयातीवर भर देण्यात आला. त्यामुळे भांडवली वस्तूंचे एकूण उत्पादन क्षेत्रातील वस्तूंच्या उत्पादनाशी असलेले प्रमाण 62 टक्क्यांपर्यंत आणि देशांतर्गत उत्पादनाचे एकूण उत्पादन क्षेत्रातील वस्तूंच्या उत्पादनाशी असलेले प्रमाण 252 टक्क्यांपर्यंत वाढले.

1951 मध्ये साखर उद्योगातील यंत्रसामग्रीच्या आयातीचे प्रमाण 100 टक्के होते ते 1977-78 मध्ये 0·1 टक्का इतके, लोखंड आणि पोलाद उत्पादनांचे प्रमाण 25·2 टक्क्यांवरून 1·1 टक्क्यांपर्यंत, अॅल्युमिनियम उत्पादनांचे प्रमाण 72·8 टक्क्यांवरून 2 टक्क्यांपर्यंत तर सायकलींच्या उत्पादनाचे प्रमाण 62·5 टक्क्यांवरून (1950–51) 22·42 टक्क्यांपर्यंत (1955–56) कमी झाले. आयातीचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी 1970–71 साली असलेले 11·37 टक्क्यांचे प्रमाण 1980–81 साली 4·42 टक्क्यांपर्यंत कमी झाले. कापड उद्योगातील यंत्रसामग्रीच्या आयातीचे कापड उद्योगात वापरात आलेल्या एकूण यंत्रसामग्रीशी असलेले 1960–61 मधील 69·13 टक्के हे प्रमाण 1970–71 मध्ये 13·20 टक्क्यांपर्यंत कमी झाले. 1965–66 मध्ये खतांच्या आयातीचे भारतातील खतांच्या उत्पादनाशी 1965-66 मध्ये असलेले 53·64 टक्के प्रमाण 1975–76 मध्ये 45·74 टक्क्यांपर्यंत कमी झाले. म्हणजे या उद्योगांतील आयात पर्यायी धोरणाचा परिणाम 0·23 टक्के इतका झाला. धान्योत्पादन, साखर कारखान्यात वापरली जाणारी यंत्रसामग्री, सोडा अॅश, ब्लिचिंग पावडर, सायकली, शिवण यंत्रे, अमोनियम सल्फेट, कच्चा कापूस आणि लोखंड व पोलाद या उत्पादनांत आयात पर्यायी धोरण चांगलेच यशस्वी झाले.

असे असले तरी इतर अनेक क्षेत्रांत आयात पर्यायी धोरण परिणामकारक ठरल्याचे जाणवत नाही. आयातीचे देशातील एकूण उत्पादनाशी असलेले प्रमाण कच्च्या कापसाच्या उत्पादनाच्या बाबतीत 1955–56 च्या 12·3 टक्क्यांवरून 1977–78 मध्ये 10·3 टक्के इतकेच, वर्तमानपत्र छपाई कागदाच्या उत्पादनाच्या बाबतीत याच कालावधीत 95·2 टक्क्यांवरून 75·1

टक्क्यांपर्यंत आणि मानवनिर्मित धाग्याच्या बाबतीत तर 20·7 टक्क्यांवरून 35·7 टक्क्यांपर्यंत वाढले. एस. पॉल यांनी आपल्या संशोधनाच्या निष्कर्षात प्रशुल्कांच्या परिणामकारक दरात आणि उद्योगांतील स्थापित उत्पादनक्षमतेच्या वापरात ऋण संबंध निर्माण झाल्याचे दाखवून दिले आहे. विश्वनाथ गोल्डर यांच्या संशोधनातून प्रशुल्कांच्या परिणामकारक दरातील वाढ आणि आयात पर्याय यातही ऋण संबंध असल्याचे स्पष्ट झाले आहे. या कालावधीत मूल्यतुल्यता दर 113 (1954–56) वरून 86 (1978–79) इतका प्रतिकूल झाला. म्हणजे 1954–56 मध्ये 113 इतक्या मूल्याच्या वस्तू आयात करण्यासाठी 100 इतक्या मूल्याच्या वस्तू निर्यात कराव्या लागत होत्या, तर 1978–79 मध्ये 113 इतक्या मूल्याच्या वस्तू आयात करण्यासाठी 131·39 इतक्या मूल्याच्या वस्तू निर्यात कराव्या लागू लागल्या. अहलुवालिया यांनी असे विधान केले आहे की, सततच्या आयात पर्याय धोरणामुळे भांडवली वस्तूंच्या उत्पादनाच्या अभिवृद्धी दरात घट होत गेली. विश्वनाथ गोल्डर यांनी एकूण उत्पादन घटकांच्या उत्पादनक्षमतेच्या वाढीचा दर मोजला तो उणे 1·29 इतका आला. त्यांनी त्यावरून असा निष्कर्ष मांडला की, उत्पादन घटकांच्या उत्पादनक्षमतेच्या अभिवृद्धीचा दर (rate of growth of total factor productivity) आणि आयात पर्याय यातील संबंध ऋण आहे.

या विवेचनावरून असे स्पष्ट होते की, आर्थिक विकासाचे एक साधन म्हणून आयात पर्यायाचे धोरण फारसे यशस्वी झाले नाही. देशात अर्थव्यवस्थेत विरुपणे विकसित झाली. या कालात भारतातील दारिद्र्यातही वाढ झाली.

## आयात उदारीकरणाचे धोरण

1978 पासून भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणात मोठा बदल झाल्याचे आढळते. अलेक्झांडर समितीने आयातीचे निर्नियंत्रण करून व्यापार धोरणात आमूलाग्र बदल करण्याचे सुचविले होते. साधनांच्या वापरात कार्यदक्षता आणण्याच्या दृष्टीने तसेच वस्तू व्यापार शेष (balance of trade) अनुकूल व्हावा म्हणून निर्यात वृद्धीचे उपाय सुचविले होते. दोन दीर्घकालीन आयात–निर्यात व्यापार धोरणे या कालात अंगिकारण्यात आली. कच्चा माल, सुटे भाग, तांत्रिक ज्ञान यांची अनुज्ञप्ती पद्धतीतून पूर्ण मुक्तता करण्यात आली. मुक्त सामान्य अनुज्ञप्ती (open general licence) व्यवस्थेअंतर्गत एक हजार पेक्षा जास्त वस्तू आणण्यात आल्या. सैद्धान्तिकदृष्ट्या पाहता निर्यातीतील नवीन गैरपरंपरागत वस्तू आयातसघन असल्यामुळे आयात उदारीकरणाच्या धोरणामुळे निर्यात वाढेल. अग्रीम आयात अनुज्ञप्ती आणि विशेष अग्रधन (imprest) अनुज्ञप्तीमुळे निर्यात सुधारेल. निर्यात वृद्धीसाठी आयात उदारीकरणाच्या धोरणात मुख्यत्वे सहा उपाय योजण्यात आले.

(1) मुक्त सामान्य अनुज्ञप्ती अंतर्गत आयात करता येणाऱ्या वस्तूंची यादी 570 (1977–78) वरून 745 (1984–85) पर्यंत वाढविली. काही वस्तूंच्या उत्पादनात देश स्वयंपूर्ण झाल्यामुळे आणि काही वस्तूंच्या देशांतर्गत उत्पादकांना संरक्षण देता यावे म्हणून या यादीतून 53 वस्तू वगळण्यात आल्या.

(2) निर्यातप्रधान उद्योगांना अग्रीम आयात अनुज्ञप्ती, आयात शुल्कमुक्त अनुज्ञप्ती, विशेष अग्रधन अनुज्ञप्ती याद्वारे भांडवली वस्तू, सुटे भाग आणि कच्चा माल आयात करण्यास परवानगी देण्यात आली.

(3) आपल्या उत्पादनांपैकी 25 टक्क्यांपेक्षा जास्त उत्पादन निर्यात करणाऱ्या उत्पादकांना यंत्र–सामग्री, कच्चा माल, सुटे भाग आणि यंत्रसाधने (machine tools) आयात करण्यासाठी अंतर्रचित (automatic) अनुज्ञप्ती देण्यात आल्या.

(4) निर्यातदारांसाठी शुल्क माफी योजना अमलात आणली गेली.

(5) नोंदणीकृत निर्यातदारांसाठी आयात योजना प्रथम व्यापारी व निर्यातदारांसाठी आणि नंतर उद्योगांसाठी सुरू करण्यात आली.

(6) निर्यातदारांना आयात अनुज्ञप्तीशिवाय आयात करता यावी म्हणून निर्यात–आयात पास बुक देण्याची योजना अमलात आणली.

तक्ता 1

**आयातसघनतेचे निकष**

| लेखक | संज्ञा | सूत्र |
| --- | --- | --- |
| 1 विद्या मिश्र | उद्योगांची आयातसघनता | आयातीचे मूल्य / उत्पादनाचे मूल्य |
| 2 व्ही. एस. सिद्धार्थन | (अ) आयातसघनतेचे मूल्य | आयात कच्चा माल / उत्पादनात वापरलेला एकूण कच्चा माल |
| | (आ) भांडवल आयातीची सघनता | आयात यंत्रसामग्री आणि सुटे भाग / उत्पादनातील एकूण यंत्रसामग्री आणि सुटे भाग |
| | (ई) तंत्रविज्ञान आयातीची सघनता | स्वामित्वधन आणि फी यांचे मूल्य / विक्री उलाढाल मूल्य |
| 3 मानस भट्टाचार्य | निर्यातीची आयातसघनता | क्षेत्राच्या निर्यातीचे एकूण मूल्य / त्या क्षेत्रातील प्रतिएकक उत्पादनातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आयात घटकांचे मूल्य |
| 4 डी. सिंग | आयातसघनता | उत्पादनात वापरलेल्या आयात कच्च्या मालाचे आणि भांडवली वस्तूंचे मूल्य / त्या उत्पादनात वापरलेल्या एकूण कच्च्या मालाचे आणि भांडवली वस्तूंचे मूल्य |
| 5 डी. एच. आणि बी. एच. धोलकिया | (अ) आयातसघनता | आयात निविष्टींचे मूल्य / एकूण निविष्टींचे मूल्य |
| | (आ) निर्यातीची आयात-सघनता | आयात निविष्टींचे मूल्य / एकूण निर्यात |

निर्यातवृद्धीसाठी आयात उदारीकरणाच्या धोरणाचे परिणाम पाहणे उद्बोधक ठरेल.

विद्या पित्रे यांनी नोंदणीकृत निर्यातदारांना दिलेल्या अनुज्ञप्तीचे एकूण आयात अनुज्ञप्तींशी असलेले प्रमाण अभ्यासून निष्कर्ष काढला आहे की, 1980–81 ते 1990–91 या कालावधीत निर्यातीत वाढ झाली. 1980–81 मध्ये नोंदणीकृत निर्यातदारांना 1,422 कोटी रुपयांच्या निर्यातीसाठी अनुज्ञप्ती देण्यात आल्या. त्यावर्षी 5,340·4 कोटी रुपयांच्या मूल्याच्या आयात अनुज्ञप्ती देण्यात आल्या. म्हणजे हे प्रमाण 26·6 टक्के इतके होते. 1985–86 मध्ये हे प्रमाण 33·8 टक्के तर 1990–91 मध्ये 54·1 टक्के इतके होते. 1988–89 मध्ये हे प्रमाण 61·4 टक्क्यांपर्यंत वाढले होते. विद्या पित्रे, व्ही. एस. सिद्धार्थन, मानस भट्टाचार्य, डी. सिंग, डी. एच. आणि बी. एच. धोलकिया यांनी वेगवेगळ्या प्रकारे आयातसघनता (import intensity) मोजून या धोरणाच्या यशापयशाची चर्चा केली आहे. त्यांनी वापरलेल्या संज्ञा आणि सूत्रे तक्ता 1 मध्ये दिली आहेत.

या संशोधकांनी वेगवेगळ्या उद्योगांची आकडेवारी घेऊन आपल्या सूत्राच्या आधारे सघनता मोजण्याचा प्रयत्न केला आहे. उद्योगातील वेगळेपण, मूल संकल्पनेतील आणि त्याआधारे तयार केलेल्या सूत्रातील फरक यामुळे या संशोधकांनी काढलेले निष्कर्ष तुलना करता येण्यासारखे नाहीत. डी. सिंग यांनी रासायनिक, अभियांत्रिकी, कापड आणि कागद उद्योगांत आयात कच्च्या मालाचे आणि भांडवली वस्तूंचे त्या उद्योगात वापरलेल्या एकूण कच्च्या मालाशी आणि भांडवली वस्तूंशी काढलेले प्रमाण जास्त योग्य वाटते. त्यांच्या संशोधनाचा निष्कर्ष तक्ता 2 मध्ये थोडक्यात दिला आहे.

आयात उदारीकरणामुळे उद्योगांनी नवे तंत्रविज्ञान आयात करून स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करावा अशी अपेक्षा होती. त्यामुळे निर्यात वाढून देशाच्या विकासाला चालना मिळेल. परंतु तक्ता 2 मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसते की, या चारही उद्योगांचे आयातीवरील अवलंबित्व वाढत गेलेले आहे. याच चार उद्योगांनी मिळविलेल्या विदेशी चलनाचे त्यांच्या एकूण परिव्ययाशी प्रमाण काढले तर आणखी एक पैलू स्पष्ट होतो. काही वर्षांची ही आकडेवारी तक्ता 3 मध्ये दिली आहे.

**तक्ता 2**

**काही उद्योगांतील आयातसघनता ( टक्केवारी )**

| वर्ष | रसायनिक उद्योग | अभि–यांत्रिकी उद्योग | कापड उद्योग | कागद उद्योग |
|---|---|---|---|---|
| 1975–76 | 4·65 | 6·05 | 1·83 | 1·39 |
| 1980–81 | 7·49 | 6·00 | 2·63 | 2·62 |
| 1985–86 | 9·10 | 6·47 | 2·34 | 10·05 |
| 1989–90 | 11·36 | 9·14 | 6·43 | 9·09 |

**तक्ता 3**

**मोठ्या सरकारी व्यवसाय संस्थांमधील विदेशी चलनाच्या निव्वळ आवकीचे एकूण परिव्ययाशी असलेले प्रमाण ( शेकडा )**

| वर्ष | रसायनिक उद्योग | अभि–यांत्रिकी उद्योग | कापड उद्योग | कागद उद्योग |
|---|---|---|---|---|
| 1975–76 | 52·15 | 75·45 | 264·57 | 24·17 |
| 1980–81 | 50·37 | 63·43 | 184·27 | 26·41 |
| 1985–86 | 40·01 | 54·91 | 173·23 | 2·52 |
| 1989–90 | 47·45 | 53·87 | 105·62 | 22·34 |

तक्ता 3 मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून एक गोष्ट दिसून येते की, कापड उद्योगातील वार्षिक निर्यातीचे मूल्य त्या उद्योगातील परिव्यया पेक्षा जास्त आहे. पण त्याचबरोबर हेही खरे की, या चारही उद्योगांतील निर्यातीचे प्रमाण कमीजास्त वेगाने का होईना पण कमी होत गेले आहे. तक्ता 2 आणि तक्ता 3 मधील आकडेवारींची तुलना केली असता असा निष्कर्ष निघतो की, या चारही उद्योगांनी वाढत्या प्रमाणात आयात

मालाचा वापर करूनसुद्धा निर्यातीत घट होत गेली. कापड उद्योगात किमान आयात माल वापरून जास्तीत जास्त पण घटत्या प्रमाणात निर्यात केली तर कागद उद्योगात जास्त वेगाने वाढत्या प्रमाणात आयात माल वापरून अल्प वेगाने घटती निर्यात केली. यावरून असे दिसते की, आयात उदारीकरणातून निर्यातवृद्धीचे उद्दिष्ट साध्य करता आले नाही. या पंधरा वर्षांच्या काळात वरील चार उद्योगांच्या आयातीत झालेल्या वाढीचा वार्षिक सरासरी दर रासायनिक उद्योगांच्या बाबतीत 91·37 टक्के, अभियांत्रिकी उद्योगाचा 39·68 टक्के, कापड उद्योगाचा 32·14 टक्के आणि कागद उद्योगाचा 110·61 टक्के होता.

धोलकिया बंधूंनी निर्यात क्षेत्रातील आयातसघनतेचे आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील आयातसघनतेचे प्रमाण मोजले आहे. त्यांच्या आकडेवारीप्रमाणे एकूण निविष्टींशी आयात निविष्टींचे निर्यात क्षेत्रातील प्रमाण 7·96 टक्के आणि अर्थव्यवस्थेतील प्रमाण 4·99 टक्के होते. म्हणजे निर्यात क्षेत्राची आयातसघनता अर्थव्यवस्थेच्या आयातसघनतेपेक्षा 59·52 टक्क्यांनी अधिक होती. तसेच त्यांनी आयात निविष्टींचे एकूण निर्यात मूल्याशी असलेले प्रमाणही मोजले आहे. निर्यात क्षेत्रात ते 3·48 टक्के तर अर्थव्यवस्थेत 2·19 टक्के होते. म्हणजे निर्यात क्षेत्राची आयातसघनता अर्थव्यवस्थेच्या आयातसघनतेपेक्षा 58·90 टक्क्यांनी जास्त होती. त्यांनी विविध वर्षांची आकडेवारी दिलेली नसल्यामुळे तुलनात्मक विश्लेषण करता येत नाही.

आयात उदारीकरणाचा निर्यातीवर होणारा परिणाम पाहता येतो. कच्च्या मालाच्या आणि सुट्या भागाच्या आयातीत झालेल्या वाढीचा निर्यात वाढीवर लवकर परिणाम होतो तर भांडवली वस्तू आणि तंत्रविज्ञान आयातीत झालेल्या वाढीचा निर्यात वाढीवर होणारा परिणाम दिसून येण्यास कालावधी जावा लागतो. एकूण आयातीतील कच्च्या मालाच्या आयातीचे प्रमाण बरेच मोठे ( 1960–61 : 47 टक्के, 1970–71 : 54·4 टक्के, 1980–81 : 77·4 टक्के आणि 1990–91 : 49·7 टक्के) असल्यामुळे आयात उदारीकरणाचा निर्यात वाढीवरील परिणाम लवकर झाला असला पाहिजे. 1970–71 पेक्षा 1971–72 मध्ये निर्यात 4·89 टक्क्यांनी अधिक होती तर 1980–81 पेक्षा 1981–82 मध्ये झालेली निर्यात 16·31 टक्क्यांनी अधिक होती.

आयात उदारीकरणापूर्वीच्या आणि नंतरच्या कालावधीतील निर्यात वाढीच्या दरांच्या तुलनेतून ते आणखी स्पष्ट होते. तक्ता 4 मध्ये ही आकडेवारी दिली आहे.

**तक्ता 4**

**आयात उदारीकरणापूर्वीच्या आणि नंतरच्या कालावधीतील निर्यात वाढीचा दर**

| वस्तू | आयात उदारीकरणापूर्वीच्या कालावधीतील निर्यात वाढीचा दर | आयात उदारीकरणाच्या कालावधीतील निर्यात वाढीचा दर |
|---|---|---|
| 1 तंबाखू | 2·1 | 12·4 |
| 2 कच्चा माल | 1·6 | 11·3 |
| 3 रसायने | 5·0 | 18·1 |
| 4 मूळ उत्पादित वस्तू | 4·3 | 15·7 |
| 5 यंत्रसामग्री आणि वाहतूक यंत्रसामग्री | 13·9 | 16·0 |
| 6 इतर उत्पादित वस्तू | 5·1 | 27·5 |

यापूर्वी अभ्यासिलेल्या चार उद्योगांतील एकूण विक्रीमधील निर्यातीचा हिस्सा 1975–76 ते 1989–90 या कालावधीत कसा बदलत गेला हे तक्ता 5 मध्ये दिले आहे.

**तक्ता 5**

**निर्यातीचे एकूण विक्रीमूल्याशी असलेले प्रमाण**

**(शेकडा)**

| वर्ष | रसायन | अभियांत्रिकी | कापड | कागद |
|---|---|---|---|---|
| 1975-76 | 3·08 | 5·73 | 6·45 | 0·81 |
| 1980-81 | 4·58 | 5·41 | 5·84 | 0·96 |
| 1985-86 | 4·13 | 3·53 | 2·99 | 0·24 |
| 1989-90 | 6·14 | 5·60 | 9·24 | 1·22 |

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, गुंतवणूक मागणी आणि आंतरउद्योग मागणीमध्ये झालेल्या वाढीचा देशी उद्योगांच्या वाढीवर इतका अनुकूल परिणाम झाला की, आयात उदारीकरणाचा औद्योगिक वाढीवर होणारा ऋण परिणाम त्यामुळे धुऊन निघाला. आयात उदारीकरणामुळे उद्योगांना उपलब्ध असलेल्या तंत्रविज्ञानाला मिळतेजुळते निविष्टी मिश्रण वापरता आले. आयात उदारीकरणामुळे पुरवठ्याची बाजू भक्कम झाल्याकारणाने उद्योगांना जास्त वेगाने विकास घडवून आणता आला. आयात वाढीतील सुलभतेमुळे मागणीत वाढ घडून आली.

आयातीच्या मागणी उत्तेजन ( demand stimulating ) परिणामामुळे आयात उदारीकरणाच्या कालात भारतीय उद्योगांची कामगिरी समाधानकारक झाली. वरील विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की, देशी उद्योगांच्या विकासात आयातीचा सहभाग ऋण होता. आयात उदारीकरणामुळे मागणीत वाढ झाली. पुरवठा परिस्थितीतील बदलाच्या मागणीवर होणाऱ्या परिणामातून उत्पादनात वाढ होते आणि आयात मुक्तीकरण पुरवठ्यात बदल घडवून आणणारा महत्त्वाचा घटक असू शकतो हा एक महत्त्वाचा धोरणात्मक धडा होय.

## निर्यातीतून विकासाचे धोरण

पी. जे. वर्दून ( P. J. Verdourn ) यांचा नियम असे सांगतो की, व्यापार धोरणामुळे बाजाराचा विस्तार वाढल्याने अनुमापी अनुकूलता ( economies of scale ) प्राप्त झाल्याकारणाने परिव्यय घटतो. निर्यात अभिवृद्धीतून विकास साधण्याच्या धोरणाचा आधार म्हणून या नियमाचा सतत आधार घेतला जातो. आर्थिक विकास साधण्यासाठी निर्यातवाढीची चळवळ भारतात जुलै 1985 मध्ये हाती घेण्यात आली. जून 1991 पासून उदारीकरण, खाजगीकरण आणि वैश्वीकरणाच्या धोरणात तिचा समावेश करण्यात आला. 1966 मध्ये निकोलस काल्डर यांनी लिहिलेल्या 'Causes of Slow Rate of Growth in the United Kingdom' या व इतर सात पुस्तकांतून या धोरणाचा पुरस्कार करण्यात आला. तसे पाहिले तर ॲडॅम स्मिथ यांच्या लिखाणात या परिकल्पनेचे बीज सापडते. स्मिथ यांच्या पूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापार शून्य बेरजेचा खेळ ( zero-sum game ) होता. श्रमविभागणी, अदृश्य हात आणि स्वहिताची कार्यदक्षता या तीनही गोष्टी आंतरराष्ट्रीत व्यापारातही अनुस्यूत असल्यामुळे दोन देशांमधील व्यापार शून्यापेक्षा जास्त बेरीज असलेला होकारात्मक खेळ ( non-zero-sum positive game ) आहे. त्यातून व्यापार करणाऱ्या देशांना ( 1 ) उत्पादकता लाभ, ( 2 ) निरपेक्ष परिव्यय लाभ ( absolute cost gain ), आणि ( 3 ) आधिक्यासाठी असलेल्या वाटेचा लाभ (vent for surplus gain) असा तीन प्रकारचा लाभ मिळत असतो.

निकोलस काल्डर आणि लॅम फालुसी (Lam Falussy) या दोघांचे यासंबंधी विचार उद्धृत करण्याजोगे आहेत. काल्डर यांच्या मते विकास हा साधन संरोधित (constrained) नसून मागणीप्रेरित असतो. निर्यातप्रेरित विकास उत्पादक उद्योगांमध्ये वाढ घडवून आणतो; त्यामुळे उद्योगांना वाढत्या प्रत्यायाचा लाभ घेता येतो. निर्यात मागणीतील 70 टक्के मागणी उत्पादक उद्योगांसाठी उत्पन्न निर्माण करण्यास उपयुक्त ठरते. त्यामुळे उत्पादक उद्योगांमधील उत्पादकता सुधारते आणि स्पर्धात्मकता वाढत असल्यामुळे इतर क्षेत्रांच्या मानाने निर्यात क्षेत्रातील एकक परिव्यय (unil cost) आणि किमती वेगाने कमी होतात.

लॅम फालूसी यांचे मत असे आहे की, निर्यातीमुळे आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदात होणाऱ्या बदलांकरवी गुंतवणुकीवर होणाऱ्या परिणामांमुळे विकास होतो. एकूण मागणीतील इतर कोणत्याही घटकांतील वृद्धीपेक्षा निर्यातीतील तेवढ्या परिमाणाची वृद्धी विकासाला जास्त पोषक ठरते. उत्पादकतेतील सुधारणेला मिळालेला प्रतिसाद म्हणजे व्यापारातील विस्तार होय. निर्यात क्षेत्रातील बहिर्गत (exogenous) बदलांचे परिणाम श्रम उत्पादनक्षमतेतील सुधारणेमुळे जास्त प्रभावी होतात आणि त्यातून निर्यात क्षेत्राची किंमत स्पर्धात्मकता वाढते. नवीन यंत्रातील अंगभूत तंत्रामुळे श्रमिकांची उत्पादनक्षमता सुधारते. त्यातून उत्पादन वाढते आणि गुंतवणूक वाढते आणि अशी नवीन गुंतवणूक अधिक उत्पादक असते. निर्यातीतील वाढीमुळे गुंतवणूक वाढते. त्यामुळे निर्यातप्रेरित

विकासात मागणीवरील आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदाचा दबाव जाणवत नाही.

येथे काल्डर आणि लॅम फालूसी यांच्या दृष्टिकोनातील एक फरक जाणून घेणे आवश्यक आहे. काल्डर यांच्या म्हणण्याप्रमाणे निर्यातीतील वाढीमुळे उत्पादक क्षेत्रातील व्यवसाय संस्थांना अनुमापी अनुकूलतेचा (economies of scale) लाभ मिळतो आणि त्यामुळे विकासाला चालना मिळते. तर लॅम फालुसी यांचे म्हणणे असे आहे की, उपक्रमींच्या भक्कम विश्वासामुळे निर्यातीत ठोस संपादन साध्य करता येते.

बी. बालसा आणि राणा यानी या संदर्भात आणखी एका वेगळ्याच मुद्यावर चर्चा केली आहे. बालसा यांच्या म्हणण्याप्रमाणे निर्यात वृद्धीतून विकासाची परिकल्पना (export expansion hypothesis) बिघडत जाणाऱ्या व्यापार वातावरणाच्या परिस्थितीतही तेवढीच ग्राह्य ठरते. पण राणा यांचे म्हणणे असे आहे की, जागतिक व्यापार वातावरण प्रतिकूल असताना निर्यातीचा विकासावरील अनुकूल परिणाम कमी असेल. निर्यात संवर्धन व्यूह अर्थव्यवस्थेच्या विकासावर किती प्रमाणात परिणाम घडवून आणतील ते ठरविण्यात जागतिक व्यापार वातावरण निर्णायक भूमिका बजावते.

1977 मध्ये दरडोई उत्पन्न 300 अमेरिकी डॉलरपेक्षा जास्त असणाऱ्या 55 विकसनशील देशांचा टायलर यानी अभ्यास करून निर्यातीचा वार्षिक वाढीचा दर आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीचा वार्षिक दर यामधील संबंध कार्ल पियर्सन सहसंबंध गुणांकाच्या (coefficient ot correlation) साहाय्याने मोजला. तो 0·49 इतका आला. याचा अर्थ असा की, निर्यातीतील एक रुपया वाढीमुळे या देशातील स्थूल राष्ट्रीय उत्पादनात 2·49 रुपयांची भर पडली.

P=a+bx हे प्रतिपगामी समीकरण (regression equation) भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत उपयोगात आणले तर असा निष्कर्ष निघतो की, एक कोटी रुपयांची निर्यातीत झालेली वाढ स्थूल राष्ट्रीय उत्पादितात 14 कोटी रुपयांनी वाढ घडवून आणू शकते. दुसऱ्या एका अभ्यासाप्रमाणे उत्पादनवाढ–निर्यात गुणोत्तर (Incremental Output-Export Ratio $\left(\frac{\Delta P}{\Delta X}\right)$ ] 4·64 तर उत्पादन वाढ–आयात गुणोत्तर [Incremental Output–Import Ratio $\left(\frac{\Delta P}{\Delta M}\right)$ ] 2·25 येतो. यावरून बहिर्मुखी व्यूह (outward–looking strategy) (Export Expansion Hypothesis) अंतर्मुखी व्यूहापेक्षा (inward-looling strategy) (Import liberalisation) उजवे ठरतात.

भारताने 1991 मध्ये स्वीकारलेल्या निर्यात-वृद्धीतून विकास साधण्याच्या मार्गात जागतिक व्यापार परिस्थितीत प्रतिकूल आणि अनुकूल अशी दोन्ही चिन्हे दिसत आहेत. भारताचा मुख्य बाजार असलेली विकसित राष्ट्रे आपला बाजार उदारीकरणाचा कार्यक्रम फार धीमेपणाने अमलात आणित आहेत. मोठ्या आर्थिक शक्तींमधील व्यापार संघर्ष निकराला आला असून त्यामध्ये विकसनशील राष्ट्रे भरडली जात आहेत. ही राष्ट्रे विकसनशील देशांबरोबरच्या व्यापारावर एकतर्फी नियंत्रणे लादत असून 'गॅट'च्या सुरक्षिततेच्या प्रणालीबाहेर असणारे 'ऐच्छिक निर्यात प्रतिरोध' यासारखी साधने संरक्षणात्मक कारणांसाठी वापरीत आहेत. शिवाय अनुचित व्यापार पद्धतीच्या विरोधात वापरली जाणारी अनुदान विरोधी साधने वापरून विकसित राष्ट्रे ऱ्हासाला लागलेल्या देशीय उद्योगांना आयात स्पर्धेपासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहेत. विकसित राष्ट्रे आपल्या अर्थव्यवस्थेतील अपसरणाच्या (recession) आणि मंदीच्या परिस्थितीवर मागणीच्या व्यवस्थापनातून भावफुगवट्याचा धोका निर्माण होईल या कारणास्तव परिणामकारक उपाय योजीत नाहीत.

असे असले तरी, विकसनशील देशांमधील त्या देशांसाठी उपलब्ध असलेला बाजार अमर्याद वाटावा इतका मोठा आहे. व्यापाराच्या अनुकूल परिणामातून या देशांत स्वस्त श्रमाच्या जोरावर अनेक अस्थिर (foot loose) उद्योग स्थापन झाले आहेत. विकसित राष्ट्रे साध्या उत्पादित मालाच्या उत्पादनातून आपले अंग काढून घेऊन जटिल (sophisticated) वस्तूंच्या उत्पादनावर भर देत आहेत आणि विकसनशील देश

त्यांची जागा घेत आहेत. अशा 'उडत्या पक्षाच्या' (flying geese) प्रकारच्या उद्योगांमुळे विकसित तसेच विकसनशील राष्ट्रांची उत्पादकता सुधारली असून निर्यात वाढत आहे.

विकसनशील देशांनी हाती घेतलेल्या निर्यात–वृद्धीच्या कार्यक्रमामुळे 1992 मध्ये त्यांची निर्यात आणि परिणामी आयात वाढली. विकसनशील राष्ट्रांच्या निर्यातवृद्धीच्या धोरणात उत्पादक उद्योगांना महत्त्वाची भूमिका बजावता येत आहे. शिवाय विकसित राष्ट्रांतील अपसरणाच्या परिस्थितीमुळे आणि पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राष्ट्रांतील मंदीच्या परिस्थितीमुळे या उद्योगांना लागणाऱ्या निविष्टींची उपलब्धता मुबलक आहे. विकसनशील देशांनी गुंतागुंतीच्या तंत्रविज्ञानावर आधारित जास्त वर्धितमूल्य (value added) असलेल्या वस्तूंच्या उत्पादनावर आणि निर्यातीवर लक्ष केन्द्रित केल्यामुळे त्यांना विकसित राष्ट्रांच्या बाजारात मुसंडी मारता आली. विकसित राष्ट्रांतील वस्तूंच्या किमतींच्या मानाने विकसनशील राष्ट्रांतील उत्पादित तसेच प्राथमिक वस्तूंच्या किमती जास्त वेगाने घटत असल्यामुळे विकसनशील राष्ट्रांना अशी मुसंडी मारणे आणखी सुलभ झाले आहे.

आशियातील उपक्षेत्रीय आणि क्षेत्रांतर्गत संपूरकतेचा (complementarity) आणि सहकार्याचा लाभ उठविण्याच्या अलीकडच्या कालात करण्यात आलेल्या प्रयत्नांमुळे या विभागात 'अभिवृद्धी त्रिकोण' (growth triangles) विकसित झाले आहेत. या विभागातील विकसित राष्ट्रांकडील भांडवल आणि शेजारी विकसनशील राष्ट्रांतील कुशल स्वस्त मजूर यांच्या परस्परपूरकतेतून स्पर्धाशील किमतीला निर्यात करता येणाऱ्या वस्तूंचा पूर आला आहे. व्यापार आणि गुंतवणूक यातून विकास साधला जात आहे.

जानेवारी 1995 ते एप्रिल 1995 या चार महिन्यांच्या कालावधीत भारताची निर्यात आयातीपेक्षा जास्त होती. निर्यात 24 टक्क्यांनी तर आयात 15 टक्क्यांनी वाढली. त्यामुळे 1995–96 चे 31 अब्ज डॉलरच्या निर्यातीचे उद्दिष्ट गाठता येईल. 1995–96 च्या अर्थसंकल्पात उत्पादन शुल्काचे आणि सीमाशुल्काचे दर कमी करण्यात आले आहेत. तयार कपडे, लेखन–सामग्री, खेळाची साधने, सायकली आणि त्यांचे सुटे भाग यासारख्या 154 वस्तूंवरील 'शुल्क परताव्याचे' (duty drawback) दर वाढविले आहेत. तसेच या उत्पादनांना वर्धितमूल्य कराची सवलत लागू करण्यात आली आहे. या सर्व उपायांमुळे भारताच्या निर्यात अभिवृद्धीचा दर वाढेल आणि विकासाला चालना मिळेल.

☐ ☐


## 'अर्थसंवाद' : पूर्वीच्या वर्षांचे अंक

'अर्थसंवाद' चे 1992–93, 1993–94 आणि 1994–95 या वर्षांचे मर्यादित अंक उपलब्ध आहेत. ज्या व्यक्ती, संस्था आणि ग्रंथालयांना या वर्षांचे प्रत्येकी चार अंकांचे संच पाहिजे असतील त्यांनी **प्रमुख संपादकांकडे** प्रत्येक वर्षासाठी रु. 100/- पाठवून मागणी करावी. मर्यादित संच उपलब्ध असल्याने 'प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी' यानुसार अंक पुरविले जातील.

प्रमुख संपादक

# एकोणिसावे वार्षिक अधिवेशन

## *सूत्रसंचालकांचे अहवाल*

### चर्चासत्र पहिले

## आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धान्तातील नवे प्रवाह

शं. के. मोडक *

### 1

### पार्श्वभूमी

भारतात उदार आर्थिक धोरणाची 1991 साली सुरू झालेली वाटचाल आणि तदनंतर जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या विषयांवर झालेली साधकबाधक चर्चा यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयाला एक नवे परिमाण प्राप्त झाले आहे. उरुग्वे फेरी, पूर्वीचा 'गॅट करार', बौद्धिक स्वामित्व अधिकार, चलनाची पूर्ण परिवर्तनीयता, बँकिंग, विमा व लेखा–परीक्षण या सेवा क्षेत्रांत विदेशी कंपन्यांना मुक्तद्वार, अनुज्ञप्ती पद्धतीचे उच्चाटन, आर्थिक गुलामगिरीची भीती आणि स्वदेशीचा पुरस्कार या आनुषंगिक प्रश्नांवर सध्या खूपच उलटसुलट चर्चा व मतप्रदर्शन होत असल्याचे दिसते आणि म्हणूनच या विषयावरील चर्चा अत्यंत समयोचित म्हणावी लागेल.

जगातील भारतासह जवळपास सर्व प्रमुख राष्ट्रांनी जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे आता त्या संघटनेच्या सर्वमान्य चौकटीत राहून सर्वांना आपले व्यापार व्यवहार करणे क्रमप्राप्त आहे. हे व्यवहार करताना आपला व्यूह काय असावा, मूल्यतुल्यता दर देशाला अनुकूल का प्रतिकूल राहणार, आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धान्तातील नवे प्रवाह कोणते आणि भारताच्या भविष्यकालीन विकासविषयक गरजा लक्षात घेतल्यास त्यापैकी कोणते प्रवाह समर्पक ठरू शकतात हे पाहणे उद्बोधक ठरेल.

### 2

### निबंधांचा सारांश

या विषयावर जे चार निबंध सादर करण्यात आले आहेत त्यापैकी पहिले दोन निबंध विषयाचा साकल्याने परामर्श घेतात आणि दुसरे दोन सापेक्षत: मर्यादित असून विशिष्ट पैलूंवर भर देतात.

* सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई.

उमेश मधुकर राजदेरकर यांनी 'बचत पोकळी, विदेशी चलन पोकळी व विकसनशील देश' या विषयावरील निबंधात आरंभी व्यापारवादी, अभिमत पंथी (अॅडॅम स्मिथ, रिकार्डो, मिल, लिस्ट इत्यादी) अर्थ-शास्त्राच्या सिद्धान्तांचा परामर्श घेतला आहे आणि नंतर आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विकसनशील देशांना आर्थिक विकासासाठी खरोखर कितपत लाभ होतो हा विवाद्य मुद्दा असल्याचे सांगून विदेशी चलनाची पोकळी, बचत पोकळी आणि अर्थव्यवस्थेच्या विदेशी भांडवल व तंत्रविद्या उत्पादकरीत्या वापरण्याच्या शक्तीवर असलेली मर्यादा या गोष्टींकडे लक्ष वेधले आहे तसेच विदेशी मदत, आयात केलेले तंत्रविज्ञान इत्यादींचा वापर आपल्याकडे मुख्यत: शहरी क्षेत्राच्या लाभासाठी झालेला आहे असे म्हटले आहे. शिवाय विदेशी मदत ही मोठ्या प्रमाणावर केवळ अल्पकालीन हेतूंसाठी वापरण्यात आली आहे. भारतात बचतीचा दरदेखील अलीकडे काहीसा कमी झाला आहे. बचत पोकळी व विदेशी चलन पोकळी या दोन समस्यांची आकडेवारी देऊन त्यांनी विश्लेषण केले आहे.

दि. व्यं. जहागिरदार आणि मुक्ता जहागिरदार या लेखकद्वयांनी 'आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धान्तातील नवे प्रवाह आणि विकसित व विकसनशील देश : एक विवेचन' या निबंधात आरंभी आधुनिक व्यापार सिद्धान्ताच्या तीन प्रवाहाविषयी ऊहापोह केला आहे. (1) नव-प्रौद्योगिक व्यापार सिद्धान्त (2) उद्योगाभ्यांतर व्यापार सिद्धान्त आणि (3) व्यूहात्मक व्यापार नीती सिद्धान्त. सिद्धान्त कोणताही असो, सरतेशेवटी परिव्यय कार्यदक्षतेमधील अंतर हेच व्यापार लाभाचे अंतिम कारक असते. लेखकांच्या मते, कमी उत्पादन परिव्यय राखणे हे विकसित देशांना सहज शक्य असते, त्या तुलनेत विकसनशील देशांची स्थिती सर्वस्वी वेगळी असते म्हणून परिव्यय कार्यदक्षतेवर आधारलेले त्यांचे स्पर्धाक्षमतेचे स्वरूप खूपच गुंतागुंतीचे होते. अनेकदा त्यांचा विदेशी व्यापार वाढलेला असतो, परंतु तो वास्तविक लाभ देणारा सिद्ध होईल अशी खात्री देता येत नसते. म्हणून स्पर्धाक्षमता केवळ दर्शनी व भ्रामक नाही याची खात्री करून घ्यावयाला हवी. त्यासाठी परिव्यय कार्यदक्षता निर्धारित करणाऱ्या उत्पादक घटकांचे मूलभूत स्वरूप कसे आहे याचा विचार झाला पाहिजे असे ते प्रतिपादन करतात. विकसनशील देशांत दारिद्र्याच्या जोडीला श्रमवैपुल्य असल्याने वेतनपातळी न्यून असते. निर्यातदारांना अनेक सवलती व अनुदाने शासनाद्वारे दिली जातात. काही उद्योग प्रदूषण वाढविणारे असले तरी तात्कालिक लाभासाठी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. नूतनीकरण शक्य नसलेल्या खनिजांचा बरेचदा अमर्याद वापर करू दिला जातो. अशा अनेक कारणांमुळे स्वदेशी उद्योगांची आंतरराष्ट्रीय स्पर्धाक्षमता वाढत असली तरी ती बव्हंशी भ्रामक असू शकते आणि देशाच्या दीर्घकालीन विकासक्षमतेवर विपरित परिणाम करणारी ठरू शकते. म्हणून विकास विरोधी नव्हे तर विकासानुकूल स्पर्धाक्षमता निर्माण करणाऱ्या परिस्थितीचे विश्लेषण करणाऱ्या व्यापार सिद्धान्ताची मांडणी करणे आज अत्यावश्यक झाले आहे असे ते प्रतिपादन करतात.

विजय शिवराम साठे यांनी 'आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धान्तातील नये प्रवाह' या निबंधात आरंभी नवीन तांत्रिक प्रवर्तन प्रारूप, आंतरउद्योग उत्पादन भिन्नता आणि व्यूहात्मक व्यापार धोरण प्रारूप, आंतर उद्योग उत्पादनभिन्नता आणि व्यूहात्मक व्यापार धोरणावर आणि त्याच्या परिणामांवर लक्ष केन्द्रित केले आहे. अल्पाधिकार व एकाधिकारी स्पर्धा यामुळे शुद्ध लाभ उत्पन्न होतो. व्यूहात्मक व्यापार धोरणाच्या यशस्वितेसाठी सरकारचा अधिक्षेप आवश्यक मानला जातो. आर्थिक मदत, प्रवेश बंदी, आयात कर, सवलतीची कर्जे, शुल्क, संरक्षण इत्यादी प्रकार या धोरणाचा भाग म्हणून वापरले जातात. अशा धोरणांमुळे देशी उद्योगांचा सीमान्तिक परिव्यय कमी होऊन त्यांची स्पर्धाशक्ती सुधारते. परंतु हे जरी खरे असले तरी भारतातील अभियांत्रिकी 1992 साली जी अनुभवाधिष्ठित चाचणी घेण्यात आली त्यात संरक्षण मिळालेल्या संस्थांनी या संधीचा कोणताच फायदा घेतला नाही. त्याउलट आयात प्रतिस्थापना करण्याच्या दृष्टीने उत्पादनाची संरचना बदलल्याचे निदर्शनास आले. त्यांचा निष्कर्ष असा की, व्यूहात्मक व्यापार धोरण यशस्वी करण्यासाठी योग्य उद्योग क्षेत्राची संरक्षणासाठी निवड करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

उमेश मधुकर राजदेरकर यांनी आपल्या दुसऱ्या निबंधात दारिद्र्यपोषक आर्थिक अभिवृद्धी या विषयावर लक्ष केन्द्रित केले आहे. विकसनशील देशांच्या विदेश

व्यापार वाढीला मर्यादा बसण्याचे एककारण म्हणजे विकसित देशांनी विज्ञान व तंत्रविज्ञान यांच्या साहाय्याने विकसनशील देशांच्या निर्यात वस्तूंना पर्यायी वस्तू निर्माण केल्या आहेत. त्यामुळे विकसनशील देशांच्या मालाला तिथे पुरेशी मागणीच येत नाही. शिवाय, तेथील मागणी अलवचिक असल्यास मूल्यतुल्यता दर प्रतिकूल होतात. परिणामतः निर्यातवाढ करूनही वास्तविक उत्पन्नात भर पडत नाही. एजवर्थ व जगदीश भगवती या लेखकांनी अशा प्रगतीला दारिद्र्यपोषक अभिवृद्धी ( immiserising growrh ) म्हटले आहे. जे देश विकासासाठी निर्यातीवर आत्यंतिक भर देतात त्यानी हा धोका लक्षात घ्यावयास हवा.

## 3

## चर्चेसाठी मुद्दे

अधिवेशनात खालील मुद्यांवर चर्चा करणे इष्ट ठरेल.

(1) सध्या नागरी व ग्रामीण क्षेत्रात उपभोक्तावाद वेगाने बळावत चाललेला दिसतो. राष्ट्रीय बचतीचा दर अल्प प्रमाणात घटला पण आहे. दीर्घकालीन संदर्भात पाहता उपभोक्तावादाचा परिणाम म्हणून राष्ट्रीय बचतीचा दर आणखी घटून बचत पोकळी पुष्कळ वाढण्याची भीती आहे काय ?

(2) विदेशी चलन पोकळी कमी करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने विदेशातून भांडवल तंत्रविज्ञान यांच्या आयातीला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे आणि प्रसार माध्यमांद्वारे प्रसृत बातम्या वाचून विदेशी भांडवलाचा ओघ मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे वाटते. परंतु हे कितपत खरे आहे ? हा भांडवलाचा ओघ मोटार, दूरदर्शन, शीतपेये इत्यादी सारख्या उपभोक्तावादाशी जुळलेल्या क्षेत्रांपर्यंत मर्यादित आहे की इतर संरचनात्मक उद्योगांकडे देखील झाला आहे ?

(3) समजा, विदेशी भांडवल व तंत्रविज्ञान विशाल प्रमाणावर देशात येऊ लागले तर त्याचा उत्पादकरीत्या पुरेपूर उपयोग करण्याची क्षमता व ताकद ( absorptive capacity ) आपल्या कार्य संस्कृतीत ( work culture ) वेगाने बदल करू शकतील काय ?

(4) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आधुनिक सिद्धान्त मुख्यतः विकसित देशांना लागू पडतात. कारण नवप्रवर्तन, उद्योगाभ्यंतर वस्तुभेदन, विशाल अंतर्गत मागणी आणि व्यूहात्मक व्यापार नीती हे मानवनिर्मित घटक त्याना अनुकूल असतात आणि त्यामुळे त्या देशांत स्पर्धाक्षमता निर्माण होते आणि टिकून राहते. याउलट विकसनशील देशांना परंपरात्मक व्यापार सिद्धान्त लागू पडतात, कारण ते नैसर्गिक घटकांशी संबंधित असतात. हे विधान कितपत समर्थनीय आहे ?

(5) मुक्त अर्थव्यवस्था स्थापन केल्याने भारतीय उद्योगांची विदेश व्यापारातील स्पर्धाक्षमता वा परिव्यय कार्यदक्षता वाढून आर्थिक विकास अधिक चांगल्या प्रकारे घडून येईल असा दावा वर्तमान आर्थिक धोरणाचे प्रणेते करतात, याउलट मुक्त व्यापार धोरण देशी उद्योगांना मारक ठरेल आणि आपली पराधीनता वाढेल अशी भीती काही विचारवंत व्यक्त करतात. आपल्या मते पराधीनता वाढेल की घटेल ?

(6) एका निबंधात असे प्रतिपादन करण्यात आले आहे की, विकसनशील देशांसाठी भ्रांतिजनक नव्हे तर वास्तवरूपी स्पर्धाक्षमता निर्माण करणाऱ्या विकासनीतीची व घटकांचा शोध घेण्याची आणि अशा घटकांचे विश्लेषण करणारे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धान्त मांडले जाण्याची आज खरी गरज आहे. या दृष्टीने नेमके काय करावयाला हवे ? त्यासाठी अनुभवाधिष्ठित संशोधनाची दिशा निश्चितपणे कशी असावी ?

(7) एजवर्थ व भगवती या लेखकांनी दारिद्र्यपोषक अभिवृद्धीची ( immiserising growth ) संकल्पना मांडली आहे. भारतातील वर्तमान आर्थिक अभिवृद्धीला दारिद्र्यपोषक हे विशेषण लावता येईल काय ?

(8) व्यूहात्मक व्यापार धोरणांचा एक भाग म्हणून भारत सरकाने सीमा संरक्षण आणि निर्यात

अर्थसहाय्य इत्यादी रूपात ज्या अधिक्षेपांच्या पद्धती अमलात आणल्या त्यांचा उद्योगांना विशेष असा लाभ मिळालेला दिसत नाही. या मताशी आपण सहमत आहात काय ?

## 4

## चर्चेचा गोषवारा

सूत्रसंचालकांच्या टिपणात नोंदलेल्या मुद्यांवर प्रतिनिधींनी नेमकी चर्चा केलीच नाही. आणि म्हणूनच रवीन्द्र दोशी याना या गोष्टीकडे लक्ष वेधणे भाग पडले. त्यानी प्रतिपादन केले की, विदेशी गुंतवणूक वाढल्यामुळे देशात आधारभूत संरचना क्षेत्रात उत्पादन वाढण्याऐवजी उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढण्याची भीती जास्त आहे. या संदर्भात ब्राझील, मेक्सिको, इत्यादी देशांचा अनुभव उद्बोधक ठरेल. भारताच्या बाबतीत मात्र अजून तरी अशी भीती नाही. कारण 1991 पासून जेवढी विदेशी भांडवलाची गुंतवणूक झाली आहे. त्यातील मोठा भाग आधारभूत संरचना उद्योगात असल्याचे त्यानी साधार दाखवून दिले.

इतर मुद्दे असे. जुने सिद्धान्त व नवीन सिद्धान्त यांच्यामध्ये भेद व साम्य काय आहे, तसेच राज्य-संस्थेच्या भूमिकेत कोणता बदल घडून आला याविषयी ऊहापोह झाला. सिंगर, प्रेबिश, मिर्डाल, इत्यादी अर्थ-शास्त्रज्ञांनी व्यापार सिद्धान्ताला दिलेल्या योगदानाचा निर्देश निबंधांमध्ये व्हावयाला हवा होता. दुसरे, निबंधांमध्ये सिद्धान्तांपेक्षा धोरणात्मक बाजूवरच भर होता, चर्चाही या दुसऱ्या बाजूवरच केन्द्रित झाली. त्यामुळे विषयाचे मूळ अधिष्ठान बाजूला पडले.

खाजगीकरण, जागतिकीकरण ही उद्दिष्टे नाहीत. ती केवळ साधने आहेत. उत्साहाच्या भरात आपण उद्दिष्टे व साधने यांच्यात गल्लत करू नये, अशी स्पष्ट समजही चर्चेच्या ओघात दिली गेली.

प्रेरितसापेक्ष लाभ, नैसर्गिकसापेक्ष लाभ आणि प्राप्तसापेक्ष लाभ यांच्यातील अंतर आपण समजून घेतले पाहिजे. हस्तक्षेप नीतीच्या माध्यमाने प्रेरित-सापेक्ष लाभात बदल होऊ शकतो. म्हणून सरकारी हस्तक्षेपाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

जगातील बहुतांश विकसित आणि समृद्ध देश किती ढोंगीपणाने वागतात हे आपण समजून घेतले पाहिजे. एकीकडे मुक्त व्यापाराचा घोषा सतत चालू ठेवावयाचा तर दुसरीकडे प्रत्यक्षात निरनिराळे संर-क्षणात्मक उपाय योजावयाचे. भारताने यापासून योग्य धडा घेऊन आपल्या फायद्याचे असेल तसेच वागावे, जागतिक मताचा जास्त बाऊ करू नये.

जगाच्या उत्तर-दक्षिण अशा विभागणीकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे. युरोपातील आणि अमेरिकी राष्ट्रांनी एकत्र येऊन व्यापारी गट (trading blocks) तयार केले आहेत. जगात असे अदमासे बारा व्यापारी गट आहेत. उत्तरेकडील देश त्यापासून मुक्त व्यापाराचे लाभ मोठ्या प्रमाणावर मिळवीत आहेत, तर दक्षिणे-कडील देश केवळ चर्चेमध्ये वेळ दवडीत आहेत. जगदीश भगवती यानी प्रादेशिक करारांचे पेव फुटले आहे, असे सार्थ वर्णन केले आहे.

अभिमत आणि नव-अभिमत अर्थशास्त्रांनी मांडलेले व्यापार सिद्धान्तन असो किंवा अलीकडील नव-तंत्रविद्येवर आधारित सिद्धान्तन असो, प्रत्येक सिद्धान्तात केवळ आंशिक सत्याचे प्रतिबिंब पडल्याचे आढळते. शिवाय, सद्यकालात अपूर्ण स्पर्धा, उत्पादन क्षमता, अल्पाधिकार, वस्तुविभेदन, इत्यादी गृहितांवर आधारित चर्चा सुरू आहे. त्यात जुन्या सिद्धान्तांची सर्व गृहिते झुगारून देण्यात आली आहेत. अशा परि-स्थितीत विविध घटकांचे अवधान ठेऊन परिपूर्ण सिद्धान्ताची मांडणी करणे कठीण परंतु आवश्यक काम आहे, आणि यदाकदाचित एखादा अर्थशास्त्रज्ञ असा सर्वसमावेशक सिद्धान्त समर्थपणे मांडू शकला तर ती कामगिरी अभूतपूर्व आणि अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळण्यायोग्य मानली जाईल यात शंका नाही. आजची व्यापारविषयक सिद्धान्ताची स्थिती मात्र धूसर आणि अस्थिर अशी आहे.

□ □

चर्चासत्र दुसरे

# भारतातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणा

मुक्ता दि. जहागिरदार *

## 1

### उपोद्घात

आर्थिक अभिवृद्धीची चर्चा उत्पादन, उत्पन्न इत्यादी अभिवृद्धीच्या वस्तुगत पैलूंच्या बाजूने जास्त होताना दिसते. मात्र आर्थिक अभिवृद्धीत वस्तुगत व वित्तीय असे दोन्ही पैलू समाविष्ट असून दोन्ही पैलू महत्त्वाचे आहेत. वित्तीय क्षेत्र वा वित्तीय व्यवस्थेत वित्तीय संस्था, वित्तीय उपकरणे आणि वित्तीय बाजार यांचा अंतर्भाव होतो. वित्तीय व्यवस्था प्रभावी शोधन व प्रत्यय व्यवस्थेद्वारे बचतकर्त्यांकडून साधनसंपत्ती गुंतवणूक क्षेत्राकडे प्रवाहित करते.

संचयकांकडून गुंतवणूकदारांकडे साधनसंपत्तीचे हस्तांतरण रोखे, हिस्से यांच्या खरेदीद्वारे होऊ शकते; भांडवली बाजाराद्वारे हे कार्य होते. गुंतवणुकीसाठी संपूर्ण वित्तपुरवठा याप्रकारे प्रत्यक्षपणे होऊ शकत नाही. वित्तपुरवठ्याची यंत्रणा म्हणून वित्तीय संस्थांचे कार्य या संदर्भात महत्त्वाचे ठरते. लोकांच्या पसंतीनुसार त्यांना तरलता, प्रत्याय ( returns ) व धोका यांची सांगड घालता येईल अशा प्रकारे गुंतवणुकीच्या संधी वित्तसंस्था उपलब्ध करून देतात. त्यामुळे बचतीला आणि तिच्या वित्तीयीकरणाला प्रोत्साहन मिळून साधनसंपत्तीची उपलब्धता वाढते, तसेच गुंतवणूक प्रकल्पांचे पृथःकरण व क्रमांकनाद्वारे भांडवली साधनसंपत्तीच्या योग्य आवटनाद्वारे भांडवलाची उत्पादकता वाढते. या कार्याद्वारे वित्तसंस्था विकासात व अर्थव्यवस्थेच्या गरजा पूर्ण करण्यात महत्त्वाचे योगदान देतात.

परिस्थितीतील बदल व अर्थव्यवस्थेच्या बदलत्या गरजा यांच्याशी वित्तीय संस्थांचे अनुकूलन ( adaptation ) होऊ शकले तरच वित्तीय क्षेत्र त्यांच्याकडून अपेक्षित दायित्व पार पाडू शकेल. परिस्थिती परिवर्तनशील असते, धोरणात्मक बदलही घडून येतात,

* शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती

सर्वस्वी निर्दोष व्यवस्था निर्माण करणे कठीण असते. तसेच प्रारंभीच्या योग्य व निर्दोष व्यवस्थेतही कालांतराने दोष निर्माण होतात. या सर्व कारणांमुळे सुधारणांची गरज इतर क्षेत्रांप्रमाणे वित्तीय क्षेत्रालाही भासते. भारतात अर्थव्यवस्थेची धोरणे, गरजा, परिस्थिती याना अनुसरून वेळोवेळी सुधारणा केल्या.

स्वातंत्र्यानंतर भारताने न्यायासह विकासासाठी आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला. वित्तीय व्यवस्थेकडून विकासाच्या गरजा भागविल्या जाव्यात यासाठी खाजगी अधिकोषांच्या कार्यावर नियंत्रणे, प्रमुख अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण, प्राधान्यप्राप्त क्षेत्रांना सवलतीच्या दराने कर्जवाटप आणि खास विकास अधिकोषांची स्थापना, अधिकोषेतर वित्तीय संस्था व भांडवली बाजाराचा विकास केला गेला. या सर्व सुधारणांमुळे वित्तीय क्षेत्राचे घनीकरण ( deepening ) व विस्तारण चांगल्या प्रकारे घडून आले. मात्र वित्तीय विकासाच्या गुणात्मक बाजूकडे दुर्लक्ष झाले.

प्राधान्यप्राप्त क्षेत्रांना कर्जपुरवठा आणि अनुदानित कर्जे यामध्ये चुकीची एकरूपता मानली गेली. निर्देशित गुंतवणुकीवरील निम्न व्याज दरामुळे इतर क्षेत्रांकडून उच्च व्याज दर आकारणे अनिवार्य झाले. शासनाचा हस्तक्षेप धोरणात्मक मार्गदर्शनापुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कर्ज निर्णयापर्यंत पोहोचला. अधिकोषांची उत्पादकता, कार्यदक्षता व लाभप्रदता घटली. वित्तीय व्यवस्थेची लवचिकता व कार्यात्मक स्वायत्तता संपुष्टात आली. नियमनात्मक बंधनांमुळे अधिकोषांना जेथे कार्य करता येत नव्हते अशा क्षेत्रांत अधिकोषेतर वित्तीय संस्थांची चांगली वाढ झाली. मात्र नियंत्रणांच्या अभावाचे दुष्परिणाम तेथे जाणवले. परिकल्पनासाठी तसेच प्राधान्य नसलेल्या क्षेत्रांना मोठा वित्तपुरवठा, देशाच्या पैसाविषयक धोरणाकडे दुर्लक्ष या प्रकारचे दोष निर्माण झाले. भांडवल बाजारही दोषमुक्त राहू शकला नाही. वित्तीय माहितीबाबत अपुरेपणा व खुलेपणाची कमतरता, रोखे बाजारातील गैरव्यवहार नियंत्रित करण्याबाबत निष्क्रियता, प्राथमिक बाजारात अनधिकृत व्यापार रोखे व हिस्से यांच्या किमतीवर आर्थिकेतर कारणांचे वर्चस्व, परिकल्पनाची अतिरेकी प्रवृत्ती निर्माण झाली. वरील सर्व दोषांमुळे वित्तीय व्यवस्थेला भेदभावी पद्धतीऐवजी नियमाधारित, सुसंगत व पारदर्शी पद्धतीने कार्य करावे लागेल, त्यांची कार्यदक्षता व लाभप्रदता वाढेल या प्रकारची व्यवस्था निर्माण करणे आवश्यक ठरेल.

दुसऱ्या बाजूने, जगात आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम सुरू झाला. 1991 पासून आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँकेने घातलेल्या कर्जअटींचे पालन करण्याच्या निमित्ताने तो भारतातही सुरू झाला. डंकेल प्रस्तावांतर्गत नवीन जागतिक अर्थव्यवस्थेच्या निर्मितीच्या प्रयत्नात त्याचा वेग वाढला. आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्विनियमन, स्पर्धा व बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेच्या निर्मितीचे लक्ष्य ठरले. इतर क्षेत्रांतील सुधारणांशी सुसंगत अशा पद्धतीने वित्तीय क्षेत्रात सुधारणा करून वित्तीय व्यवस्था सबल, कार्यदक्ष, स्पर्धाक्षम व लाभप्रद बनविणे आवश्यक ठरले. या संपूर्ण पार्श्वभूमीवर वित्तीय क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या गेल्या.

अभ्यासगट, समित्यांबरोबर प्रामुख्याने नरसिंहम समितीच्या शिफारसींच्या आधारे आर्थिक सुधारणा कार्यान्वित केल्या गेल्या. अधिकोषेतर वित्तीय संस्थांच्या विकासाचे लक्ष्य ठेवून 50 लाख रुपये आणि त्यापेक्षा जास्त शुद्ध निधी असलेल्या अधिकोषेतर वित्तीय संस्थांना रिझर्व्ह बँकेकडे नोंदणी आवश्यक ठरविण्यात आली. तसेच क्रमांकन अधिकरणाद्वारे क्रमांकन प्राप्त करणे अनिवार्य ठरविले. याशिवाय अधिकोषांना लागू केलेल्या सुधारणा त्यानाही लागू करण्यात आल्या. यात आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त लेखांकन पद्धती आणि प्रमाणकाचा स्वीकार, विवेकी पर्यवेक्षण, तरतूद व उत्पन्न प्रमाणके, थकबाकीची तरतूद इत्यादी संबंधी नियम लागू झाले. याव्यतिरिक्त अधिकोषासाठी सांविधिक तरलता गुणोत्तर आणि रोकड संचिती गुणोत्तरात घट, व्याज दर संरचनेचे सुसूत्रीकरण, भांडवल उभारणीसाठी काही बँकांना भांडवली बाजारातून साधनसंपत्ती प्राप्त करण्याची परवानगी, विदेशी बँका व गुंतवणूक संस्थांना मोकळीक, खाजगी क्षेत्राला बँक व्यवसायात प्रवेश, इत्यादी सुधारणांचा उल्लेख करता येईल.

भांडवल बाजाराच्या नियंत्रणाचे अधिकार भारतीय रोखे आणि विनिमय मंडळाकडे ( SEBI )

सोपविण्यात आले आहेत. मध्यस्थांचे पंजीयन, दलालांच्या व्यवहारावर नियंत्रणे, पर्यवेक्षणाची व्यवस्था, भांडवल उभारणी करणाऱ्या उत्पादन संस्थांना त्यांच्या प्रकल्पांची संपूर्ण माहिती जाहीर करण्याचे बंधन, इत्यादी सुधारणांद्वारे प्रभावी नियंत्रणाची चौकट निर्माण करून भांडवल बाजारातील गैरप्रकारांना आळा घालणे, कार्यदक्षता व पारदर्शकता वाढविणे आणि भारतातील भांडवल बाजाराला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

वरील सर्व सुधारणांद्वारे भारतातील वित्तीय क्षेत्राची लाभप्रदता, कार्यदक्षता व स्पर्धाक्षमता वाढून जागतिक स्पर्धेत टिकून राहण्याच्या दृष्टीने वाटचाल होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. तथापि, सुधारणांचे अल्पकालीन परिणाम फार आश्वासक नाहीत. सर्व शिफारसी वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारलेल्या नाहीत. उदाहरणार्थ, कृषी व लघुउद्योग क्षेत्र सक्षम झाले असून स्पर्धात्मक अटींवर कर्ज घेण्याच्या स्थितीत असल्याचे नरसिंह्म समितीचे प्रतिपादन वस्तुस्थितीशी पूर्ण सुसंगत वाटत नाही. त्यावर आधारित सुधारणांनी नवीन प्रश्न निर्माण होऊ शकतात. सांविधिक तरलता गुणोत्तर व रोकड संचिती गुणोत्तर घटवून अधिकोषांचा गुंतवणूक निधी वाढवावयाचा आहे. तो उत्पादककार्यात वापरला जावा अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्षात हा वाढीव निधी अधिकोषांनी सरकारी रोख्यांत गुंतविलेला दिसतो. या तरतुदींचा परिणाम म्हणून वाढलेली तरलता परिकल्पना व्यवहारासाठी वापरली जाऊ शकते. त्यासाठी नियंत्रणाची प्रभावी तरतूद आहे का ते स्पष्ट नाही. रोखे घोटाळ्यांच्या पार्श्वभूमीवर तिची गरज निश्चितच आहे.

बाजाराधिष्ठित जागतिक अर्थव्यवस्थेच्या निर्मितीचे लक्ष्य विकसनशील देशांना दीर्घकालात लाभप्रद ठरेलच असे ठामपणे म्हणता येत नाही. त्यामुळे त्या अनुषंगाने वित्तीय क्षेत्रातील खुलेपणा लाभप्रद ठरेल याची शाश्वती देता येत नाही. विदेशी अधिकोष व गुंतवणूक संस्था त्यांच्या पितृदेशातील पैसा व वित्तीय गरजाभिमुख पद्धतीने कार्यरत राहू शकतात. त्यांच्या प्रभावी नियंत्रणाची व्यवस्था कठीण आहे. आंतरराष्ट्रीय भांडवलाच्या मुक्त प्रवाहामुळे लॅटिन अमेरिकेतील देशांत भांडवल बाजारातील धक्क्यांनी अर्थव्यवस्थेला हादरे बसले आहेत. वित्तीय खुलेपणाने अर्थव्यवस्थेची बाह्य धक्क्यांशी समायोजन करण्याची क्षमता कमी होते.

एकंदरित, वित्तीय व्यवस्थेशी संबंधित घटकांचा सुधारणांना मिळणारा प्रतिसाद, नियंत्रणांतील घटकांबाबत तरतुदींचा आणि त्यांच्या कार्यवाहीचा काटेकोरपणा तसेच नियंत्रणाबाहेरील घटकांनी निर्माण केलेल्या समस्यांतून मार्ग काढण्याचे वित्तीय व्यवस्थेचे कौशल्य या सर्वांवर वित्तीय सुधारणांचे यश अवलंबून आहे.

## 2

## निबंधांचा परामर्श

या चर्चासत्रासाठी फक्त पाच निबंध आलेले आहेत. सर्व निबंध भारतातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणांचा आणि त्यांच्या परिणामांचा आढावा घेणारे आहेत. नि. गं. बापट व प्र. भा. अष्टुरकर यांचा निबंध अधिकोषांचे खाजगीकरण या एकाच शिफारसीशी संबंधित आहे. बाकीच्या निबंधांमध्ये विशिष्ट सुधारणांवर विशेष भर असला तरी सामान्यपणे महत्त्वाच्या अशा जास्तीत जास्त शिफारसींचा आढावा घेण्याचा प्रयत्न दिसतो. बा. द. कुलकर्णी यांनी आपल्या निबंधात नरसिंह्म समितीबरोबर खुस्रो समितीने सुचविलेल्या सुधारणांचा विचार केला आहे. इतर निबंध नरसिंह्म समितीच्या शिफारसींवर आधारलेले आहेत. त्यात भांडवल बाजारासंबंधी उल्लेख असले तरी प्रामुख्याने अधिकोषण व्यवस्थेशी संबंधित सुधारणांचे विवेचन केलेले दिसते.

बा. द. कुलकर्णी यांनी 'भारतातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणा' या शीर्षकाच्या आपल्या निबंधात वित्तीय सुधारणांची गरज निर्माण करणाऱ्या भारतातील परिस्थितीचा उल्लेख करून प्रथम नरसिंह्म आणि नंतर खुस्रो समितीच्या शिफारसींचे विवेचन केले. शिफारसींच्या अनुषंगाने अधिकोषांना कोणते बदल व सुधारणा करावयाच्या आहेत ते सांगितले आहे.

नि. गं. बापट व प्र. भा. अष्टुकर यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या 'बँकांचे खाजगीकरण—नवीन प्रवृत्ती'

या निबंधात बँक व्यवसायात खाजगी क्षेत्राला प्रवेश देताना त्यांनी पाळावयाची तत्त्वे व नियम यांचे स्पष्टीकरण केलेले असून खाजगी अधिकोषांच्या फायद्यातोटयांचे विवेचन केले आहे.

'नरसिह्मम समिती व बँकिंग क्षेत्रातील संरचनात्मक बदल' हा अंजली कुलकर्णी यांचा निबंध तीन भागात विभागलेला आहे. पहिल्या भागात नरसिह्मम समितीच्या शिफारसींचा आढावा घेतलेला असून दुसऱ्या विभागात शिफारसींच्या अमलबजावणीचा आणि तिसऱ्या भागात या सुधारणांच्या परिणामांचा परामर्श घेतला आहे. शिफारसींचे वर्गीकरण संरचनात्मक, कार्यात्मक व धोरणात्मक शिफारसी याप्रकारे केले. अधिकोषांची संरचना ही सहकारी, खाजगी व विदेशी अधिकोष तसेच राष्ट्रीय, प्रादेशिक व ग्रामीण अधिकोष याप्रकारे ठेवण्याची शिफारस असल्याचे दाखविले आहे. परिणामांच्या विवेचनात प्रामुख्याने धोरणात्मक बदलामुळे सध्याच्या प्राधान्यप्राप्त क्षेत्रांवर तसेच नियोजित विकासावर होणाऱ्या दुष्परिणामांची चर्चा केली आहे.

स. न. कुलकर्णी आणि र. रा. बेराड यांनी संयुक्तपणे लिहिलेला 'भारताच्या वित्तीय क्षेत्रातील सुधारणा: अपेक्षा आणि सद्यःस्थिती' हा निबंध पाच भागात विभागलेला आहे. पहिल्या भागात आर्थिक सुधारणांची पार्श्वभूमी स्पष्ट करताना अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या समस्यांचा व आर्थिक वृद्धीस निर्माण झालेल्या अडसरांचा संक्षिप्त आढावा घेतला. एकाच क्षेत्रातील सुधारणा निरुपयोगी ठरतात म्हणून कार्यान्वित करावयाच्या धोरणसमूहाचा उल्लेख दुसऱ्या विभागात आहे. तिसऱ्या भागात नरसिह्मम समितीने सुचविलेल्या सुधारणांचे विश्लेषण करताना सांविधिक तरलता गुणोत्तर व रोकड संचिती गुणोत्तरातील घट, अधिकोषांच्या ताळेबंदाच्या रास्त मूल्यांकनाचे निकष, व्याज दर संरचनेचे वाजवीकरण इत्यादी काही सुधारणांचे सविस्तर विवेचन केले आहे. निबंधाच्या चौथ्या भागात विविध सुधारणांची अपेक्षित फलिते, उदाहरणार्थ, सांविधिक तरलता गुणोत्तर व रोकड संचिती निधी गुणोत्तरातील घटीने अधिकोषांच्या गुंतवणूक निधीत वाढ, इत्यादींचा आढावा घेतला आहे. पाचव्या विभागात वित्तीय सुधारणांचे अल्पकालीन परिणाम फारसे उत्साहवर्धक नसल्याचा निष्कर्ष काढून सुधारणांच्या यशासाठी इतर क्षेत्रांच्या सहकार्याची गरज स्पष्ट केली आहे.

वि. श्री. देशपांडे यांनी 'भारताच्या वित्तीय क्षेत्रातील सुधारणा–समस्या आणि धोके' हा निबंध सैद्धान्तिक विवेचनाची पार्श्वभूमी वापरून लिहिलेला आहे. पहिल्या भागात आदर्श कर्ज बाजाराची संकल्पना पारेटो इष्टतमता व कार्यदक्षतेच्या संदर्भात स्पष्ट केली. कर्जबाजारातील शासनाच्या हस्तक्षेपासंबंधी अर्थशास्त्रज्ञांच्या अनुकूल व प्रतिकूल मतांचा त्यांनी परामर्श घेतला. दुसऱ्या भागात वित्तीय सुधारणांचा उल्लेख असून व्याज दराचे उदारीकरण, बँकांचे खाजगीकरण, पैशाचे व्यवस्थापन इत्यादी सुधारणांचे विशेष विवेचन केले आहे. भारतातील वित्तीय व्यवस्थेची समष्टीय बाजू या तिसऱ्या भागात वित्तीय विकास व आर्थिक अभिवृद्धीतील संबंध स्पष्ट केला. समष्टीय आर्थिक स्थिरतेशिवाय उदारीकरणात यशाची खात्री नाही असे सांगून वित्तीय विकासदर्शक गुणोत्तर आणि कार्यदक्षतेच्या निकषांचे विवेचन करून शेवटच्या भागात समारोप केला. वित्तीय सुधारणा कार्यान्वित करण्याची गती व पद्धती महत्त्वाची असून दिवाळखोर वित्तीय संस्था उदारीकरणाने सक्षम बनू शकत नाहीत असे त्यांचे प्रतिपादन आहे.

## 3

## चर्चेसाठी मुद्दे

आर्थिक सुधारणांचा एक भाग म्हणून भारतात सरकारी क्षेत्रातील अधिकोष, खाजगी व विदेशी अधिकोष, भांडवल बाजार, अधिकोषेतर वित्तीय संस्था, विमा मंडळे, इत्यादी वित्तीय संस्था तसेच वित्तीय व्यवस्थेत अनेक सुधारणा सुचविण्यात आल्या आणि कार्यान्वित केल्या गेल्या. नरसिह्मम समितीचा वाटा त्यात अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याबरोबरच खुस्रो, मल्होत्रा, शहा, इत्यादी समित्यांच्या शिफारसीही या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. वित्तीय क्षेत्रात निर्माण झालेले दोष व दुर्बलता दूर करून या क्षेत्राला स्पर्धाक्षम बनविण्याच्या उद्देशाने अनेक सुधारणा केल्या गेल्या. वरील बाबी तसेच निबंधात उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेता चर्चासत्रात खालील मुद्द्यांच्या अनुषंगाने चर्चा व्हावी.

(1) वित्तीय क्षेत्रातील सुधारणा या व्यापक आर्थिक सुधारणांचा भाग असल्याने इतर क्षेत्रांतील सुधारणा व वित्तीय क्षेत्रातील सुधारणा यातील सह–संबंध, परस्परपूरकता यांचा विचार करता येईल.

(2) वित्तीय क्षेत्रातील अधिकोष, अधिकोषेतर, वित्तीय संस्था, भांडवली बाजार, इत्यादींपैकी प्रत्येक घटकाच्या संदर्भात सुधारणांचे स्वतंत्रपणे विवेचन करता येईल.

(3) सुचविलेल्या सुधारणांचे संरचनात्मक, धोरणात्मक, चालनात्मक सुधारणा इत्यादी प्रकारे वर्गीकरण करून प्रत्येक वर्गातील सुधारणांचे सविस्तर विवेचन करता येईल.

(4) नरसिह्मम समितीने सुचविलेल्या सुधार–णांशी संबंधित काही कारणमीमांसेबाबत (उदाहरणार्थ, अधिकोषांच्या कमी लाभप्रदतेला निर्देशित पतपुरवठा, सवलतीचे व्याज दर, अधिकोषांच्या अकार्यदक्षतेचे सापेक्ष प्रमाण, कृषी व उद्योग क्षेत्र पुरेसे प्रगत झाल्याने सवलतीच्या व्याज दराची अनावश्यकता, इत्यादी) अधिक वस्तुस्थितीदर्शक शोध घेता येईल.

(5) अधिकोष व इतर वित्त संस्थांबाबत प्रत्यक्ष माहिती व आकडेवारीतून प्राप्त निष्कर्षांची चर्चा करता येईल.

(6) नरसिह्मम समितीव्यतिरिक्त इतर समि–त्यांच्या शिफारसींची चर्चा होणे आवश्यक आहे.

(7) ज्या शिफारसी स्वीकारल्या नाही वा ज्यांची कार्यवाही केली गेली नाही. त्यांची कारणमीमांसा करता येईल.

(8) सुधारणांच्या अपेक्षित निष्पत्तीसाठी कोणत्या तरतुदी केल्या वा कोणती पूर्वकाळजी घेतली त्यासंबंधीच्या विशेष तरतुदींचे विश्लेषण करता येईल.

(9) सुधारणा कार्यान्वित झाल्यानंतरचा काल-खंड फार अल्प आहे हे मान्य करूनही त्यांच्या परिणामांचा परामर्श घेणे आवश्यक आहे. विशेषतः कोणत्या प्रक्रियेतून दीर्घकालीन परिणाम प्राप्त होणार आहेत तसेच सध्याची कार्यवाही आणि त्यांचे अल्प–कालीन परिणाम दीर्घकालीन अपेक्षित परिणामांशी सुसंगत आहेत की नाहीत त्यावर प्रकाश टाकता येईल.

(10) आर्थिक वृद्धी व सामाजिक न्याय यांच्या समन्वयासाठी इतर क्षेत्राबरोबर वित्तीय क्षेत्रात विशिष्ट व्यवस्था स्वीकारण्यात व निर्माण करण्यात आलेली होती. नवीन सुधारणांच्या स्थितीत ती व्यवस्था पूर्णपणे बदलली जात आहे. न्यायासह विकासाची निकड संपली. त्याची उपेक्षा झाली किंवा नवीन व्यवस्थेत त्यातील समन्वय कोणत्या प्रकारे साध्य करण्यात येईल यासंबंधीचे स्पष्टीकरणही अपेक्षित आहे.

## 4

## चर्चेचा गोषवारा

निबंध व चर्चेतून अपेक्षित बाबींचा उल्लेख कर–ताना वित्तीय सुधारणांची चर्चा नरसिह्मम समितीच्या शिफारसींभोवती केन्द्रित झालेली असून मल्होत्रादी इतर समित्यांच्याही शिफारसींचा आढावा घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त झाली. वित्तीय सुधारणांच्या संदर्भात सैद्धान्तिक दृष्टिकोन स्पष्ट व्हावा, तसेच वित्तीय सुधा-रणांचे सहकारी क्षेत्रावरील, भांडवल बाजारावरील, इत्यादी परिणाम आणि एकूण अर्थव्यवस्थेवरील व्यापक परिणाम यांची चर्चा उपयुक्त ठरेल अशी भावना आढळून आली.

चर्चा प्रामुख्याने वित्तीय सुधारणांच्या परिणामां-वर झाली. वित्तीय सुधारणांबाबत अनुकूल तसेच प्रति–कूल अभिप्रायही नोंदविण्यात आले. भारतात प्रत्यक्षात घडून आलेले परिणाम आणि इतर देशांचा अनुभव जमेस धरता वित्तीय सुधारणांच्या अपेक्षित परिणामांपेक्षा विपरित परिणामांची जास्त शक्यता वर्तविली गेली.

प्राधान्य क्षेत्र पूर्णतः समाप्त करण्यात आलेले नसून त्याची नव्याने व्याख्या व पुनरीक्षण होत असून तसे होणे योग्य आहे याप्रमाणेच प्राधान्य क्षेत्राचा संकोच आणि एकूण वित्तपुरवठ्यात प्राधान्य क्षेत्राचा घटता हिस्सा अयोग्य आहे. प्राधान्य क्षेत्रात प्रचंड तूट

निर्माण होत असून त्याच्या त्या क्षेत्रावर तसेच ग्रामीण विकासावर होणाऱ्या विपरित परिणामांबाबत चिंता व्यक्त झाली. अधिकोषांना लागू केलेले लाभप्रदतेचे निकष तसेच शाखा उघडण्याचे व बंद करण्याचे स्वातंत्र्य यामुळे ग्रामीण क्षेत्रातील अधिकोषण व्यवस्था कोलमडून पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विमा उद्योगाचे खाजगीकरण, विशेषत: विदेशी संस्थांना परवानगी, अयोग्य ठरेल असे मत समोर आले. तसेच स्पर्धाजन्य लाभ प्राप्त होण्यासाठी खाजगीकरणाला विरोध करणे अनुचित ठरेल असेही सांगितले गेले. खाजगीकरणामुळे वित्त संस्थांची कार्यदक्षता कदाचित वाढेलही, परंतु वित्तीय सुधारणांनंतर गैरव्यवहारांचे प्रमाण वाढले असून कोट्यवधी रुपयांचे गैरव्यवहार झाले याकडे लक्ष वेधण्यात आले.

निर्विनियमन म्हणजे सुधारणा याप्रकारचे समीकरण आजकाल रूढ होत असून ते चुकीचे असल्याची जाणीव करून देण्यात आली. विदेशी संस्थांकडून समान सुविधा व सवलतींची मागणी अर्थात समस्तर कार्यक्षेत्राच्या (level playing field) मागणीचा परामर्श घेताना सरकारी व खाजगी क्षेत्र तसेच देशी व विदेशी वित्त संस्थांबाबत सुविधांबरोबर दायित्वांचीही समानता निर्माण करण्याचे आग्रही प्रतिपादन केले गेले.

विदेशी निवेशक व संस्थांवरील नियंत्रणे काढून घेतल्याने गुंतवणुकीत निर्माण झालेली अतिशीघ्रता देशात आर्थिक अस्थिरतेला कारणीभूत ठरेल. विदेशी वित्त संस्थांना दिलेल्या मोकळिकीमुळे प्रत्यक्षातील विदेशी गुंतवणूक मोठ्या उद्योगात वाढली असून गेल्या काही वर्षांत त्यांचा रोजगारवाढीचा दर ऋणात्मक आहे. याचा अर्थ वित्तीय सुधारणांचा रोजगारावर होणारा परिणाम चिंताजनक असल्याचे लक्षात आणून देण्यात आले.

□ □


# मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| नी. वि. सोवनी | : | **अर्थसिद्धान्त, आणखी चिकित्सक निबंध** * (1977) : पृष्ठे 226, किंमत 20 रुपये. |
| मो. वि. भाटवडेकर | : | **शिक्षणाचे अर्थशास्त्र** (1978), पृष्ठे 157, किंमत 20 रुपये. (वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', 381 क, शनिवार पेठ, पुणे 411 030). |
| भ. म. बापट | : | **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धान्त आणि धोरण** (1982),* पृष्ठे 333. किंमत रु. 50 (वितरक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे 411 030) (आवृत्ती संपली). |
| नी. वि. सोवनी | : | **स्राफा विचारसरणी : चार व्याख्याने**,* पृष्ठे 64, किंमत रु. 10, प्रकाशक : नी. वि. सोवनी, पुणे. |
| नी. वि. सोवनी | : | **अर्थमीमांसा–वैज्ञानिक की कलात्मक ?** (वितरण : डॉ. व्यं. सु. पाटणकर, पुणे) किंमत रु. 2·50 |

* ही पुस्तके मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या मंगळवेढा येथील कार्यालयाकडून मिळू शकतील.

## चर्चासत्र तिसरे

# महाराष्ट्रातील अर्थशास्त्राचे विद्यापीठीय अभ्यासक्रम : सुधारणा आणि पुनर्रचना

ध्यं. सु. पाटणकर *

1

### प्रास्ताविक

अर्थशास्त्राचे विद्यापीठीय अभ्यासक्रम कसे असावेत यासंबंधी आपल्या देशात (आणि राज्यातही) आजवर वेगवेगळ्या निमित्ताने जरी पुष्कळ विचारमंथन झालेले असले तरी गेल्या चार दशकांच्या कालात अभ्यासक्रम सुधारण्याच्या दिशेने लक्षणीय बदल झाल्याचे आढळत नाही. महाराष्ट्रापुरते पाहावयाचे झाले तर एवढेच म्हणता येईल की, या कालावधीमध्ये विद्यापीठांनी कला आणि वाणिज्य विद्याशाखांतर्गत पदवी आणि पदव्युत्तर पातळ्यांसाठी अर्थशास्त्राच्या प्रश्नपत्रिकांची संख्या आणि प्रत्येकासाठी नियुक्त केलेल्या अभ्यासक्रमात काही फेरफार घडवून आणले. मात्र व्यापक आणि सुसूत्र पुनर्रचनेचा भाग असे त्यांचे स्वरूप नव्हते. अभ्यासक्रमांची नेमकी उद्दिष्टे काय असावीत याचे पूर्वनिर्धारण न झाल्याने कदाचित असा परिणाम झाला असावा.

अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याला काय शिकविले जावे यासंबंधीच्या चर्चेमध्ये एक मुद्दा वारंवार असा मांडला जातो की, सध्याचे अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम रूक्ष, निरुपयोगी आणि वास्तवाशी निगडित नसलेले असे आहेत. यामध्ये सत्यांश असण्याचा संभव आहे. सध्याच्या व्यवस्थेनुसार अर्थशास्त्राची मूलतत्त्वे आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्या असे दोन विभाग प्रामुख्याने अभ्यासले जातात. पदव्युत्तर पातळीवरील अभ्यासक्रम मात्र बहुतांश अर्थशास्त्रीय तत्त्वचर्चेवर आधारलेला आहे. यामध्ये विद्यापीठनिहाय तपशिलाबाबत काही फरक आहे हे खरे. अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम व्यवसायाभिमुख असावेत किंवा निखळ विद्यानिष्ठ (academic) असे त्यांचे स्वरूप राहावे हा एक वादाचा प्रश्न आहे. यासंबंधी केले जाणारे युक्तिवाद तपासून पाहणे जरुरीचे आहे. काहींच्या मते अर्थशास्त्रात काय शिकविले जाते वा जावे हे तितकेसे महत्त्वाचे नाही. आम्ही

* अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आणि भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, पुणे.

ते कसे शिकवितो आणि शिकवावयास हवे या दिशेने विचार ( आणि कृती ) व्हावयास हवी.

अर्थशास्त्राच्या अध्ययन–अध्यापनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी अनेक उपाय सुचविले जात आहेत. गणिती आणि संख्याशास्त्रीय विश्लेषणाची साधने व प्रारंभिक लेखाशास्त्र यांचा परिचय, अर्थशास्त्रीय क्रमिक पुस्तकांची प्रादेशिक भाषेतून निर्मिती, अध्यापकांसाठी कार्यशाळा आणि उद्‌बोधन वर्ग, परीक्षा पद्धतीत सुधारणा इत्यादींचा त्यामध्ये समावेश आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एका तज्ज्ञ समितीने अलीकडे सुचविलेल्या अर्थशास्त्र अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शन आराखड्याने या प्रश्नाला पुन्हा एकवार चालना मिळालेली आहे. त्या त्या प्रादेशिक विभागातील गरजा आणि परिस्थिती याना अनुलक्षून या आराखड्यात काही फेरफारही सुचविले जाऊ शकतील.

## 2

## निबंधांचा सारांश

प्रस्तुत विषयातील चर्चासत्रासाठी एकूण सहा निबंध सादर केले जाणार आहेत. त्यांची तीन गटांमध्ये विभागणी करता येईल. प्रत्येक गटात दोन निबंध असतील. पहिल्या गटामध्ये बागलकोट आणि मृणालिनी फडणवीस यांच्या निबंधांचा अंतर्भाव करता येईल. अर्थशास्त्राचे सध्याचे विद्यापीठीय अभ्यासक्रम कसे आहेत, त्यामध्ये कोणत्या उणिवा ठळकपणे जाणवतात आणि त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी कोणती पाउले उचलावी लागतील यासंबंधी तत्त्व चर्चा करणारे हे दोनही निबंध आहेत. दुसऱ्या गटात जहागिरदार आणि खेर यांचे निबंध येतात. एकामध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठांमधील अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमाच्या संरचनेचा काही तपशील आणि त्यावरील भाष्य यांचा समावेश असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तज्ज्ञ समितीने सुचविलेल्या अर्थशास्त्र अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक आराखड्याची वैशिष्ट्ये त्यात नमूद करण्यात आली आहेत. खेर यांच्या निबंधात सध्याच्या आर्थिक अभ्यासक्रमातील उणिवांचा निर्देश करण्यात आला असून त्यात सुधारणा सुचविणारी एक रूपरेषा (संदर्भ ग्रंथसूचीसह) त्यानी मांडलेली आहे. पाटील आणि पेडगांवकर यानी आपापल्या निबंधांमध्ये अनुक्रमे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र अभ्यासक्रम सुधारणाविषयक अनुभवांचा आढावा घेतला आहे.

प्रत्येक निबंधात मांडण्यात आलेल्या ठळक मुद्यांकडे आता वळू. बागलकोट यानी अर्थशास्त्र अभ्यासक्रमाच्या सुधारणेचे प्रमुख अंग म्हणून आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा अवलंब करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. विविध सामाजिक शास्त्रांच्या गेल्या एक कोन शतकातील विकासाच्या वाटचालीकडे दृष्टिक्षेप टाकला तर असे लक्षात येते की, एका बाजूला त्या त्या ज्ञानशाखांच्या कक्षा रुंदावत राहिल्या, विश्लेषणाची नवी–नवी साधने उपलब्ध झाली आणि प्रत्येकाचे स्वतंत्र ' शास्त्र ' बनले तर दुसऱ्या बाजूला त्यांच्यामध्ये साचेबंदपणा येऊ लागला आणि समाजातील घडामोडींचा अन्वयार्थ लावण्याच्या दृष्टीने ती अपुरी वाटू लागली. अर्थशास्त्राच्याही बाबत असेच काहीसे घडले आहे. अर्थशास्त्रीय प्रश्नांच्या अभ्यासासाठी आंतरविद्याशाखीय पद्धती का उपयुक्त ठरू शकेल याबाबत लेखकाने दोन विचार मांडलेले आहेत. पहिला म्हणजे अर्थशास्त्रीय संकल्पना आणि सिद्धान्तांच्या विकासामध्ये अन्य सामाजिक शास्त्रांतील संकल्पनांचे मोठे योगदान आहे. आर्थिक विचारांच्या इतिहासामध्ये याचे अनेक दाखले आढळतील. दुसरा असा की, सामाजिक आणि राजकीय बंधनांच्या चौकटीतच अर्थव्यवहार होत असल्याने त्या अर्थव्यवहारांमागील प्रेरणा, स्वरूप आणि परिणाम यांचे सम्यक्‌दर्शन होण्यासाठी आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या समस्यांच्या निराकरणासाठी सामाजिक कार्यानुवर्तन कसे होत आहे याची स्थूल का होईना माहिती पार्श्वभूमी म्हणून अभ्यासकाला अवगत असावयाला हवी. आर्थिक विचारांचा इतिहास अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमात अनिवार्य केल्यास वरील हेतू साध्य होण्यास काही प्रमाणात मदत होऊ शकेल असा लेखकाचा दावा आहे.

फडणवीस यांच्या निबंधात अर्थशास्त्र अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना (1) अर्थशास्त्राची व्याख्या, (2) अर्थशास्त्रीय नियम, (3) स्थितीशील आणि गतीशील अर्थशास्त्र आणि (4) व्यष्टीय आणि समष्टीय

अर्थशास्त्र या चार बाबींचा प्रामुख्याने विचार व्हावयास हवा असे प्रतिपादन करण्यात आले आहे. अर्थशास्त्राची व्याख्या 'समकालीन आर्थिक समस्यांचे मूळ स्वरूप स्पष्ट करणारे असावे' या विधानातून फारसा अर्थबोध होत नाही. अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमामध्ये आर्थिकेतर घटनांचा आर्थिक घटनांवर पडणारा प्रभाव दुर्लक्षिला जातो कामा नये हा विचार पटण्यासारखा जरूर आहे. परंतु हे नेमके कसे करता येईल, अशा प्रयत्नांची व्यवहार्यता आणि मर्यादा कोणत्या याचे साधक-बाधक विवेचन अधिक उपयुक्त ठरले असते. अर्थशास्त्रातील नियमांकडे 'तत्त्व' म्हणून न पाहता 'पद्धती' म्हणून पाहावयाला हवे ही भूमिका सुस्पष्टपणे मांडावयाला हवी. अर्थशास्त्राच्या सध्याच्या अभ्यासक्रमामध्ये व्यष्टीय आणि समष्टीय अर्थशास्त्रांतर्गत विश्लेषण पद्धती अलगअलगपणे शिकविल्या जातात. त्या दोहोंमधील परस्परसंबंध अभ्यासक्रमात समन्वितरीत्या मांडला जावयाला हवा असेही लेखिकेने सुचविले आहे.

जहागिरदार यांनी आपल्या निबंधामध्ये अर्थशास्त्रामध्ये काय आणि कसे शिकविले जावे यासंबंधीचा ऊहापोह गेल्या शंभर वर्षांच्या कालात जगभर केला जात असून भारतातही स्वातंत्र्योत्तर कालात त्याबाबत विविध अभ्यासकांनी आपले विचार लेखन-भाषणांच्या रूपाने मांडले असल्याचे प्रारंभी नमूद केले आहे. उपरोक्त प्रश्नाचा एक भाग म्हणून प्रादेशिक भाषेतून अर्थशास्त्राच्या अध्ययन–अध्यापनाला वाढती मागणी देशात आणि आपल्या राज्यातही येत राहिल्याने उद्भवणाऱ्या परिस्थितीची लेखकाने चर्चा केलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने पुरस्कारलेल्या पुनर्रचित अर्थशास्त्र अभ्यासक्रम रूपरेषेची काही वैशिष्ट्ये आणि त्यातील उणिवा सांगून महाराष्ट्रातील प्रचलित विद्यापीठीय अर्थशास्त्र अभ्यासक्रमाचे तौलनिक स्वरूप यांचा त्रोटक आढावा लेखकाने घेतला आहे. निबंधात उल्लेखिलेल्या काही वादप्रश्नांमध्ये सुधारित अभ्यासक्रमामध्ये विश्लेषण पद्धतीचा अंतर्भाव, प्रादेशिक भाषेतून ग्रंथनिर्मिती, प्राध्यापकांसाठी प्रशिक्षण सुविधा या बाबींची नोंद घेण्यात आली आहे.

आपल्या निबंधामध्ये खेर यांनी अर्थशास्त्राचे सध्याचे अभ्यासक्रम केवळ पुस्तकी आणि तत्त्वविवेचनावर आधारलेले असल्याने ते नीरस आणि निरुपयोगी बनल्याची बहुसंख्य विद्यार्थ्यांची भावना लक्षात घेता त्यामध्ये कोणत्या सुधारणा इष्ट आणि व्यवहार्य ठरतील याचा साकल्याने विचार करण्याची गरज स्पष्ट केली आहे लेखकाच्या मते समाजाच्या वर्तमान आर्थिक समस्यांचे आकलन आणि त्यांची उकल करण्याच्या पर्यायी मार्गांचे दिग्दर्शन अर्थशास्त्राकडून होण्याची अपेक्षा आहे. यासाठी अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याला प्रस्थापित सामाजिक व राजकीय व्यवस्थेची घडी याचे तर ज्ञान असावयाला हवे पण त्याचबरोबर संख्याशास्त्र आणि प्रारंभिक लेखाशास्त्राच्या मूलतत्त्वांची तोंडओळख व्हावयास हवी. या सूचनांना अनुलक्षून बी. ए. (अर्थशास्त्र) त्रैवार्षिक अभ्यासक्रमाचा एक ढोबळ आराखडाही लेखकाने सादर केला आहे.

तिसऱ्या गटापैकी पाटील यांनी भारतातील विद्यापीठातील अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम काहीसे साचेबंद झालेले असून पाश्चिमात्य देशात उगम पावलेल्या आणि विकसित करण्यात आलेल्या अर्थशास्त्रीय संकल्पना, प्रमेये व सिद्धान्त यांचीच उसनवारी आपल्या अभ्यासक्रमांसाठी आपण करीत राहिल्याने असे घडले असावे असे अनुमान आपल्या विवेचनात केले आहे. आपले पदवी आणि पदव्युत्तर पातळीवरील अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम पाहिले तर असे आढळते की, अभ्यासक्रमाचे विषय आणि उपविषय यांच्याबाबत पुनरावृत्तीचेही दोष आढळतात. या निरिक्षणांच्या पार्श्वभूमीवर लेखकाने, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील अर्थशास्त्र अभ्यासक्रमाच्या संरचनेचे स्वरूप स्पष्ट केले आहे, प्रादेशिक / स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेता त्या त्या विद्यापीठांच्या अर्थशास्त्र अभ्यासक्रमात वेगळेपणा जरूर असावा आणि 'प्रकल्प कार्या'चा अनिवार्य विषय म्हणून अंतर्भाव व्हावा अशा दोन ठळक सूचना निबंधाच्या अखेरीस करण्यात आल्या आहेत.

पेडगांवकर यांचा निबंध मराठवाडा विद्यापीठाच्या (आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) अर्थशास्त्र अभ्यासक्रमातील बदल आणि त्यांची फलश्रुती या संबंधीच्या अनुभवापुरता मर्यादित आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून, म्हणजे 1958 पासून, वेळोवेळी केलेल्या अर्थशास्त्र अभ्यासक्रमातील बदलांची लेखकाने संक्षिप्त नोंद घेतली आहे. मुख्य भर जो आहे तो विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अर्थशास्त्र–

विषयक मार्गदर्शन आराखड्यानुसार जे फेरफार 1991 मध्ये या विद्यापीठाने स्वीकारले त्याबाबत आलेल्या अनुभवांवर पदवी पातळीवरील पुनर्रचित अभ्यासक्रमातील प्रश्नपत्रिकांची नावे व संख्या कायम ठेवून आशयात मात्र अल्पावधीतच काटछाट करण्यात आली. हे योग्य नसल्याचा लेखकाने निर्वाळा दिला आहे.

अभ्यासक्रमांतील सुधारणांचा प्रश्न परीक्षा पद्धतीमधील सुधारणांशी निगडित असल्याने या दोहोंचा एकत्र विचार व्हावयास हवा. अभ्यासक्रम प्रत्यक्षात कसे शिकविले जातात याचे प्रत्यंतर मूल्यांकन व्यवस्थेमध्ये मिळू शकते. लेखकाच्या मते या संबंधीचा अनुभव उत्साहवर्धक नाही. सुधारित अभ्यासक्रमांचे सुयोग्य अध्यापन होण्यासाठी प्राध्यापकांसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे आणि त्यामधील त्यांचा सहभाग सक्रीय राहील अशी व्यवस्था व्हावी, परीक्षा पद्धतीत सुधारणा व्हाव्या, परिमाणात्मक तंत्रांचा अभ्यास अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना अनिवार्य असावा अशा काही सूचना लेखकाने मांडलेल्या आहेत.

## 3

## चर्चेसाठी मुद्दे

चर्चासत्रामध्ये ज्या मुद्यांवर भर देणे योग्य ठरेल त्यांचे आता थोडक्यात विवरण करतो.

(1) अर्थशास्त्राचे विविध अभ्यासक्रम महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर कला आणि वाणिज्य विद्याशाखांमध्ये दीर्घकाल शिकविले जात आहेत. गेल्या काही वर्षांपासून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवरील अभ्यासक्रमांमध्येही एक ऐच्छिक विषय म्हणून अर्थशास्त्राचा समावेश झालेला आहे. वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखांतर्गत अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये अर्थशास्त्र हा एक अनिवार्य विषय झालेला आहे. असेच अभियांत्रिकी विद्याशाखेकडील अभ्यासक्रमांत अर्थशास्त्राला स्थान लाभलेले आहे. विवेचन सौकर्याच्या दृष्टीने बी. ए. आणि एम. ए. पुरते पाहावयाचे झाल्यास सध्याच्या अर्थशास्त्र अभ्यासक्रमाची संरचना विविध विद्यापीठांमध्ये कशी आहे याचा एक तुलनात्मक आढावा घेण्याची गरज आहे. प्रस्तावित बदलांची दिशा आणि स्वरूप यांचा याआधारे विचार करता येईल.

(2) सध्याच्या व्यवस्थेनुसार अर्थशास्त्रीय सिद्धान्त आणि भारताच्या आर्थिक समस्या यांच्या अध्यापनासाठी अलगअलग अभ्यासक्रम आखण्यात आलेले आहेत. प्रादेशिक / राष्ट्रीय पातळीवरील अर्थव्यवहारांचे स्वरूप, कारणमीमांसा आणि परिणाम यांच्या आकलनासाठी संबंधित तात्त्विक विश्लेषणाचे निष्कर्ष कितपत उपयुक्त आहेत आणि त्यांच्या मर्यादा कोणत्या या दृष्टिकोनातून प्रस्थापित अभ्यासक्रमांची बांधणी झाली नसल्याने अर्थशास्त्राचा अभ्यास नीरस आणि व्यावहारिकदृष्ट्या निरुपयोगी झालेला आहे, या आक्षेपाची साधकबाधक चर्चा व्हावयास हवी.

(3) परिमाणात्मक तंत्रांचा अभ्यास अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असला पाहिजे. गणिती आणि संख्याशास्त्रीय साधनांचा वापर आर्थिक विश्लेषणात कसा केला जातो हे समजल्यास गुणवत्ता संवर्धनास मदत होऊ शकेल. या सूचनेचा पाठपुरावा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तज्ज्ञ समितीने शिफारस केलेल्या आराखड्यात करण्यात आलेला आहे. प्राध्यापक मंडळींनीही ती तत्त्वतः मान्य आहे. मात्र तसे केल्यास विषयाची काठिण्य पातळी वाढून अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांची संख्या घटेल ही भीती अनेकांच्या मनात आहे. यातून काही मार्ग काढता येईल का? काही आकलनास (आणि उपयोजनास) सोप्या साधनांचा परिचय पदवी पातळीवर आणि इतरांचा पदव्युत्तर पातळीवर करणे व्यवहार्य (आणि स्वीकार्य) ठरेल का?

(4) अर्थशास्त्र अभ्यासक्रमाच्या पुनर्रचनेसंबंधीच्या चर्चेमध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा अवलंब करण्याची गरज अनेकांनी आग्रहाने मांडलेली आहे. अशा दृष्टिकोनानुसार तयार केलेले अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम काही विद्यापीठांमध्ये शिकविलेही जात आहेत. या दिशेने केलेल्या प्रयोगांबाबत अनुभव काय आहे?

(5) महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये राबविल्या जाणाऱ्या सध्याच्या अर्थशास्त्र अभ्यासक्रमात बऱ्याच तफावती आहेत. प्रश्नपत्रिकांची संख्या व नावे, प्रत्ये-

कासाठी नियुक्त केलेला अभ्यासक्रम, ऐच्छिक/अनिवार्य इत्यादींशी त्या संबंधित आहेत. कदाचित त्या आवश्यकही असतील, परंतु पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्याला अर्थशास्त्राचे किमान केवढे ज्ञान असावयाला हवे हे लक्षात घेऊन तेवढ्यापुरता 'समान' अभ्यासक्रम आणण्याचा विचार कितपत योग्य आणि व्यवहार्य आहे हे तपासून पाहावे लागेल.

(6) अभ्यासक्रमांची अमलबजावणी कशी होते, हे अध्यापन आणि मूल्यांकन पद्धतीशी निगडित आहे. स्वाध्याय, प्रात्यक्षिके, प्रकल्पकार्य इत्यादींचा योग्य तो मेळ प्रत्यक्ष अध्यापनाशी कसा साधावा? परीक्षा पद्धतीत कोणते बदल हवेत? 'उपयोजित' स्वरूपाच्या प्रश्नांना कोणते स्थान असावे? प्रश्नपेढ्यांचे यासाठी कितपत साहाय्य होऊ शकेल?

(7) अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर पातळीवरील अध्ययन-अध्यापनासाठी मराठी माध्यमाचा वापर ग्रामीण आणि निमनागरी भागात आता सार्वत्रिक झाला आहे. मोठ्या शहरातही मराठी माध्यमातून अर्थशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे. अभ्यासक्रमांच्या सुधारणेबरोबरच दर्जेदार क्रमिक आणि संदर्भ पुस्तके उपलब्ध करून देण्याचा प्रश्न महत्त्वाचा बनला आहे.

(8) अध्यापनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्राध्यापकांसाठी कार्यशाळा / उद्बोधन वर्गाचे आयोजन व्हावे याबाबत आता दुमत नाही. ग्रंथनिर्मिती आणि कार्यशाळा यांच्याबाबत मराठी अर्थशास्त्र परिषदेकडून कोणत्या अपेक्षा आहेत?

## 4

## चर्चेचा गोषवारा

अलीकडेच विद्यापीठ अनुदान आयोगाने नियुक्त तज्ज्ञ समितीने प्रचलित अभ्यासक्रमांची छाननी करून जी एक नवी रूपरेषा सुचविलेली आहे त्यामुळे संबंधितांचे या महत्त्वाच्या प्रश्नाकडे पुन्हा एकवार लक्ष वेधले गेले आहे. परिषदेच्या व्यासपीठावरून यंदा झालेली या विषयावरील चर्चा म्हणूनच औचित्यपूर्ण मानावयाला हवी. या चर्चेत उपस्थित झालेले ठळक मुद्दे आणि त्याआधारे मांडलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

अर्थशास्त्र अभ्यासक्रमाच्या सुधारणेचे मुख्य अंग म्हणून सामाजिक शास्त्रांच्या समन्वित अभ्यासक्रमाचा निर्देश केला जातो. असा बदल केल्याने अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम वास्तवाच्या अधिक नजिक येतील आणि मानवसमाजाच्या अर्थव्यवहारातून उद्भवणाऱ्या समस्यांच्या आकलनाला आणि निराकरणाला ते अधिक प्रभावीपणाने मार्गदर्शन करू शकतील. मात्र सामाजिक शास्त्रांचा समन्वित अभ्यास म्हणजे बहुशाखान्वयी अभ्यास असे मानणे चुकीचे ठरेल. बहुशाखान्वयी अभ्यासात निरनिराळ्या सामाजिक शास्त्रांचे पृथक् अस्तित्व मान्य केलेले असते. ही शास्त्रे अध्यापनाच्या दृष्टीने स्वतंत्र म्हणून ओळखावयाची आणि संशोधनासाठी बहुशाखान्वयी अभ्यासाची अपेक्षा करावयाची अशीच आजवरची रूढ समजूत होती. समन्वित अभ्यासक्रमाचा विचार सामाजिक वास्तवाच्या एकात्मतेवर आधारलेला आहे. या नव्या अभ्यासक्रमांची आखणी आणि अमलबजावणी पुरेशा तयारीने होणे अगत्याचे आहे.

पदवी आणि पदव्युत्तर पातळीवरील अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमाचा फेरविचार करताना उच्च माध्यमिक पातळीवरील या विषयाचे सध्याचे अभ्यासक्रम बारकाईने तपासून पाहावे लागतील. अर्थशास्त्राच्या प्रारंभिक अभ्यासाचीच येथे अपेक्षा असल्याने अमूर्त आणि समजण्यास अवघड अशा संकल्पनांच्या परिचयावर भर देणे योग्य ठरणार नाही. त्याऐवजी राष्ट्रीय आणि प्रादेशिक अर्थव्यवहारांची सध्याची संरचना, त्यांचे अन्योन्य संबंध आणि त्यामधील परिवर्तनाचे स्वरूप हे या पातळीवरील अभ्यासक्रमाचे मुख्य घटक असावयाला हवेत.

अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना प्रस्थापित सामाजिक आणि राजकीय घडीचे सर्वसाधारण ज्ञान जसे असावयाला हवे तसेच संख्याशास्त्र आणि गणिती तंत्रांची तोंडओळख असणे अपरिहार्य झाले आहे. परिमाणात्मक तंत्रांचा वापर अर्थशास्त्रीय विश्लेषणात कसा केला जातो हे समजल्यास गुणवत्ता संवर्धनाच्या दृष्टीने ते उपयुक्त ठरेल. गणितामध्ये फारशी गती नसलेल्या विद्यार्थ्यांपुढे

अशा बदलामुळे काही अडचणी उद्भवू शकतील आणि विषयाची काठिण्य पातळी वाढून अर्थशास्त्राच्या विद्यार्थी संख्येवर त्याचा कदाचित विपरित परिणाम होईल. ही भीती अगदीच निराधार नसली तरी वर सुचविलेल्या दिशेने प्रयत्न करण्याची गरज आहे. आकलनास आणि उपयोजनास सुलभ अशा गणिती आणि संख्याशास्त्रीय पद्धतींचा परिचय पदवी पातळीवरील अभ्यासक्रमात असावा याबाबत सर्वसाधारण अनुकूलता दिसली.

कला आणि वाणिज्य विद्याशाखांतर्गत पदवी पातळीवरील अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमामध्ये फारसा फरक नाही. बी. ए. च्या 'स्पेशल' अभ्यासक्रमाची जेथे तरतूद नाही तेथे हा सारखेपणा ठळकपणे जाणवतो. वाणिज्य विद्याशाखेकडील 'व्यवसाय अर्थशास्त्र' चे अभ्यासक्रम तपासून पाहिले तर सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत अर्थशास्त्राच्या सैद्धान्तिक भागाचीच तेथे पुनरावृत्ती आढळते. ही उणीव दूर होणे गरजेचे आहे.

वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमांमध्ये प्रादेशिक गरजांना, वैशिष्टयांना अनुलक्षून काही वेगळेपणा असावयाला हरकत नसली तरी अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याला पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर किमान केवढे ज्ञान असावयाला हवे यावर सर्वांगीण चर्चा होऊन त्याआधारे एका समान आराखडयाची आखणी व अमलबजावणी इष्ट ठरेल, प्रात्यक्षिके आणि प्रकल्पकार्य याना या आराखडयात योग्य ते स्थान मिळावयास हवे असा विचार पुढे आला.

सुधारित अभ्यासक्रमांचे सुयोग्य अध्यापन होण्यासाठी प्राध्यापकांसाठी उद्बोधन वर्ग आणि कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे आणि त्यामधील त्यांचा सहभाग सक्रिय राहील अशी व्यवस्था व्हावी. पदवी आणि पदव्युत्तर पातळीवरील प्राध्यापकांसाठी अलगअलग उजळणी वर्ग कदाचित अधिक उपयुक्त ठरू शकतील. कसदार क्रमिक आणि संदर्भ साहित्याच्या निर्मितीचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. मराठी माध्यमातून अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी आणि वाढती संख्या लक्षात घेता या दिशेने तातडीने परंतु योजनाबद्धरीत्या पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

अभ्यासक्रम सुधार कार्यक्रमांच्या अनुषंगाने अनेक आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. त्यांचा कितपत यशस्वीरीत्या मुकाबला करता येईल हे निर्णायकरीत्या अध्यापक वर्गाच्या व्यवसायनिष्ठा आणि मानसिकता यावर अवलंबून राहील.

□ □

## तुमचा पत्ता बदलला आहे काय ?

परिषदेच्या कार्यालयाकडे आपल्या ज्या पत्त्याची नोंद आहे त्यामध्ये काही बदल असल्यास ताबडतोब आपला नवीन पत्ता कार्यवाहांच्या कार्यालयाकडे कळवावा. परिषदेच्या सर्व सदस्यांनी याबद्दल जागरूक राहावे ही विनंती. पत्त्यातील बदल कळविताना आपला आजीव सदस्य क्रमांकही लिहावा. तो 'अर्थसंवाद'च्या पाकिटावर तुमच्या पत्त्याच्या जागी असतो. अंक परत आल्यास पुढील अंक पाठविले जात नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**गुलाबराव तायडे**
कार्यवाह–खजिनदार

चर्चासत्र चौथे

# महाराष्ट्र शासनाची झुणका-भाकर योजना : उत्पत्ती, प्रयोजन, प्रश्न व पर्याय

रवीन्द्र दोशी*

## 1

### पार्श्वभूमी

एक लोकाभिमुख आणि कल्याणकारी योजना म्हणून खूप गाजावाजा होऊन महाराष्ट्र शासनाने 1 मे, 1995 पासून राज्यभर झुणका-भाकर योजना कार्यान्वित केली आहे. तेव्हापासून तिच्या प्रयोजनाबद्दल आणि संभाव्य यशापयशाबद्दल सर्वच क्षेत्रात उलटसुलट चर्चा सुरू झाली. केवळ लोकानुनय करणारी योजना आहे येथपासून या योजनेचे अर्थशास्त्र आतबट्ट्याचे आहे येथपर्यंत विरुद्ध बाजूचे विचार पुढे आले तर दुसऱ्या बाजूने अत्यंत उपयुक्त अशी लोककल्याणकारी योजना अशी त्याची भलामण करण्यात आली. कोणत्याही आर्थिक योजनेच्या बऱ्यावाईटपणाविषयी मत-मतांतरे असणारच. तथापि तारतम्याने अशा योजनांच्या विविध अंगांचा विचार करणे हे शास्त्रशुद्ध अभ्यासकाचे काम असते. त्यातून वास्तवाचे भान राखून धोरणात्मक निर्णयांना योग्य वळण लावणे सहजसाध्य होते. या भूमिकेतून आयत्या वेळेचा विषय म्हणून प्रचलित बहुचर्चित अशा महाराष्ट्र शासनाच्या झुणका-भाकर योजनेची निवड या राखीव चर्चासत्रासाठी करण्यात आली.

या योजनेची निर्मिती मात्र राजकीय पार्श्वभूमीवर झालेली आहे. सध्या महाराष्ट्रात अधिकारारूढ असलेल्या दोन पक्षांच्या युती शासनाने आपल्या निवडणूक जाहिरनाम्यात (त्याला शासन 'वचननामा' म्हणते) राज्यातील लोकाना आश्वासन दिले होते की, युतीला शासन चालविण्याची संधी निवडणुकीनंतर मिळाली तर गरिबांकरिता 1 रुपयात झुणका-भाकर उपलब्ध करून देऊन त्यांची दारिद्र्य आणि उपासमारीची स्थिती सुकर करण्याला हातभार लावला जाईल. अलीकडच्या काही वर्षांत भारताच्या निरनिराळ्या राज्यांत काँग्रेसेतर पक्षांनी बहुमत प्राप्त करून सरकार स्थापन करण्यासाठी गरीब मतदारांना 2 रुपये किलो

* प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'.

तांदूळ अशासारख्या आमिषांचे मधाचे बोट लावले. अशा तऱ्हेच्या लोकानुनयी कार्यक्रमांच्या गाजरामुळे काँग्रेसेतर पक्षांना बहुमत मिळवून सत्तारूढ होता आले. तसाच मार्ग झुणका-भाकर कार्यक्रमाचे आमिष दाखवून महाराष्ट्रातील युती पक्षांनी अनुसरला आणि त्यांना यश मिळाले. 14 मार्च, 1995 रोजी सत्ताग्रहण केल्या-नंतर आपल्या वचननाम्यातील कलमांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने सरकारने पाउले टाकण्यास सुरुवात केली. त्यातूनच दिनांक 1 मे, 1995 पासून झुणका-भाकर योजना जन्माला आली.

## 2

### योजनेचा आकृतीबंध

शासनाने दिनांक 27 एप्रिल, 1995 पासून वेळोवेळी काढलेल्या परिपत्रकांमधून यासंबंधीचा तपशील आपल्याला मिळतो. त्यानुसार या कार्यक्रमाचा आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे.

(1) राज्यातील गरीब व गरजू जनतेला 1 रुपया या अल्प किमतीला झुणका-भाकर देण्याकरिता ही योजना आखलेली आहे.

(2) ही योजना नागरी क्षेत्र आणि ग्रामीण क्षेत्र अशा दोन स्तरांवर राबविण्यात येईल. प्रारंभी ती नागरी क्षेत्रापुरती मर्यादित राहून महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात तिची कार्यवाही केली जाईल. यथावकाश ती ग्रामीण क्षेत्रात तालुका मुख्यालये आणि काही मोठ्या गावांमध्ये राबविली जाईल. योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यात 2,000 केन्द्रे स्थापन केली जातील; त्यापैकी 1,000 केन्द्रे महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात आणि 1,000 केन्द्रे ग्रामीण क्षेत्रात राहतील. त्यांचा सर्वसाधारण तपशील असा :

| क्षेत्र | | केन्द्रांची संख्या |
|---|---|---|
| **(अ) महानगरपालिका क्षेत्र** | | |
| 1 मुंबई | | 10 |
| 2 पुणे व नागपूर | प्रत्येकी | 7 |
| 3 नवी मुंबई, ठाणे, कोल्हापूर, नाशिक, अमरावती, सोलापूर, औरंगाबाद, कल्याण | प्रत्येकी | 5 |
| 4 पिंपरी-चिंचवड | | 3 |
| **(आ) जिल्हा मुख्यालय** ( ज्या ठिकाणी महानगरपालिका आहेत ते जिल्हे वगळता ) | प्रत्येकी | 4 |
| (इ) तालुक्याची मुख्यालये | प्रत्येकी | 2 |
| (ई) तालुका मुख्यालये नसलेली परंतु मोठी गावे | | प्रत्येक जिल्ह्यातील दोन गावांत, प्रत्येक गावात एक याप्रमाणे |
| (उ) राज्य परिवहन महामंडळा-मार्फत परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांवर | | |

(3) निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये साधारणतः पुढील ठिकाणी झुणका-भाकर केन्द्रे उघडण्यास परवानगी देण्याचे धोरण राहील :

**(अ) महानगरपालिका क्षेत्र**

1 सार्वजनिक रुग्णालये
2 रेल्वे स्थानके
3 न्यायालय आवार अथवा मोठ्या कार्यालयाचे आवार
4 कृषी उत्पन्न बाजार समितीचे आवार
5 व्यापारी संकुले

**(आ) जिल्ह्याचे ठिकाण**

1 जिल्हाधिकारी कार्यालय आवार
2 जिल्हा सार्वजनिक रुग्णालय आवार
3 कृषी उत्पन्न बाजार समितीचे आवार
4 जिल्हा न्यायालय आवार

**(इ) तालुक्याचे ठिकाण**

1 तहसील कार्यालय आवार किंवा तालुका न्यायालय आवार
2 कृषी उत्पन्न बाजार समितीचे आवार

(ई) प्रत्येक जिल्ह्यातील इतर मोठी गावे

ज्या ठिकाणी लोकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे अशा ठिकाणी मागणीनुसार आणि गरजेनुसार प्रत्येक गावात एक याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात एकूण दोन केन्द्रे.

(4) ही योजना राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर एक समिती असेल. केन्द्राची जागा निश्चित करणे, केन्द्र चालविण्यासाठी संस्था / व्यक्ती यांची निवड करणे, केन्द्रांच्या कार्यावर देखरेख ठेवणे, केन्द्राला अनुदान देणे आणि अनुषंगिक प्रशासकीय कामे ही समिती करील.

(5) केन्द्रांच्या प्रत्यक्ष कामकाजावर नियमितपणे देखरेख ठेवण्यासाठी महानगरपालिका / नगरपालिका आणि तालुका स्तरावर अमलबजावणी समिती असेल.

(6) विशिष्ट ठिकाणी केन्द्र चालविण्यासाठी जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येतील आणि पुढील अग्रक्रमानुसार संस्था / व्यक्ती यांची निवड करण्यात येईल : (अ) महिलांनी चालविलेल्या नोंदणीकृत विश्वस्त संस्था, (आ) इतर नोंदणीकृत विश्वस्त संस्था, (इ) नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था, (ई) इतर संस्था, (उ) सुशिक्षित बेकार.

(7) निवड झालेल्या नागरी क्षेत्रातील केन्द्रांना (एस. टी. स्टँड वगळून) राज्य शासनाकडून केन्द्र उभारण्यासाठी ठराविक क्षेत्राची जागा विनामूल्य देण्यात येईल. या जागेवर स्टॉल उभारण्यासाठी अनुदानही मिळेल. ते स्टॉल बांधण्याच्या खर्चाच्या 50 टक्के किंवा रु. 25,000 यात जी रक्कम कमी असेल तितके राहील. स्टॉलधारकाला यासाठी शासनाशी करार करावा लागेल. जागेवर सरकारचा मालकी हक्क राहील. जर केन्द्राने झुणका-भाकरसाठी 1 रुपयापेक्षा अधिक आकार घेतला अथवा झुणका-भाकर देणे बंद केले तर दिलेली जागा व स्टॉल काढून घेण्यात येईल.

(8) झुणका-भाकर केन्द्रावर प्रत्येकी 50 ग्रॅम वजनाच्या दोन भाकऱ्या आणि 35 ते 50 ग्रॅम झुणका देण्यात येईल. एका व्यक्तीस एका वेळेस एकच झुणका-भाकरी मिळेल. बाजरी किंवा तांदळापासूनही भाकरी बनविण्यास मुभा आहे.

(9) झुणका-भाकर केन्द्रावर साधारणतः सकाळी 11 ते दुपारी 2 या कालावधीतच विक्री होईल. गरजेनुसार सायंकाळी 7 ते 9 या वेळेत केन्द्राची विक्री चालू राहील. प्रत्येक केन्द्रावर दररोज किती झुणका-भाकरींची विक्री झाली हे दाखविणारा एक फलक दर्शनी भागावर लावण्याचे बंधन केन्द्रांवर आहे.

(10) नागरी क्षेत्रात उभारलेल्या केन्द्रांवर झुणका-भाकरीशिवाय इतर अल्पोपाहाराचे पदार्थ आणि/अथवा पेये विक्रीस ठेवण्याची मुभा आहे. मात्र केन्द्र प्रामुख्याने झुणका-भाकर केन्द्र असावे. इतर पदार्थांच्या विक्रीमुळे केन्द्र फायद्यात चालविणे शक्य होईल आणि अशा केन्द्रांना अनुदान देण्याची गरज उरणार नाही.

(11) केन्द्र चालकांना झुणका-भाकर तयार करण्यासाठीची सामग्री (ज्वारी, चण्याचे पीठ, तेल इत्यादी) खुल्या बाजारातून खरेदी करावे लागेल. यात सुधारणा करून या वस्तू कमी दरात उपलब्ध करून देण्याचे शासनाने ठरविले आहे.

(12) प्रत्येक केन्द्रावर दर दिवशी किमान 200 लाभधारकांना या योजनेचा लाभ घेता यावा.

(13) प्रत्येक केन्द्राच्या दैनिक आवर्ती खर्चाची विगतवारी (1,000 लाभार्थींसाठी) पुढीलप्रमाणे राहील असा अंदाज करण्यात आला आहे :

**एका केन्द्राचा एक दिवसाचा आवर्ती खर्च**
**(1,000 लाभार्थी)**

| वस्तू | परिमाण (किलो) | दर (रुपये) | खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| ज्वारीचे पीठ | 100 | 7 | 700 |
| बेसन | 25 | 20 | 500 |
| तेल | 10 लि. | 35 | 350 |
| कांदे | 10 | 4 | 40 |
| मसाला | | | 60 |
| हिरवा मसाला | | | 50 |
| रॉकेल | 10 लि. | 5 | 50 |
| मजुरी | 3 महिला | 50 | 150 |
| | | एकूण | 1,900 |
| अधिक आकस्मिक खर्च 10 टक्के | | | 190 |
| एकूण आवर्ती खर्च | | | 2,090 |

(14) केन्द्रांना होणारा संभाव्य तोटा ध्यानात घेऊन त्याना दर दिवशी जास्तीत जास्त मिळू शकणारे अनुदान पुढीलप्रमाणे :

| क्षेत्र | अनुदान ( रुपये ) |
|---|---|
| 1 मुंबई महानगरपालिका | काही नाही |
| 2 इतर महानगरपालिका | 500 |
| 3 जिल्हा मुख्यालये | 400 |
| 4 तालुक्याची ठिकाणे | 300 |
| 5 इतर मोठी गावे | 200 |

ही रक्कम ठरविताना प्रत्येक झुणका–भाकर एककामागे 1 रुपया अनुदान असा हिशेब आहे. मात्र नमूद प्रमाणापेक्षा कमी खप झाल्यास अनुदानही त्या प्रमाणात कमी होईल. खप जास्त झाल्यास मात्र कमाल रकमेपेक्षा अधिक अनुदान उपलब्ध होणार नाही.

## 3

## चर्चेचा गोषवारा

हा विषय आयत्या वेळेचा असल्यामुळे परिषदेच्या प्रथेप्रमाणे या विषयावर निबंध मागविले जात नाहीत. सूत्रसंचालकांच्या प्रास्ताविकानंतर लगेच विषयाच्या मांडणीला आणि चिकित्सक विश्लेषणाला सुरुवात झाली. नियोजित वक्त्यांनी प्रथमतः या योजनेतील महत्त्वाच्या तरतुदींचा तपशील सांगितला. तो विस्ताराने यापूर्वीच्या भागात दिला आहे. या तपशिलाबर अनेकांनी विविधांगी भाष्ये केली. त्यामध्ये एक सूर असा आढळला की, ही योजना कल्याणकारी असल्याने तिच्या बाबतीत उदार दृष्टिकोन ठेऊनच तिच्या संभाव्य फायद्याचे मूल्यमापन केले पाहिजे. दुसऱ्या टोकाला जाऊन ही योजना लोकानुनयी ( populist ) असून त्यामागे राजकीय लाभ उठविण्याचा उद्देश आहे. काही वक्त्यांनी अर्थशास्त्राच्या चौकटीतून ती पारखण्याचा प्रयत्न केला आणि दारिद्र्यनिर्मूलनाची ही योजना आहे काय असा प्रश्नही उपस्थित केला. त्यापाठोपाठ ती अंशतः का असेना दारिद्र्यनिर्मूलनाची योजना मानावयाला हरकत नाही असा निर्वाळा दिला.

तथापि चर्चेचा बराच भाग या योजनेतील काही महत्त्वाच्या बाबींना स्पर्श करून गेला. पहिली गोष्ट म्हणजे, या योजनेचे लाभार्थी नेमके कोण असतील हे 'गरीब आणि गरजू व्यक्ती' या शब्दप्रयोगातून स्पष्ट होत नाही. त्याचप्रमाणे अशी प्रत्येक लाभार्थी व्यक्ती दररोज या थाळीचा लाभ घेईलच असेही नेमके सांगणे अवघड आहे. लाभार्थी विशिष्ट परिसरातून येतील याबद्दलही अनिश्चितता असल्याने केन्द्रांकडून दररोज किती एककांची विक्री होईल याचा अंदाज करणे शक्य होणार नाही. लाभार्थी विखुरलेले असल्याने त्यापैकी कित्येक जण केन्द्रांपर्यन्त जाऊन जो काही मर्यादित लाभ मिळतो त्यापासून वंचित राहतील.

योजनेच्या अर्थशास्त्रासंबंधी काहीशी चिकित्सक मांडणी करण्यात आली. यामध्ये एक भाग आहे तो झुणका–भाकर केन्द्र उभे करण्याच्या भांडवली खर्चाचा आणि त्यासाठी उपलब्ध असणाऱ्या अनुदानाचा. शासनाकडून जास्तीत जास्त 25,000 रुपये अनुदान मिळणे शक्य आहे. उर्वरित 25,000 रुपयांचा खर्च करण्याची आर्थिक कुवत, ज्या प्रवर्गातील संस्था / व्यक्ती निश्चित केल्या आहेत, त्यांच्याकडे सहजपणे असणार नाही. विशेषतः लहान स्वयंसेवी संस्था, महिलांच्या संस्था किंवा सुशिक्षित बेकारांना हा प्रश्न भेडसावणारा आहे. या परिस्थितीत या पैशाची व्यवस्था बँकांकडून स्वस्त व्याज दरात होऊ शकेल काय ? नाही. याला पर्याय कोणता ? हे पैशाचे गणित एवढ्यावरच संपत नाही. प्राप्त परिस्थितीत संबंधित संस्था / व्यक्तींनी बँकेकडून प्रचलित व्याज दराने ही रक्कम कर्जाऊ घेतली तर 15 टक्के दराप्रमाणे वार्षिक व्याज 3,750 रुपये होईल. विकलेल्या झुणका–भाकर एककांवर प्रत्येकी 1 रुपयाचे अनुदान शासनाकडून मिळावयाचे आहे. ते काही महिना संपताच लगोलग मिळत नाही. त्यांचे सर्व सोपस्कार पूर्ण होऊन मासिक अनुदान मिळावयाला महिना–पंधरा दिवस लागणार. म्हणजे साधारणतः दीड ते दोन महिने केन्द्राला स्वतःचे आणखी भांडवल वापरावे लागणार. दररोज सरासरीने 250 एकक विकले असे मानले तर दररोजचा खर्च 2 रुपयांप्रमाणे 500 रुपयांचा होईल. त्यानुसार महिन्याला 15,000

रुपयांचे ( रु. 500 X 30 दिवस ) खेळते भांडवल केन्द्राकडे पाहिजे. शिवाय अनुदान मिळेपर्यंतच्या पुढच्या सरासरी पंधरवड्याचे खेळते भांडवल 7,500 रुपये. थोडक्यात, केन्द्राला स्वतःचे म्हणून जवळपास 20 ते 22 हजार रुपयांचे खेळते भांडवल हाताशी ठेवावे लागेल. 25,000 रुपयांचे स्थिर भांडवल आणि 20 ते 22 हजार रुपयांचे खेळते भांडवल इतकी पुंजी संबंधित संस्था / व्यक्ती जमवू शकतील काय ? हे गणित एव-ढ्यावर संपत नाही. स्थिर भांडवलाचे आणि खेळत्या भांडवलाचे मासिक व्याज 15 टक्के दराप्रमाणे अनुक्रमे 325 आणि 250 रुपये, म्हणजे एकूण 575 रुपये, होईल ते कुठून भरावयाचे? शिवाय केन्द्र चालकाला या उपक्रमापासून किमान 2,000 रुपयांची मासिक प्राप्ती अपेक्षित धरावी लागेल. हा सगळा हिशेब शासनाच्या खर्चाच्या तपशिलात आलेला नाही. तो आला पाहिजे. तो घेतला तर एका झुणका-भाकर एककाची किंमत 2 रुपयांपेक्षा अधिक होऊन ती साधारणतः 2·50 ते 2·75 रुपये होईल. ही वास्तवता दुर्लक्षिता येणार नाही. शासनाने या महत्त्वाच्या बाबींकडे काणाडोळा केला आहे. असे केले तर केन्द्रे चालविण्यात व्यक्ती / संस्थांना फारसे स्वारस्य राहणार नाही. परिणामी केन्द्रांची निर्धारित संख्यापूर्ती होणार नाही. या अनुषं-गाने नागपूर शहराचाच अनुभव बानगीदाखल सांगण्यात आला. सुरुवातीला 7 केन्द्रे स्थापण्याचे ठरले आहे; त्यापैकी 3 केन्द्रे स्थापन झाली आहेत. त्यापैकी एक केन्द्र युती पक्षाचेच नागपूर महानगरपालिकेचे उपमहापौर चालवीत आहेत आणि दुसरे शासकीय रुग्णालया-जवळ चालविले जात आहे. उर्वरित 4 केन्द्रे कधी चालू होतील याचा मागमूस नाही.

आणखी एक गणित घातले गेले. गरजूंना 100 ग्रॅमची भाकरी देणे ही गरिबांची क्रूर चेष्टा आहे. त्यांची किमान अन्नाची गरज भागविण्यासाठी आजच्या परिस्थितीत दरमाणसी किमान रु. 3·50 खर्चावे लागतील. म्हणजे, दरमाणशी वार्षिक रु. 1,200 तरी खर्च होईल. महाराष्ट्रात 1 कोटी 20 लाख गरजू व्यक्ती आहेत. त्यांच्यासाठी वर्षाला 1,440 कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. तरच ही योजना समाधानकारकपणे चालविता येईल. अंदाजित 1 कोटी 20 लाख गरजूंपैकी निम्म्यांना जरी या योजनेच्या लाभात सामील करावयाचे असले तरी 720 कोटी रुपयांची व्यवस्था दरवर्षी केली पाहिजे. एवढ्या पैशांची व्यवस्था शासन करू शकणार नाही.

याच संदर्भात कोल्हापूर जिल्ह्यातील दत्त सह-कारी साखर कारखाना, शिरोळ या संस्थेने काही वर्षांपासून चालविलेल्या झुणका-भाकर योजनेचा अनु-भवही कथन करण्यात आला. एक आदर्श केन्द्र म्हणून त्याचा उल्लेख झाला. त्यांच्याकडील झुणका-भाकर एककाचा खर्च रु. 2·35 आहे. ना नफा, ना तोटा पद्धतीने हा उपक्रम तिथे चांगल्या रीतीने चालविला जात आहे. अशाच आणखी काही यशस्वी उपक्रमांचे दाखलेही देण्यात आले.

या उपक्रमात आर्थिक प्रेरणेचा अभाव जाणवतो. कारण 2 रुपये खर्चाचे गणित चुकीचे आहे. ते जरी ग्राह्य धरले तरी केन्द्र चालविण्याचा मोबदला म्हणून केन्द्र चालकाला किती प्राप्ती होणार हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. कोणत्याही उपक्रमातून त्या उपक्रमीला स्वतः-साठी काही किमान प्राप्ती व्हावी ही नैसर्गिक अपेक्षा असते. ती अपेक्षापूर्ती या योजनेतून होत नाही. केन्द्र चालकांनी जोड व्यवसाय करून स्वतःच स्वतः आपली अपेक्षित प्राप्ती करून घ्यावी हे सांगणे प्रशस्त वाटत नाही असा सूर निघाला. झुणका-भाकर एककाची किंमत 1 रुपयापेक्षा अधिक ठेवणे किंवा केन्द्रांना द्याव-याच्या अनुदानात वाढ करणे या गोष्टींना शासन राजी होणार नाही. कारण, तो 'वचननाम्या'चा भंग होईल. असे असल्याने, ही केन्द्रे, निदान आताचे सरकार सत्तेवर असेपर्यंत, कोण चालविण्याची शक्यता आहे ? एक तर ज्याना राजकीय प्रेरणा आहे आणि ही केन्द्रे चालवि-ल्याने ज्याना राजकीय पदे मिळतील आणि त्यांच्या-द्वारा अप्रत्यक्षपणे किंवा भविष्यात आजचा तोटा भरून काढण्याइतपत लाभ मिळेल अशा व्यक्ती किंवा संस्था चालवितील; किंवा ज्याना असे केन्द्र चालवून आजच सत्ताधारी पक्षाकडून इतर क्षेत्रांतील अधिक लाभदायी प्रकल्प पदरात पाडून घेता येतील अशा अराज-कीय व्यक्ती चालवितील; किंवा ज्या सेवाभावी संस्थांची आर्थिक स्थिती बळकट आहे अशा संस्था चालवितील.

चर्चेमधून काही विचार करण्यासारखे प्रश्न पुढे आले. ते थोडक्यात असे :

(1) प्रत्येक ठिकाणच्या केन्द्रांची संख्या कोणत्या निकषावर निश्चित केली? निकषांचा संदर्भ कोणत्याही परिपत्रकात नाही.

(2) दर दिवसाला साधारणत: 200 एकक किमान विकले जातील याला आधार कोणता ?

(3) अनुदानाचा मोठा भार करदात्यांवरच पडणार नाही का ? हे कितपत रास्त आहे ?

(4) गरीब आणि गरजू व्यक्तींनाच या योजनेचा फायदा मिळेल याची खातरजमा करून घेण्याची काय व्यवस्था आहे ?

(5) ही केन्द्रे आर्थिकदृष्ट्या सबल राहतील याचा पुरेसा प्रयत्न या योजनेतून झालेला आहे काय ? कसा ?

(6) केन्द्रांतील खाद्यपदार्थांचा पुरवठा आरोग्याला पोषक पद्धतीने होऊ शकेल असे वाटते काय ?

(7) हा उपक्रम ना नफा, ना तोटा तत्त्वावर केन्द्रांनी चालवावा अशी अपेक्षा आहे. यातून केन्द्रांचे सातत्य कितपत राहील ? नफ्याची काही तरी व्यवस्था नको का ? केवळ स्वयंसेवी संस्थांवर कितीसे अवलंबून राहावयाचे ? झुणका-भाकर ('झु-भा') आणि अन्य खाद्यपेयांची विक्री या संयुक्त उपक्रमातून 'झु-भा' चे उद्दिष्ट खरोखरीच साध्य होईल काय ?

(8) ज्या संस्थांना / व्यक्तींना स्वत:हून असे उपक्रम चालवावयाचे असतील त्यांना अनुदान न देता ते चालवू द्यावेत. मोठ्या शहरातून अल्प किमतीत पोळी-भाजी पाकिटे उपलब्ध होत आहेत. त्यांना सर्व प्रवर्गातील गरजूंकडून चांगला प्रतिसाद मिळतो. अशा उपक्रमींनाच मदत करून अधिक कार्यप्रवण बनविता येणार नाही काय ?

(9) गरिबांनाच मदत करावयाची असेल तर झुणका-भाकर केन्द्रांचा खर्चिक अव्यापारेषु व्यापार करण्यापेक्षा रास्त भाव दुकानातील धान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तू या प्रवर्गांना आतापेक्षा आणखी कमी दरात उपलब्ध करून देण्याचा पर्याय अधिक सोपा आणि परिणामकारक नव्हे काय ? हा पर्याय स्वीकारल्याने जास्त गरिबांचे आणि गरजूंचे अधिक कल्याण कार्यदक्षतेने साधता येणार नाही काय ? उपलब्ध यंत्रणाच कार्यदक्ष बनविण्याचा पर्याय नव्या अकार्यदक्ष आणि अतिखर्चिक योजनांपेक्षा अधिक फलदायी वाटत नाही काय ?

झुणका-भाकर योजनेची परिणामकारकता आणि भविष्यकालीन वाटचाल ही वरील प्रश्नांची उत्तरे आपण काय देतो यावर बव्हंशी अवलंबून राहील हे स्पष्ट आहे. गरिबांचा कळवळा दाखवून अर्थकारणाच्या माध्यमातून राजकारणाचा मार्ग मोकळा करून घेतला जाणार नाही ना अशी शंकाही वक्त्यांनी व्यक्त केली. जाताजाता एका गोष्टीबद्दल थोडा सबुरीचा सल्लाही देण्यात आला. योजना नुकतीच सुरू झाली आहे, तिच्या प्रगतीची पाउले कशी पडतात हे अजमावयाला काही थोडा अवधी जाणे जरूर आहे. मगच तिचे यथोचित मूल्यमापन करणे न्याय्य ठरेल; घाईघाईने अनुकूल वा प्रतिकूल निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. दरम्यानच्या कालात, अर्थशास्त्रातील संशोधकांनी या योजनेचा अभ्यास व्यष्टीय पातळीवर करून वस्तुस्थितीचे यथार्थ दर्शन घडविणे भविष्यकालीन निर्णयासाठी खचितच उपयुक्त ठरेल.

□ □

# ‘अर्थसंवाद’, वार्षिक अहवाल : 1994–95

रवीन्द्र दोशी *

सन 1994–95 हे ‘अर्थसंवाद’चे अठरावे वर्ष. मराठी अर्थशास्त्र परिषदेची मुहूर्तमेढ रोवताच एक महत्त्वाचा उपक्रम म्हणून आपण ‘अर्थसंवाद’ हे विद्यानिष्ठ त्रैमासिक सुरू केले आणि गेली अठरा वर्षे ते अखंड प्रकाशित होत राहिले आहे. ही गोष्ट खचितच गौरवास्पद मानावयाला हवी. प्रादेशिक भाषेतून चालणारी विद्यानिष्ठ नियतकालिके आकाराने वाढणे आणि त्यांच्या प्रकाशनात सातत्य राहणे या दोन्हीही बाबी आजकाल तशा जिकिरीच्याच आहेत. असे असूनही आपण नुसतेच तग धरून बसलो आहोत असे नाही तर या क्षेत्रात आपण शक्य ती धडपड करून पाय घट्ट रोवून उभे आहोत. ‘अर्थसंवाद’च्या अठराव्या वर्षाचा अहवाल सादर करताना माझ्या मनात अशी प्रतिक्रिया उभी राहते.

‘अर्थसंवाद’ आता चांगलाच स्थिरावला आहे याचे खचितच आपणाला समाधान आहे. तथापि त्याची वाटचाल जेवढी सहजपणाने व्हावयाला पाहिजे तशी मात्र ती होत नाही याकडे मी सर्व संबंधितांचे लक्ष वेधू इच्छितो. आपल्या त्रैमासिकाच्या प्रत्येक अंकाची पृष्ठसंख्या साधारणतः 100 राहून वर्षभरातील एकंदर पृष्ठसंख्या 400 च्या जवळपास असावी असा आपला मनोदय आहे. त्यादृष्टीने 1990–91 पासून आपण दमदारपणाने वाटचाल करून 1993–94 मध्ये आपले उद्दिष्ट गाठले. याबद्दल गतवर्षीच्या अहवालात मी समाधान व्यक्त केले होते. तसेच या पृष्ठसंख्येला आपण सध्या तरी स्थिरावणार आहोत हेही स्पष्ट केले होते. या पार्श्वभूमीवर 1994–95 या वर्षातील आपली कामगिरी दोन पावले मागे नेणारी आहे. चारही अंकांची मिळून पृष्ठसंख्या 374 होती, एवढेच नव्हे तर, पहिला अंक जेमतेम 72 पानांचा, दुसरा 82 पानांचा, तिसरा 100 पानांचा आणि चौथा 120 पानांचा याप्रमाणे पृष्ठसंख्येत मोठीच विषमता निर्माण झाली. एकंदर 400 पानांचे लक्ष्य गाठण्यासाठी तिसरा आणि चौथा अंक मोठा करण्याचा प्रयत्न करूनही अपेक्षित लक्ष्य गाठता आले नाही ! याचे मुख्य कारण

* प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, ‘अर्थसंवाद’.

म्हणजे छापण्यायोग्य पुरेसा मजकूर पहिल्या सहामाहीत हाती नव्हता. यावरून, अजूनही आपणाला लेखक शोधावे लागतात. आपणहून लेख पाठविण्याचा विचार लोप पावत चालला आहे की काय असे आता वाटू लागले आहे. तथापि त्याहूनही अधिक म्हणजे, संपाद–कांनी लेख पाठविण्यासाठी पत्रे लिहूनही त्याना त्याबाबतीत निराशा पदरी पडते. खरे तर शक्य तेवढ्या जास्त लेखकांना वाव मिळावा म्हणून आपण अंकाची पृष्ठसंख्या वाढवीत राहिलो. आता लेखन नाही म्हणून अंक लहान राहतो आणि त्याच्या प्रकाशनाचे संकल्पित वेळापत्रक चुकते. लेखकांच्या अभिव्यक्तीला चालना मिळावी या इराद्याने परिषदेने 'अर्थसंवाद'चा प्रपंच उभा केला खरा. परन्तु अठरा वर्षे उलटली तरी अजूनही संपादकांना लेखक शोधावे लागावे आणि छपाई–योग्य साहित्याची प्रतीक्षा करावी लागावी म्हणजे आपल्या उद्दिष्टाचा पराभव आहे असे मानले तर वावगे ठरू नये. आमच्या लेखक बांधवांनी आपली निष्क्रियता सोडून देऊन आपले योगदान 'अर्थसंवाद' साठी सातत्याने देऊ करावे अशी माझी सर्वांना नम्रपूर्वक आणि आग्रहाची विनंती आहे. आपल्या सक्रिय सहका–र्याची मी अपेक्षा करतो.

अठराव्या खंडाने वाचकांना कायकाय दिले त्याचा थोडक्यात आढावा घेऊ या. चारही अंकांत मिळून 14 स्वतंत्र लेख, 1 अध्यक्षीय भाषण, 1 ग्रंथ परीक्षण, 3 सांख्यिकी पुरवण्या, 5 अधिवेशन वृत्तांत, 6 अधिवेश–नातील विषयांच्या रूपरेषा, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनांसंबंधीचा 1 तक्ता आणि लेख व लेखक सूची असा विविध प्रकारचा मजकूर छापला. यामध्ये पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान आणि दोन अनुवादित लेख समाविष्ट आहेत. प्रतिवर्षी अर्थशास्त्रातील 'नोबेल' पारितोषिक मिळविणाऱ्या व्यक्तींच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारा लेख ऑक्टोबर–डिसेंबर अंकात देण्याची प्रथा मी 1990–91 पासून सुरू केली होती. ती या वर्षात खंडित झाली. पत्रे लिहूनदेखील हे लिहिणारा लेखक सापडला नाही! असाच काहीसा अनुभव ग्रंथ परीक्षणाच्या बाबतीतला आहे. प्रत्येक अंकात किमान एक तरी ग्रंथ परीक्षण असावे असा अंकाचा आकृतीबंध ठरविला खरा. परंतु लिहिण्याबद्दल सुचवून, ग्रंथ पाठवूनदेखील अनेकदा संपादकांच्या पदरी निराशाच आली आहे. आणखी एक बाब प्रकर्षाने आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. वार्षिक अधिवेश–नातील चर्चासत्रांचा गोषवारा 'अर्थसंवाद' मध्ये छापण्याचा प्रघातही मी सुरू केला. बेळगांव येथील अठराव्या अधिवेशनातील दोन चर्चासत्रांचे अहवाल अनेकदा पत्रव्यवहार करूनदेखील सूत्रसंचालकांनी न पाठविल्याने ते 'अर्थसंवाद' मध्ये छापता आले नाहीत. तसा उल्लेखही मी त्या सदराच्या अखेरीस केला आहे. सूत्रसंचालकांचे अहवाल संपादकांना उपलब्ध करून देण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित सूत्रसंचालकांची असते, आणि ते उपलब्ध होतील याची खातरजमा करण्याचे काम अध्यक्षांचे असते. इतःपर पुढे अशी त्रुटी राहणार नाही हे सर्व संबंधितांनी पाहावे अशी माझी विनंती आहे. उणिवांची जाणीव व्हावी हीच इच्छा. या वर्षभरातील मजकूर पुरविण्यात 31 लेखकांचे योग–दान लाभले ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब आहे.

अंकांचे वितरण गतवर्षीप्रमाणे या वर्षातदेखील कोल्हापूर येथूनच झाले. त्यामुळे अंक छपाईनंतर लव–कर वाचकांपर्यंत पोचविणे शक्य झाले. त्याचप्रमाणे चारही अंक ज्या त्या तिमाहीच्या अखेरीपर्यंत प्रकाशित होऊ शकले. मात्र हे वेळापत्रक सांभाळण्यासाठी पहिल्या दोन अंकांच्या निर्धारित पृष्ठसंख्येवर पाणी सोडावे लागले हे लक्षात असू द्यावे.

'अर्थसंवाद'च्या प्रत्येक अंकाच्या 1,000 प्रती सध्या आपण छापतो आहोत. एप्रिल–जून 1993 च्या अंकापासून याची सुरुवात झाली. पुढील काळात 'अर्थ–संवाद'ची मागणी वाढून प्रतींची संख्या वाढवावी लागेल असा आशावाद होता. सदस्यांच्या संख्येत आणि 'अर्थसंवाद'च्या वर्गणीदारांमध्ये वाढ होत जाऊन उत्तरोत्तर अधिकाधिक प्रती छापाव्या लागतील अशी अटकळ होती. परंतु ती फोल ठरली आहे.

परिषदेच्या आजीव सदस्यांची संख्या वाढते आहे; त्याचवेळी 'अर्थसंवाद'च्या वार्षिक वर्गणीदारांची संख्या घटते आहे. त्यामुळे आजही आपण 1,000 प्रतींच्या संख्येला चिकटून आहोत एवढेच नव्हे तर यापेक्षा कमी प्रती छापण्याचा प्रसंग आज उद्भवला आहे! संपूर्ण महाराष्ट्रात केवळ 150 शिक्षण संस्थांकडूनच 'अर्थ–संवाद'ची वर्गणी येते ही घटना विवंचना करण्यासारखी आपणाला वाटत नाही काय? याबद्दल प्रत्येक अधिवे–शनांत आपण बोलत राहतो, सदस्यांना आवाहन करतो,

प्रत्यक्षात पदरी माप पडतच नाही. प्रत्येक सदस्याने आपल्या शिक्षण संस्थेच्या ग्रंथालयात 'अर्थसंवाद' येत राहील याबद्दल जागरुकतेने प्रयत्न करण्यात कोणता अडसर आहे ते समजत नाही. सदस्यांकडून प्रयत्नच होत नाहीत असे नाईलाजाने म्हणावे लागते. यापेक्षाही अधिक म्हणजे जेवढे वर्गणीदार आहेत त्यांच्या वर्गणीचे नूतनीकरणही सत्वर होत नाही. संपूर्ण वर्षभर, अगदी मार्चपर्यंतही, वर्गणी येत राहते. हे कसे सुधारावयाचे याचा सर्वांनीच गंभीरपणाने विचार करावयाला हवा. 'अर्थसंवाद' निर्माण करण्यामागची उद्दिष्टे साध्य व्हावयाची असतील आणि 'अर्थसंवाद' हे उपयुक्त नियतकालिक ठरावयाचे असेल तर तो महाराष्ट्रात तरी सर्व महाविद्यालयांच्या ग्रंथालयात पोचावयाला हवा. तिथून तो राज्यातील असंख्य विद्यार्थ्यांपर्यंत नेता येणे शक्य होणार आहे. यासाठी सदस्यांकडून ठोस कार्याची अपेक्षा आहे. प्रत्येकाने हे आपले वार्षिक कर्तव्य जाणीवेने पार पाडले तर ते परिषदेला आपले अत्यंत भरीव योगदान ठरणार आहे. आपण ही छोटीसी अपेक्षा पूर्ण कराल काय ?

आता 'अर्थसंवाद' संबंधीचा सांख्यिकी तपशील पाहू या. तो खालील तक्त्यात दिला आहे,

तक्त्यातील माहितीच्या अनुषंगाने पुढील बाबी ध्यानात घ्याव्यात. 1994–95 या अहवाल वर्षात –

(1) चारही अंकांचा एकंदर खर्च गतवर्षीच्या जवळ–पास असला तरी पृष्ठांची संख्या कमी होती; ती जर चारशेहेच्या आसपास पोचली असती तर हा खर्च यापेक्षा अधिक झाला असता;

(2) दर नगाच्या छपाई खर्चात अल्पशी वाढ झाली आहे; छपाई कागदाची किंमत 380 रुपये रीम-वरून 420 रुपये रीमपर्यंत गेल्याने ही वाढ झाली आहे;

(3) असे असले तरी दर पानाचा छपाई खर्च 18 पैशांवरच स्थिरावला आहे.

(4) जाहिरातीपासूनचे उत्पन्न गतवर्षीपेक्षा जास्त आहे; एप्रिल–जून 1995 अंकातील आवरण पृष्ठ 3 कोरे राहिले नसते तर एकंदर उत्पन्न 20,500 रुपयांपर्यंत पोचले असते.

थोडक्यात, छपाईच्या बाजूचा तोल बराचसा सांभाळला गेला आहे. एक गोष्ट मात्र पुन्हा एकदा स्पष्ट करा–वयाला पाहिजे 'अर्थसंवाद'च्या आवरण पृष्ठाची तीनही पाने जाहिरातीने भरलेली असावयाला हवीत याची काळजी सर्व संबंधितांनी केलीच पाहिजे. त्यापैकी एकही पान कोणत्याही अंकात कोरे राहता कामा नये. तसे राहिल्यास 'अर्थसंवाद'चे अर्थशास्त्र बिघडते. त्यामुळे केवळ 'अर्थसंवाद'ची देयके भागविण्यात अड–चण येते एवढेच नसून अनुदाने मिळवितानाही आपण लंगडे पडतो. आपले नियतकालिक शक्य तेवढे स्वाव–लंबी बनविण्याकरिता आपण किती कसोशीने प्रयत्न केले आहेत याबद्दल खात्री करून दिल्यासच अनुदान देणाऱ्या संस्था आपल्या अनुदानाच्या मागणीचा सहानु-भूतीने विचार करतात असा अनुभव आहे. प्रत्यक्षात, परिषदेच्या कार्यकारी मंडळातील सर्व सदस्यांनी जाहि-राती मिळवून द्यावयाच्या आहेत असे वारंवार समक्ष आणि पत्राने कळवूनदेखील अहवाल वर्षात कार्यकारी

| तपशील | 1990–91 (खंड 14) | 1991–92 (खंड 15) | 1992–93 (खंड 16) | 1993–94 (खंड 17) | 1994–95 (खंड 18) |
|---|---|---|---|---|---|
| 1 चारही अंकांच्या एकूण प्रती | 3,200 | 3,450 | 3500 | 4,000 | 4,000 |
| 2 चारही अंकांची एकूण पृष्ठे | 302 | 358 | 388 | 404 | 374 |
| 3 चारही अंकांचा एकूण खर्च (रु.) | 37,999 | 48,591 | 61,862 | 71,075 | 71,303 |
| 4 दर नगाचा छपाई खर्च (रु.) | 11·87 | 14·08 | 17·67 | 17·77 | 17·83 |
| 5 दर पानाचा छपाई खर्च (रु.) | 0·15 | 0·15 | 0·17 | 0·18 | 0·18 |
| 6 जाहिरातीपासून उत्पन्न (रु.) | 16,900 | 16,500 | 20,500 | 15,500 | 19,000 |

मंडळावर निवडून आलेल्या एकाही सदस्याने जाहिरात मिळवून दिली नाही हे मला अत्यंत खेदाने नमूद करावे लागते. या मान्यवर सदस्यांनी सक्रिय बनून परिषदेच्या कार्याला या माध्यमातून हातभार लावण्याची आपली नैतिक जबाबदारी पार पाडायलाच हवी. यादृष्टीने परिषदेच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांच्या परिषदे-संबंधीच्या कामाचा अहवाल मागवून त्याची कार्यकारी मंडळाच्या बैठकीत शहानिशा करण्याची प्रथा सुरू करावयास हरकत नाही असे मी सुचवितो.

अहवाल वर्षात रवीन्द्र दोशी (संपादक, 'अर्थ-संवाद'), सुरेन्द्र भानुशाली (सहायक संपादक, 'अर्थ-संवाद',) रव्वाजासाहेब पठाण (अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद ), गुलाबराव तायडे ( कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद ), अंजली कुलकर्णी (सदस्य, सल्लागार मंडळ, 'अर्थसंवाद'), पुरुषोत्तम पाळंदे ( सदस्य, सल्लागार मंडळ, 'अर्थसंवाद' ) आणि आप्पासाहेब पुजारी ( आजीव सदस्य, मराठी अर्थशास्त्र परिषद ) यानीच जाहिराती मिळविण्याची जबाबदारी पेलली. सर्वांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे ज्या जाहिरातदारांनी आमच्या विनंतीला मान देऊन जाहि-राती दिल्या आणि आपल्या शैक्षणिक उपक्रमाला हातभार लावला त्यांचा मी ऋणी आहे.

'अर्थसंवाद' ची आर्थिक बाजू बळकट करण्यात या वर्षीही महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यानी अनुदान देऊन हातभार लावला याबद्दल आम्ही या दोन्हीही संस्थांचे उतराई आहोत.

आधी केले आणि मग सांगितले या न्यायाने 'अर्थसंवाद'ला आणखी आर्थिक बळ देण्यासाठी मी जे प्रयत्न अलीकडेच केले आहेत त्याची आपणाला माहिती देतो. विद्यापीठ अनुदान मंडळाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून 'अर्थसंवाद'च्या प्रकाशनासाठी अनुदान मिळावे यासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे मी एक मागणी सादर केली होती. मला आपणास सांगण्यास आनंद वाटतो की, शिवाजी विद्या-पीठाच्या संबंधित समितीने माझी मागणी मान्य करून सन 1994-95, 1995-96 आणि 1996-97 या तीन वर्षांकरिता दरसाल 7,500 रुपयांचे अनुदान 'अर्थसंवाद' करिता मंजूर केले आहे. शिवाजी विद्या-पीठाचे आपण ऋणी आहोत.

दुसरा प्रयत्न म्हणजे जाहिरातीच्या माध्यमातून सातत्याने मिळू शकणाऱ्या निधीची व्यवस्था करणे. 'अर्थसंवाद'च्या एखाद्या आवरण पृष्ठाकरिता सलग 8 ते 10 जाहिराती कुणाकडून मिळू शकतील का असा प्रयत्न होता. यादृष्टीने संभाव्यता म्हणून परिषदेचे आजीव सदस्य आणि नॅशनल इन्शुअरन्स अॅकॅडेमी, पुणे या संस्थेचे संचालक पुरुषोत्तम पाळंदे यांच्याशी बोलणे केले. त्यांनीही मला लगेच प्रतिसाद दिला. त्यांच्या विशेष प्रयत्नामुळे आणि पुढाकारामुळे आयुर्विमा महा-मंडळाने 'अर्थसंवाद'च्या मलपृष्ठासाठी पुढील 8 अंकांकरिता प्रत्येकी रु. 3,000/- ची जाहिरात देण्याचे मान्य केले आहे. याबद्दल पुरुषोत्तम पाळंदे आणि आयु-र्विमा महामंडळ याना मनःपूर्वक धन्यवाद.

या दोन्ही घटनांतून परिषदेच्या सदस्यांना काम करण्यासाठी स्फूर्ती मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती अनाठायी ठरू नये. सदस्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात यादृष्टीने काही भरीव कार्य केल्यास त्याचे स्वागतच होईल.

'अर्थसंवाद'ची वर्षभराची जबाबदारी पार पाडताना मला परिषदेचे अध्यक्ष रव्वाजासाहेब पठाण, कार्याध्यक्षा नलिनी पंडित, कार्यवाह-खजिनदार गुलाब-राव तायडे, सहायक संपादक सुरेंद्र भानुशाली आणि व्यंकटेश पाटणकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले. 'अर्थसंवाद'च्या छपाईचे काम तत्परतेने आणि सुबक करून देण्यात 'हेमंत मुद्रण', कोल्हापूरचे मालक सुनील नसिराबादकर आणि त्यांचे सहकारी श्री. मोहन वंशे, श्री. शंकरराव रजपूत, श्री. सुभाष साळोखे, श्री. रघुनाथ घोडके, व श्री. अनंत साळोखे यानी नेहमीच आस्था दाखविली. या सर्वांचे मी हार्दिक आभार मानतो.

शेवटी सर्वांना कळकळीची आणि नम्र विनंती. 'अर्थसंवाद' जास्तीत जास्त शिक्षण संस्था आणि इतर संस्था यांच्यापर्यंत पोचेल यासाठी थोडीशी खटपट करा; 'अर्थसंवाद'ची आर्थिक बाजू भक्कम करण्या-साठी आपापल्या परीने हातभार लावा. 'अर्थसंवाद'ला मजकुराची कमतरता भासणार नाही यासाठी प्रयत्न-शील राहा.

☐ ☐

# एकोणिसाव्या वार्षिक अधिवेशनाचा कार्यवृत्तांत

**गुलाबराव तायडे ***

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एकोणिसावे वार्षिक अधिवेशन पुणे येथे दिनांक 4, 5 आणि 6 नोव्हेंबर, 1995 रोजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ या अभिमत विद्यापीठाच्या विद्यमाने पार पडले. प्रा. शि. ना. माने हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

## पत्रकार परिषद, उद्‌घाटन आणि अध्यक्षीय भाषण

दिनांक 2 नोव्हेंबर, 1995 रोजी सकाळी 11 वाजता विद्यापीठ कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी शहरातील प्रमुख वृत्तपत्रांचे पत्रकार उपस्थित होते. यावेळी परिषदेच्या स्थापनेमागील भूमिका, मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे प्रकाशित केले जाणारे 'अर्थसंवाद' हे त्रैमासिक आणि त्यामध्ये येणारे लेख, परिषदेची वार्षिक अधिवेशने आणि त्यात चर्चेला येणारे विषय, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणारा स्व. जमनालाल बजाज स्मृती उपक्रम आणि कै. पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यानमाला, परिषदेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेली विविध प्रकाशने, इत्यादी– विषयीची माहिती परिषदेचे ज्येष्ठ सदस्य डॉ. पाटणकर यांनी दिली. यावेळी स्थानिक संयोजन समिती सदस्य, विद्यापीठाच्या अधिष्ठाता आणि संचालक डॉ. हिरा अद्यंताया उपस्थित होत्या. स्थानिक कार्यवाह डॉ. बाळकृष्ण कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

अधिवेशनाचा उद्‌घाटन सोहळा दिनांक 4 नोव्हेंबर, 1995 रोजी सकाळी विद्यापीठाच्या सभागृहात झाला. परिषदेचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री श्री. शशिकांत सुतार यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी आपल्या स्वागतपर भाषणात महाराष्ट्राच्या व देशाच्या आर्थिक इतिहासाचा अभ्यास अर्थतज्ज्ञांनी करावा अशी सूचना केली. ते म्हणाले, या विषयावर पाश्चिमात्य लोक

* कार्यवाह–खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, नाशिक.

संशोधन करीत असले तरी आपल्याकडे गोंधळाची परिस्थिती आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेनेच पुढाकार घ्यावयाला हवा. समाजकारण, अर्थकारण व राजकारण या विषयात पुणे शहर आघाडीवर होते. आर्थिक इतिहास लिहिला गेल्यास या क्षेत्रातील महत्त्वाची माहिती पुढे येईल अशी अपेक्षा त्यानी या प्रसंगी व्यक्त केली.

स्थानिक कार्यवाह डॉ. बाळकृष्ण कुलकर्णी यानी अध्यक्षांचा व पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्री. शशिकांत सुतार यांच्या हस्ते प्रा. सी. वि. सोवनी यानी लिहिलेल्या 'अर्थ मीमांसा : वैज्ञानिक की कलात्मक ?' आणि डॉ. बाळकृष्ण कुलकर्णी लिखित 'कृषी अर्थ-पुरवठ्याचे अर्थकारण' या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

परिषदेचे उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री श्री. शशिकांत सुतार यानी आपल्या उद्घाटनपर भाषणात सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक विषयांवर मूलगामी स्वरुपाचे संशोधन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, अधिवेशनातील अर्थतज्ज्ञांनी महाराष्ट्र स्वयंपूर्ण होण्यासाठी शासनाला मार्गदर्शन करावे; पिण्याचे पाणी, झुणका-भाकर, नगदी पिके, फलोत्पादन आदी विषयांवर संशोधन करावे; शासन यासाठी पूर्ण सहकार्य करेल.

अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. शि. ना. माने यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय 'भारतातील ऊस किंमत धोरण (उसाच्या किंमतीचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र)' असा होता. यावेळीं बोलताना ते म्हणाले की, साधन-संपत्तीची विल्हेवार हे किंमत धोरणाचे मूलभूत उद्दिष्ट आहे. सर्वसाधारण अर्थव्यवहाराचे किमान ज्ञान असणारे लोक जेव्हा अर्थशास्त्र काबीज करून लोकानुनय करतात, वचननामे व हुकुमनामे काढण्याचा सपाटा सुरू करतात तेव्हा गोंधळ उडतो आणि साधनसंपत्तीची नासधूस सुरू होते. अलीकडे कर्जमाफी, स्वस्त तांदूळ, ज्वारी आणि मोफत भोजन असे वचननामे जाहीर झाले आहेत. त्यातच ऊस व कापसाच्या खरेदीच्या घोषणा राजकीय हटवादापायी केल्या जात आहेत. त्यामुळे ऊस उद्योगाची हानीच होणार आहे.

गेल्या साठ वर्षांत उसाची किंमत, त्यातील शर्करांश व साखर उतारा यांच्यातील हरवलेला दुवा प्रस्थापित करण्याचे अनेक प्रयत्न झाले. असा संदर्भ देऊन ते म्हणाले, सांख्यिकी कसरती करून अंदाज बांधण्याचे काम तज्ज्ञ समित्यांकडून सुखासुखी झाले नाही. त्यासाठी पैशातील व बौद्धिक त्याग सहन करावा लागला आहे. दुर्दैवाने या अभ्यासातील निष्कर्षांची व शिफारसींची कार्यवाही होऊ शकलेली नाही. उसाची उत्पादकता, त्यातील शर्करांशाचे प्रमाण व साखर उतारा याबाबत म्हणूनच निराशाजनक परिस्थिती दिसते. त्यामुळे त्यात सुधारणा करण्याचा प्रश्न उसाच्या किंमत प्रोत्साहनापुरता मर्यादित ठेवता येणार नाही. उसाची किंमत लवचिकता 0·34 ते 0·39 या टप्प्यात असते. म्हणून उत्पादनास आवश्यक ठरणाऱ्या पाणी, बीज, खते यांच्या वापराचाही अभ्यास होणे गरजेचे आहे. शेतीमालाच्या एकरी उत्पादन वाढीसाठी जलसिंचन सुविधा व तंत्रविद्या यांच्या माध्यमातून संख्यात्मक बदल करण्याची आवश्यकता आहे.

## चर्चासत्रे

पूर्वनियोजित विषयांवर चर्चासत्रे हा अधिवेशनाचा महत्त्वाचा भाग असतो. यंदा एकूण चार चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. स्वीकारलेल्या निबंधांची संख्या सतरा होती. दरवर्षीच्या तुलनेत या वर्षी निबंधांची संख्या कमी होती. नियुक्त करण्यात आलेल्या सूत्रसंचालकांनी आपापल्या विषयावरील निबंधांचे परिशीलन करून, त्यातील प्रतिपादनाचा आशय लक्षात घेऊन, त्यांचे सोयीस्कर वर्गीकरण करून त्यातील ठळक मुद्दे आणि निष्कर्ष यावर आधारलेले टिपण त्या त्या चर्चासत्राच्या प्रारंभी प्रास्ताविकादाखल सादर केले. चर्चेमध्ये नेटकेपणा आणि शिस्त राखण्याच्या दृष्टीने ही व्यवस्था उपयुक्त ठरत असल्याचा पुन्हा एकवार प्रत्यय आला. चर्चासत्रांच्या अध्यक्षस्थानी प्रा. शि. ना. माने होते.

पहिले चर्चासत्र 4 नोव्हेंबर, 1995 रोजी दुपारी आयोजित करण्यात आले. 'आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धान्तातील नवे प्रवाह' या विषयावरील चर्चासत्राचे सूत्रसंचालक म्हणून डॉ. शं. के. मोडक यानी काम पाहिले. या चर्चासत्रात एकूण चार निबंध सादर कर-

ण्यात आले. यामध्ये डॉ. दि. व्यं. जहागिरदार, डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार, डॉ. विजय शिवराम साठे, प्रा. उमेश राजदेरकर यांचा समावेश होता. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये डॉ. सहस्रबुद्धे, डॉ. खांदेवाले, प्रा. गोडबोले, डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ. गुलाब मोहिते, डॉ. रवीन्द्र दोशी, डॉ. रमेश बेराड, डॉ. दि. व्यं. जहागिरदार, डॉ. कल्याणकर, डॉ. मुणगेकर, डॉ. कैलास बवले, डॉ. धाणेकर, डॉ. श्री. आ. देशपांडे, डॉ. इंद्रजित आलटे, प्रा. वि. स. कुलकर्णी, प्रा. रमेश देव, प्रा. दिलिप पाटील, प्रा. सौ. सुनंदा अत्रे, प्रा. जे. जी. जाधव, श्री. शरदचंद्र जोग, श्री. सुधीर केणी यानी आपले विचार व्यक्त केले. चर्चेत व्यक्त करण्यात आलेल्या मतांचा परामर्श घेऊन डॉ. शं. के. मोडक यानी या चर्चासत्राचा समारोप केला.

दुसरे चर्चासत्र 5 नोव्हेंबर, 1995 रोजी सकाळी पार पडले. 'भारतातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणा' हा चर्चेचा विषय होता. डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार सूत्रसंचालिका होत्या. प्रारंभी त्यानी या विषयासंबंधी सविस्तर विवेचन करून संपूर्ण पार्श्वभूमी विशद केली या चर्चासत्रात सादर करण्यात आलेल्या निबंधांची संख्या 6 होती. डॉ. बाळकृष्ण कुलकर्णी, डॉ. बापट, डॉ. अष्टूरकर, डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. स. न. कुलकर्णी, डॉ. र. रा. बेराड, डॉ. विनायक देशपांडे यानी आपले निबंध सादर केले. पहिल्या चर्चासत्राप्रमाणेच याही चर्चासत्रात प्रतिनिधींचा सहभाग चांगला होता. डॉ. मुणगेकर, डॉ. खांदेवाले, डॉ. सहस्रबुद्धे, डॉ. बुरंगे, डॉ. इंद्रजित आलटे, डॉ. जुगळे, डॉ. पठाण, डॉ. शं. के. मोडक, डॉ. पाटील, डॉ. धाणेकर, डॉ. दास्ताने, प्रा. कैलास पाटील, प्रा. भालेराव, प्रा. अष्टेकर, श्री. मुकेश चोथाणी, डॉ. एस. वाय. पाटील. इत्यादींनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी झालेल्या चर्चेत प्रतिनिधींची संख्या मोठी असल्याने साहजिकच या विषयावरील विविध मते प्रतिनिधींना ऐकावयास मिळाली डॉ. मुक्ता जहागिरदार यांच्या समारोपानंतर हे चर्चासत्र संपले.

तिसरे चर्चासत्र दुपारी आयोजित करण्यात आले. या चर्चासत्राचा विषय 'महाराष्ट्रातील अर्थशास्त्राचे विद्यापीठीय अभ्यासक्रम : सुधारणा व पुनर्रचना' असा होता. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. व्यं. सु. पाटणकर यानी केले. या चर्चासत्रातील निबंधांची संख्या सात होती. निबंध सादर करणाऱ्या प्रतिनिधींमध्ये डॉ. एस वाय. पाटील, डॉ. दि. व्यं. जहागिरदार, डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ. श्रीराम पेडगांवकर, श्री. सी. पं. खेर, डॉ. बागलकोट, डॉ. खोकले यांचा समावेश होता. यावेळी झालेल्या चर्चेत प्रा. ठक्कर, प्रा. लिमये, प्राचार्य शितोळे, प्रा. गोडबोले, डॉ. दास्ताने, डॉ. रूपा शहा, डॉ. पेठे, डॉ. सुधा मोकाशी, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. धोंगडे, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. कल्याणकर, डॉ. रवीन्द्र दोशी, डॉ. सहस्रबुद्धे, प्रा. नी. वि. सोवनी, प्रा. सौ. शुभदा वझे, प्रा. दिलिप पाटील, श्री. सुधीर केणी इत्यादींनी भाग घेतला. या विषयावरील चर्चासत्रातील चर्चा अत्यंत अभ्यासपूर्ण व उद्बोधक झाली. डॉ. पाटणकर यांच्या समारोपानंतर हे चर्चासत्र संपले.

आयत्या वेळेच्या विषयावरील चर्चासत्र दि. 6 नोव्हेंबर 1995 रोजी सकाळी आयोजित करण्यात आले. 'महाराष्ट्रातील झुणका-भाकर योजना : उत्पत्ती, प्रयोजन, प्रश्न व पर्याय' असा विषय अध्यक्षांनी मुक्रर केला होता. प्रथेप्रमाणे आयत्या वेळेच्या विषयावर निबंध सादर केले जात नाहीत; फक्त चर्चा घडवून आणली जाते. चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. रवीन्द्र दोशी यानी केले. या विषयावरील चर्चेचा उपोद्घात डॉ. खांदेवाले, डॉ. मुणगेकर, डॉ. दास्ताने आणि डॉ. पुजारी यानी केला चर्चेत प्रा. गोडबोले, श्री. शरदचंद्र जोग, श्री. सुधीर केणे, प्रा. सुभाष दगडे, प्रा. व्ही. जी. मानकर प्रा. वि. स. कुलकर्णी, डॉ. रूपा शहा, प्रा. ठक्कर, डॉ. पठाण, डॉ. जहागिरदार, डॉ. निरगुडे, डॉ. अष्टेकर, प्रा. जाधव, प्रा. गुजर यानी भाग घेतला. चर्चेत मांडलेल्या मतांचा परामर्श घेऊन डॉ. रवीन्द्र दोशी यानी चर्चासत्राचा समारोप केला.

**कार्यकारी मंडळाच्या सभा**

अधिवेशन कालात परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या दोन सभा दिनांक 3 नोव्हेंबर आणि 4 नोव्हेंबर, 1995 रोजी भरविण्यात आल्या. या दोन्ही सभांच्या अध्यक्षस्थानी प्रा. शि. ना. माने होते. सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन खालील निर्णय घेण्यात आले.

(1) दिनांक 1 जानेवारी व 2 जानेवारी,

1995 रोजी साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटी संचलित राणी पार्वती देवी महाविद्यालय, बेळगांव यांच्या विद्यमाने आशिर्वाद मंगल कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या आणि दिनांक 30 जुलै, 1995 रोजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे झालेल्या सभांच्या कार्यवृत्तांतास मंजुरी देण्यात आली.

(2) कार्यवाह – खजिनदारांनी सादर केलेला 1994-95 चा वार्षिक अहवाल संमत करण्यात आला.

(3) 'अर्थसंवाद'चे प्रमुख संपादक डॉ. रवीन्द्र दोशी यांनी 1994–95 चा 'अर्थसंवाद'चा अहवाल सादर केला. या अहवालातील महत्त्वपूर्ण बाबींकडे त्यांनी सदस्यांचे लक्ष वेधले. जाहिराती मिळविण्याबाबत अधिक नेटाने प्रयत्न होण्याची गरज, अधिक लेखन साहाय्य मिळण्याची अपेक्षा, 'अर्थसंवाद'चे सभासद व वर्गणीदार वाढविण्याची आवश्यकता, परिषदेच्या कार्यकारी मंडळावर निवडून येणाऱ्या सदस्यांनी आजीव सभासद आणि जाहिराती मिळविण्यासाठी घ्यावयाची जबाबदारी इत्यादी बाबींवर चर्चा होऊन 1994–95 च्या अहवालास मान्यता देण्यात आली.

(4) लेखापालांच्या 1994–95 या वर्षाच्या तपासणी हिशेबास आणि 1996–97 या वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली.

(5) मेसर्स चांडक अँन्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांची 1995–96 या वर्षासाठी परिषदेचे लेखापाल म्हणून नियुक्ती व्हावी आणि त्यांना पाचशे रुपये मेहेनताना देण्यात यावा अशी शिफारस वार्षिक साधारण सभेला करण्याचे ठरले.

(6) कै. प्रा. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यानमालेचे (सातवे पुष्प) आयोजन डॉ. के. जी. पठाण यांनी भारती विद्यापीठाच्या वतीने यशवंतराव चव्हाण समाज विज्ञान आणि अनुसंधान संस्थेमार्फत करण्याचे निश्चित झाले.

(7) स्व. जमनालाल बजाज स्मृती उपक्रमाबाबत चर्चा होऊन 1995–96 या वर्षाचा उपक्रम नाशिक येथील के. टी. एच. एम. महाविद्यालयात आयोजित करण्यासंबंधी कार्याध्यक्ष व कार्यवाहांनी संबंधितांशी संपर्क साधून निर्णय करावा असे ठरले.

(8) कार्यकारिणीवर 1995–96 या वर्षासाठी दोन सदस्यांची नियुक्ती करण्यासंबंधात डॉ. मुक्ता जहागिरदार, अमरावती आणि प्रा. ज्योत्स्ना राजपूत, मुंबई यांची वर्षारंभी टपालाच्या माध्यमातून निवड करण्यात आली होती त्याची नोंद घेण्यात आली.

(9) मुंबई येथील 'सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज' मधील श्रीमती संजीवनी सावंत आणि श्रीकांत कदम यांचे बहुमोल साहाय्य परिषदेला गेली अनेक वर्षे लाभलेले आहे. त्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञतापूर्वक नोंद घेण्यात आली.

(10) भावे पारितोषिकासाठी उत्कृष्ट लेखाची निवड करण्याच्या त्रिसदस्य समितीतून 'अर्थसंवाद'च्या संपादकांना वगळून त्याजागी वेगळ्या तज्ज्ञाची नियुक्ती करावी ही डॉ. रवीन्द्र दोशी यांची सूचना मान्य करण्यात आली.

(11) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे लेखापालांनी मान्य केलेले विवरण पत्र ( **audited statement** ) प्रतिवर्षी 'अर्थसंवाद'मध्ये छापावे असे ठरविण्यात आले.

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

मराठी अर्थशास्त्र परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 5 नोव्हेंबर, 1995 रोजी सायंकाळी 5·30 वाजता विद्यापीठ भवन, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथील सभागृहात भरविण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रा. शि. ना. माने होते.

सभेत पुढील कामकाज पार पडले.

(1) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक सदस्य व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थशास्त्रज्ञ आणि भूतपूर्व अध्यक्ष प्रा. वि. म. दांडेकर, तसेच परिषदेचे आजीव सदस्य प्रा. जीवराज गांधी, डॉ. तुकाराम नाईक आणि भूतपूर्व अध्यक्ष डॉ. वि. वि. बोरकर यांचे दुःखद निधन झाले. त्याबद्दल शोकप्रस्ताव संमत करून सभेने त्यांना श्रद्धांजली वाहिली.

(2) मंगळवार दिनांक 3 जानेवारी, 1995 रोजी साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटी संचलित राणी पार्वती देवी महाविद्यालय, बेळगाव यांच्या विद्य-

माने आशिर्वाद मंगल कार्यालय येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्तांतास मंजुरी देण्यात आली.

(3) कार्यवाह-खजिनदारांनी सादर केलेला परिषदेचा 1994–95 या वर्षाचा अहवाल सभेने मान्य केला.

(4) 'अर्थसंवाद' च्या प्रमुख संपादकांनी 'अर्थसंवाद' चा 1994–95 या वर्षाचा सादर केलेला अहवाल सभेने मान्य केला.

(5) परिषदेच्या सनदी लेखापालांनी तपासलेले परिषदेचे 1994–95 या वर्षाचे हिशेब आणि 1995–96 चा अर्थसंकल्प यांना सभेने मान्यता दिली.

(6) 1995–96 या वर्षासाठी परिषदेचे लेखापाल म्हणून मेसर्स चांडक अॅन्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांची नियुक्ती करण्यात यावी आणि त्यांना या कामाबद्दल पाचशे रुपये मेहनताना देण्यात यावा यास सभेने मंजुरी दिली.

(7) 1996–99 या तीन वर्षांच्या काला-वधासाठी कार्यकारी मंडळावरील तीन रिक्त जागांसाठी खालील सदस्यांची निवड करण्यात आली.

1 प्रा. नंदकिशोर सुंदा, अमरावती
2 प्रा. कृष्णराव माधवराव भोसले, सातारा
3 डॉ. बाळकृष्ण दत्तात्रय कुलकर्णी, पुणे

(8) अर्थशास्त्रावरील मराठीतील सर्वोत्कृष्ट ग्रंथाच्या लेखनासाठी ठेवलेले मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक यावर्षी प्रवेश पत्रिका न आल्यामुळे देण्यात आले नाही, असे सभेस सांगण्यात आले.

(9) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रासाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट निबंधासाठी ठेवण्यात आलेले कै. ग. प्र. पिंपरकर स्मृती पारितोषिक यंदा डॉ. विनायक देशपांडे, नागपूर यांच्या 'भारताच्या वित्तीय क्षेत्रातील सुधा-रणा–समस्या आणि धोके' या निबंधास देण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.

(10) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या एम. ए. (अर्थशास्त्र) एप्रिल–मे, 1995 च्या परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास द्यावयाचे 'मराठी अर्थशास्त्र परिषद–पाचवे अधिवेशन पारि-तोषिक' श्री. सुरेश कृष्णा नामदास, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना विद्यापीठाकडून देण्यात आले आहे अशी माहिती देण्यात आली.

(11) कै. पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान-मालेचे आयोजन मराठी अर्थशास्त्र परिषद आणि भारती विद्यापीठाची यशवंतराव चव्हाण समाज विज्ञान आणि संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक 26 ऑगस्ट, 1995 रोजी पुणे येथे करण्यात आले. यासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. माधव गोडबोले, भूतपूर्व सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार यांना निमंत्रित केले होते. 'मुक्त अर्थव्यवस्था आणि राज्य' हा त्यांचा व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुण्याचे डॉ. शरदचंद्र गोखले होते. याची माहिती सभेत देण्यात आली.

(12) स्व. जमनालाल बजाज स्मृती उपक्रमां-तर्गत 'समाजधारणा, स्त्री शक्ती व महात्मा गांधी' या विषयावर 26 फेब्रुवारी, 1995 रोजी मराठी अर्थशास्त्र परिषद आणि श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महा-विद्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. तारा भवाळकर, सांगली, श्रीमती सावित्री मदान, पुणे आणि श्रीमती इंदुमती पाटणकर, कासेगांव यांना निमंत्रित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. बाळासाहेब भारदे होते. ही माहिती सभेत सांग-ण्यात आली.

(13) सभेने डॉ. भ. ग. बापट, पुणे यांची 1996–97 या वर्षासाठी परिषदेचे आणि विसाव्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड केली.

(14) सभेने डॉ. व्यं. सु. पाटणकर, पुणे यांची 1996–99 या कालावधीसाठी परिषदेचे कार्याध्यक्ष म्हणून एकमताने निवड केली.

(15) सभेने डॉ. आ. गो. पुजारी, मंगळवेढा (जि. सोलापूर) यांची 1996–99 या कालावधीसाठी

परिषदेचे कार्यवाह–खजिनदार म्हणून एकमताने निवड केली.

(16) नोव्हेंबर, 1996 मधील मराठी अर्थ–शास्त्र परिषदेचे विसावे वार्षिक अधिवेशन प्रताप कॉलेज, अमळनेर येथे आयोजित करण्याचे ठरले.

(17) विसाव्या वार्षिक अधिवेशनातील चर्चा–सत्रांसाठी पुढील विषय निश्चित करण्यात आले :

(अ) एकोणिसाव्या शतकातील आर्थिक उदार-मतवाद आणि तत्कालीन भारतीय अर्थ–शास्त्र

(आ) भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचे स्थान

(इ) महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्याचे अर्थशास्त्र

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि परिषदेचे अध्यक्ष तो यथावकाश जाहीर करतील.

शेवटी, कार्यवाह–खजिनदार गुलाबराव तायडे यांनी परिषदेच्या वर्षभरातील विविध उपक्रमांमध्ये ज्या ज्या व्यक्ती आणि संस्था यांचे साहाय्य लाभले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले. त्यानंतर वार्षिक सर्व–साधारण सभा समाप्त झाली.

**'अर्थसंवाद' संपादन सल्लागार मंडळाची सभा**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या सल्लागार मंडळाची सभा दिनांक 3 नोव्हेंबर, 1995 रोजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आली.

सभेमध्ये पुढील कामकाज पार पडले :

(1) प्रमुख संपादकांनी 'अर्थसंवाद'च्या 1994–95 च्या वार्षिक अहवालातील प्रमुख मुद्यांकडे सद–स्यांचे लक्ष वेधले. अहवालावर चर्चा होऊन तो संमत करण्यात आला.

(2) 'अर्थसंवाद'च्या 1994–95 वर्षातील आर्थिक बाबींचा आढावा घेतला.

(3) 'अर्थसंवाद' साठी लेख मिळविण्याकरिता विशेष प्रयत्न करण्याचे ठरले.

(4) 'अर्थसंवाद' साठी प्रत्येक सदस्याने जाहिरात मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. डॉ. पुरुषोत्तम पाळंदे यांनी केलेल्या सहकार्याची विशेष नोंद घेण्यात आली.

(5) 'अर्थसंवाद'चे वर्गणीदार वाढविण्याची निकड स्पष्ट करण्यात आली.

(6) 'अर्थसंवाद'चे वितरण कोल्हापुरातून समाधान–कारकपणे चालू असल्याचे सांगण्यात आले.

(7) 'अर्थसंवाद'साठी प्रमुख संपादकांच्या प्रयत्नाने शिवाजी विद्यापीठाकडून 1994–95 या वर्षा–पासून तीन वर्षांकरिता प्रतिवर्ष रु. 7,500 प्रमाणे अनुदान मंजूर झाल्याचे प्रमुख संपादकांनी सांगि–तले. या कामाची विशेष नोंद घेण्यात आली.

**अधिवेशनाचा समारोप**

परिषदेच्या अधिवेशनाचा सांगता समारंभ दिनांक 6 नोव्हेंबर, 1995 रोजी दुपारी 12·30 वाजता महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रकाश जावडेकर यांच्या उपस्थितीत पार पडला. पुढील तीन वर्षांसाठी कार्याध्यक्ष म्हणून डॉ. व्यं. सु. पाटणकर आणि कार्यवाह–खजिनदार म्हणून डॉ. आ. गो. पुजारी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच निवृत्त होणारे पदाधिकारी कार्याध्यक्षा श्रीमती नलिनी पंडित आणि कार्यवाह–खजिनदार गुलाबराव तायडे यांना निरोप दिला. याप्रसंगी डॉ. पाटणकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रतिनिधींच्या वतीने डॉ. सु. गो. भानुशाली, कोल्हापूर आणि डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. परिषदेचे अध्यक्ष प्रा. शि. नो. भावे यांनी परिषदेच्या भावी वाट–चालीत अध्ययन, संशोधन, अध्यापन यांच्यातील उत्त–मांचा निश्चित स्वीकार होईल अशी अपेक्षा केली. स्थानिक कार्यवाह, बाळकृष्ण कुलकर्णी यांनी अधिवेश–नाच्या यशस्वीतेला हातभार लावणाऱ्या सर्व व्यक्ती व संस्था यांचे आभार मानले. परिषदेच्या वतीने कार्यवाह–खजिनदार गुलाबराव तायडे यांनी सर्व संबंधितांचे आभार मानले. त्यानंतर अधिवेशन समाप्त झाल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

□□

# विसावे वार्षिक अधिवेशन

## निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

(1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप–विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

(2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून आपण नवीन अर्थ ( interpretation ) लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

(3) जी माहिती एम. ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळी विश्लेषण निबंधात असू नये; कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

(4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक–सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

(5) निबंधातील वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

(6) निबंधात शक्य तो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

(7) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

(8) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल.

(9) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने दिलेली असावी.

(10) निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा.

## निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

### *भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचे स्थान*

**कुमुद पोरे** *

या विषयाची व्याप्ती सैद्धान्तिक, व्यावहारिक आणि आर्थिक विकासाच्या धोरणात्मक पातळीवर फार मोठी आहे त्यामुळे निबंध लिहिणाऱ्या अभ्यासकांना मोठा वाव आहे.

* अर्थशास्त्राच्या निवृत्त प्राध्यापिका, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

(अ) भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचे आजचे स्थान काय आहे या विषयाचे विवरण करताना अर्थोत्पादनातील महिलांच्या सहभागाचा विचार करता येईल. महिला कामकरी निरनिराळ्या औद्योगिक आणि व्यावसायिक गटांमध्ये कशा रीतीने विभागला गेल्या आहेत, संघटित आणि असंघटित क्षेत्रांमध्ये त्यांचा सहभाग किती आहे, मुख्य कामकरी आणि सीमान्तिक कामकरी तसेच बिगर–कामकरी गटांमध्ये महिलांची विभागणी कशी होते हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

त्याचबरोबर राष्ट्रीय उत्पन्नाच्या मोजमापाच्या प्रचलित पद्धतीमुळे राष्ट्रीय उत्पादनामधील महिलांच्या सहभागाचे वास्तव दर्शन होते का हा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. महिलांचे दृश्य व अदृश्य श्रम राष्ट्रीय उत्पादनाच्या आकडेवारीत कसे प्रतिबिंबित करावेत हा आजचा महत्त्वाचा असा सैद्धान्तिक व संख्याशास्त्रीय विश्लेषणातील प्रश्न आहे. तसेच उत्पादक श्रम व अनुत्पादक श्रम याचा विचार करता ( बहुधा महिलाच करीत असलेल्या ) घरकामाचा आणि त्या कामाच्या राष्ट्रीय उत्पादनातील योगदानाचा विचार कसा करता येईल हाही सैद्धान्तिक पातळीवरील एक वादग्रस्त प्रश्न आहे.

अर्थव्यवस्थेतील महिलांच्या स्थानाचे विवरण करताना गुणात्मक आयामाचाही विचार करावा लागतो. आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये महिलांचा सहभाग हा आधुनिक उद्योगात तसेच परंपरागत उद्योगात कशा प्रकारे आहे आणि महिलांच्या व्यावसायिक सहभागाचा विचार करताना उत्पादन व्यवस्थेमध्ये निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग किती यावर त्यांचे उत्पादन व्यवस्थेतील स्थान अवलंबून असल्याने अशा तऱ्हेचे विवरण उपयोगी ठरेल. थोडक्यात, अर्थव्यवस्थेतील अर्थोत्पादनातील महिलांचे प्रमाण आणि दर्जा दोन्हींचे विवरण करताना शेती आणि बिगर–शेती क्षेत्रांचा स्वतंत्र वा तौलनिक अभ्यास करता येईल. स्त्रियांचा उत्पादनकार्यातील सहभाग (work participation) हाही संशोधनाचा स्वतंत्र विषय होईल. शेतीसंबंधात हरित क्रान्तीच्या प्रारंभानंतर महिलांच्या शेतीतील कामाच्या सहभागावर काय परिणाम झाला आहे यावर प्रकाश टाकता येईल.

त्याबरोबरच, राष्ट्रीय उत्पन्नाच्या विवरणामध्ये महिलांचे स्थान काय आहे हे पाहणे आवश्यक आहे. वेतनश्रेणीमध्ये महिला कोठे बसतात, मालमत्तेच्या वितरणात त्यांचा वाटा किती आहे यावर महिलांचा आर्थिक दर्जा अवलंबून आहे. भारतातील दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण काय आहे या दृष्टीकोनातूनही विचार करता येईल.

(आ) कोणत्याही विशिष्ट गटाचे अर्थव्यवस्थेतील स्थान त्या गटाच्या कोणकोणत्या गुणवैशिष्ट्यांवर अवलंबून असते हे पाहणे विश्लेषणाच्या दृष्टीने पुढील टप्पा आहे. शैक्षणिक दर्जा, प्रशिक्षणाची परिस्थिती याबरोबरच कौटुंबिक अडसर, सांस्कृतिक वातावरण, दळणवळणाच्या सुविधा, निवास व्यवस्था, महिला कामकऱ्यांना आवश्यक अशा अन्य सोयी अशा विविध पैलूंद्वारे याचे विवेचन करता येईल. शैक्षणिक सुविधा आणि सवलती यांच्यामुळे आर्थिक उपक्रमातील महिलांच्या सहभागात कितपत बदल झाला आहे ?

भारतीय अर्थव्यवस्थेतील यादृष्टीने राज्याराज्यातील फरक, महाराष्ट्रातील प्रादेशिक फरक का व कसे पडतात हे पाहणे महत्त्वाचे ठरावे. भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात धार्मिक आणि जातीय गटागटातील फरक, मागासवर्गीय महिला आणि बिगर–मागासवर्गीय महिला यांच्या स्थानातील फरक लक्षणीय ठरावा. दारिद्र्य रेषा ओलांडून किती आणि कोणत्या महिला जाऊ शकलेल्या आहेत हे तपासणे उद्‌बोधक ठरेल.

(इ) अर्थव्यवस्थेतील विशिष्ट गटाच्या स्थानाबद्दल चर्चा करताना स्वतंत्रपणे विविध आयामांची चर्चा करता येते. परंतु विशेषतः जेव्हा तो गट एक दुर्बल गट असतो त्यावेळी निरनिराळ्या आयामांच्या संदर्भात त्या गटाची तुलना त्या गटाच्या तुलनेत सबल असणाऱ्या गटाशी केली जाणे अपरिहार्य आहे. महिलांच्या बाबतीत अशी तुलना पुरुषांबरोबर होणे अपरिहार्य आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील अर्थव्यवस्था आहे. एकूण जागतिक अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान काय आहे अशा प्रश्नाबरोबर, 'महिला' हा गट लोकसंख्येच्या जवळपास अर्धा असल्याने या गटाचे स्थान आर्थिक विकासाच्या पातळीबरोबर बदलते किंवा कसे हेही पाहणे महत्त्वाचे ठरावे. त्यादृष्टीने विकसित देशांच्या अर्थव्यवस्थेतील महिलांच्या स्थानाची तुलना विकसनशील देशांतील अर्थव्यवस्थांमधील महिलांच्या स्थानाशी करता येईल. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचे स्थान अन्य एकाद्या विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेतील महिलांच्या स्थानाशी तुलना करता काय प्रत्ययास येते हेही तपासून पाहता येईल. चीनशी तुलना करता येईल का ? तसेच आर्थिक नियोजनाच्या संदर्भात समाजवादी देशातील आर्थिक नियोजनामध्ये स्त्रियांच्या सहभागाचा विविध क्षेत्रात आणि विविध पातळीवर कसा विचार केला गेला होता आणि त्यातून महिलांच्या आर्थिक दर्जावर काय परिणाम झाला हे पाहणेही उद्‌बोधक ठरावे.

(ई) भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचे स्थान स्वातंत्र्योत्तर कालात कसे बदलत गेले याचा ऐतिहासिक आढावा उद्‌बोधक ठरेल. आर्थिक नियोजनाच्या कालात महिलांचे स्थान अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात कसे बदलत गेले, त्यात सुधारणा करण्याकरिता कोणत्या विशेष योजना आखल्या गेल्या आणि अशा विविध योजनांची फलश्रुती काय व का या प्रश्नांचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर 1975 साली संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक महिला वर्ष जाहीर केल्यानंतरच्या कालातील भारतीय स्त्री चळवळ जोर धरू लागलेल्या कालातील शासकीय धोरणे आणि त्यांची फलश्रुती पाहावी.

या संदर्भात 1991 साली स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणाचे महिलांच्या अर्थव्यवस्थेतील स्थानावर कोणते आणि कसे परिणाम होतील यादृष्टीने 1991–96 या कालातील भारतीय अनुभव आणि उदारीकरणाच्या धोरणाचा इतर विकसनशील देशांतील अनुभव यांच्या आधारे भविष्याचा वेध घेणे जरूर आहे. नवीन आर्थिक धोरणामागील जागतिक व भारतीय अर्थकारणाची चिकित्सा करणे आणि दुर्बल गटांसाठी जाहीर होणाऱ्या नव्या–नव्या योजनांचे स्थान व भवितव्य यावर चर्चा व्हावी.

जून 1994 मध्ये महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेले महिलाविषयक धोरण आणि त्यातील महिलांचा आर्थिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने सुचविलेली आणि काहीशी अमलात आणलेली उपाययोजना याची चिकित्सक चर्चा करता येईल.

थोडक्यात, अर्धे आकाश पेलणाऱ्या महिलांचे भारतीय व महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत स्थान काय आहे, ते तसे का आहे, ते सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या गेल्या आणि त्यांची फलश्रुती काय तसेच महिलांच्या दुय्यम आर्थिक स्थानाचे नेमके दुखणे कुठे आहे याचे निदान करणाऱ्या निबंधांना या चर्चासत्रामध्ये भरपूर वाव आहे. सरकारी व आंतरराष्ट्रीय संघटनांनी प्रसिद्ध केलेली आकडेवारी, स्त्री समस्यांच्या संदर्भात झालेले संशोधन यांच्या आधारे तसेच मौलिक संशोधनावर आधारित निबंध सादर करता येतील.

## संदर्भ सूची

1 TOWARDS EQUALITY, Report of the Commission on Women, Government of India, 1974, Chairperson Phulrence Guha.

2 CENSUS OF INDIA, Government of India, Various reports.

3 HUMAN DEVELOPMENT REPORT, 1995, UNDP, Oxford University Press.

4 REVERSED REALITIES - GENDER HIERARCHIES IN DEVELOPMENT THOUGHT, Naila Kabeer Kali for Women, New Delhi, 1994.

5 National Paper prepared by Government of India for Beijing Conference, 1995.

6 VOICES FROM INDIA, Report Prepared by NGOs for Beijing Conference, 1995.

7 INDIAN JOURNAL OF GENDER STUDIES, ( Various issues ), Sage Publications, 1994 and 1995.

□ □

# महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्याचे अर्थशास्त्र

दि. त्र्यं. जहागिरदार *

## 1 प्रास्तविक

शिक्षणाच्या अर्थशास्त्राप्रमाणेच आरोग्याचे अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची नवीन शाखा मानली जाते. सरकारी वित्तव्यवस्थेची उपशाखा म्हणून सुरुवातीस मूळ धरलेला विषय आजमितीस आरोग्याचे अर्थशास्त्र म्हणून श्रम अर्थ-शास्त्र, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, औद्योगिक अर्थशास्त्र, इत्यादींप्रमाणे पूर्ण व स्वतंत्र शाखा म्हणून विकसित होत आहे. विकसित देशांमध्ये गेल्या 40 वर्षांपासून विकसित होत असलेला हा विषय मात्र भारतात गेल्या 15–20 वर्षांपासून अर्थशास्त्रज्ञांच्या अध्ययनाचा विषय झाला आहे.

आरोग्याच्या अर्थशास्त्रात आरोग्याची काळजी किंवा निगा, डॉक्टरांच्या सेवा, रुग्णालयांचे कार्य, शिक्षण, आहार, सांडपाण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पर्यावरण, कुटुंब नियोजन, दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रम, औषधी उद्योग इत्यादी बाबींचा सर्वसाधारणपणे अंतर्भाव होतो. आरोग्याच्या अर्थशास्त्रात दुर्मिळ साधनसंपत्तीच्या विल्हेवारीचे (allocation) अध्ययन केले जाते. अर्थशास्त्रातील सिद्धान्त, संकल्पना आणि विश्लेषणाचे तंत्र यांचा आरोग्याच्या अर्थशास्त्रात वापर केला जातो. देशातील साधनसंपत्तीचा आरोग्यविषयक सेवांच्या निर्मितीसाठी कसा उपयोग केला जातो; आरोग्याचा अर्थव्यवस्थेवर कसा परिणाम होतो; आरोग्यविषयक सेवांच्या निर्मितीकरिता अर्थ-प्रबंधन कसे करावे; सेवांचा पुरवठा करणाऱ्या संस्थांचे स्वरूप कसे असावे; अशा संस्थांमध्ये कार्यदक्षता कशी निर्माण करावी; या संस्थांमधील कर्मचाऱ्यांचे वेतन व सेवा शर्ती; रोग प्रतिबंधक उपाय, उपचारात्मक उपाय-योजना; उपलब्ध औषधोपचार पद्धती; आरोग्यविषयक सेवांची किंमत; आरोग्यविषयक विमा; आणि विशेष म्हणजे आरोग्यविषयक सेवांच्या निर्मिती व पुरवठ्यात शासन हस्तक्षेपाची आवश्यकता इत्यादी विविध पैलूंचा आरोग्याच्या अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो.

आरोग्याची व्याख्या आपण जेवढी व्यापक करू त्यावरून आरोग्याच्या अर्थशास्त्राची व्याप्ती ठरते आणि आरोग्याचे निर्धारक घटक वाढत जातात. अधिक साधनसंपत्तीची आवश्यकता निर्माण होते. त्याद्वारे अधिक वादप्रश्न (issues) निर्माण होतात, आरोग्याच्या अर्थशास्त्राचा अभ्यास दोन स्तरावर होत असल्याचे जाणवते. पहिल्या स्तरावर संकल्पनात्मक संशोधनाचे क्षेत्र असून दुसऱ्या स्तरावर अनुभवनिष्ठ सर्वेक्षणाचे क्षेत्र येते. हे सर्वेक्षण व्यष्टीय आणि समष्टीय स्तरावर केले जाते. दोनही स्तरांवरील अध्ययन व संशोधन परस्परांना पूरक ठरते.

* प्रपाठक, शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती.

मानवी भांडवलातील गुंतवणूक म्हणून शिक्षणाचे जे महत्त्व सांगितले जाते तेवढेच, किंबहुना थोडे जास्त, महत्त्व आरोग्याचे आहे. विकसनशील देशांमध्ये वैयक्तिक आरोग्य आणि सार्वजनिक आरोग्य या दोघांनाही महत्त्व आहे. सार्वजनिक आरोग्याचे कार्यक्रम तीन प्रकारे कार्य करतात: (1) समाजाला विशिष्ठ आरोग्य सेवा पुरवितात; (2) आरोग्यपूर्ण वर्तन प्रोत्साहित करतात; (3) आरोग्यपूर्ण पर्यावरणाचे प्रवर्तन करतात. अशा अर्थव्यवस्थांमध्ये आरोग्याचा स्तर (status) वाढविण्याच्या उद्देशाने आरोग्यविषयक विविध सोईमध्ये वाढ करण्यावर भर दिला जातो. समाजाच्या आरोग्याची नाडी कोणत्या दर्जाची आहे, त्याचा स्तर कोणता हे निश्चित करण्यासाठी काही निर्देशकांचा आधार घेतला जातो. मान्यताप्राप्त निर्देशक पुढीलप्रमाणे सांगता येतात : (1) जन्माच्या वेळी असणारे आयुर्मान (Life expectancy at birth), (2) बालमृत्यू दर, (3) माता मृत्यू दर आणि (4) मृत्यू दर. सार्वजनिक आरोग्याचा स्तर समजण्याच्या दृष्टीने बहुतेक अध्ययनांमधून हे निर्देशक वापरले जातात.

आरोग्याच्या अर्थशास्त्रात आरोग्याची 'आर्थिक वस्तू' ही संकल्पना अधिक सुस्पष्टपणे व्यक्त झाली पाहिजे. तसेच आरोग्याच्या सोई आणि आरोग्याची निगा राखण्याच्या सोई ( health care facilities ) इत्यादी संकल्पना स्पष्ट करताना त्यामध्ये अधिक शास्त्रीयता व सुस्पष्टपणा असला पाहिजे. आरोग्याच्या अर्थशास्त्रात आरोग्याला आश्रित (dependent) चल मानावयाचे की स्वतंत्र चल ? जर आरोग्याला आपण आश्रित चल मानले तर आरोग्याची निगा, उत्पन्न, वय, लिंग, शिक्षण, जात, वैयक्तिक सवयी पर्यावरण इत्यादींचे ते फल होईल. जर आरोग्य स्वतंत्र चल मानले तर त्याद्वारे मजुरी, वेतन, उत्पादनक्षमता, आरोग्याची मागणी इत्यादींचे स्पष्टीकरण करणे शक्य होईल.

आरोग्य किंवा सार्वजनिक आरोग्याची संकल्पना आर्थिक वस्तूच्या स्वरुपात स्वीकारल्याबरोबर आपोआप आरोग्याच्या काळजीची मागणी व पुरवठा या दोन बाजूंचा विचार करावा लागेल. साधारणपणे आरोग्याची सेवा पुरविणाऱ्या पुरवठा पक्षात पुढील बाबी लक्षात घ्याव्या लागतील. (1) आरोग्याची काळजी घेणाऱ्या सोई व त्यावरील परिव्यय; (2) विविध सोईंचा तौलनिक परिव्यय; (3) डॉक्टर, परिचारिका, औषध, अन्य कर्मचारी, इत्यादी निविष्टींचा बाजार; (4) विविध प्रकारच्या निविष्टींना दिलेला मोबदला आणि त्यांचा निविष्टींच्या पुरवठ्यावरील परिणाम; (5) श्रमाऐवजी भांडवलाच्या वापराची शक्यता. आरोग्य सेवांच्या पुरवठा पक्षापेक्षा मागणीच्या पक्षाची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. आरोग्याच्या मागणीचा निर्णय व्यक्ती, कुटुंब व समाज घेऊ शकतो. आरोग्याची निगा, उत्पन्न, व्यक्तीच्या उपभोग खर्चाची संरचना, वय, व्यवसाय, लिंग, शिक्षण, हवामान इत्यादी विविध घटकांनी आरोग्याची मागणी प्रभावित होते. विकसनशील देशांतील दुर्बल लोकसंख्या आरोग्य सेवांचे महत्त्व जाणूनही मागणी करू शकत नाहीत. म्हणून सार्वजनिक आरोग्य सेवांच्या क्षेत्रात शासकीय हस्तक्षेपांची नितांत आवश्यकता आहे.

## (2) आरोग्याच्या अर्थशास्त्राच्या प्रेरणा आणि आरोग्यविषयक सेवांची ठळक वैशिष्ट्ये

आरोग्याच्या अर्थशास्त्राच्या सैद्धान्तिक प्रेरणा कोणत्या आहेत याचे विश्लेषण या विषयाच्या चर्चेसाठी आहे. या प्रेरणा अर्थशास्त्राच्या प्रमुख शाखांमधून घेतल्या आहेत. (अ) आरोग्य सेवांमधील शासनाचा हस्तक्षेप, साधनसंपत्तीचे वाटप, सेवांच्या पुरवठ्यात समतेचे तत्त्व, अर्थप्रबंधन, कार्यक्षमता, इत्यादी विविध मुद्दे हे सार्वजनिक वित्त आणि कल्याणाच्या अर्थशास्त्राशी संबंधित आहेत; (आ) डॉक्टर, परिचारिका, अन्य कर्मचारी यांचे वेतन, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या संस्थांतील तसेच सांडपाणी व्यवस्थापनातील कर्मचाऱ्यांचे वेतन, कर्मचाऱ्यांचे मालकाशी (शासन वा अन्य) असणारे संबंध, वैद्यकीय शिक्षणातील प्रत्याय ( returns ) इत्यादी बाबींचा संबंध श्रम अर्थशास्त्राशी आहे; (इ) रुग्णालये, औषधी उद्योग, पाणी पुरवठा संस्था इत्यादींची कार्ये यांचे विवेचन औद्योगिक संघटनाच्या अंतर्गत केला जाईल; (ई) आरोग्याच्या सेवांमध्ये आरोग्यविषयक विम्याचा कार्यभाग आहे. असे प्रश्न विकसित देशांच्या संबंधात विशेषत्वाने अभ्यासले जातात.

आरोग्यविषयक विविध सेवांपैकी जर आपण केवळ वैद्यकीय सेवा विचारात घेतल्या तर त्या सेवांची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील (त्यांपैकी काही वैशिष्टये वैद्यकीय सेवांखेरीज अन्य आरोग्य सेवांनाही काही प्रमाणात लागू पडतात.) : (1) वैद्यकीय सेवांच्या मागणीत अनिश्चितता आहे; (2) उत्पादन प्रक्रियांपासून उत्पादन (सेवा) विलग करता येत नाही; (3) प्राप्त सेवाहेखील अनिश्चित असते; (4) या सेवांबाबत अपूर्ण माहिती; (5) वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्यांचे स्वरूप हे बऱ्याच प्रमाणात एकाधिकारी आहे; (6) वैद्यकीय सेवांमध्ये प्रवेशावर नियंत्रण; (7) वैद्यकीय सेवांच्याबाबत आढळणारी बाहयता.

आरोग्यविषयक सेवांवर विकसित आणि विकसनशील देश अधिकाधिक प्रमाणावर खर्च करीत आहेत. स्थूल राष्ट्रीय उत्पादिताचा कितवा हिस्सा आरोग्यविषयक सेवांवर खर्च होतो. बऱ्याच वेळा उपलब्ध आकडे हे वैद्यकीय सेवांच्या संदर्भात असतात. केन्द्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक संस्था, सार्वजनिक उपक्रम इत्यादी विविध संस्थांद्वारे आरोग्य सेवांवर जसा खर्च होतो तसाच कुटुंब व व्यक्ती पातळीवरदेखील हा खर्च केला जातो. या खर्चाचा आरोग्याच्या दर्जावर कोणता परिणाम झाला ? वेगवेगळ्या आरोग्य सेवांचा फायदा कोणाला मिळाला ? सध्याची आरोग्य सेवांची व्यवस्था कशी आहे ? वैद्यकीय सेवा व अन्य सेवांची किंमत कशी ठरवावी ? वेगवेगळ्या आरोग्य सेवांचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. आरोग्यविषयक सेवा गरीब वर्गाला मोफत द्यावी का ? आरोग्यविषयक सेवांचा भार कोणी उचलावा ? शासनाच्या कार्याचे व आरोग्यविषयक सेवांच्याबाबत शासन धोरणाची छाननी केली पाहिजे. World Development Report 1993 ने आरोग्यविषयक सुधारणा करण्यासाठी शासकीय धोरणाबाबत 3 दृष्टिकोन सुचविले आहेत. शासकीय धोरणाची चर्चा करताना हे दृष्टिकोन लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. अर्थात या दृष्टिकोनांच्या मर्यादाही सुस्पष्ट होणे आवश्यक ठरते.

### (3) महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य : काही वादप्रश्न

भारतात तसेच महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्यावरील खर्चात वाढ होत आहे. अनेक अहवाल, संशोधनपर लेखांमध्ये आरोग्यावरील खर्चात पाणीपुरवठा, स्वच्छता, सकस आहार इत्यादींवरील खर्च वगळून आरोग्यावरील खर्च सांगितला जातो. अशा प्रकारचा खर्च साधारणतः वैद्यकीय काळजी / निगा कार्यक्रमावरील खर्च असतो. 1990–91 मध्ये, खाजगी व सार्वजनिक या दोनही क्षेत्रांद्वारा हा खर्च 17,452·11 कोटी रुपये, म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादिताच्या (GNP) 3·75 टक्के, होता. महाराष्ट्र शासनाच्या Public Health Department च्या Performance Budget मध्ये वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्याच्या अन्य सेवांबाबत विपुल आकडेवारी दिलेली असते तिचा वापर करता येईल.

1991 च्या लोकसंख्येप्रमाणे महाराष्ट्राची लोकसंख्या 7·89 कोटी असून एक लाखावरील शहरांची संख्या 33 होती. एकूण लोकसंख्येपैकी 39 टक्के लोकसंख्या शहरी होती तर 61 टक्के ग्रामीण. 1 एप्रिल 1995 अखेरीस, प्राथमिक आरोग्य केन्द्रे 1,695, उपकेन्द्रे 9,725 आणि ग्रामीण/कुटीर रुग्णालये 25 होती.

महाराष्ट्रातील आरोग्य सेवांच्या संदर्भात पुढील महत्त्वाच्या विषयांवर निबंधांतून प्रकाश टाकता येईल.

(1) गेल्या 10–15 वर्षांत महाराष्ट्रातील आरोग्य सेवांवरील खर्चाचे स्वरूप, अन्य प्रांतांच्या तुलनेत झालेला खर्च, प्रतिव्यक्ती खर्चाच्या संदर्भात ही तुलना करता येईल.

(2) महाराष्ट्रात उपलब्ध आरोग्यविषयक सुविधा, दर दहा हजार लोकसंख्येमागे डॉक्टर, रुग्णालयातील खाटा, रुग्णालये, पिण्याचे पाणी उपलब्ध असणारी खेडी, प्राथमिक आरोग्य केन्द्रांची संख्या, इत्यादी आढावा घेता येईल. तसेच अन्य प्रांतांशी तुलनाही करता येईल.

(3) महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमधील सार्वजनिक आरोग्यावरील खर्चाची आणि अनुषंगिक सुविधांमधील भिन्नता अभ्यासणे आवश्यक आहे. तसेच जिल्ह्यान्तर्गत भिन्नता स्पष्ट करता येईल.

(4) सार्वजनिक आरोग्याच्या सोईचा फायदा कोणाला प्राप्त झाला ? तसेच त्या सेवा कितपत अभिगम्य आहेत. लिंग, वय, जात, इत्यादी भिन्नतेमुळे आरोग्यविषयक सेवांच्या उपलब्धतेत भिन्नता आढळते का ?

(5) आरोग्यविषयक सेवांवरील खर्चामुळे आरोग्याच्या दर्जात (status) फरक पडला का ? आरोग्याच्या दर्जात सुधारणा केवळ आरोग्य सेवांवरील अधिकाधिक खर्चामुळे होते का ?

(6) महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये कुपोषणाची (सर्व वयातील व विशेषत: बालकांच्या कुपोषणाची) उदाहरणे आढळून आली आहेत. या संदर्भात आरोग्य सेवांचे मूल्यमापन आवश्यक आहे

(7) ग्रामीण भागातील अनेक रोग हे दूषित पाणी पिल्यामुळे होतात. त्यादृष्टीने ग्रामीण भागातील बारमाही पिण्याच्या पाण्याच्या सोईचे अध्ययन आवश्यक आहे.

(8) महाराष्ट्रात ग्रामीण भागात सकस आहार योजनांसारखे उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. अन्य प्रांतांमधील अनुभवांच्या संदर्भात अशा कार्यक्रमांची पद्धती कशा प्रकारे विकसित करता येईल ?

(9) महाराष्ट्रातील आरोग्यविषयक सेवा पुरविणाऱ्या संस्थांची कार्यपद्धती, त्यांचा चालू परिव्यय, कर्मचाऱ्यांवरील खर्च, तसेच सेवांच्या किमतींचे धोरण.

(10) महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्याचे धोरण.

(11) महाराष्ट्रात वैद्यकीय उपचाराच्या विविध पद्धती अन्य प्रांतांप्रमाणे उपलब्ध आहेत. किमान परिव्यय निकषावर विशिष्ट रोगांवर उपचार करणाच्या दृष्टीने कोणती पद्धत भविष्यात विकसित केली पाहिजे ? सार्वजनिक आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने यादृष्टीने तुलनात्मक विचार करणे शक्य आहे.

(12) सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये वाढ होण्यासाठी सेवाभावी संस्थांचे महत्त्व आहे. त्यांचा सहभाग कसा वाढविता येईल ?

(13) सार्वजनिक आरोग्यविषयक सोयी उपलब्ध करून देताना वैद्यकीय सुविधा, सांडपाण्याची समस्या दूर करणे, पिण्यासाठी शुद्ध पाणी पुरविणे, कुटुंबकल्याण कार्यक्रम या सर्वांचा एकात्मिक कार्यक्रम ठराविक जिल्ह्यांमध्ये अमलात आणणे शक्य आहे. त्यादृष्टीने एखादे प्रारूप सुचविता येईल. तसेच वैद्यकीय सुविधांच्या कार्यक्रमात स्त्रिया व लहान मुले यांना अधिकाधिक सामावून घेणेही अगत्याचे आहे.

(14) सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात शासन हस्तक्षेप अनिवार्य आहे. फक्त तो अधिक प्रभावी करण्यासाठी उपाययोजना करता येईल. विशेषकरून दुर्बल घटकांसाठी अधिक प्रभावी आरोग्यविषयक सेवा हव्यात.

(15) सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नाची उपाययोजना करताना आरोग्याचे शिक्षण देणे उपयुक्त ठरते. रोग कसे होणार नाहीत यादृष्टीने सर्वसाधारण स्वरुपाचे शिक्षण देण्याची आवश्यकता.

सार्वजनिक आरोग्याच्या अर्थशास्त्रावर पुढील काही महत्त्वाची पुस्तके व अहवाल निबंध लिहिण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरू शकतील.

1 Arrow, K. J. ( 1963 ). ' Uncertainty and the Welfare Economics & Medical Care', THE AMERICAN ECONOMIC REVIEW.

2 Datta, G. and P. K. Chaudhari ( 1988 ), ' Health Care in Rural India', ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 16 July.

3 Guy, P. ( 1988 ), 'Primary Health Care As a Gender Issue', ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 29 October.

4 Government of Maharashtra, Public Health Department, Performance Budgets.

5 Indian Institute of Management, Ahmedabad ( 1987 ), A STUDY OF HEALTH CARE FINANCING IN MAHARASHTRA AND W. BENGAL.

6 Kamble, N. D. ( 1984 ), RURAL HEALTH, Ashish Publishing House, New Delhi.

7 Mukhopadhyaya, A- ( 1989 ), 'Public Health Services in a Mess', ECONOMIC AND POLITICAL WEEKLY, 5 August.

8 Panchmukhi, P. R. ( 1983 ), COST-BENEFIT ANALYSIS OF HEALTH SERVICES IN METROPOLITAN AREAS.

9 Panchmukhi, P. R. ( 1988 ), PUBLIC FINANCE INTERVENTION AND FAMILY WELFARE PROGRAMME ( Government of India sponsored study ).

10 Reddy, K. N. (1994), ' Economic Foundations of Health Care', INDIAN ECONOMIC JOURNAL, Conference Volume.

11 Reddy, K. N. (1992), HEALTH EXPENDITURE IN INDIA, National Institute of Public Finance and Policy.

12 William, A- ( 1987 ), HEALTH ECONOMICS, Macmillan Press, London.

13 Seetha Prabhu, K. ( 1994 ), ' Financing of Health Sector in Maharashtra', INDIAN ECONOMIC JOURNAL, Conference Volume.

14 Shanmukhsundharam, Yasodha ( 1979 ), 'Economics of Health and Human Capital', INDIAN ECONOMIC JOURNAL, Conferene Volume.

15 Shanmukhsundharam, Yasodha (1991), HEALTH ECONOMICS, Emerald Publishers, Madras.

16 World Bank (1993), WORLD DEVELOPMENT REPORT, Oxford University Press.

□ □

# एकोणिसाव्या शतकातील आर्थिक उदारमतवाद आणि तत्कालिन भारतीय अर्थशास्त्र

सु. गो. भानुशाली *

व्यक्तीपुढाकार, व्यक्तीनियंत्रण, व्यक्तीव्यक्तीमधील तसेच व्यक्ती आणि समाज यामधील करारावर आधारलेले संबंध या त्रिसूत्रीच्या आधारे निर्माण झालेली विचारधारा म्हणजे उदारमतवाद. निरंकुशतेचे धोरण ( Laissez-faire Policy), मुक्त अर्थव्यवस्था, बाजार अर्थव्यवस्था, उपभोक्त्याचे सार्वभौमत्व, जमीन मालकाऐवजी भांडवलदारांचा वाढता प्रभाव, देशाच्या आर्थिक विकासासाठी आयात निर्यातीवरील कर रद्द करणे, एकल, भागीदारी आणि नफ्याच्या तत्त्वावर आधारलेली संयुक्त भांडवली संघटन पद्धती यांचा यथानुक्रम आविष्कार; त्याच कालावधीत अभियांत्रिकी क्षेत्रात लागलेल्या शोधांमुळे झालेली औद्योगिक क्रान्ती या सर्व घटनांमधून आर्थिक उदारमतवाद विकसित झाला.

अॅडम स्मिथ यांचे 'Theory of Moral Sentiments' आणि 'Wealth of Nations' हे दोन्ही ग्रंथ मुक्ततेची आकांक्षा, विकासाची अपेक्षा या मूलतः उदारमतवादी असलेल्या मूल्यांचा पाठपुरावा करतात. आयात–निर्यातीवरील कर रद्द करण्यातील स्मिथच्या विचारांचा वाटा मोठा आहे. स्मिथ यांचा उल्लेख उदारमतवादाचे उपदेशक म्हणूनच केला जातो. डेव्हिड रिकार्डो यांच्या लिखाणाची प्रेरणा कमाल लाभ साधणारा आर्थिक मनुष्य ही आहे. जॉन स्टुअर्ट मिल रिकार्डोच्या विचारांशी अगोदरच्या काळात पूर्ण सहमत असले तरी नंतर त्यांची भूमिका रिकार्डोपेक्षा वेगळी झाली आणि त्यांनी निरंकुशतेच्या संकल्पनेचा त्याग केला.

मँचेस्टर विचारप्रणालीच्या जॉन ब्राईट आणि रिचर्ड कॉबडेन यांनी उपयोगितावादाच्या संकल्पनेला धरून मांडलेला आर्थिक सुधारणांचा आराखडा महत्त्वाचा होता. मिल यांच्या लिखाणातून आलेला कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्रोत असा पुढे नेला. मिल यांच्या 'On Liberty' या लहानशा ग्रंथात व्यक्ती आणि समाज यांच्या "To individuality should belong the part of life in which it is chiefly the individual that is interested; to society, the part which chiefly interests society," (पृष्ठ 92).

इंग्लंडमध्ये कोलरिज, ( Coleridge ), कार्लाईल, सुथे ( Southey ) आणि डिझरेली यांनी समतेच्या तत्त्वावर आधारलेल्या शासनाच्या संकल्पनेचा भक्कम विकास घडवून आणला. समाजवादाने उदारमतवादाच्या विकासाला खीळ घातली असे म्हटले जात असले तरी मानवेंद्रनाथ रॉय यांचे प्रतिपादन असे होते की, "मार्क्सवाद उदारमतवादाचाच स्वाभाविक तर्कशुद्ध विकास होय."

फ्रान्समध्ये फ्रँको गिझो ( Fracois Guizot ) यांचे म्हणणे असे होते की, कोणाही व्यक्तीला कष्ट करून मत्ता मिळविण्याचा हक्क आहे. अॅलेक्सी द कॉकविल ( Alexis de Tocquieville ) यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला समतेची आस असल्यामुळे लोकशाही स्थापन होणे अपरिहार्य आहे. फ्रान्समध्ये समाजवाद्यांनीसुद्धा उदारमतवादाचे तत्त्वज्ञान ग्राह्य मानल्याचे दिसून येते.

जोसेफ मॅझिनी तर उदारमतवादी राष्ट्रवादाचे इटलीमधील उद्गाते होते. राष्ट्र ही संकल्पना व्यक्ती आणि मानवता यांना जोडणारा दुवा असून त्यामुळे व्यक्तीला अर्थ प्राप्त होतो तर संस्कृतीला दिशा प्राप्त होते.

* अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आणि सहायक संपादक, 'अर्थसंवाद', कोल्हापूर.

कॅमिलो बेन्सो ( Camillo Benso ) आणि काउंट दी कॅव्हूर ( Count di Cavour ) यानी इंग्लंडमधील मध्यम-मार्गी उदारमतवादाच्या आधारे बुर्ज्वा उदारमतवादाचे ( bourgeois liberalism ) धोरण आखले.

जर्मनीतील 1848 च्या क्रान्तीचे उद्दिष्टच मुळी संघटित मुक्त राष्ट्र निर्माण करण्याचे होते. पण ही क्रान्ती उद्दिष्ट गाठू शकली नाही. बिस्मार्क यानी प्रशियात शासन स्थापन केल्यावर राष्ट्रवाद आणि उदारमतवाद या दोन्ही विचारधारा एकमेकात मिसळून गेल्या. व्यक्तिस्वातंत्र्य, राष्ट्राप्रती असलेली एकनिष्ठा आणि राष्ट्रीय ऐक्य परस्पर-पूरक असल्या पाहिजेत. इंग्लंड आणि फ्रान्समध्ये मध्यमवर्ग उदारमतवादी असला तरी जर्मनीतील मध्यमवर्ग विरोधात होता.

निबंधाच्या पहिल्या भागात याप्रमाणे युरोपातील एकोणिसाव्या शतकातील उदारमतवादाच्या विचार-धारेचा विकास स्पष्ट करता येईल. व्यक्तिस्वातंत्र्य, प्रजा एव राजा :, ग्राहको एव राजा; निर्हस्तक्षेपाचे धोरण हा उदारमतवादाचाच एक उद्‌गार आणि त्याच्या विरुद्ध, व्यापक असलेला कल्याणाचे (सामाजिक तसेच आर्थिक) तत्त्वज्ञान हा उदारमतवादाचाच दुसरा उद्‌गार होय. या पद्धतीने या भागातील विचारांची मांडणी करावी.

## तत्कालिन भारतीय अर्थशास्त्र

इंग्लंडमधून आलेल्या उदारमतवादी तरुण प्रशासक वर्गाशी आलेला संबंध, वाचन आणि शिक्षणातून झालेली युरोपातील उदारमतवादी विचारांची ओळख यामुळे भारतातील बुद्धिनिष्ठ लोकांमध्ये उदारमतवादाचा प्रसार झाला. त्यांच्या विचारप्रणालीवर त्याचा खोलवर ठसा उमटला. इंग्लंडमध्ये कल्याणकारी शासन आणणारे सरकार हिंदुस्थानात मात्र इंग्लंडच्याच कल्याणाची धोरणे राबवीत होते असे दादाभाई नौरोजी यांचे प्रतिपादन होते. भारतातील उद्योगांचा या धोरणामुळे ऱ्हास झाला. कररूपाने गोळा केल्या जाणाऱ्या महसुलाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण इंग्लंडमध्ये केवळ 8·5 टक्के असताना भारतात ते 22 टक्के इतके जास्त ठेवण्यात आले होते.

महादेव गोविंद रानडे यानी हिंदुस्थानातील आर्थिक दुःस्थितीचे वर्णन करून आर्थिक विकासासाठी काय करणे आवश्यक आहे याची मीमांसा केली आहे. उत्पादनाच्या आणि विभाजनाच्या नियमांचा समन्वय झाला पाहिजे असे मिलचे म्हणणे त्यानी आग्रहाने प्रतिपादले होते. रिकार्डोचा खंडाचा सिद्धान्त हिंदुस्थानात लागू पडत नाही असे त्यांचे म्हणणे होते.

दिनशा एडुलजी वाच्छा यानी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या 1898 च्या अधिवेशनात सरकारच्या चलनविषयक धोरणावर (currency policy) टीका केली होती. मार्च 1906 मध्ये त्यानी फर्गसन महाविद्यालयात केलेल्या भाषणात भारतीय अर्थशास्त्राचा अभ्यास होण्याची गरज प्रतिपादिली होती. रानडे आणि वाच्छा यांच्या मते भारतीय अर्थशास्त्र हे युरोपात अभ्यासल्या जाणाऱ्या अर्थशास्त्राप्रमाणे स्वतंत्रपणे विकसित झाले पाहिजे. या तीन विचारवंतांचा उदारमतवाद आर्थिक परिस्थितीशी सीमित होता.

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यानी सर्वसमावेशक उदारमतवादाचा पुरस्कार केला. इतिहासाची जाणीव आणि ऊर्जितावस्था, क्लिफ्टच्या ‘Political Economy’ या ग्रंथाच्या आधारे लिहिलेले ‘लक्ष्मीज्ञान’ (1849), ‘शतपत्रे’ यामध्ये याचा सहज विचार दिसून येतो. ऐहिक उपयुक्तता ही सामाजिक आणि राजकीय व्यवहाराची कसोटी मानण्यात येत होती. समाजाचे हित म्हणजे समाजातील बहुसंख्य लोकांचे हित या कल्पनेला अनुसरून ‘शतपत्रे’ लिहिली. या तत्त्वज्ञानाचा परिणाम आगरकर, न्यायमूर्ती रानडे यांच्यावर झाला. ते पाश्चात्यांच्या प्रभावाखाली स्वत्व विसरले नाहीत. लोकहितवादींना हवे असलेले स्वराज्य लोकसत्तेला प्रमाण मानणारे, व्यक्ति-स्वातंत्र्याला व सुधारणेला प्रोत्साहन देणारे होते. त्यानी संसदीय लोकशाहीचा निर्भेळ पुरस्कार केला. राष्ट्रीय दृष्टीतून त्यानी अर्थविचार मांडला. राज्य ही ‘आवश्यक पण अनिष्ट’ बाब होय. इतिहासाची जाणीव आणि ऊर्जितावस्था या उदारमतवादी विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात आढळते. “पाश्चात्यांचे श्रेष्ठ उद्योगावर असून

आमच्या लोकांचे श्रेष्ठ उद्योग नष्ट करणाऱ्या अनेक प्रकारच्या छंदफंदात आहे", असे ते म्हणत. लोकांची सुधारणा म्हणजे देश सुधारणा होय.

लोकहितवादींचे हे विचार जोतिबा फुले यानी आणखी पुढे नेलेले, प्रगल्भ केलेले आढळतात. 1886 मध्ये ब्रिटिशांनी शेतीवरील सारा वाढविला. 1877–78 या वर्षी महाराष्ट्रात दुष्काळ पडला. त्यातून होणारे शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्यासाठी फुल्यांनी कार्य केले. कृषीरक्षक योजना त्यानी पुरस्कारून अमलात आणली. मानवी स्वातंत्र्य हें त्यांच्या कार्याचे मुख्य सूत्र होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या सहवासाने त्यांचे विचार उन्नत झाले होते. त्यांचे सहकारी ना. म. लोखंडे यानी औद्योगिक कामगारांचे शोषण थांबविण्यासाठी कार्य केले. देशमुख, फुले, लोखंडे यांच्या बाबतीत एक विशेष आढळतो तो म्हणजे त्यानी विचाराला दिलेली कार्याची जोड.

रोमेशचंद्र दत्त, गोपाळ कृष्ण गोखले, कृष्णाजी पांडुरंग, नारायण मल्हार जोशी, प्रमथनाथ बॅनर्जी, वामन गोविंद काळे यांचे विचार या पद्धतीने मांडावे लागतील.

निबंधाच्या दुसऱ्या भागात हिंदुस्थानातील या विचारवंतांच्या उदारमतवादी विचारसरणीचा संकलनात्मक, सटीक मागोवा घ्यावयास हवा. युरोपातील उदारमतवादी विचारसरणी आणि हिंदुस्थानातील उदारमतवादी विचार–सरणी यामधील साम्य आणि फरक विशद करावयास हवा. हिंदुस्थानातील उदारमतवादी विचारसरणीच्या लोकांना त्यामुळेच ब्रिटिश राजवटीतून होणारी हिंदुस्थानची ससेहोलपट सिद्ध करता आली. यापेक्षा महत्त्वाची बाब अशी की, ब्रिटिशांना त्यामुळे आपल्या धोरणात बदल करावे लागले.

निबंध लेखकांना पुढील संदर्भ उपयुक्त ठरतील :


1 Laski, Harold, J. ( 1958 ), THE RISE OF EUROPEAN LIBERALISM, George Allen and Unwin Ltd., London.

2 Mill, J. S. ( 1948 ), ON LIBERTY, Walts and Co., London.

3 Schapiro, J. Salwyn ( 1958 ), LIBERALISM, D. Van Nostrand Company Inc., London.

4 कुंभार, नागोराव (1992) **उदारमतवाद**, प्रबोधन प्रकाशन, लातूर.

5 पारीख, गोवर्धन (1981) **(मानवेंद्र रॉय) : नवमानवतावाद आणि मानवाचा आदर्श**, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई.

6 पारीख, गोवर्धन (1951) **लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख**, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

7 फडकुले, निर्मलकुमार (1973) **लोकहितवादी**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

8 पानसे, रमेश ( 1984 ), 'लोकहितवादी, ग्रामरचना, त्यातील व्यवस्था आणि त्यांची हल्लीची स्थिती', **अर्थसंवाद**, खंड 7, अंक 4, जाने.–मार्च.

9 गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे यांचे प्रकाशन क्र. 16, **चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ** (1843–55)

10 Madan, G. R. ( 1981 ), ECONOMIC THINKING IN INDIA, S. Chand and Co. Ltd., New Delhi.

11 Datta, B. : EVOLUTION OF ECONOMIC THINKING IN INDIA.

12 Spengler, J. J. : THE INDIAN ECONOMIC THOUGHT.

13 Gqnguli, B. N. : INDIAN ECONOMIC THOUGHT : NINETEENTH CENTURY PERSPECTVE.


□ □

# अर्थसंवाद ( खंड 19 : 1995–96 )

## (अ) लेख सूची

### स्वतंत्र लेख


1 अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना 1–44
2 खंडमीमांसा 91–104
3 चिंतामणराव देशमुख 267–70, 271–80
4 जिल्हा उद्योग केन्द्र आणि लघुउद्योगांचा विकास 114–29
5 डाळिंब व बोर शेतीचे अर्थशास्त्र 149–58
6 बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भारतातील स्थान 45–54
7 भारतीय वस्तुनिर्माण क्षेत्रातील आयातसघनता 213–26
8 भारतातील ऊर्जा स्रोत 234–46
9 भारताची राजकोषीय तूट 247–66
10 भारताच्या वित्तीय क्षेत्रातील सुधारणा : समस्या आणि धोके 309–19
11 भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणाचे सैद्धान्तिक आधार 341–49
12 भावफुगवट्याचे देशांतर्गत विरुपण 130–45
13 मुक्त अर्थव्यवस्था आणि राज्ये 185–212
14 रॉबर्ट लूकास 227–33
15 श्रमिक संघांचे भवितव्य 105–13
16 समावेशक वर्धितमूल्य कर : संभाव्य अडचणी 55–60


### अध्यक्षीय भाषण


1 भारतातील ऊस किंमत धोरण (उसाच्या किंमतीचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र) 295–308


### ग्रंथ परीक्षण


1 वेतनसिद्धान्त की श्रम अर्थशास्त्र ? 63–69


### संवाद


1 'कन्झुमरिझम' म्हणजे काय ? 61–62
2 'खंडमीमांसा' या लेखावरील भाष्य 281


### अर्थ शब्दांची वाट पाहे


1 कन्झुमरिझम 146–48


### श्रद्धांजली


1 वि. म. दांडेकर 166–69


### आर्थिक वार्ता


1 आर्थिक विकासामुळे पर्यावरणाला बाधा येते काय ? 336–40
2 बहुराष्ट्रीय कंपन्यांची भारतातील गुंतवणूक 164–65
3 भारतातील आंतर-राज्य आर्थिक विषमता 330–36
4 भांडवलशाहीची बदलती रूपे 159–62
5 शेतीतील उच्च तंत्रवैज्ञानिक अभिवृद्धी क्षेत्रे 328–30
6 सॉफ्टवेअरच्या बाजारात अमेरिका अग्रणी 325–28
7 स्थानिक करांचे स्वरूप आणि औचित्य 162–64


### सांख्यिकी पुरवणी


1 आर्थिक विकास : आंतरराज्य तुलना 70–87
2 भारतीय अर्थव्यवस्था–काही निर्देशके (1) 171–81
(2) 282–89


### अधिवेशन वृत्तांत


1 'अर्थसंवाद' वार्षिक अहवाल : 1994–95 372–75
2 एकोणिसाव्या वार्षिक अधिवेशनाचा कार्यवृत्तांत 376–81
3 आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धान्तातील नवे प्रवाह 350–53
4 भारतातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणा 354–59
5 महाराष्ट्रातील अर्थशास्त्राचे विद्यापीठीय अभ्यासक्रम : सुधारणा आणि पुनर्रचना 360–65
6 महाराष्ट्र शासनाची झुणका–भाकर योजना : उत्पत्ती, प्रयोजन, प्रश्न व पर्याय 366–71

## विषयांची रूपरेषा

1 एकोणिसाव्या शतकातील आर्थिक उदार–मतवाद आणि तत्कालीन भारतीय अर्थशास्त्र 390–92
2 भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचे स्थान 382–85
3 महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्याचे अर्थशास्त्र 385–89

## संकीर्ण

1 मराठी अर्थशास्त्र परिषदेची वार्षिक अधिवेशने 320–24
2 लेख आणि लेखक सूची 393–94

# (आ) लेखक सूची

## स्वतंत्र लेख

1 कशाळीकर, वृंदा 234–46
2 कांबळे, बापूराव 130–45
3 खेर, माणिक 105–13
4 खेर, सी. पं. 45–54
5 खुरुद, भागचंद्र 114–29
6 दास्ताने, संतोष 271–80
7 देशपांडे, विनायक श्रीधर 227–33, 309–19
8 दोशी, रवीन्द्र 91–104
9 पुजारी, आ. गो. 141–58
10 बुरंगे, लक्ष्मण 213–26
11 भानुशाली, सु. गो. 341–49
12 मस्तकार, संजय 271–80
13 म्हस्के, बी. एस. 55–60
14 सातव–मतकर, शर्मिष्ठा 247–66
15 सोवनी, नी. वि. 1–44

## अध्यक्षीय भाषण

1 माने, शि. ना. 295–308

## ग्रंथ परीक्षण

1 केळकर, किर्ती 63–69

## संवाद

1 खांदेवाले, श्रीनिवास 61–62
2 सोवनी, नी. वि. 281

## अर्थ शब्दांची वाट पाहे

1 माने, शि. ना. 146–48

## श्रद्धांजली

1 भानुशाली, सु. गो. 166–69

## आर्थिक वार्ता

1 खेर. सी. पं. 164–65
2 डेकणे, भा. रा. 159–64
3 दोशी, रवीन्द्र 325–40

## सांख्यिकी पुरवणी

1 दोशी, रवीन्द्र 171–81, 282–89
2 पाटणकर, व्यं. सु. 70–87

## अधिवेशन वृत्तांत

1 जहागिरदार. मुक्ता 354–59
2 तायडे, गुलाबराव 376–81
3 दोशी, रवीन्द्र 366–71, 372–75
4 पाटणकर, व्यं. सु. 360–65
5 मोडक, शं. के. 350–53

## विषयांची रूपरेषा

1 जहागिरदार, दि. व्यं. 385–89
2 पोरे, कुमुद 382–85
3 भानुशाली, सु. गो. 390–92


# (इ) अंकांचा तपशील

| अंक | तिमाही | पृष्ठे |
|---|---|---|
| 1 | एप्रिल–जून 1995 | 1–90 |
| 2 | जुलै–सप्टेंबर 1995 | 91–184 |
| 3 | ऑक्टोबर–डिसेंबर 1995 | 185–294 |
| 4 | जानेवारी–मार्च 1996 | 295–396 |

□ □

## चुकीची दुरुस्ती

'अर्थसंवाद', ऑक्टोबर–डिसेंबर 1995, खंड 19, अंक 3 मध्ये दास्ताने-मस्तकार या लेखकद्वयांचा 'चिंतामणराव देशमुख : आर्थिक प्रशासक' हा लेख छापला आहे. त्यामध्ये मुद्राराक्षसाचा एक दोष आहे. त्याची दुरुस्ती पुढीलप्रमाणे :

पृ. 275, रकाना 2 वरून आठवी ओळ : "असे अनुदार उद्गार **चिंतामणरावांनी** जाहीरपणे काढले." याऐवजी "---असे अनुदार उद्गार **कृष्णम्माचारींनी** जाहीरपणे काढले." असे दुरुस्त करून वाचावे.

**प्रमुख संपादक**

# अर्थसंवाद

## पूर्वीच्या अंकांतील लेखांच्या झेरॉक्स प्रती

ज्या अभ्यासकांना 'अर्थसंवाद' च्या खंड 1, अंक 1 पासून तो आजपर्यंतच्या 'अर्थसंवाद' मधील कोणत्याही अंकातील एखाद्या लेखाची प्रत झेरॉक्स करून पाहिजे असेल तर ती करून पाठविण्याची सुविधा 'अर्थसंवाद' कडून सुरू केली जात आहे. त्यासाठी केवळ झेरॉक्स करण्याचा खर्च संबंधितांकडून आकारला जाईल. अभ्यासकांना पूर्वीचे अंक पुरविता येत नसल्याने ही पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचा फायदा अभ्यासकांनी जरूर घ्यावा.

**प्रमुख संपादक**

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन फॉर्म 4, नियम 8 नुसार

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | प्रकाशन स्थळ | : | 'मराठी अर्थशास्त्र परिषद', द्वारा / प्रा. गुलाबराव पं. तायडे, 9, नहुष सहकारी गृहनिर्माण संस्था, गंगापूर रस्ता, नाशिक 422 005 |
| 2 | नियतकाल | : | त्रैमासिक |
| 3 | मुद्रकाचे नाव | : | गुलाबराव पं. तायडे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 9, नहुष सहकारी गृहनिर्माण संस्था, गंगापूर रस्ता, नाशिक 422 005 |
| 4 | मुद्रण स्थळ | : | हेमंत मुद्रण, 26, प्रतिभानगर मार्केट, कोल्हापूर 416 008 |
| 5 | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. 3 प्रमाणे |
| 6 | संपादकाचे नाव | : | रवीन्द्र रा. दोशी |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर 416 004 |
| 7 | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई 400 014 |

मी, गुलाबराव पं. तायडे, असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**गुलाबराव पं. तायडे**
मुद्रक व प्रकाशक

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सदस्यांची यादी

**(ऑक्टोबर–डिसेंबर 1995 अंकावरून पुढे चालू)**

717 प्रा. इंदुमती गोविंदराव शेळके, लोणी, खुर्द (जिल्हा अहमदनगर)

718 प्रा. जे. के. पवार, कोल्हापूर

719 प्रा. बाळासाहेब मारुती जाधव, मांगूर (जिल्हा बेळगांव)

Registration No. R. N. 31918/77

With Best Compliments From

**Ask Consultants**

'Arvind Smruti'
Near Abhinav Vidyalaya,
Nal Stop,
Pune 411 004

With Best Compliments From

**Herringer Bright Chemicals Pvt. Ltd.**

'Manas'
Model Colony,
Pune 411 016
Tel. No. 355090

प्रा. मु. पं. तायडे यांनी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या संस्थेकरिता हे त्रैमासिक हेमंत मुद्रण, 26, प्रतिभानगर मार्केट, कोल्हापूर – 416 008, येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद', द्वारा : 9, नहुष सहकारी गृहनिर्माण संस्था, गंगापूर रस्ता, नाशिक – 416 005 येथे प्रसिद्ध केले.



# आमचे ग्राहक आम्हाला मोलाचे वाटतात.
# बहुमोलाची सेवा देणं ही आम्ही बांधिलकी मानतो.

सातत्यानं बदलत राहणाऱ्या ग्राहकांच्या आमच्या -विषयीच्या अपेक्षांशी मिळतीजुळती सेवा देण्यामध्ये आम्ही नेहमी प्रयत्नशील असतो.

- आमच्या सेवासुविधांमध्ये भरपूर योजनांची रेलचेल असून यातली प्रत्येक योजना ग्राहकांच्या खास गरजांशी तंतोतंत मिळतीजुळती अशीच आखली गेली आहे.
- आम्ही नेहमीच आमच्या ग्राहकांना केन्द्रस्थानी ठेविले आहे म्हणून आम्ही देशाच्या दुर्गम अशा कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलो आहोत.
- 2021 शाखांचे जाळे आणि 5 लाखाहून अधिक अभिकर्ता -द्वारा आम्ही आमच्या सेवायोजना ग्राहकांच्या थेट दारापर्यंत पोहोचवितो.
- 215645.27 कोटीहून अधिक रकमेचा विमा उतरविला गेलेल्या 659.30 लाखाँहून अधिक विमापत्रांचे व्यवस्थापन आता आमच्याकडून केले जाते.
- केवळ 1994-95 या आर्थिक वर्षात 108.88 लाख नव्या पॉलिसींवर 55472.12 कोटी रुपयाचा विमा उतरविण्यात आला.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करून आम्ही कार्यक्षम ग्राहक सेवा देतो.

39 वर्षे जनतेची निष्ठापूर्वक सेवा.

कुटुंब संरक्षणाचा ध्वजधारक

भारतीय आयुर्विमा महामंडळ

Modern LIC/105/96/Bom/Mar.